आंतरभारतीय पुस्तकमाला

श्वेत रक्त

नानकसिंह

अनुवादिका

डॉ. उर्मिला जावडेकर

नेशनल बुक ट्रस्ट, इंडिया

पहिली आवृत्ती : 1972 (शके 1893)
चौथी आवृती : 1990 (शके 1912)

Original Title : CHITTA LAHU (Punjabi)
Marathi Translation : SHWETA RAKTA
रू. 12.00
संचालक : नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया,
ए-5 ग्रीन पार्क, नवी दिल्ली-110 016 द्वारा प्रकाशित.

भूमिका

सामाजिक गतीबरोबरच मानवी व्यवहाराच्या स्वरूपावरील विचारसरणीतही वृद्धी होते. एका जातीची दुसऱ्या जातीवरील जबरदस्ती, एखाद्या मनुष्याचा एखाद्या अबलेवर बलात्कार करण्याचा प्रयत्न करणे आणि दुसऱ्या एखाद्या माणसाने स्वाभिमान आणि परोपकाराच्या भावनेने प्रेरित होऊन तिच्या रक्षणासाठी जिवाची कुरवंडी करण्यास तयार होणे ह्यासारख्या समस्या पूर्वी लेखकांसमोर असत. पण हल्लीचे सामाजिक जीवन इतके साधे आणि सरळ राहिले नाही. त्यातील समस्याही इतक्या सोप्या राहिल्या नाहीत. विद्या आणि परस्परसंबंधवृद्धीमुळे त्यात निरनिराळ्या गुणावगुणांचे मिश्रण झाले आहे, आणि मानवी आचरण अधिकच जटिल होऊन बसले आहे.

कादंबरीकाराचे काम केवळ कथानकनिर्मिती एवढेच नसून कथानकाच्या परिस्थितीस अनुसरून प्रत्येक पात्राची निर्मिती करणे हेही आहे. सामाजिक आचरण आणि त्याच्या संपर्कात येणाऱ्या स्त्री-पुरुषांचे व्यक्तिगत जीवन इतके जटिल झाले असेल तर त्याबरोबरच कादंबरीकाराचे काम कठिण झाले आहे. सफल कादंबरीकारामध्ये मानवी आचरणास समजून घेण्याची पात्रता असली पाहिजे. त्याला हिंदू म्हटले म्हणजे ते बावरट, मुसलमान तेवढे विलासी आणि शीख म्हटला की कट्टर गुरुमुखाभिमानी दिसता कामा नये. हिंदु-मुसलमान लोकांतही चांगली, प्रामाणिक माणसे असू शकतात आणि शीखधर्मातही वाईट माणसे असू शकतात हे समजून घेण्याची पात्रता त्याच्या अंगी असली पाहिजे. लेखकास एखाद्या विद्येचे ज्ञान असले की पुरते, परंतु कादंबरीकारास धर्म, तत्त्वज्ञान (विशेषकरून मनोविज्ञान), इतिहास, भूगोल, विज्ञान, साहित्य आणि समाजाच्या सर्वसाधारण ज्ञानाबरोबरच अन्य समाजाबद्दलही सहानुभूतिपूर्ण परिचय असणे अत्यावश्यक असते.

हा परिचय तावडतोब होऊ शकत नाही. म्हणूनच कादंबरी साहित्याच्या इतर प्रकारानंतर प्रकट होते. सामाजिक परिस्थिती एका विशिष्ट स्थितीप्रत जाणे कादंबरीच्या सृजनास आवश्यक असते. ज्या जमातीत स्त्रियांची स्थिती अतिशय निम्नस्तरास पोहोचली असेल, ज्या जमातीत सामाजिक जीवनाचा अद्याप इतका विकास झालेला नाही, त्या जमातीत कादंबरीनिर्मिती कशी होईल? स्त्रीपुरुषांचा संबंध गुलाम व मालकासारखा नसणे, त्यांच्या पारस्परिक अधिकारांत समानता असणे, व जी काही

वैगुण्ये राहिली असतील ती सुधारण्याची आशा असणे, त्याचप्रमाणे एका जातीची दुसऱ्या जातीवर शिरजोरी नसणे, इत्यादी गोष्टी सामाजिक व्यवहारात अत्यावश्यक आहेत. उन्मुक्त वातावरण, निदान त्याची अपेक्षा सर्व समाजास चैतन्यमय राखते.

पूर्वी आमच्या देशात अशी स्थिती नव्हती. आता हळूहळू या स्थितीचा उदय होत आहे, म्हणूनच कादंबरीवाङ्मयही हळूहळू सृजन पावत आहे. समाजाच्या पतनावस्थेत ज्या कादंबऱ्या लिहिल्या जात त्यांचा समाजसुधारणा हाच विषय असे. उदा०—भाई विरसिंहजींची 'सुभागजी का सुधार' ही कादंबरी घ्या. ह्यामध्ये स्त्री-जातीच्या दुःखाचे वर्णन केले गेले आहे. बाबा नौधसिंहाचे चरित्र केवळ आदर्श चरित्र नसून त्यात अशा निःपक्षपातीपणाचे आणि सहानुभूतीचे वर्णन केले गेले आहे, की बाबा अगदी जगन्मित्र वाटतो. त्याच्या व्यक्तिमत्त्वात असलेले विशेष गुण त्यास इतर पात्रांपासून वेगळे वैशिष्ट्य प्राप्त करून देतात. म्हणूनच ही कादंबरी भाईसाहेबांच्या पूर्वीच्या इतर कादंबऱ्यांपेक्षा अधिक उच्च दर्जाची व खऱ्या अर्थाने कादंबरी आहे.

भाई नानकसिंहजींच्या कादंबऱ्या सुद्धा समाजसुधारणेसंबंधीच आहेत. आपल्या 'मीठा मदुरा', 'प्रेम संगीत', 'काल चक्कर' ह्या कादंबऱ्यांच्या निर्मितीमुळे पंजाबी साहित्यसृष्टीत त्यांनी अमाप लोकप्रियता मिळविली. पण प्रस्तुत कादंबरी 'श्वेत रक्त' यामध्ये तर त्यांनी अभूतपूर्व कमाल करून सोडली आहे. प्रथम समाजाचा एखादाच दोष पुढे करून ते कादंबरी लिहीत असत. पण आता तर त्यांनी आपल्या बळकट हातांनी समाजाला गदागदा हलवून सोडले आहे आणि सर्व बाजूंनी समाजावर प्रहार केले आहेत. ही कादंबरी देशाच्या कानाकोपऱ्यात घुसली तर पुष्कळच समाजसुधारणा होऊ शकेल. अज्ञान, अस्पृश्यता, अंमली पदार्थांचे सेवन, विवाहपद्धतीमधील दोष, स्त्रीजातीवरील विशेषतः विधवांवरील अत्याचार, गुरुद्वाऱ्याबद्दल औदासिन्य, कलह, खून, खटले, कपटीपणा, आदी गोष्टींची गुंफण कथानकात इतक्या सुंदर रीतीने झाली आहे, की वाचकांवर त्याचा तात्काळ परिणाम झाल्याशिवाय राहणार नाही. ह्या कादंबरीचा नायक, नायिका, आणि दुसऱ्या पात्रांच्या चित्रणातही औचित्य, अनुभव आणि कलात्मकतेचा परिचय मिळतो.

एका कलंदराने—डोंबाऱ्याने वाढविलेली मुलगी–सुंदरी, गुरु सिक्खीची विद्या प्राप्त करून बचनसिंहाच्या सहवासाने उच्च व्यक्तिमत्त्व प्राप्त करून घेते; परंतु कलंदर आणि माकडांचा प्रारंभिक सहवास वारंवार तिला अवनतीकडे खेचत असतो. बचनसिंहाचा प्रभाव तिला समाजसेवेच्या दिशेने प्रेरित करतो, तर तिचे पूर्वसंस्कार आणि समाजाच्या अत्याचारांची आठवण तिला वारंवार सुडाच्या भावनेकडे प्रेरित करीत असते. हा सत आणि असत प्रवृत्तींचा संघर्षच ह्या व्यक्तिरेखेच्या सौंदर्याचे वैशिष्ट्य होय.

पंडित राधाकृष्ण यांचे चित्रण अतिशय सूचक आणि हास्यरसाने परिपूर्ण झाले आहे. तो भायत्या बिळावरील नागोबा, लोकांच्यासमोर सोवळेपणाचे ढोंग करणारा पण आत मुसल्मानाबरोबर बसून एकाच थाळीत जेवणारा ढोंगी ब्राह्मण होता. गावात होणाऱ्या लांड्यालबाडया, चोऱ्यामाऱ्या इ. सर्व योजना त्याच्याच सल्ल्याने आखल्या जात. तरीसुद्धा त्याचे नेतृत्व कायम राहात असे.

सर्वांत अधिक सहानुभूती वृद्ध कलंदर रोडूबाबाकडे दाखविली गेली आहे. नीच जातीत आढळून येणाऱ्या नैसर्गिक प्रेमाचे तो एक आदर्श उदाहरण आहे. एक काळ असा होता, की आपल्या मुलांचे लाड करताना पाहून रोडू लोकांना हसत असे. पण जेव्हा त्याला एक निष्पाप बालिका रस्त्यात पडलेली सापडली तेव्हा किती अल्पावधीतच तो तिच्या मोहात गुरफटून गेला आणि शेवटपर्यंत तिच्याच प्रेमात लीन राहिला! या प्रेमानेच त्याचा कायाकल्प झाला आणि त्याच्या रानटी मनोवृत्तींमध्ये उच्च भाव आणि जबाबदारीची जाणीव निर्माण झाली, हे अतिशय कौशल्याने लेखकाने दाखविले आहे.

हेच कौशल्य लेखकाने दुसऱ्या पात्रांच्या चित्रणातही दाखविले आहे. लेखकाच्या दृश्य चित्रणातसुद्धा हेच कौशल्य आढळून येते. देशातील लेखकांची दुर्दशा, निष्पाप सुंदरीसाठी कलंदर करीत असलेली लोकांची आर्जवे, तिच्यासाठी गाणारी अंगाईगीते, पालासिंहाच्या बदमाष मंडळींचे भांग घोटणे, धर्मशाळेत क्षुल्लक कारणावरून जाट लोकांमध्ये होणारी मारामारी, अनवरचा मुजरा, विशेषतः सुंदरीचे अनवरजवळ जाऊन 'मांजी मांजी' असे दोनच शब्द बोलून तिच्या जीवनात क्रांती घडवून आणणे इत्यादी दृश्ये इतक्या कौशल्याने चित्रित केली गेली आहेत, की पंजाबी साहित्यात त्यांना तोड नाही.

भाषा आणि शैलीसुद्धा उच्च दर्जाची आहे. कादंबरीचा प्रारंभ मोठ्या विचित्र ढंगाने केला आहे. विनोद-निर्मितीच्या वेळी लेखकाने भाषा अतिशय संयत आणि सभ्य वापरली आहे. दुःखद प्रसंगांचे वर्णन करताना भाषेत गांभीर्य आणि आवेशाचे तारतम्य चांगले संभाळण्यात आले आहे. विद्वत्तापूर्ण भाषा लिहिण्यात कौशल्य दाखविले गेले आहेच, पण जाट आणि शेतकऱ्यांच्या घरगुती, खेडवळ भाषेचा प्रयोगही हुबेहूब केला गेला आहे. वाक्प्रचार-म्हणींचा प्रयोग आणि काही अस्सल शब्द लेखकाच्या प्रांताचा ताबडतोब परिचय देतात.

नानकसिंहाच्या शैलीचे आणखी एक वैशिष्ट्य आहे. त्यामुळेच त्यांचे साहित्य इतक्या उच्च कोटीला पोहोचले आहे. ते वैशिष्ट्य म्हणजे नाट्यमय उपरोध (Drāmatic Irony) किंवा सांकेतिक विनोदाचा उपयोग. यामुळे गोष्टीची परिणामकारकता अधिक वाढते. राधाकृष्ण यांच्यासारखे सोवळे ब्राह्मण मुसल्मानाच्या हातचेच काय, पण त्याच्या स्वयंपाक्याने तयार केलेले पदार्थही खातात, त्याच्या उष्ट्या ग्लासातील दारूसुद्धा पितात.

आपल्या लेकी-सुना विधवा झाल्या तर त्यांच्यासाठी घरात जागा नाही, समाजात त्यांना मान नाही, पण तीच विधवा जेव्हा मुसलमान वेश्या बनून एखाद्याच्या घरी येते तेव्हा पंडितजींसारखे समाजाचे धुरीण समजले जाणारे लोकसुद्धा तिच्या घराच्या उंबरठ्यावर नाक घासीत, लाळ घोटीत बसतात. एखाद्या हरिजनाच्या प्रणाम करण्याने देवाचा प्रसाद अपवित्र होतो पण कुत्रा आत येऊन थेट मांडीवर बसला तरी तो अपवित्र होत नाही. एका अस्पृश्य मुलीशी (सुंदरीशी) संबंध ठेवल्यामुळेच पालासिंह बचन-सिंहाचा सतत विरोध करीत असतो आणि दुसऱ्यांनाही त्याच्या विरुद्ध भडकवीत असतो. परंतु स्वतः तिच्याशी लग्न करण्याची इच्छा प्रकट करताना म्हणतो, 'अरे, या फालतू गोष्टी जाऊं दे, शिखांचा या समजुतींशी, शंकांशी काय संबंध!'

ही कादंबरी एक जबरदस्त शोकांतिका (ट्रेजेडी) आहे, वाचकांच्या मनावर ती खोलवर परिणाम करते. पार्लमेंटने केलेल्या कायद्यांनी जे काम झाले नाही ते डिकन्सच्या कादंबऱ्यांनी केले असे म्हणतात. आता ही कादंबरी समाजातील अपवित्र श्वेत रक्त काढून त्यात किती लालभडक शुद्ध रक्त भरते, पाहू या.

तेजासिंह

अपूर्ण प्रकरण

'संतरी, इस बदमाशको खडा रखो।'

तिकीट-चेकरने ओरडून सांगितले आणि तो दुसऱ्या प्रवाशांची तिकिटे तपासू लागला. सायंकाळचा सातचा सुमार झाला होता. यात्रेकरू आपापली तिकिटे दाखवून फाटकाबाहेर पडत होते. शिपायाने त्या मुसाफिराचा खांदा पकडून त्याला जोरात खेचले व फाटकाजवळ एका बाजूला उभे केले. त्याच वेळी त्या यात्रेकरूच्या लांबलचक मळक्या कोटाच्या फाटक्या खिशातून चिंध्या झालेले एक कागदाचे पुडके खाली पडले. त्याने ते पटकन उचलून हातात धरले.

त्या तरुण मुशाफिराजवळ काहीच सामान नव्हते. वेषभूषेवरून तो शीख असावा. असेल सतरा-अठरा वर्षांचा. अजून मिसरूडसुद्धा फुटली नव्हती. त्याचा शर्ट गळ्या-जवळ थोडासा फाटला होता. तीच स्थिती त्याच्या लांबलचक काळ्या कोटाची होती. कोटाला ठिकठिकाणी नाड्या बांधल्या होत्या. बटनांची काजी फाटून फाटून अधिकच रुंदावली होती. त्यांना जाड पांढऱ्या धाग्याच्या शिवणी घातल्या होत्या. कोटाला बटनांचा पत्ता नव्हता. थंडीपासून संरक्षण करण्यासाठी आमच्या यात्रेकरूने काजांमध्ये दोरा ओवून वेळ साजरी केली होती. कोटाचा एक खिसा पार फाटला होता. नशीब, दुसरा शाबूत होता. मुशाफिराच्या रेखीव आणि गोऱ्यापान शरीराचा प्रत्येक अवयव गरिबी, निराशा आणि लज्जेची साकार मूर्ती बनला होता.

त्या शिपायाच्या हस्तस्पर्शाने प्रवासी नखशिखान्त थरारून गेला. त्याच्या डोळ्यां-देखत शेकडो प्रवासी तिकिटे देऊन निघून गेले होते पण तिकीट-चेकरने जसे त्याला धारेवर धरले होते तसे दुसऱ्या कोणालाच धरले नव्हते. लोकांच्या कुत्सित नजरेपासून बचावण्यासाठी तो थोडेसे पुढे जाऊन फाटकाकडे पाठ वळवून उभा राहिला. शिपायाला वाटले, हा पळून जाण्याचा प्रयत्न करीत आहे की काय? त्याने डोळे वटारून त्याला धमकावले, 'क्यों बे साले, कुठे चाललास? मुकाट्याने आपल्या जागेवर उभा राहा, नाहीतर मारून मारून चामडी लोळवीन तुझी, सांगून ठेवतो.'

मुशाफिर मुकाट्याने परत आपल्या जागेवर जाऊन उभा राहिला. जवळ जवळ पाऊण तासानंतर सर्व प्रवासी निघून गेले. तेव्हा तिकीट-चेकरचे त्याच्याकडे लक्ष गेले. त्याने दरडावून म्हटले, 'चल रे चोरा, टाक एक रुपया दहा आणे.' तिकीट-चेकरने तोंड उघडण्यापूर्वीच मुशाफिर आपल्या कोटाच्या खिशात हात घालून काही तरी

चाचपडत होता. त्याच्याजवळ जाड कडा असलेले तांब्याचे एक शुभ्र नाणे होते. तहानेने माणसाचा जीव जात असावा आणि त्याच्यासमोर एक पाण्याची छोटीशी वाटी ठेवावी, ती सुद्धा खाऱ्या पाण्याची. अगदी अशीच स्थिती त्या गरीब बिचाऱ्या मुशाफिराची झाली होती. त्याच्या खिशात फक्त एक खोटे चार आण्याचे नाणे निघाले.

मुशाफिराने अगदी मृदू आवाजात घाबरत घाबरत म्हटले, 'साहेब! माझ्यावर दया करा. मी फार गरीब आहे हो. पुष्कळ खटपट करूनसुद्धा मी भाड्याचे पैसे जमवू शकलो नाही. म्हणूनच तिकिटाशिवाय प्रवास करण्याची पाळी आली माझ्यावर.'

तिकीट-चेकरने उपहासाने आणि तिरस्काराने म्हटले, 'बरोबर आहे! म्हणे भाड्यासाठी पैसे नव्हते. गाडी तुझ्या बापाची आहे नाही का? फुकटात प्रवास करताना तुरुंगाच्या मीठभाकरीची आठवण झाली नाही का रे चोरा?'

जवळच उभा असलेला शिपाई म्हणाला, 'साहेब, तुम्हांला वाटते की ह्याच्याजवळ भाड्यासाठी पैसे नाहीत. मला वाटते ह्याची झडती घ्यावी, म्हणजे कळेल हा खरंच गरीब आहे की ढोंगी आहे ते.'

शिपायाच्या म्हणण्याला पुष्टी देत तिकीट-चेकर म्हणाला, 'मला काय माहीत नाही की काय! ह्या लोकांचा आजकाल हा धंदाच झाला आहे. फुकटात प्रवास करावा आणि भेटलाच कोणी बावळट पैसेवाला तर त्याला लुबाडून पुढे जावे.' मुशाफिराकडे वळून तो दरडावून म्हणाला, 'आता बऱ्या बोलाने भाडे देतोस की फाडू पावती?'

भीतीमुळे मुशाफिराचे रक्त गोठले होते. त्याच्या चेहऱ्यावरील भाव क्षणाक्षणाला पालटत होते. दोन-तीनदा त्याने बोलण्याचा प्रयत्न केला पण जीभ जणू टाळ्याला चिकटून बसली होती. शेवटी जिवाचा धडा करून तो म्हणाला, 'साहेब, मी चोर-लफंगा नाही, एक संकटग्रस्त गरीब मनुष्य आहे. फुकटात प्रवास करण्याचा गुन्हा माझ्या हातून घडला आहे खरा. आपण मला वाटेल तिकडे नेऊ शकता, पण कृपा करून असे शब्द वापरून माझ्या काळजाला भोके पाडू नका हो!' बोलता बोलता त्याचे डोळे अश्रूंनी डबडबून आले.

तिकीट-चेकरचे कान फुकट्या प्रवाशांची अशा तऱ्हेचीच काय पण ह्यापेक्षाही अधिक काकुळतीची बोलणी ऐकण्यास चांगले सरावले होते. म्हणूनच त्याने बेफिकिरीने त्याचे म्हणणे ऐकले. पण त्याची नजर त्या प्रवाशाच्या डोळ्यांकडे जाताच तो चकित झाला. मुशाफिराच्या टपोऱ्या डोळ्यांत रक्त साकळले होते. रागाने आणि तिरस्काराने त्याचे ओठ थरथरत होते. त्याचा गोरापान चेहरा लालबुंद झाला होता.

शिपायाचे हृदय कदाचित अधिक कठोर असावे. त्यामुळे त्याने ह्या गोष्टीकडे लक्ष दिले नाही. पण त्या प्रवाशाच्या चार करुण शब्दांनी तिकीट-चेकर मात्र विरघळला.

अरेरे, उगीच आपण बिचाऱ्यास दुखावले. तो टक लावून मुशाफिराच्या डोळ्यांकडे पाहात राहिला. त्या दोन डोळ्यांचा त्याच्यावर जादूसारखा परिणाम घडत होता.

मुशाफिर कधी हातात पकडलेले पुडके काखेत दाबून धरीत होता, कधी ते कोटाच्या खिशात कोंबत होता. पण दुसऱ्या खिशाप्रमाणे हाही खिसा फाटून जाईल ह्या विचाराने पुन्हा ते पुडके खिशातून काढून हातात काळजीपूर्वक धरून ठेवीत होता.

'चल माझ्याबरोबर' असे म्हणून तिकीट-चेकरने आपला चार्ज दुसऱ्या तिकीट-चेकरकडे दिला आणि तो स्टेशनाबाहेर पडला. त्याची ड्यूटी संपली असावी. प्रवासीही त्याच्या पाठोपाठ चालू लागला. आता त्याला हा तिकीट-चेकर आपल्याला स्टेशन-मास्तरकडे घेऊन जातो की पोलिस-चौकीवर नेतो ह्याची मुळीच काळजी वाटत नव्हती. पण स्टेशनाबाहेर पडून तिकीट-चेकर एका मैदानात हिरवळीवर येऊन बसलेला पाहून त्याला मोठे नवल वाटले. त्याने मुशाफिरालाही बसण्याचा संकेत केला. तिकीट-चेकरने परत एकदा त्याच्याकडे न्याहाळून पाहात विचारले, 'कोठून आलास तू ?'

'लाहोरहून.'

'घर कोठे आहे ?'

'इथेच अमृतसरमध्ये.'

'आश्चर्याची गोष्ट आहे मोठी. अमृतसरमध्ये घर आहे आणि तुझ्या खिशात दहा आणेसुद्धा नाहीत ? काम काय करतोस ?'

ह्या प्रश्नाचे उत्तर देणे त्याला संकटच वाटले असावे. क्षणभर विचार करून तो म्हणाला, 'काही नाही.'

तिकीट-चेकरने आश्चर्याने विचारले, 'अं, काही नाही ? मग पोटा-पाण्याचे काय ?' तिकीट-चेकरने परत एकदा त्याच्याकडे संशयित नजरेने पाहिले. पण त्याचा चेहरा निष्पाप होता. तेथे संशयाला तिळमात्र जागा नव्हती. त्याच्या डोळ्यांत असे काही गूढ आकर्षण होते की तिकीट-चेकर अगदी भारून गेला. त्याच्या सुप्त भावना जाग्या होऊ लागल्या होत्या.

मुशाफिर म्हणाला, 'कसं सांगू मी कसं पोट भरतो ते ?' थोडा वेळ थांबून तो म्हणाला, 'साहेब, खरंच मृत्यू ही किती वाईट गोष्ट आहे ! मनुष्य मृत्यूला किती घाबरतो ! ईश्वराने मानवाला, विशेषकरून माझ्यासारख्या माणसाला, किती धीट आणि निर्लज्ज बनविले आहे ! सर्वस्वाचा होम झाल्यावरसुद्धा, इतके अपमान आणि जुलूम झाले असतानाही माझ्या मनात जगण्याची इच्छा आहे. धिक्कार असो माझा आणि माझ्या जीवनाचा !' बोलता बोलता त्याचा गळा दाटून आला. त्याच्या अंतिम

वाक्यांनी तिकीट-चेकरच्या मनावर अधिकच खोल परिणाम घडला. त्याने मुशाफिराला धीर देत म्हटले, 'सरदारजी, धीर धर. मला वाटतं तुला कसल्या तरी भीषण संकटाने घेरले आहे. माझ्याकडून शक्य आहे तितकी मदत करण्यास मी तयार आहे.'

प्रवासी परत गहन विचारांत गर्क झाला. तिकीट-चेकरच्या बोलण्याकडे दुर्लक्ष करीत, एक खोल सुस्कारा टाकून तो म्हणाला, 'महाशय, माझ्या बाबतीत हे चांगले झाले नाही. तुम्ही मला पोलिसांच्या ताब्यात द्यावयास पाहिजे होते. संध्याकाळच्या आधीच मी तुरुंगाची हवा खात पडलो असतो. माझ्या बाबतीत...असेच घडावयास पाहिजे होते.'

त्याच्या बोलण्याचा अर्थ समजून घेण्यासाठी तिकीट-चेकरने परत त्याच्या तोंडाकडे पाहिले. ह्याचे डोके-बिके तर फिरले नाही ना असेच त्याला वाटले. त्याने पुन्हा पुन्हा विचारले, 'माझ्या बाबतीत हेच ठीक होते याचा अर्थ काय?'

मुशाफिराने हातात धरलेल्या कागदाच्या पुडक्याकडे पाहून म्हटले, 'माझ्या ह्या कादंबरीचे अपूर्ण प्रकरण तरी पूर्ण झाले असते.'

तिकीट-चेकर म्हणाला, 'बाबा रे, सारं काही नीट समजावून सांग बघू. मला काही-मुद्धा कळलं नाही.'

प्रवासी म्हणाला, 'महाशय, मी ह्या शहरात भगतांवाल्या दरवाजाच्या आत एका मोडकळीस आलेल्या खोलीत राहतो. तिचे भाडे दरमहा फक्त आठ आणे आहे. पण हेच आठ आणे माझ्या लेखी आठ रुपयांप्रमाणे आहेत. मी एक सामान्य लेखक आहे. पण माझा हा धंदा नाही. काही दिवसांपासून माझ्या मनात लेखनाची आवड निर्माण झाली. ह्याच्या पूर्वीच मी काही पुस्तके प्रकाशकांना दिली आहेत, ती प्रसिद्धही झाली आहेत. ह्याशिवाय काही मासिकांतून माझ्या लघुकथाही प्रसिद्ध होतात. लोक त्यांची अतिशय प्रशंसा करतात हे खरे, पण केवळ प्रशंसा घेऊन मी काय करू? कोणीही माझ्या हातावर चार-दोन पैशांशिवाय अधिक काही ठेवले नाही. हे पैसे माझ्या गरजांच्या मानाने अगदीच कमी पडतात.' थोडा वेळ थांबून तो म्हणाला, 'साहेब, काही दिवसांपूर्वी मी हे (हातात धरलेल्या हस्त-लिखिताकडे संकेत करून) लिहीत होतो. आजच्यासारखाच मी भणंग भिकारी होतो, फुटकी कवडीही माझ्यापाशी नव्हती. मला कोणी उधार पैसेही देत नव्हते. परवाचीच गोष्ट आहे. जेव्हा माझे कागद संपले तेव्हा माझ्या तोंडचे पाणी पळाले. ह्या कादंबरीचे अंतिम प्रकरण शिल्लक होते. मी स्वतः उपाशी राहून, उघडा बोडका राहून कसं तरी भागविले असतं, पण कागदाशिवाय एक क्षणही निभावणं कसं शक्य होतं? सबंध दिवस मी वणवण भटकलो, पण कोणीही एक चवलीसुद्धा उधार दिली नाही की कागदाचा एखादा कपटाही दिला नाही. मी अतिशय

निराश झालो. मला जीवही द्यावासा वाटला, पण पुस्तक अर्धवट राहील ह्या विचाराने म्हणा किंवा कसल्या तरी मोहाने, मी मरू शकलो नाही. असाच बाजारात फिरत असता कचऱ्याच्या ढिगाऱ्यात मला काही मळके कागद दिसले. एखाद्या शाळकरी पोराने रद्दी वही फेकली असावी. मी ते कागद उचलून पाहतो तो सर्व ओले झाले होते. त्यांतील काही कागदांवर एका बाजूला लिहिलेले होते तर दुसरी बाजू कोरी होती. पण शाई पसरल्यामुळे तेही रंगीत झाले होते. मी सर्व कागद गोळा केले आणि आपल्या खोलीत आणून आगीच्या धगीत ते वाळविले. कागद मिळाले हेच पुष्कळ झाले. त्या कागदांवर मी सतत सहा-सात तास लिहीत होतो. दुसऱ्या दिवशी लिहिण्यासाठी एकही कागद उरला नाही. त्यावेळी माझी कादंबरी जवळ जवळ संपत आली होती. तिचे अखेरचे प्रकरणही निम्मे लिहून झाले होते. कादंबरी विकण्याची मला घाई झाली होती. लौकरात लौकर ही विकून पुष्कळ पैसे मिळवून आपले कर्तव्य पूर्ण करावे अशी माझी उत्कट इच्छा होती. ते कर्तव्य काय होते ते नाही मी सांगू शकत. मी अगदी अधीर झालो होतो. मनात विचार केला की, ही कादंबरी आपल्या पहिल्या सर्व साहित्यापेक्षा अधिक सरस आहे, तेव्हा लाहोरला जाऊन एखाद्या चांगल्या जाणकार प्रकाशकास ती दाखवावी. पण पैशाशिवाय लाहोरला जाणं काय नि कलकत्त्याला जाणं काय मला सारखंच होतं. काल कशीबशी मी एका रुपयाची व्यवस्था केली पण ज्याने मला रुपया दिला होता तो जुगाऱ्यांचा सावकार होता. त्याने रुपया देऊन माझ्याकडून दोन रुपयांची पावती घेतली. मी आज सकाळपासून उपाशी आहे. ही अपुऱ्या प्रकरणाची कादंबरी घेऊन मी लाहोरला निघालो. माझा विचार होता जेव्हा कोणाबरोबर सौदा होईल तेव्हा त्याच्याचकडून कागद घेऊन राहिलेला भाग तेथेच एखाद्या बागेत बसून पूर्ण करावा आणि मगच जेवावे. तिकीट काढून मी लाहोरला पोहोचलो. अनेक दुकानदारांकडे खेटे घातले. म्हटलं, ज्याला ही कादंबरी दाखवीन, त्याला ती एकदा आदीपासून अंतापर्यंत वाचून दाखवावी, म्हणजे प्रकाशक प्रभावित होईल व चांगले पैसे मिळतील. पण माझी ती रद्दी फाटकी-तुटकी वही पाहूनच ते घाबरून जात आणि जास्तीत जास्त दहा-पंधरा रुपये देण्यास तयार होत. माझ्या गरजा ह्या एवढ्याशा रकमेत कशा पूर्ण होणार ? तात्पर्य हे की, मी सारा दिवस वणवण केली पण माझे पुस्तक विकले गेले नाही. आता अमृतसरला कसे परतावे ही माझ्यापुढे बिकट समस्या होती. भुकेने डोळ्यांपुढे काजवे चमकत होते. त्यावेळेस माझ्याजवळ फक्त चवली होती. मी एका तंदूरवर (खानावळीवर) जाऊन चवलीचे जेवण मागविले. पण पैसे देताना माझी त्रेबडी वळली. चवली माझ्या नशिबाप्रमाणेच खोटी निघाली. तंदूरच्या मालकाने ती माझ्या तोंडावर फेकली. तेथेच दुसरी काही

माणसे जेवीत होती. माझी कीव करून सहानुभूती दाखविण्याऐवजी ती माझ्याकडे बघून टवाळी करीत होती, मला वाटेल ते टोमणे मारीत होती. तंदूरवाल्याने मला उभे-आडवे ताणले. माझा अगदी निरुपाय होता. माझ्या खिशात एक रेशमी रुमाल होता. तुम्हांला कसं सांगू, तो माझ्या लेखीं किती बहुमूल्य होता ते.' सांगता सांगता परत त्याला गहिवरून आले. 'हा रुमाल म्हणजे माझ्या जीवनाच्या खर्च झालेल्या कमाईचा उरलासुरला भाग होता. हृदयावर दगड ठेवून मी चार आण्याला तो रुमाल तंदूरवाल्याच्या हवाली केला. हातांतून रुमाल सोडताना एक मनमोहक चेहरा डोळ्यांसमोर तरळू लागला. मला वाटलं कोणी तरी सजल नेत्रांनी म्हणत आहे, 'दुष्टा, तुझं रक्तसुद्धा अशुद्ध झालं ना?' मी कसाबसा स्टेशनावर पोहोचलो आणि तिकिटा-शिवायच गाडीत चढून बसलो. गाडीत बसून वर्तमानपत्राच्या रद्दी कागदांवर आपल्या अपुऱ्या प्रकरणाचा उरलेला भाग लिहिण्यास प्रारंभ केला, पण तो पूर्ण होऊ शकला नाही. येथे पोहोचलो, तो तुमच्याच ताब्यात आलो. साहेब, म्हणूनच तुम्हांला सांगत होतो की तुम्ही मला तुरुंगाची हवा खाण्यास पाठविले असते तर माझ्या ह्या कादंबरीचे अपुरे प्रकरण अतिशय सुंदर रीतीने पूर्ण झाले असते. कारण कादंबरीचे शीर्षक आहे 'श्वेत रक्त'. ह्या कादंबरीत ज्या ज्या व्यक्तींचा उल्लेख आहे त्यांपैकी एकदोन सोडून बाकी सर्वांचे रक्त सफेद म्हणजेच अपवित्र दाखविले आहे. तुम्ही माझ्या कादंबरीचे अंतिम पात्र आहात. तुमचेही रक्त अपवित्र दाखविले असते तर ही मोठी मजेशीर शोकान्तिका झाली असती. आता ह्या अंतिम भागासाठी घडलेल्या घटना सोडून मला आणखी एखाद्या विषयाचा तपास करावा लागेल.'

मुशाफिराच्या कादंबरीचे अंतिम प्रकरण जर इतके दुःखद आहे तर ह्या पुस्तकाचा बाकीचा भाग कसा बरे असेल? ह्या विचाराने, तसेच त्याची आत्मकथा ऐकून, तिकीट-चेकरचे मन व्याकुळ झाले. त्याने मोठ्या आदर, सहानुभूती आणि प्रेमपूर्ण नजरेने परत एकदा त्यास आपादमस्तक न्याहाळले. त्याच्या हाताचे चुंबन घेऊन तो मोठ्या श्रद्धेने म्हणाला, 'सरदारजी, क्षमा करा. तुम्ही इतके महान आहात हे मला माहीत नव्हते. चला, आजची रात्र ह्या गरिबाच्या झोपडीत घालवा. तुमची हरकत नसेल तर कृपा करून तुमची कादंबरी मला ऐकवाल का? मलासुद्धा वाचनाचा अतिशय नाद आहे. कदाचित मीसुद्धा ती प्रकाशित करण्याची व्यवस्था करू शकेन. येथील अनेक प्रकाशकांशी माझी चांगली ओळख आहे.'

मुशाफिराने काही उत्तर दिले नाही, मुकाट्याने उठून तो तिकीट-चेकरच्या मागून चालू लागला. त्यानंतर तिकीट-चेकरने एकही प्रश्न विचारला नाही. थोड्याच वेळात ते दोघे घरी पोहोचले. आल्याबरोबर त्याने नोकराला बोलावून मुशाफिराच्या भोजनाची

व्यवस्था करण्यास सांगितले. कारण घरात तो एकटाच होता. भोजनानंतर दोघेजण पुढच्या खोलीत आले. चेकरने त्याला एका बिछान्यावर बसण्याचा संकेत करून म्हटले, 'सरदारजी, बसा. तुमची कादंबरी ऐकण्याची मला फार इच्छा आहे.' रात्रीचे नऊ वाजले होते. मुशाफिराने पुडक्यावर बांधलेली मळकट चिंधी सोडली, त्याबरोबर त्यातील लहानमोठे कागद त्याच्या हातांतून सुटून जमिनीवर इतस्ततः विखुरले. त्याने सर्व कागद पुन्हा एकत्र केले. सर्व पाने क्रमशः एकत्र लागल्यावर त्याने सर्वांत प्रथम शीर्षकाचे पान उचलून तिवईवर ठेवले. तिकीट-चेकरची शीर्षकावर नजर जाताच तो एकदम गडबडून खुर्चीवर उभा राहिला. कधी कधी आपल्या साहेबाला अचानक आलेला पाहिल्यावर तो असाच आदबीने उभा राहात असे. त्या पानावर काही फार मोठे शीर्षक नव्हते, फक्त एवढेच लिहिले होते :

'श्वेत रक्त'

लेखक

गुप्तेश्वर

'गुप्तेश्वर' हे नाव तिकीट-चेकरच्या रोमारोमात भिनले होते. त्याची पुस्तके तो अतिशय श्रद्धेने, प्रेमाने आणि आवडीने वाचत असे. त्यांच्या वाचनाने त्याला किती मानसिक सुख-समाधान लाभत असे. ती पुस्तके तो पवित्र धर्मग्रंथांप्रमाणे एका रुमालात बांधून ठेवीत असे.

'हाच गुप्तेश्वर आहे? ज्याचे एकेक वाक्य आकाशवाणीप्रमाणेच श्रद्धेय आहे त्या महान विभूतीच्या दर्शनाचा मला खरंच का लाभ झाला?' नाना प्रश्न त्याच्या डोक्यात थैमान घालू लागले. खुर्चीवरून उठून तो जमिनीवर बसला व दोन्ही हातांनी मुशाफिराच्या चरणांना स्पर्श करीत त्याने म्हटले, 'आपणच गुप्तेश्वर आहात? माझ्या रोमरोमांत वास करीत असलेले महापुरुष आपणच आहात का?' बोलता बोलता त्याने झटकन कपाट उघडून रुमालात बांधलेले एक गाठोडे काढले व ते त्याच्यासमोर उघडून म्हटले, 'हे सर्व तुमचेच साहित्य ना?' गाठोड्यात गुप्तेश्वराची सर्व प्रकाशित पुस्तके होती, शिवाय मासिकांतून त्याच्या नावाने छापलेल्या लेखांची कात्रणे होती.

सर्वसामान्य लेखकांच्या मनावर आत्मस्तुतीचा कैफ चढतो. पण या मुशाफिराच्या मनावर त्या प्रशंसेचा तिळमात्र परिणाम झाला नाही. पूर्ववत गंभीरपणे मान हलवून तो म्हणाला, 'होय, ही सर्व त्या परमेश्वराचीच कृपा आहे.'

शामदास बाबू (तिकीट-चेकर) आदराने गहिवरून म्हणाले, 'गुप्तेश्वरजी, खरंच किती भाग्यवान आहे बरं मी. ज्या गोष्टीचा मी ध्यास घेतला होता, तिचाच लाभ मला झाला. तुम्ही माझ्यावर किती उपकार केले आहेत. काही वर्षांपूर्वी मी अगदी कुत्र्याचे

जिणे जगत होतो. मला सर्व वाईट सवयी होत्या. मी अतिशय चैनी, विलासी होतो, आणि त्याची मला घमेंड होती. पण मी तुमचे साहित्य वाचण्यास प्रारंभ केला, आणि माझ्या जीवनात आपोआपच परिवर्तन घडून आले. मी शोधून-शोधून तुमची पुस्तके जमविली. ज्या मासिकांत तुमचे लेख आणि कथा येत असत ती सर्व मासिके मी मागवू लागलो. तुमच्या लेखनात किती आध्यात्मिकता, कारुण्य आणि सदुपदेश भरलेला असे. त्यामुळे माझ्या जीवनात आमूलाग्र बदल घडून आला. पुष्कळदा तुमच्या दर्शनाची इच्छा होत असे, खूप धावपळही केली, पण तुमचा पत्ता कोठी मिळाला नाही. प्रत्येक जण हेच सांगे की इतक्या अल्पावधीत प्रसिद्धी आणि लोकप्रियतेच्या कळसावर चढलेल्या ह्या अज्ञात लेखकास कोणीही पाहिलेले नाही. गुप्तेश्वरजी, ह्याच बैठकीत दारुडे, आणि नाना प्रकारची व्यसने असलेल्या लोकांचा अड्डा पडत असे, त्याचा मीच म्होरक्या असे. ह्याशिवाय...ती दुष्कृत्ये...आठवण झाली तरी......'

गुप्तेश्वराला त्याची अतिशय कीव आली. इतक्या मुरब्बी गुन्हेगाराने स्वतःला इतक्या लवकर सुधारलेले पाहून त्याच्या मनात शामदासाबद्दल स्नेह आणि सहानुभूती निर्माण झाली. प्रेमाने त्याचा हात धरून त्याला खुर्चीवर बसवीत तो म्हणाला, 'बाबा, हे काय ! तुम्ही मला वडिलांसारखे आहात. भाग्यवान आहात तुम्ही. स्वतःला किती लवकर पापकर्मातून खेचून वर काढलेत हे पाहून फार आनंद झाला मला. खरं म्हणजे पापाच्या दलदलीत एकदा फसले की वर निघणे जवळ जवळ अशक्यच असते. परमेश्वराची कृपाच म्हटली पाहिजे. त्यानेच तुमच्यावर दया केली.'

शामदास बाबूच्या हर्षास पारावार राहिला नाही. पण तसेच थोड्या वेळापूर्वी ह्या पवित्र आत्म्याचा आपण किती अपमान केला होता हे आठवून शरमेने त्याचे पाणी पाणी झाले. गुप्तेश्वराचे पाय धरून तो म्हणाला, 'मला क्षमा करा, खरोखर आज मी मोठा अक्षम्य गुन्हा केला आहे.'

आपल्या पायावरील त्याचा हात दूर करून गुप्तेश्वर म्हणाला, 'बाबा, असं करून मला नरकात का ढकलता ! वयाने तुम्ही मला पित्यासमान आहात.'

शामदास म्हणाला, 'खरं आहे. पण गुणिपु न च लिङ्गं न च वयः।' त्यानंतर त्याने विनंती केली, 'गप्पा नंतर मारता येतील. आधी तुमचे कादंबरी-वाचन सुरू करा ना.'

गुप्तेश्वर म्हणाला, 'मी वाचतो. पण पुस्तक खूप मोठे आहे. मला वाटतं ऐकता ऐकता तुम्ही कंटाळून जाल.'

'छे छे, जोपर्यंत सबंध पुस्तक मी ऐकणार नाही तोपर्यंत पाण्याचा थेंबही मी घेणार नाही. तुम्हांलाच वाचता वाचता कंटाळा आला तर दुसरी गोष्ट.'

'तर मग आज सारी रात्र तुम्हांला जागरण करावे लागेल. कितीही लवकर लवकर वाचले तरी सबंध पुस्तक संपण्यास कमीत कमी आठ-दहा तास तरी लागतील.'

'दहा दिवस लागले तरी चालतील. डोळ्याची पापणी लवू देणार नाही.'

'बरं, ऐका तर मग.' शामदासने विजेचा दिवा त्याच्यासमोर टांगला आणि म्हटले, 'हं करा सुरू.'

गुतेश्वराने शीर्षकाचे पान उचलून समोरील तिवईवर ठेवले आणि कादंबरी-वाचनास प्रारंभ केला —

[1]

शिशिरऋतूत ज्याप्रमाणे जंगलातील नीरव शांततेत वृक्षाचे शुष्क पान खडखड आवाज करीत खाली पडते, थोड्याच वेळात त्याचा आवाज त्या शांततेत विलीन होतो, त्याप्रमाणे मध्यरात्रीच्या सुमारास मोडक्या-तोडक्या पर्णकुटीत बसलेली एक दुःखी युवती जेव्हा निराशेने सुस्कारा सोडते तेव्हा त्या घोर अंधकारात, तो आवाज एक लहानसा निनाद उत्पन्न करून तेथेच लुप्त होऊन जातो. एक तर निबिड अंधकार, दुसरं म्हणजे गावाच्या अगदी बाहेर असलेल्या झोपडीत ती हतभागी तरुणी एकटी होती. कोणी कोणी नव्हते जवळपास. जवळच मळेवाल्यांची झोपडी असावी, पण तीत मळेवाले लोक फक्त दिवसाच बसून हुक्कापाणी करीत असत. तरुणीचे वय सतरा-अठरापेक्षा जास्त नव्हते. काशाचे चकचकीत भांडे धुराजवळ ठेवून काळे पडते त्याप्रमाणे अतिशय सुंदर असूनही तिचे लावण्य दुःखाच्या सावटाने झाकळले गेले होते. तिच्या डोळ्यांभोवती काळी वर्तुळे पडली होती. केसांच्या जटा आणि कपड्यांच्या झालेल्या लक्तरांवरून नियतीने तरुण वयातच तिच्यावर दुःखांचे डोंगर कोसळविले असल्याची कल्पना येत होती. अमावस्येची काळीकुट्ट रात्र, त्यांत थंडीचे दिवस आणि माघ महिना. वादळाचा धुमाकूळ आणि शुष्क वृक्षांच्या कर्कश आवाजाने दुःखाग्नीत होरपळणाऱ्या हृदयात प्रलयाचे स्वरूप धारण केले होते. तिची देहलता थंडीने काकडून गेली होती. पण तिच्या हृदयात धगधगणारी आग काही निसर्गाच्या गारठ्याने विझणारी लाकडाची किंवा कोळशाची आग थोडीच होती! सुखासीन दिवसांच्या स्मृतीप्रमाणे रात्र हळूहळू संपत होती. पण भावी दुःखांच्या संभावनेप्रमाणे थंडी आणि वादळाचा जोर वाढतच होता. जेव्हा तिचे शरीर पूर्णपणे बधिर झाले, शुद्धही हरपली तेव्हा ती तेथेच शेणाने लिंपलेल्या ओल असलेल्या जमिनीवर कोसळली. तिची असहाय दशा पाहून

आकाशात चमकणाऱ्या तारकांनीही डोळे मिटून घेतले. मेघ शोकदर्शक काळा पोशाख परिधान करून तिच्या दुःखाबद्दल अश्रू ढाळू लागले. वादळाचा जोर वाढतच होता.

ती दुःखी बाला तशीच बेहोश स्थितीत पडली होती. वादळाच्या झंझावाती वाऱ्याने ते तुटके छप्परही तिच्या मस्तकावरून उचलून दूरवर नेऊन आदळले. तरीसुद्धा गवताच्या काही काटक्या धीटपणे त्या हतभगिनीवर छत्र धरून उभ्या होत्या; पण संकटकाळातील मित्रांप्रमाणे त्यामुळा कधी उडून गेल्या देव जाणे. खरं आहे : कठिण समय येतां कोण कामासि येतो !' आता त्या दुर्दैवी स्त्रीवर विशाल गगनाशिवाय काही-एक नव्हते. बर्फासारखी थंडगार हवा तिच्या मृतप्राय शरीरास झोंबत होती. तिचे लांबसडक शुष्क केस पाण्याने भिजून गुन्हेगाराच्या हृदयाप्रमाणे कडक झाले होते. कोणी निर्दयी तिच्या शरीरावर सपासप कोरडे ओढीत असल्यासारखे वाटत होते. मृतप्राय अबला आता अगदी उघड्या मैदानात होती.

[2]

हळूहळू ती मूर्च्छेतून जागी होऊ लागली होती. तिच्या शरीरात थोडीशी ऊब आली. अंगात थोडीशी शक्ती आल्यासारखेही तिला वाटले. तिच्या पापण्या थरथरल्या. तिने हळूहळू डोळे उघडले. सभोवतालच्या वस्तू आपल्याभोवती फिरत असल्यासारखे तिला वाटले. कोणत्याही वस्तूवर तिची नजर स्थिरावत नव्हती. आपोआपच तिचा हात डोक्यामागे गेला. तिची बोटे त्या जागेला चाचपडून पाहू लागली. नेमका त्याच ठिकाणी टणका लागला होता. आणि केस रक्तात भिजून चिकटले होते. तिच्या डोक्याभोवती पट्टी बांधली होती.

हळूहळू ती शुद्धीवर आली. आता तिला वस्तुस्थितीची पूर्ण जाणीव होत होती. त्याचबरोबर नुकतीच घडलेली एक भयंकर घटनाही तिला आठवू लागली आणि एकदम 'हाय' असा उद्गार काढून ती परत बेशुद्ध पडली. पण, ह्यावेळी तिची मूर्च्छा फार वेळ टिकली नाही. लवकरच शुद्धीवर येऊन उठून बसण्यासाठी ती खाट चाचपडू लागली.

तेवढ्यात कोणीतरी मृदू आवाजात म्हटले, 'नाही पोरी बी, एवढ्यात उठायचे-बिठायचे नाही हं.' तिने शब्द उच्चारणाऱ्या त्या स्त्रीकडे पाहिले. आपल्या स्मृतीला ताण देत ती तिला ओळखण्याचा प्रयत्न करू लागली. पण त्या स्त्रीला कुठे पाहिल्याचे तिला मुळीच आठवत नव्हते. इतक्यात तिचा कंठस्वर तिच्या कानावर पडला, 'पोरी !

खुदाची कृपा ! खुदाने तुला पुनर्जन्म दिला. मला फार काळजी वाटत होती. वाटलं, काय होणार अल्लाच जाणे !'

रोगिणीला तिचे बोलणे अगदी चांगले ऐकू येत होते. विशेषतः 'खुदाची कृपा' व 'अल्ला' हे शब्द तर लाउडस्पीकरप्रमाणे मूळ आवाजाच्या शेकडो पट मोठ्याने तिच्या कानाशी खणखणू लागले. म्हणजे मी मुसल्मानाच्या घरात आहे की काय ! ह्या विचाराने तिच्या जिवाची तगमग अगदी पराकाष्ठेला पोहोचली. ती परत मूर्च्छित होऊन पडली असती, पण त्याच वेळी तिला जाणीव झाली की ती स्त्री आपल्या उशाशी बसून अश्रू ढाळीत आहे आणि आपले मस्तक मांडीवर घेऊन वारंवार आपल्या कपाळाचे चुंबन घेऊन म्हणत आहे, 'बेटी, घाबरू नकोस. इडा पीडा टळो. हे परवरदिगार, पाहिजे तर माझा बळी घे. पोरी, तू एवढीसुद्धा फिकीर करू नकोस. तुझी हालत आता सुधारत चालली आहे.'

त्या रोगिणीला एक जुनी घटना आठवली. लहानपणी कधीतरी ती मलेरियाने हैराण झाली असता तिच्या आईने बाहेरून येताच तिच्या उशाशी बसून प्रेमाने तिचे मस्तक आपल्या मांडीवर घेतले होते आणि तिच्या कपाळाचे चुंबन घेऊन काहीसे अशाच तऱ्हेचे उद्गार काढले होते आणि त्यानंतर तत्काळच तिचा ताप उतरला होता.

शुद्धीत असूनही तिला काळाचे भान राहिले नाही. तिला ते घर, त्या घराच्या भिंती, प्रत्येक वस्तू आपल्या माहेरच्या घरासारखी दिसू लागली. जणू आपण आठ वर्षांच्या आहोत, आणि प्रत्यक्ष आईच आपल्या उशाशी बसून मोठ्या प्रेमाने आपल्याकडे पाहात आहे असा तिला भास झाला. काही काळ विस्मृत झालेली आईबद्दलची माया परत ताजीतवानी झाली व साऱ्या यातना, दुःख विसरून तिची काया मातृप्रेमाने आमूलाग्र थरारून गेली.

पडल्यापडल्याच तिने मस्तक मागे करून उशाशी बसलेल्या त्या स्त्रीकडे पाहिले आणि दोन्ही हात तिच्या गळ्यात टाकून ती म्हणाली, 'आई ग, तू मला सोडून कुठे निघून गेली होतीस ग ? मला जवळ घे ना. पण तू तर मेली होतीस ना ? सर्वजण असंच तर म्हणत होते की तू मेलीस. (विचार करून) हो, मी स्वतः आपल्या डोळ्याने पाहिले होते, बापूजी तुझ्या चितेला अग्नी देत होते. तू मलासुद्धा...' एवढंच बोलून मातृप्रेमाने तिचा गळा दाटून आला व ती हुंदके देऊ लागली.

आता मात्र उशाशी बसलेल्या त्या स्त्रीला राहावेना. तिने रोगिणीला पोटाशी धरून म्हटले, 'माझी गुणाची बाळ ती ! मी नेहमी तुझ्याजवळच राहीन बरं. तुला सोडून कधीही कुठे जाणार नाही. खुदा...ईश्वर करो आणि लवकरात लवकर तुला गुण येवो.'

रोगिणी आता पूर्णपणे शुद्धीवर आली होती. आता तिच्या लक्षात आले की

जिला ती आपली आई समजली होती तिचे स्वरूप व घरातील प्रत्येक वस्तूचे स्वरूप काही वेगळेच आहे. तिला हेही कळून चुकले की ज्या घराला ती आईचे घर समजली होती ते वास्तविक एका मुसल्मानाचे घर आहे. तिला आपल्या असंबद्ध बडबडीची अतिशय लाज वाटली व ती आश्चर्याने म्हणाली, 'मी कुठे आहे?' तिच्या घशाला कोरड पडली होती. तिने पाणी मागितले. वृद्ध स्त्रीने तिला हळूच खाटेवर निजविले व 'थांब हं बाळ, मी पाणी आणते' असे म्हणून ती खोलीबाहेर पडली.

रोगिणीला विचार पडला, 'मुसलमानाच्या हातचे पाणी कसे प्यावे? छे:, कधीच पिणार नाही मी!' त्याच वेळी ती वृद्धा आत आली. तिच्याबरोबर पाण्याचा ग्लास हातात धरून एक हिंदू मुलगा आत आला. पाणी प्याल्यामुळे तिला जरा तरतरी आली. तिने परत विचारले, 'मी येथे कशी आले? मी तर......'

म्हातारी मध्येच म्हणाली, 'बीबी धी, मी सांगते, तू मुळीच चिंता करू नकोस. ह्या घराला तू आपलंच घर समज. आम्ही मुसलमान असलो तरी तुझा धर्म काही बाटणार नाही!

'मी आणि माझा मुलगा अंबाल्याहून आजच आलो. माझा मोटा मुलगा तेथे ठेकेदारीचं (कंत्राटाचं) काम करतो. पहाटे चार वाजता आम्ही गाडीतून उतरून भाड्याच्या टांग्याने जेमतेम मैल दीड मैल आलो असू. इतक्यात आमच्या कोचवानाने तुला रिहाना गावाच्या बाहेर बेशुद्धावस्थेत पडलेले पाहिले. प्रथम आम्ही तुला मृतच समजत होतो. पण माझ्या मुलाला थोडेबहुत वैद्यकीय ज्ञान आहे. तुझ्याकडे बारकाईने पाहात तो म्हणाला, 'अम्मा, हिच्या छातीवर हात ठेवून हिच्या हृदयाची गती बघ बरं.' छातीवर हात ठेवल्यावर मला थोडीशी धुगधुगी जाणवली. मुलाचे म्हणणे पडले की हिला गावकऱ्यांच्या हवाली करावी. नाहीतर बिचारी अशीच मरून जाईल. आम्ही इकडे तिकडे पाहिले पण रस्त्यावर चिटपाखरूसुद्धा नव्हते. त्याच वेळी पाऊसही थोडा थोडा पडत होता. आम्हांला वाटत होते एखादा मनुष्य मिळाला तर बरं होईल, म्हणजे तुला त्याच्या हवाली करून जाता येईल. पण मग विचार केला, गावात बातमी देऊन यावे. पण वाटलं कडाक्याच्या थंडीत कोणी बाहेर येईल की नाही! शिवाय अशा वेळी पोलिसाच्या भीतीने सुद्धा लोक पुढे येत नाहीत. इकडे तुझी अवस्था तर अतिशय नाजूक झाली होती. सरतेशेवटी मुलाच्या सल्ल्यानुसार मीच तुला उचलून टांग्यात घालून घरी घेऊन आले. घरी पोहोचताच पहिल्याप्रथम डॉक्टरला बोलावणे पाठवले : तुझे ओले कपडे बदलले, तुला थोडा शेक दिला, एवढ्यात डॉक्टर आलेच. कल्याण होवो बिचाऱ्याचे! सतत दोन तास तुझ्या उशाशी बसून औषधपाणी करीत होते. तुझ्या डोक्याच्या मागे जखम झाली होती व तुझे केस रक्ताने थबथबले होते. त्यांनी जखमा

शिवून मलमपट्टी केली. त्यानंतर गफूर (माझा मुलगा) मला अनेक सूचना देऊन बाहेर गेला. रात्रभर तुला शुद्ध नव्हती. आता खुदाच्या कृपेने तू शुद्धीवर आली आहेस.' थोडा वेळ थांबून ती वृद्धा म्हणाली, 'बेटी, आता तू आपली कर्मकहाणी सांग. तुझ्यावर ही अशी परिस्थिती का आली? कोण्या दुष्टाने तुझी अशी दशा केली? प्रथम हे तर सांग, तुझे नाव काय? मी तुला कोणत्या नावाने हाक मारू?'

रोगिणी पडल्यापडल्या म्हातारीचे बोलणे ऐकत होती. तिच्या चेहऱ्यावरील भाव भराभर पालटत होते. कधी ती रागाने लालेलाल होत होती तर कधी द्वेष आणि तिरस्काराने तिच्या कपाळावर आठ्यांचे जाळे पसरले होते. कधी त्या बाईच्या उपकारांचा विचार मनात येताच तिच्या नजरेत कृतज्ञता व स्नेहाची चमक दिसत होती.

म्हातारीने परत म्हटले, 'बाळ, चिंता करू नकोस. अग, भल्या भल्या माणसांवर सुद्धा संकटे येतात. नशिबापुढे कोणाचे काहीही चालत नाही. खरंच, सांग ना तुझं नाव!'

ओढणीच्या टोकाने डोळे टिपीत त्या मुलीने उत्तर दिले, 'गुरदेई.'

वृद्धा म्हणाली, 'गुरदेई बीबी! आता आपली हकीगत सांग बेटा, आपल्या घराचा पत्ताही सांग. गफूर अगदी अधीर झाला आहे. म्हणत होता, 'हिचा पत्ता लवकर समजेल तर बरं, म्हणजे तिला पोहोचविता येईल.' मुली, दुनिया फार वाईट आहे बरं. कोणाचं भलं केलं तर लोक त्याची दखलही घेत नाहीत; पण वाईट केल्यावर लगेच बदनामी होते.'

गुरदेईने एक खोल निःश्वास सोडून म्हटले, 'माई! तुम्ही माझ्यावर फार फार उपकार केले आहेत. पण तुम्ही हे उपकार केले नसते तर बरं झालं असतं. माझी साऱ्या दुःखातून सुटका तरी झाली असती. पण हतभाग्यांना मृत्यूचेही भय वाटते. माझ्या नशिबात काय काय भोग लिहिले आहेत देव जाणे!' बोलता बोलता तिचा चेहरा अश्रूंनी ओला झाला.

ह्या संकटग्रस्त बालिकेचे बोलणे ऐकून त्या वृद्धेचे काळीज तिळ तिळ तुटत होते. ती तिला पोटाशी धरून तिचे सांत्वन करू लागली. गुरदेई पुढे सांगू लागली, 'माझ्या माहेरच्या गावाचे नाव वैरीवाल आहे. मी दहा वर्षांची असतानाच माझी आई देवाघरी गेली. मला भाऊ, बहीण कोणी नव्हते. फक्त बापाचाच काय तो आधार होता. पण तोही असून नसल्यासारखाच होता. वाईट संगतीने तो फुकट गेला होता. आई जिवंत असतानाच अष्टौप्रहर घरात भांडणं होत असत. तिने त्यांना दारू पिण्यास मनाई केली म्हणजे बापू तिला बेदम मारहाण करीत असत. बिचारी ह्या दुःखाच्या वणव्यात होरपळून हे जग सोडून चालती झाली. तिच्या मृत्यूनंतर बापू अगदीच निरंकुश झाले.

रात्रदिवस दारूच्या मैफिली चालत. जोपर्यंत मित्रमंडळीला पुक्त्ला झोडावयास मिळत होता तोपर्यंत ती सावलीसारखी बापूंच्या मागे मागे राहिली. पण सर्वस्व गमावून बापू जेव्हा नंगे फकीर बनले तेव्हा त्या सर्व दोस्तांनी काढता पाय घेतला. इकडे मी दिवसे-दिवस वयाने वाढत होते. पण त्याचे त्यांना काय सोयरसुतक. मला पंधरावे लागले.'

म्हातारीने विचारले, 'एवढ्या वयापर्यंत तुझे लग्न ठरले नाही?'

'माझी आई साखरपुडा करून गेली होती. पण माझ्या बापूंनी ते लग्न मोडले.'

'का बरं?'

'काय सांगू? प्रत्येक जण वेगळंच काही सांगतो. आईच्या जिवात जीव असेपर्यंत कोणी ब्रसुद्धा काढला नाही. पण तिने डोळे मिटताच वाक्बाण सुटू लागले. कोणी म्हणे, मुलाकडील लोकांस समजले की मुलगी अशिक्षित आहे, तेव्हा त्यांनीच लग्न मोडले. कोणी म्हणे, बापूंनी मुलीकडील लोकांकडे पैसे मागितले.'

म्हातारीने विचारले, 'पण बाळ, तुला का शिकविले नाही? तुम्हा हिंदू लोकांत तर मूल जन्मताच त्याला शाळेत घातले जाते ना?'

'पण माझा बाप त्या लोकांसारखा थोडाच होता? माझी शिकण्याची किती इच्छा होती, पण बापूंनी ठामपणे नकार दिला. ते म्हणत, शिक्षणाने मुली बिघडतात. त्यांचे म्हणणे असे की आमच्या सात पिढ्यांत जर कोणी शिकले नाही तर आपण कशाला पूर्वजांच्या नावाला काळोखी फासायची?'

'मग काय झाले?'

'काय व्हायचे? प्रथम लग्न मोडले, नंतर बापूंची तीच जुनी चांडाळचौकडी परत त्यांच्या पुढे पुढे करू लागली. पदरचे पैसे खर्च करून त्यांना दारू पाजू लागली.'

'म्हणजे?'

'ते लोक माझा संबंध एका अशा ठिकाणी करू इच्छीत होते, ज्याच्यासाठी बापू तयार नव्हते. पण नशिबापुढे कोणाचे चालते? त्यांनी बापूंना राजी केलेच. माझी किंमत म्हणून बापूंनी सासरच्या माणसांकडून दोन हजार रुपये मोजून घेतले. काही दिवसांनी लग्न झाले, आणि येथूनच माझ्या ग्रहदशेस प्रारंभ झाला. मी सासरी आले. माझा नवरा बापूंपेक्षाही वयाने मोठा होता. गुदस्ताच त्याच्या नातवाची मुंज झाली होती. दम्या-खोकल्याने तो अगदी पोखरून गेला होता. घरात मुलं, सुना, नातवंडं होती. लक्ष्मी पाणी भरीत होती. सावकारी मुत्सद्दीत त्यांनी अपार पैसा कमावला होता.'

म्हातारी म्हणाली, 'पण बेटा, तुझ्या बापूंनी चूक केली, तरी तुमच्या जातीतील लोकांनी एवढेसुद्धा कसे विचारले नाही की ते उंटाच्या गळ्यात घंटा कशाला बांधीत

आहेत ? ते सुद्धा पोटच्या गोळ्याला विकून, तिचे ठरलेले लग्न मोडून ! त्यांनी का अडविले नाही ?

'माई, जातवाल्यांचे काय घेऊन बसलात ? त्या जातवाल्यांचीच तर ही सारी करामत. जी चांडाळचौकडी बापूंच्या दारूच्या मैफिलीतील साथी होती तेच लोक तर जातीचे म्होरक्ये, अग्रणी समजले जात. ह्या जातवाल्यांच्या तडाख्यात एकदा का सापडले की बस ! माई, ती फार लांबलचक कहाणी आहे. सांगायला लागले तर महिने पुरे पडायचे नाहीत. त्या मेल्या जातवाल्यांनी मला बुडविण्याचा प्रयत्न केला नसता तर माझी अशी दशा कशाला झाली असती ?'

जमिनीला हात लावून मग कान पकडून म्हातारी म्हणाली, 'तोबा तोबा ! बरं, पुढे काय झाले ?'

'व्हायचे तेच झाले. लग्न होऊन वर्ष सुद्धा झालं नाही तोच सारा खेळ संपला. दर महिन्या दोन महिन्यांनी ह्यांचा दम्याचा विकार बळावत असे. शेवटी रोग इतका बळावला की आठ प्रहरांतच त्याने ह्यांचा बळी घेतला आणि मी नशिबाला दोष देत रडत बसले !

'दुर्भाग्याने येथेच माझा पाठलाग सोडला असता, मला ह्याच स्थितीत नशिबाने राहू दिले असते, तर इतर दुःखी विधवांप्रमाणे मीही निमूटपणे वैधव्यदशा भोगीत बसले असते. पण एवढ्यावरच माझी दुर्दशा संपली नव्हती ! माझ्या दोन सावत्र मुलांपैकी धाकटा अविवाहित होता व शाळेत शिकत होता; तो माझ्या कुठल्याच बाबतीत लक्ष घालीत नसे. पण मोठा मुलगा व त्याची बायको हे जिवंत असतानासुद्धा माझ्याकडे बघून दातओठ खात असत. त्या दोघांनी मला वाटेल तसा त्रास द्यायला सुरुवात केली. मीही मुलुखाची फटकळ व हट्टी होते. 'अरे' ला 'का रे' केल्याशिवाय, एकाला चार उत्तरे दिल्याशिवाय माझ्या जिवाचे मुळी समाधानच होत नसे. थोडीशी शिकलेली असते तर भविष्याची चिंता केली असती. पण मेलं भाग्यच खोटं होतं. घरात एकसारखे माझ्या दुर्गुणांचे पाढे वाचले जात, माझ्यावर नाना तऱ्हेचे दोषारोपण केले जाई. कोणीही माझ्याशी सरळ बोलत नसे. प्रथम प्रथम फक्त शिव्याशाप देऊन ते लोक आपला क्रोध शांत करीत. पण आता आमचे सुपुत्र करमचंद बायकोच्या शिकवणुकीवरून जोशात येऊन माझ्या अंगावर हातही टाकू लागले.

'रागाच्या भरात मी कित्येक दिवस अन्नाचा कणही तोंडात घालीत नसे. पण माझी समजूत घालावयास कोण होते ? शेवटी झक मारीत स्वतःच अन्न गिळून घेत असे.

'अशा तऱ्हेने दुःखाचे क्षण मोजीत मोजीत काही काळ लोटला. एके दिवशी बापू आजारी असल्याची बातमी आली. मी माहेरी जाण्यास तयार झाले. माझी तयारी

चालली असतानाच करमचंद माझ्याजवळ येऊन मोठ्या आस्थेने बापूंच्या प्रकृतीची चौकशी करू लागला. तो पुढे म्हणाला, 'माझ्या मते, घरात रोजरोजचे तंटेबखेडे होणं काही ठीक नाही. तुझी तयारी असेल तर चार लोकांना बोलावून घराची वाटणी करून टाकू या.'

'मी होकार दिला. थोड्याच वेळात चार-पाच इसम गोळा झाले. त्यात गावाचा पंडितही होता. एका कागदावर काहीतरी लिहून अंगठा करण्यासाठी तो कागद माझ्या पुढे ठेवण्यात आला. त्यातील मजकूर मला ऐकविण्यात आला तो असा :

'घराची संपूर्ण चल आणि अचल संपत्ती मिळून साठ हजारांचा कागद तयार केला आहे. त्यातील वीस हजार गुरदेईला देण्यात यावे, वीस हजार करमचंदाला, बाकी वीस हजार धाकट्या मुलासाठी ठेव म्हणून ठेवले जावेत. ह्याशिवाय गुरदेई व करमचंदाच्या बायकोच्या दागिन्यांची किंमत लावली जाऊन त्याचे तीन हिस्से करण्यात यावेत. दोन हिस्से त्या दोघींना आणि तिसरा हिस्सा धाकट्या मुलाच्या लग्नासाठी जमा करून ठेवण्यात यावा.'

'ह्या कागदावर त्या लोकांनी माझा अंगठा घेतला. अनेक लोकांनी साक्षीही दिल्या. नंतर त्यांच्या सांगण्यावरून हा सुतडा तेवढा ठेवून बाकीचे सर्व दागिने मी त्यांच्या स्वाधीन केले. त्यांनी मला सांगितले, 'तू माहेरी जाऊन ये. तू येईपर्यंत सर्व दागिन्यांची किंमत केली जाईल व संपत्तीचा वाटाही तुझ्या पदरात पडेल.'

'त्याच दिवशी संध्याकाळी मी माहेरी आले. पाहते तो बापू मरणाच्या दारात पडलेले. त्यांच्याजवळ फुटकी कवडीही नव्हती. त्यांच्या दिखाऊ दोस्तांनी त्यांना सर्वस्वी लुबाडले होते. दुसऱ्याच दिवशी त्यांना देवाघरचे बोलावणे आले. मी क्रियाकर्म आटोपून काल संध्याकाळीच सासरी आले. आपला वाटा ताब्यात घेण्यासाठी मी अगदी अधीर झाले होते. त्यावेळी थोडा थोडा पाऊस पडत होता. वादळ-वारं सुटलं होतं. थंडीने मी अगदी गारठून गेले होते. घरी येऊन पाहते तो सर्वांनी आपले पवित्रे बदलले होते. माझ्या खोलीचे कुलूप तोडून सर्व पेट्या लांबविण्यात आल्या होत्या. हे पाहून माझ्या तोंडचे पाणी पळाले. मी सूनबाईला विचारले तर तिने रागारागानेच उत्तर दिले, 'ह्या सर्व वस्तूंवर आता तुझा हक्क काय? जेथून आलीस तेथे जा चालती हो.'

'आपण अगदी रसरसत्या निखाऱ्यांवर उभ्या आहोत असे मला वाटले. मी जोरजोराने कपाळ बडवून गळा काढला, आरडा-ओरडा केला. तशी आळीतील सर्व लोक जमा झाले. करमचंदही आला. त्याच्याबरोबर दुसरे कित्येक प्रतिष्ठित लोक होते. मी रडत-रडत सर्व हकीगत त्यांना सांगितली. सूनबाईने पेटीतून माझ्या अंगठ्याची निशाणी

असलेला तो कागद काढून माझ्या पायाशी फेकला. त्यांतील एकाने तो मला वाचून दाखविला. त्यात लिहिले होते, 'मी आपल्या पतीच्या संपत्तीतील तिसरा हिस्सा घेऊन तीर्थाटनास जात आहे. यापुढे घरातील कोणत्याही वस्तूशी माझा काडीचा संबंध नाही.'

'हे ऐकून माझा अगदी तिळपापड झाला. पण तेथे माझे कोण ऐकणार ! घरातील व बाहेरील लोकसुद्धा माझा धिक्कार करू लागले. थोड्याच वेळात सर्वजण आपापल्या घरी निघून गेले. मी आरडूनओरडून शिव्यागाळी करून आकाशपाताळ एक केले होते. घरातील तिघंजणं संतापाने वेडी-पिशी बनून माझ्यावर तुटून पडली. जेव्हा मी धमकी दिली की धरणं धरून येथेच पडून राहीन, तेव्हा तर त्यांच्या क्रोधाग्नीत तेलच पडले. शिवाय त्यांना पंचांची फूस होतीच. सर्वांनी लाथाबुक्क्यांनी मला झोडपण्यास सुरुवात केली. त्याच मारहाणीत मुनेने लाटणे घेऊन माझ्या डोक्यावर हाणले. रक्तबंबाळ होऊन मी खाली कोसळले. आता त्यांना आपली कातडी वाचविण्याची फिकीर पडली. त्यांनी माझ्या तोंडात बोळा खुपसून, माझे हात पाय खेचत एका जरा दूरच्या खोलीत आणून मला फेकले. त्यावेळी पाऊस जोरात कोसळत होता. मी शुद्धीवर आले तेव्हा मला कळून चुकले की माझे सर्व कपडे रक्ताने आणि पावसाने भिजले आहेत. मी पडत-झडत तेथून कशीबशी निघाले. दोन-तीन शेजाऱ्यांची दारे ठोठावली. पण कोणी दरवाजा उघडण्याची तसदी घेतली नाही. मला वाटले, जगून तरी काय करावयाचे ! त्यावेळी विहीर जवळ करणेच मला सर्वात सोपी गोष्ट वाटली. मी गावाबाहेरील विहिरीकडे निघाले. अंधारी रात्र, ढगांचा गडगडाट, विजांचा कडकडाट, मुसळधार पाऊस ! विहीर खूपच लांब होती. वादळाचे तडाखे मला पुढे ढकलत होते, तर पावसाचा वर्षाव मला अडवत होता. पाय मात्र थकले होते. शुद्ध हरपत चालली होती. एक पाऊल उचलणेसुद्धा मला कठीण झाले होते. शिवाय त्या घनदाट अंधारात विहीर कोठे आहे याचाच पत्ता लागत नव्हता. मध्येच चमकणाऱ्या विजेच्या प्रकाशात मी रस्त्याचा अंदाज बांधून त्या दिशेला जात होते. दुर्दैवाने मी ज्या बाजूला चालले होते त्या बाजूला हवा आणि पाऊस इतक्या प्रचंड वेगात होता की माझे एक पाऊल पुढे पडे, तर कित्येक पावले मी मागे ढकलली जाई. सरतेशेवटी मी त्या झोपडीत येऊन बेशुद्ध पडले. जेव्हा मी दुसऱ्यांदा शुद्धीवर आले तेव्हा मी तुम्हांला येथे पाहिले.'

गुरदेईची दुःखद कर्मकहाणी ऐकून माईच्या अंतःकरणाचे पाणी पाणी झाले.

पंडित राधाकृष्णांना गावातील शेंबडे पोरसुद्धा ओळखत होते. विशेषतः गावातील विलासी खुशालचेंडू तरुण तर त्यांना अगदी भजत असत. त्यांतील काही जण त्यांना 'हातिमताई'चा किंवा 'राजा विक्रमादित्या'चा अवतार समजत असत. परोपकार करण्याचा जणू त्यांना रोगच लागून राहिला होता. कोणावर खटला गुदरलेला असो अथवा कोणाच्या घरी तंटाबखेडा उद्भवलेला असो अशा वेळी बहुधा लोक पंडितजीं-कडे धाव घेत असत; पण जर अशा वेळीही एखाद्या हतभाग्याने त्यांचा आसरा घेतलेला नसला तर पंडितजी स्वतः हजार कामे बाजूला सारून त्याच्याकडे जात आणि प्रत्येक गोष्टीत रस घेऊन तंटा मिटविण्याचा यत्न करीत.

एकदा एका गुराख्याची गुरे लाला भानेशाहच्या शेतात घुसली, त्यावेळी पंडितजींच्या अक्कलहुषारीनेच दंड म्हणून वीस रुपयांच्या कागदावर सहीशिक्का झाला होता. गुराखी बिचारा अशिक्षित होता. पंडितमहाशयांच्या 'अगाध लीलांसंबंधी' अज्ञानी असल्यामुळे तो खरे काय ते बोलून गेला. त्यामुळे त्याला पंडितजींची शापवाणी चांगलीच बाधली ह्या घटनेला सहा वर्षांचा कालावधी होऊन गेला. अजूनपर्यंत तो पैसे चुकते करू शकला नाही. उलट त्या प्रकरणात त्याची सर्व गुरे विकली गेली तरी भानेशाहचे कर्ज अजून त्याच्या डोक्यावर तसेच आहे. पंडितजींच्या भक्तगणांनी ह्या प्रकारच्या हजारो लीलांचे वर्णन करून लोकांच्या मनावर बिंबवले की पंडितजी एक सिद्ध पुरुष आहेत. त्यांचा सर्वांत महान चमत्कार हा आहे की ते काही काम-काज करीत नाहीत, की कधी पत्रिका-कुंडली पाहात नाहीत. तरीही त्यांच्या घरी ऋद्धी-सिद्धी पाणी भरीत असतात. ऐन तारुण्यातच त्यांनी आपल्या धर्मपत्नीला घरातून हाकलून दिले होते. कारण त्यांच्या मते ती अत्यंत दुष्ट आणि नीच होती. घरातील अर्धेअधिक धान्य ती गोरगरिबांना वाटीत असे आणि ब्राह्मणी असूनही आपल्या यजमान असलेल्या घरांवर दरारा बसवून काहीही वसूल करून घेत नसे. कोणाला जरा दुखलेखुपले की नीच स्त्रीप्रमाणे तावडतोब त्याचे हलक्यात हलके काम करण्यास तयार होत असे. शेवटी पंडितजींना साक्षात्कार झाला की आपली पत्नी गतजन्मी शूद्र स्त्री होती. त्यांनी तिच्याशी असलेला संबंध तोडला आणि आजतागायत तिचे मुखावलोकनसुद्धा केले नाही. मौखिक शास्त्रविद्येत ते पारंगत होते. पुस्तकी किडे असलेल्या दुसऱ्या लोकांना आपल्या हयातीत रहस्यज्ञान झाले नाही; परंतु पंडितजी पुस्तकांना स्पर्शही न करता सर्वज्ञ आणि तत्त्वदर्शी झाले. काय बिशाद होती कोणाची शास्त्रार्थामध्ये त्यांना हरविण्याची! अज्ञानामुळे सामान्य

जन ज्या दैवी शक्तींस विसरले होते,. त्यांना पुनरुज्जीवन देण्याच्या प्रयत्नात पंडितजी सफल झाले होते. उदा., शंकराची प्रिय-सखी सांगून भांग-भवानीचा प्रचार करणे, मद्यास देवांचे चौदावे रत्न किंवा सोमरस असे नाव देऊन त्याचे सेवन करणे-करविणे, द्यूतविहार (जुगार) हे कौरव-पांडवांचे मनोरंजनाचे साधन होते असे सांगून त्याकडे लोकांस प्रवृत्त करणे. बाप रे! एकाच जन्मात किती परोपकार पंडितजींनी केले होते. शहरातील श्रीमंत तरुणांची सभा जेव्हा त्यांच्या गुरुकुलरूपी घरात भरत असे, तेव्हा पंडितजी नेतृत्व स्वीकारून शास्त्रीय आणि राजनैतिक विषयांवर झोड उठवीत आणि श्रोतृवृंद ‘वाहवा–वाहवा’ करून उठे.

आज आम्ही आमच्या वाचकांस याच पंडितमहाशयांच्या सभेचे दर्शन घडविणार आहोत. थंडीचा कितीही कडाका असो, पंडितजीच्या तेजापुढे–पराक्रमापुढे तिचा काय पाड लागणार? बैठकीच्या खोलीत कोळशाची शेगडी धगधगत आहे, तेथेच गडीमाणसे कोंबडी, मासे वगैरे तऱ्हेतऱ्हेची स्वादिष्ट व्यंजने बनविण्यात गर्क आहेत, असे असताना तेथे थंडीचा शिरकाव होईलच कसा? त्यांच्या भक्तगणांच्या शरीर व मनापर्यंत थंडीचा प्रवेश होणेच अशक्यप्राय आहे. कारण तेथे तर सोमरसाचा कडक अंमल!

नवाच्या सुमारास सर्व सेवकगण येऊन आपापल्या जागी स्थानापन्न झाले. त्यानंतर पंडितजींनी आपले आसन सुशोभित केले. त्यावेळी त्यांच्या प्रेमीजनांनी उठून त्यांचा आदरसत्कार केला. एका सेवकाने पटकन बाटलीचे बूच उघडून, खाण्यापिण्याचे सामान एकत्र करून ह्या शुभ-कार्यास प्रारंभ करण्यासाठी पंडितजींची आज्ञा मागितली.

पंडितजींनी लक्षपूर्वक सर्व लोकांवरून आपली कृपादृष्टी फिरवून म्हटले, ‘मित्रजनहो, जरा सबूर. अजून आमच्या सभेचे शिरोमणी ख्वाजासाहेबांचे आगमन झाले नाही. मला वाटते समारंभाचे आमंत्रण कोणी त्यांच्याकडे पोहोचविले नसावे.’

एक मनुष्य मध्येच म्हणाला, ‘असे कसे होईल महाराज! मी स्वतः दोनदा त्यांच्या घरी जाऊन आलो. ते अगदी तयार होते. पण कोणी खेडेगावची माणसे त्यांच्याकडे आल्यामुळे त्यांना थांबावे लागले. मला वाटते त्यांच्याशी बोलत बसल्यामळे त्यांना उशीर झाला असावा, नाहीतर ते थोडेच थांबून राहणार?’

सब-इन्स्पेक्टर ख्वाजा शेरखाँ साहेब जवळजवळ तीनेक वर्षांपासून ह्या इलाख्याचा सम्मान वाढवीत होते. आल्याबरोबरच ते मोठ्या आनंदाने पंडितजींना भेटले, मग दोघेही आपापल्या आसनावर स्थानापन्न झाले. पंडितजी म्हणाले, ‘हं, काय झाले, इतका उशीर का झाला? आपली वाट पाहून पाहून अगदी दमलो. तुम्हांला येण्यास अजून थोडा जरी उशीर झाला तरी आजची सभा बरखास्त करण्यात आली असती. अहो, सेनापतीशिवाय सैन्याला शोभा येते का कधी?’

आत्मप्रशंसा ऐकून ख्वाजासाहेब फुशारून गेले. फेट्याचा शेमला कुरवाळीत म्हणाले, 'वा पंडितजी! माशा अल्लाह! आपण हजर असताना कधी कसली उणीव राहणे शक्य आहे काय? मी केव्हाच आलो असतो. पण असेच काही आवश्यक काम पडले म्हणूनच जरा उशीर झाला.'

पंडितजी जरा पुढे सरकून ख्वाजासाहेबांच्या अगदी निकट जाऊन त्यांच्या कानाशी म्हणाले, 'काय नवीन शिकार बिकार...?

ख्वाजासाहेबांनी आपली गोंडेदार टोपी काढून सभेतील एका सेवकाच्या हातात दिली आणि टकलावरून हात फिरवीत म्हणाले, 'होय, खुदानेच एक असामी पाठविली आहे.'

'मग खिसा चांगला गरम झाला ना? भानगड काय होती?'

'अगदीच मामुली भानगड होती.'

'असे का? मला वाटले एखादा खुनाचा खटला आला की काय!'

'तोबा! तोबा! इतके कुठले आमचे भाग्य! कधी काळी वर्ष-सहा-महिन्यांत एखादा मोठा मासा लागतो गळाला. अहो, जर अशा रोज रोज खुनाच्या केसेस यायला लागल्या ना तर अम्ही सोन्याच्या राशीवर नसतो का लोळत पडलो?'

'तरीपण चार-पाचशेला तर मरण नाही ना?'

'नाही हो, फक्त दोनशे रुपडे मिळाले.'

'काय भानगड होती?'

'शेजारच्याच सुलतानपुर नावाच्या गावात काही जाट लोक जरा फेरफटका मारायला जायचे होते.'

पंडितजी मिशांवर ताव देत म्हणाले, 'अस्सं, आताच ते नवस बोलून गेले आहेत. त्यांची इच्छा पूर्ण झाली तर खिसे चांगले गरम करतील अशी आशा आहे.'

'हं, आशा आहे खरी. चौथाई पत्तीचा निर्णय झाला आहे.'

'बरे झाले. कोणत्या ना कोणत्या रूपाने ईश्वरच दान करतो. ख्वाजासाहेब! ईश्वराची लीला अगाध आहे. दगडाच्या आतील किडेमुंग्यांना देखील तो उपजीविका पोहोचवितो. (करमचंद आणि ख्वाजासाहेबांकडे पाहून) अरे हो, तुम्हांला आजच्या सभेचे प्रयोजन माहीतच असेल. आमच्या यजमानांनी आजच्या साऱ्या खर्चाची जबाबदारी उचलली आहे. ख्वाजासाहेब हे फार सज्जन पुरुष आहेत बरं. ह्यांच्या स्वर्गीय पित्याचे आमच्याशी चांगले स्नेह-संबंध होते. हेही मोठे दयाळू आहेत. (ढेकर देत) हरि ओ...म्!'

ख्वाजासाहेबांनी करमचंदाकडे पाहून स्मित केले तशी तो पटकन हात जोडून उभा राहिला. हातानेच त्याला बसण्याचा संकेत करून ते म्हणाले, 'अच्छा, हे त्या बाईच्या

भानगडीसंबंधी येथे आले आहेत का? अरे हो, पंडितजी, माहीत आहे मला. बरे झाले त्या बाईचे वाटोळे केलेत ते. ती कुठे गेली काही कळले का?'

पंडितजी ग्लास पुढे करून म्हणाले, 'नक्की पत्ता कळला नाही. पण दुपारच्या सुमारास एका मळेवाल्याकडून कळले की सकाळी एक बुरखाधारी स्त्री तिला टांग्यात बसवून कुठेतरी घेऊन चालली होती. तिच्याबरोबर एक तरुणही होता.'

घटाघटा ग्लास संपवून एका बाजूला ठेवीत ख्वाजासाहेब म्हणाले, 'काय म्हटलेत, मुसलमानाबरोबर?'

'होय.'

त्याच वेळी गावातील एक मालगुजार ज्वालासिंह म्हणाला, 'होय साहेब, आमच्या शेताजवळूनच टांगा गेला. मी आपल्या डोळ्यांनी पाहिले.'

दुसरा ग्लास रिचविल्यावर ख्वाजासाहेबांना नशा चढत गेली. ते डोक्यावरून हात फिरवीत म्हणाले, 'चला जाऊ द्या ह्या सर्व गोष्टी. झाले ते चांगलेच झाले. आता मैफलीचा आनंद लुटा.' त्यांच्या बोलण्याचाच अवकाश होता, बाटल्यांवर बाटल्या फुटू लागल्या व ग्लास रिकामे होऊ लागले.

पंडितजी माशाच्या तुकड्यातील काटे निवडत म्हणाले, 'ख्वाजासाहेब, तुमचा बावर्ची फारच सुगरण दिसतो. मासे बनविण्यात तर त्याने कमाल केली आहे. चव तोंडातच घोळत राहिली आहे.'

'होय, हा आमच्याकडे गेली पाच वर्षे काम करीत आहे. ह्याचा बाप, खुदा त्याचे कल्याण करो, ह्याच्याहीपेक्षा अधिक सुगरण होता. खरे म्हणजे मेजर बर्टनसाहेबांच्या मुदपाकखान्यात ह्याने चार वर्षे काम केल्यामुळेच त्याला मांसाहारी भोजन बनविण्यात हातखंडा झाला आहे.'

आता मदिरेचा अंमल हळू हळू सर्वांवर चढला होता. नशेमध्ये सर्वजण अनर्गल प्रलाप करीत होते. पंडितजी सर्वांना उद्देशून म्हणाले, 'मित्रहो, येथे जातीय एकता व पारस्परिक प्रेमाचे राज्य आहे ही किती भाग्याची गोष्ट आहे नाही! खरंच, मी जेव्हा जेव्हा हिंदू-मुसलमानांना एकाच ठिकाणी खाता-पिताना पाहतो तेव्हा माझे मन हर्ष-गद्गद होऊन जाते. ईश्वर करो आणि समस्त भरतखंडात असाच मित्रभाव उत्पन्न होवो.'

ख्वाजासाहेब म्हणाले, 'पंडितजी, अल्ला कसम ही सर्व मदिरारत्नाचीच कृपा आहे. लोक म्हणतात, मद्य हे खुदाने निर्माण केलेल्या बहुमूल्य पदार्थांपैकी एक आहे. ह्याच्या प्रभावाने परस्पर प्रेमभाव किती वृद्धिंगत होतो हे त्या दुर्दैवी लोकांना कसे समजणार बरे!'

पंडितजी म्हणाले, 'ख्वाजासाहेब! मैत्री म्हणजे काय हे त्या लोकांना माहीतच

नाही मुळी. अरेच्चा, विसरलोच की, ख्वाजासाहेब तुम्ही कित्येकदा आपली हार्दिक इच्छा प्रकट केली होती. आज तुम्हांला एक नवीन उपहार देणार आहोत.'

'कोणता बरे?'

'अहो देशी, घरेलू शराब.' मग प्यारासिंहाकडे वळून पंडितजी म्हणाले, 'जा रे रोज म्हणत होतास ना की ख्वाजासाहेबांना ती पाजीन म्हणून. जा लवकर आण.'

'ठीक आहे.' असे म्हणून प्यारासिंहाने जवळच बसलेल्या आपल्या भाच्याचा खांदा गदागदा हलवून म्हटले, 'धन्नासिंह, जा, तुझ्या मावशीला सांग, ज्या खोलीत पेंढा ठेवला आहे त्या खोलीचे दार उघडून कोपऱ्यात ठेवलेल्या लाकडी खाटेच्या पट्ट्या बाजूला सारून खालून छोटासा घडा काढून दे म्हणून. त्याच्यावर एक वाटी उपडी ठेवून दे. घड्याचे तोंड कणकेने बंद केले आहे. हे बघ, सांभाळून उचल हं. कुठे ठेचकाळू नकोस. जा माझ्या बिबट्या वाघा, झटपट जाऊन ये!'

थोड्याच वेळात त्या छोकऱ्याने घडा आणून ख्वाजासाहेबांच्या पुढ्यात ठेवला. ख्वाजासाहेब आधीच दारूच्या कैफात होते; आता हा नवीन उपहार पाहून ते आनंदाने नाचू लागले. प्रथम त्यांनी घड्यात बोट घालून चाखून पाहिले; जेव्हा त्यांना चव आवडली तेव्हा ते ओंजळ भरभरून पिऊ लागले. मोठ्याने मिटक्या मारीत ते म्हणाले,

'अहाहा! पंडितजी, अतिशय स्वादिष्ट माल आहे!'

'मग काय खोटे सांगत होतो मी?'

'ह्याच्या आधीच तुम्ही हे मद्य कसे मागविले नाही?'

'तुमच्या भीतीने नाही मागविले. नाही तर...'

'वा वा, माझी भीती? अल्लाची कसम, तुम्ही तर माझे भाऊच आहात. मला तर फक्त हीच (घड्यामध्ये ग्लास बुडवीत) पाजीत जा. (तोच ग्लास भरून पंडितजींना देत) वा वा, फारच मस्त आहे.'

रात्री बारा वाजेपर्यंत सभा रंगात आली होती. शेवटी सभा बरखास्त झाली. त्या वेळी कोण कसल्या अवस्थेत होता व ते कसे आपापल्या घरी पोहोचले ईश्वरच जाणे!

[4]

सायंकाळचा अंधार सर्वत्र पसरू लागला होता. त्या वेळी एक टांगा समोरील सडकेवरून येऊन गावातील अड्ड्यावर थांबला. एका तरुण मुसलमानाने टांग्यातून उतरून रस्त्यावरून जाणाऱ्या एका माणसाला विचारले, 'काय हो, पंडित राधाकृष्णांचे घर कोठे आहे?'

'याच समोरच्या हवेलीत आहे,' त्याने सांगितले. 'का ? काय काम आहे ?'

'त्यांच्याशी एक अत्यंत महत्त्वाचे काम आहे,' टांग्यात बसलेल्या एका स्त्रीकडे पाहून युवक उत्तरला आणि टांग्याजवळ जाऊन त्याने म्हटले, 'या, ताई, उतरा. मी तुम्हांला त्यांच्या घरी पोहोचवून येतो.'

स्त्री मुकाट्याने त्याच्या पाठोपाठ चालू लागली. थोड्याच वेळात दोघे पंडित राधाकृष्णांच्या घरासमोर जाऊन पोहोचली. युवकाने दार ठोठावले. आतून एका किडकिडीत मुलाने येऊन विचारले, 'काय पाहिजे ?'

तरुण म्हणाला, 'पंडितजी घरात आहेत का ? त्यांच्याशी एक काम आहे.'

'हो आहेत घरी. पण ह्यावेळी ते भेटू शकणार नाहीत. ही त्यांची पूजेची वेळ आहे.'

'काही हरकत नाही. आम्ही थोडा वेळ वाट पाहतो. किती वेळाने त्यांना सवड होईल ?'

'तासाभराने.'

'ते मोकळे होतील तेव्हा त्यांना जरा निरोप सांगा.'

'ठीक आहे,' असे म्हणून तो मुलगा आत निघून गेला.

जवळ जवळ पाऊण तासाने पंडितजी बाहेर आले. त्या युवकाने उठून त्यांना सलाम केला. आल्याआल्याच पंडितजी म्हणाले, 'जरा दरवाजातून मागे सरकून उभे राहा. हे ब्राह्मणाचे घर आहे माहीत आहे ना ?'

नवयुवक आपल्या चुकीमुळे ओशाळून म्हणाला, 'माफ करा. माझ्याकडून मोठी चूक घडली.'

नंतर त्या स्त्रीकडे पाहात तो म्हणाला, 'ह्या बाई काल पहाटे ह्या गावाच्या बाहेर बेशुद्धावस्थेत पडल्या होत्या. ह्यांना माझ्या आईने आणि मी मिळून आपल्या गावी घेऊन गेलो. कारण त्या [illegible] तेथे कोणी नव्हते व ह्यांची अवस्था तर अत्यंत नाजूक होती. आता [illegible] यांची प्रकृती ठीक आहे. ह्यांनी सांगितले की आपण लाला मिठामलच्या [illegible] पत्नी आहेत. बाकी सर्व हकीगत तुम्ही स्वतःच ह्यांना विचारा व कसेही करून [illegible] त्यांच्या घरी पोहोचवून त्यांच्या मुलाबाळांशी समेट करून द्या. फार मोठी कृपा होईल.' तो तरुण पुढे म्हणाला, 'बहनजी, तुम्ही स्वतःच पंडितजींना सर्व सांगा.'

त्याचे बोलणे ऐकता ऐकता पंडितजींचा चेहरा रागाने लाल होऊ लागला होता. ते त्या तरुणास म्हणाले, 'तरुणा, तुझ्या कपड्यालत्त्यांवरून तरी तू सुशिक्षित असावास असे वाटते. पण बोलण्यावरून वाटते तू अगदीच अशिक्षित आहेस.'

तरुण आश्चर्याने म्हणाला, 'मी एफ्. वाय. पास आहे. पण तुमच्यासारख्या वडील माणसांसमोर मी खरंच अशिक्षित आहे. जर काही गैर शब्द तोंडावाटे गेला असेल तर माफ करा.'

'बरं बरं कळलं,' पंडितजी हसत म्हणाले. 'ह्या इंग्रजी भाषेनेच तर आमच्या भारत-वर्षाचा अगदी सत्यानाश केला आहे. जर तू इंग्रजी शिकला नसतास तर एका हिंदू कन्येला 'बहीण' मानण्याची घोडचूक कधी केली नसतीस. आपल्याबरोबर टांग्यात बसवून तिला आपल्या घरी नेऊन बिचारीचा जन्म भ्रष्ट केला नसतास.'

पंडितजींचे ते बोलणे ऐकून तो तरुण बुचकळ्यात पडला. 'आता ह्यांना काय उत्तर देऊ बरं?' शेवटी खूप विचार करून तो म्हणाला, 'बरं, मी आपल्या चुकीबद्दल माफी मागतो. कृपा करून ह्या गरीब बिचाऱ्या संकटग्रस्त अबलेला तिच्या घरी पोहोचवा. तिच्या तोंडून तिची आत्मकहाणी ऐकली तेव्हाच समजले की हिच्यावर फार अत्याचार झाला आहे.'

पंडितजी अधिकच आवाज चढवून म्हणाले, 'नाही, नाही, आता हिंदुधर्मातून ही पतित झाली आहे. तिला कोणत्याही प्रकारे...(मग काही विचार करून बोट तोंडात घालून) तसे पाहिले तर मला हिची दया येत आहे. जेव्हा माझ्या कानी आले की हिच्या सावत्र मुलांनी हिला घराबाहेर काढले तेव्हापासून मी अन्नजल ग्रहण केले नाही बरं. पण...(गुरदेईला) मुली, तू आत जाऊन बस. मी त्या दुष्टांना चांगले वठणीवर आणतो तू काही काळजी करू नकोस. (ढेकर देत) हरि ओ...म्!'

पंडितजी राग सोडून दयाळू झालेले पाहून युवकाचे डोळे आनंदाश्रूंनी डबडबून आले. तो गहिवरून पंडितजींच्या चरणांना स्पर्श करण्यासाठी खाली वाकत म्हणाला, 'तुम्ही खरंच देवदूत आहात. मी...'

तो पुढे काही बोलण्याच्या आधीच पंडितजी दोन-तीन पावले मागे सरून म्हणाले, 'अरे, अरे, पायाला शिवू नकोस बाबा. ह्या कडक थंडीत स्नान करावे लागेल मला.'

युवकाला परत आपल्या उतावळेपणाची लाज वाटली. त्याने दुरूनच हात जोडले, व वाकून नमस्कार करीत तो मागे सरला. जाताना त्या स्त्रीकडे पाहून त्याने म्हटले, 'बरं आहे, ब...' लगेच त्याला आपल्या पहिल्या चुकीची आठवण झाली. काहीही न बोलता तो मुकाट्याने टांग्यात जाऊन बसला. कोचवानाने चाबूक सरसावला. टांगा रस्त्यावर धावू लागला. टांगा दृष्टीआड होईपर्यंत गुरदेई कृतज्ञतेने एकटक त्याच दिशेला पाहात राहिली. मग हळूच आत गेली. समोरील खोलीच्या डाव्या बाजूला देव्हारा होता. पूजेसाठी तिकडे जाता जाता ते गुरदेईला म्हणाले, 'मुली, तू समोरच्या ओट्यावर जाऊन बैस. मी पूजाअर्चा संपवून आलोच. हरि ओ...म्!'

ती संकोचून जमिनीवरच एका कोपऱ्यात बसली. पंडितजी पूजेअर्चेत मग्न झाले. प्रथम त्यांनी संध्यापाठ केला, मग गोमुखी हातात घेऊन पुष्कळ वेळ जप केला. त्यानंतर त्यांची समाधी सुटली व ते हळू हळू उठून स्तोत्र पुटपुटत गुरदेईजवळ एका खाटेवर जाऊन बसले व म्हणाले, 'हं, बेटी, सांग आता तुला काय सांगावयाचे आहे ते.'

काही वेळ गप्प बसून, काडीने जमिनीवर रेघोट्या ओढीत ती हळूच म्हणाली, 'तुमच्यापासून काय लपून राहिले आहे?'

पंडितजी ढेकर देत लांबलचक सुरात 'हरि ओ...म्' म्हणत आपल्या पोटावरून हात फिरवीत पुढे म्हणाले, 'होय, मला राजारामाने (पंडितजींच्या नोकराने) काल रात्री सांगितले की करमचंदाने तुला मारपीट करून घरातून हाकलून दिले. मी आपला पूजा-अर्चा करीत होतो. नंतर त्यांना विचारायची सवडच झाली नाही बघ. हरि ओ...म्।'

गुरदेई चाचरत म्हणाली, 'तुम्हांला आठवण राहिली नसेल. पण तुम्ही तेथेच तर उभे होता आणि करमचंदाच्या कानात काहीतरी कुजबुजत होता.'

पंडितजी जणू काहीतरी विसरलेलं आठवण्याचा प्रयत्न करीत आहोत अशा थाटात बोटाने कान खाजवीत म्हणाले, 'बरोबर. आता आठवले. आजकाल कसली आठवणच राहात नाही बघ. डोके अगदी हलके झाले आहे. रात्री काय भोजन केले ते सकाळी आठवत नाही. बरोबर आहे तुझं. त्या वेळी मी पूजेला लागणारे साहित्य घेऊन येत होतो. तुमच्या घरावरून जाताना मी रडण्याचा आवाज ऐकला. मीच त्याच्या कानात सांगत होतो की ह्या गरीब अबलेवर इतका अत्याचार करू नकोस. इस्टेटीतून तिचा वाटा तिच्या हवाली करून टाक. पण तो दुष्ट ऐकतच नव्हता. बरे, काय झाले त्यानंतर?'

गुरदेईने आपली सर्व कर्मकहाणी त्यांना सांगितली. अब्दुल गफूर व त्याच्या आईच्या औदार्याची आणि उपकाराची गोष्ट ऐकून रागाने दातओठ खात पंडितजी म्हणाले, 'मुली, तुला अजून ह्या लोकांच्या वागण्याची पद्धत माहीत नाही. त्यांनी तुझा धर्म भ्रष्ट केला. त्या लोकांनी आणखी काय काय दुष्टपणा केला असता कोण जाणे! मला काल जेव्हा कळले की त्या गावातील एका मुसलमानाने तुला बेशुद्धावस्थेत उचलून नेले तेव्हा माझे तर प्राणच गोठून गेले. एका हिंदू मुलीवर म्लेंच्छांचा एवढा अत्याचार! शिव! शिव! त्याच क्षणी मी आपल्या गड्याला घोडीवरून पाठविले आणि निरोप धाडला की त्या मुलीला ताबडतोब माझ्या घरी आणून पोहोचवा नाही तर साऱ्या गावाची धडगत नाही. म्हणूनच तर तो दुष्ट मुकाट्याने तुला येथे सोडून गेला. (ढेकर देत) हरि ओ...म्!'

हे ऐकून गुरदेई जरा आवेशात आली. काही बोलता बोलता ती एकदम थांबली व आपल्या जिभेला आवर घालीत म्हणाली, 'त्यांना तर मीच सांगितले होते.'

'काय ?'

'हेच की मला आपल्या घरी न पाठविता पंडितजींच्या घरी पोहोचवा. विचार केला, तुम्ही करमचंदाला चार समजुतीच्या गोष्टी सांगून राजी कराल.'

'बरे झाले तू सांगितलेस आणि माझा निरोपही मिळाला. मग त्यांनी तुला कसे येथे पोहोचविले नसते ! बरे, झाले ते झाले. आता सांग तुझी काय इच्छा आहे ते.'

'मला वाटा देवविण्याचा प्रयत्न करा.'

'पण पहिल्यासारखीच तू आपल्या घरी पडून राहिलीस तर तुझी काय हरकत आहे ?'

'ते लोक क्षणभरही मला घरात राहू देणार नाहीत.'

थोडा वेळ विचार करून पंडितजी म्हणाले, 'बरे, तू वरच्या मजल्यावर बैठकीच्या खोलीत जाऊन बैस. मी आताच त्यांना बोलावणे धाडतो.'

गुरदेईने मस्तक नमवून प्रणाम केला व ती वरच्या मजल्यावर निघून गेली. पंडितजी रामनामाचा पंचा खांद्यावर टाकून खडावा घालून बाहेर पडले.

[5]

थोड्याच वेळात लाला करमचंदाच्या ओसरीवर पंचायतीच्या प्रमुख मंडळीची सभा भरली. त्या सभेचे अधिष्ठाते पंडितजीच होते. चौधरीसाहेब दित्तामलांनी हुक्क्याच्या नळीचे तोंड फिरवून एक झुरका मारला आणि खोकत खोकत ते म्हणाले, 'हं, बाबा करमचंद, काय झाले त्या भानगडीचे ?'

करमचंद पगडीवरून हात फिरवीत म्हणाला, "चौधरीमहाराय, सर्व प्रकार तुमच्या डोळ्यांसमोरच घडला. आज पंडितजी एक नवीनच वार्ता घेऊन आले आहेत. तीही ऐका.'

इतक्यात पंडितजी ढेकर देत म्हणाले, 'चौधरीमहाराय ! काय सांगावे ? आता सांगण्यासारखे काय उरले आहे बरे ? आता भयंकर कलियुग आले आहे ना ! आपण तर बाबा हात जोडून प्रार्थना करतो की सारी हयात शांतिपूर्वक धर्मपारायणात घालविली, आता असे उत्पात घडण्याआधीच ईश्वराने आमची ह्या धरतीवरून उचलबांगडी करावी. राम जाणे प्रारब्धात काय लिहिले आहे. हरि ओ...म् !'

सर्व लोक नवीन खबर ऐकण्यासाठी अगदी उतावीळ झाले. 'महाराज ! सांगा, सांगा,' असे चारही बाजूंनी आवाज येऊ लागले.

पंडितजी रागाने म्हणाले, 'बाबांनो, काय सांगू कपाळ ? हे सर्व तुम्हा लोकांच्या नीच

प्रवृत्तीचं फळ आहे बरं. दिवसेदिवस नेम-धर्मापासून पराङ्मुख व्हा, पूजा-पाठ, संध्या-तर्पण ह्यांबद्दल उदासीनता दाखवून दुष्ट कर्मांत अडकून पडा, मग धरतीवर असे अनाचार होतील नाही तर काय होईल? शिव, शिव, शिव! (थोडा वेळ स्तब्ध राहून करमचंदास उद्देशून) अरे सद्गृहस्था, मी एक वार नाही हजारदा कानीकपाळी ओरडून सांगितले की, बाबा रे, त्या हलकट बाईला इतकं ...यावर चढवून ठेवू नकोस. तिची काहीतरी कायमची व्यवस्था कर. सरतेशेवटी ज्याची शक्यता वाटत होती तेच झाले ना! ती कुल्टा मुसंड्यांच्या घरात जाऊन राहिली. ईश्वर साक्षी आहे ही गोष्ट कानावर आली तेव्हापासून मी आतल्या आत तळमळत आहे. आमच्यासारखी धर्मपरायण माणसे या गावात राहात असता असले अनर्थ व्हावे ना! धिक्कार असो आमच्या जिण्याचा!'

समाजाविषयी पंडितजींची ही उदारता व दयाभाव पाहून सर्वजण एका सुरात उद्गारले, 'धन्य आहे! धन्य आहे!'

मग पंडितजी करमचंद व सोहनलाल यांच्याकडे पाहून म्हणाले, 'आजकालच्या कारट्यांची बुद्धीच फिरली आहे. वाटेल तसे वागतात लेकाचे. भडव्यांनो, मला आधीच विचारायला तुमच्या बापाचे काय जात होते? हा ब्राह्मण तुमचा शत्रू तर नव्हता. तुमच्या वाडवडिलांच्या अन्नावरच लहानाचा मोठा झालो आहे. प्रामाणिक सल्ला नाही तर नाही, पण बदसल्ला तर खात्रीने दिला नसता. जाऊ द्या, बाबांनो, आम्हांला करावयाचे आहे काय तंट्याबखेड्याशी! मजा करा, मनाला येईल तसे करा. आम्ही कशाला उगीचच्या उगीच अडथळे आणायचे?' असे म्हणत म्हणत पंडितजी गुडघ्यावर हात टेकीत उठले व जाऊ लागले. ते पाहून सर्वांना चिंता वाटली व 'नाही नाही महाराज, आपण बसावे. जरा ऐका तर खरे महाराज, शांत व्हा, राग सोडा,' इत्यादी सांगून सर्वांनी त्यांना गराडा घातला. कोणी त्यांच्या पायांवर डोके ठेवले तर कोणी त्यांच्या हातातील छडी काढून घेतली. कोणी त्यांचा रस्ता अडवून उभे राहिले.

शेवटी नाइलाजास्तव पंडितजींना बसावे लागले. एवढ्यात करमचंद पंडितजींच्या पायावर कोसळला आणि गयावया करून म्हणाला, 'महाराज! आमची अब्रू आता तुमच्या हातात आहे. ह्या गोष्टीचा निवाडा करूनच तुम्ही जा. नाहीतर समाजात तोंड दाखवायला जागा उरणार नाही आम्हांला.'

जवळच बसलेला एक मनुष्य म्हणाला, 'खरंच महाराज, ह्या बिचाऱ्याची नाहक बदनामी होत आहे.'

ह्याच मंडळींमध्ये मुंशी देवीदयाळाचा मुलगा मोहनलालही बसला होता. काही दिवसांपूर्वीच तो डी. ए. व्ही. कॉलेज सोडून घरी परतला होता. तो म्हणाला, 'पंडितजी,

खरंच हे मोठे परोपकारी कृत्य आहे. आपल्यासारख्या महापुरुषाच्या सामर्थ्यानेच ही इतकी विकट समस्या सुटू शकेल. अजूनही जर तुम्ही यत्न केलात तर ती परत येऊ शकेल!'

'काय म्हणालास? परत येऊ शकेल?' पंडितजींनी पंचांकडे पाहिले. 'पाहिलीत ह्या मूर्खाची अक्कल?' मग त्याच्याकडे वळून ते म्हणाले, 'आर्यांनी तुला हेच ज्ञान दिले का रे? बाबा रे, अंथरूण पाहून पाय पसरावे. वडील माणसांच्या भानगडीत तू कशाला तोंड घालतोस? म्हणतात ना, जंज बिगानी मूरख नचे![1]'

ह्यावर सर्व लोक त्याच्याकडे तिरस्काराने पाहू लागले. पण तरीसुद्धा मोहनलालला राहवले नाही. तो म्हणाला, 'क्षमा करा, पंडितजी, मी काही वाईट गोष्ट नाही सांगितली. तिला परत आपल्या समाजात घेण्यास काय हरकत आहे? शिवाय ती बाल-विधवा आहे बिचारी! जर लाला करमचंद तिचा सांभाळ करू शकत नसले तर एखादा सुयोग्य वर......!'

आता मात्र पंडितजींचा पारा भलताच चढला. रागाने ओरडून मध्येच त्याचे बोलणे खोडून काढीत ते म्हणाले, 'पुरे, पुरे अशी म्लेंच्छ भाषा परत थोबाडातून काढू नकोस. साबणाने धुतल्याने गाढव कधी गाय होतो का? हिंदू-धर्मात पुनर्विवाहासंबंधी बोलून ह्या पवित्र जातीला कलंकित करताना तुला लाज नाही वाटत? (कपाळ बडवून घेत) मित्रहो, ह्या आर्यसमाजीयांनी व अकाली लोकांनी भारताचा सत्यानाश करून टाकला. हरि ओ...म्!'

मोहनलालने परत म्हटले, 'पण महाराज, आपल्या म्हणण्याप्रमाणे जर गाढव गाय बनू शकत नाही तर मग गाय तरी गाढव कशी बनू शकेल?'

आता मात्र बरेचसे लोक हात धुवून मोहनलालच्या पाठीमागं लागले व त्यांनी त्याला गप्प बसविले. लाला कन्हैयालाल म्हणाला, 'पोरा, गप्प बैस. फार मुक्ताफळं उधळू नकोस. एका सभ्य माणसाच्या विधवेविषयी असे बोलताना लाज नाही वाटत? शिवाय तू तर इतका शिकला-सवरलेला आहेस. धर्मशास्त्रांची काय आज्ञा आहे याबद्दल विचार नाही वाटतं करता येत तुला? (पंडितजींना) हं पंडितजी, तुम्ही आपले काम चालू ठेवा. ह्या मूर्ख पोरट्याच्या वटवटीचा राग नका मानू. सांगा बरे तिचा काय बंदोबस्त करावयास पाहिजे?'

करमचंद म्हणाला, 'पंचांनो, माझी एक विनंती आहे. जर ती अब्रू सांभाळून विधवेसारखी राहिली असती तर माझ्या घरात काय कमी होते? पण गेले कित्येक दिवस मी पाहात होतो, तिची वेगळीच लक्षणे दिसू लागली होती. तरी सुद्धा मी मूग गिळून

[1] दुसऱ्याच्या लग्नांत मूर्ख नाचतात.

गप्प बसलो. म्हटले आपले काय जाते ? करील तसे भोगील. पण ती तर आमच्या वडिलांची इज्जतच सुपात घालून वाजविण्यास तयार झाली होती. मला काय विचारता ? म्हणतात ना, आकाशाला कोठे कोठे ठिगळे लावणार ? ह्या काय सांगण्यासारख्या गोष्टी आहेत ? तरीही मी सबुरी केली. सांगा, अजून मी काय करावयास पाहिजे होते ? त्यानंतर स्वतः तोंड काळे करून चालती झाली हे तुम्हांला माहीतच आहे.'

चारही बाजूंनी आवाज येऊ लागले, 'बरोबर आहे. ह्या विचाऱ्यास ती परकीच होती. एवढा चांगुलपणा तर पोटच्या पोराने सुद्धा दाखविला नसता. तिचेच नशीब फुटके—त्यात ह्याचा काय अपराध ?'

पंडितजी जरा विचार करून म्हणाले, 'आता काय करावे ?'

बाबा राधासिंह डोक्यावरील पगडी मागे सारीत म्हणाला, 'करायचेय काय ? जो धर्मातून गेला तो जातीतून गेला. जो भरल्या घरातून रिकाम्या हाताने बाहेर गेला त्या हतभाग्यासाठी कोण काय करणार ? ती जेथे आहे तेथेच तिला राहू द्या. स्वतःच कृतकर्माचे फळ भोगील.'

सर्व म्हणाले, 'ठीक आहे! ठीक आहे! बाबाजीने अगदी लाखमोलाचा सल्ला दिला आहे.'

पंडितजी म्हणाले, 'त्या कुलटेला तेथेच राहू द्यावे. ह्याशिवाय दुसरे काय करणार ? काय रे बाबा करमचंदा, तुझे काय म्हणणे आहे ? हरि ओ...म्!'

करमचंद हात जोडून मोठ्या उत्साहाने म्हणाला, 'महाराज! आपला सल्ला तीच माझी इच्छा. आपण समजूतदार आहात. ह्या घरात आता तिला पाऊलसुद्धा टाकता येणार नाही, महाराज. शिवाय कुसकरलेले फूल आणि तुटलेले मन परत सांधणे कठिणच आहे नाही का ?'

ह्यावर सर्वांनी होकार भरला. सर्वजण पंडितजींच्या औदार्याची आणि करमचंदाच्या हुषारीची वाखाणणी करीत हळू हळू उठून जाऊ लागले. पंडितजी सुद्धा 'हरि ओ...म्' म्हणत म्हणत सर्वांच्या मागून सावकाश उठले. जाता जाता करमचंदाने हळूच त्यांच्या मुठीत चांदीची काही नाणी कोंबीत म्हटले, 'महाराज! आमच्यावर अशीच कृपा-दृष्टी असू द्यावी.' पंडितजी भरल्या हाताने खिसा चाचपू लागले व दुसऱ्या हाताने करमचंदाचा खांदा पकडून म्हणाले, 'राहू दे, राहू दे. बरं, मी जी गोष्ट सांगितली होती...'

'हो हो, मी त्याच वेळी ख्वाजासाहेबांकडे गेलो होतो. अगोदर ते तयार होईनात पण मग आपली सिफारिश ऐकून तयार झाले.'

'[illegible] झाले! केवढ्याला ?'

'पन्नास रुपये नगद देऊन आलो होतो आणि सौदा झाल्यावर आणखी पन्नास रुपये द्यायचं ठरवून आलो होतो.'

'काम स्वस्तात झाले.'

'होय. सर्व आपल्याच कृपेचे फळ आहे, नाही तर... "

नंतर आशीर्वाद देऊन पंडितजी हळू हळू छडी वाजवीत घरी निघाले. घरी पोहोचण्यापूर्वी कोणाकोणाच्या घरी गेले आणि त्यांना काय काय सल्ले दिले, देव जाणे!

[6]

गुरदेई चिंतेत बुडून गेली होती. इतक्यात तिला पंडितजी आत येत असलेले दिसले. इकडच्या-तिकडच्या गोष्टी झाल्यानंतर ते म्हणाले, 'बाळ, तुझ्यासाठी आज आख्ख्या गावात फिरलो, पंचायत बोलावली, ज्याचे तोंडसुद्धा पाहावेसे वाटत नाही त्याचे पाय धरले. पण देवाने ह्यांच्या बुद्धीला काय केले आहे कोण जाणे, काही केल्या ती मंडळी बधत नाहीत. (ढेकर देत) हरि ओ...म्!'

गुरदेईने मोठ्या भक्तिभावाने पाया पडत म्हटले, 'महाराज, माझ्यासारख्या दुःखी स्त्रीसाठी आपण कष्ट घेणार नाही तर कोण घेणार?'

'पण मुली, माझे मनोरथ असफलच झाले ना?'

'का बरे?'

'करमचंद काही केल्या ऐकत नाही. म्हणतो, 'तिने आम्हांला लेखी दिले आहे. आता तिला आमचे काय वाईट करता येणार आहे?''

गुरदेईने निराशेने सुस्कारा टाकीत म्हटले, 'आणि जातवाल्यांनी काय सांगितले?'

'बेटी, त्यांच्या हातात काय आहे? ते जोरजबरदस्ती थोडीच करू शकतात? ही काय सरकारी कोर्ट-कचेरी थोडीच आहे की पाहिजे ते करून घ्यावे.'

'मग आता मी काय करावे?'

थोडा वेळ विचार करून पंडितजी म्हणाले, 'काय सांगू? मोठी कठीण समस्या आहे. फिर्याद करूनही काही आशा नाही. कारण त्याला पैशाचे पाठबळ पाहिजे.'

'किती खर्च येईल?'

'कमीत कमी तीनशे रुपये तरी लागतील.'

आपल्या हातातील बांगड्यांकडे पाहात गुरदेईने विचारले, 'ह्या केवढ्याच्या असतील?'

पंडितजी आशाळभूतपणे त्या बांगड्यांकडे पाहात म्हणाले, 'ह्या ना? असतील दीडशे-दोनशेच्या.' गुरदेई निराश झाली.

पंडितजींनी धीर दिला. 'बेटी, तू काळजी करू नकोस. जे काही पैसे कमी पडतील ते मी माझ्या पदरचे घालून तुझे काम करण्यास तयार आहे.'

गुरदेईने हातांतील बांगड्या काढून पंडितजींच्या पायापाशी ठेवल्या व त्यांना साष्टांग नमस्कार घालून ती म्हणाली, 'मी आपल्याच आसऱ्यावर आहे. तुम्हीच काय ते माझी नौका पैलतीरी लावू शकाल.'

पंडितजी मोठ्या प्रेमाने तिच्या मस्तकावरून हात फिरवीत म्हणाले, 'मुली, देव तुझे कार्य सिद्धीस नेईल बरे. मी आजच ह्या खटल्याची सर्व जबाबदारी माझ्या डोक्यावर घेतो. ईश्वरकृपेने लवकरच ह्यात यश मिळेल. (ढेकर देत) हरि ओ...म्! पण तू येथे राहिलीस तर काम बिघडण्याचा धोका आहे.'

'पण मी जाऊ तरी कोठे? आपण म्हणत असाल तर माहेरी जाते. पण तेथेसुद्धा कोणी नाही माझे. हो, राहण्यासाठी एक घर तेवढं आहे.'

'नाही मुली, तू मुळीच काळजी करू नकोस. सियालकोटला माझा एक मित्र आहे. पाहिजे तर तुला त्याच्याकडे पाठवितो.'

'महाराज, आपल्या आसऱ्याला आले आहे, सांगाल ते करीन.'

पंडितजींनी बांगड्या उचलून खिशात टाकल्या व तिला धीर देत म्हटले, 'मुली, मी त्याचा बंदोबस्त करतो. तू जेवून आराम कर. कसलीही फिकीर करू नकोस.'

'महाराज, आपण असताना कसली काळजी? आपण तर नरसिंहाप्रमाणे खांब फोडून माझ्या मदतीला धावून आला आहात. आपले उपकार मी कसे फेडू?'

'हरि ओ...म्' म्हणत म्हणत पंडितजी खाली निघून गेले. थोड्या वेळाने एक मुलगा तिचे जेवण ठेवून गेला. दोन-चार घास खाऊन तिने खोलीतील एका खाटेवर अंग टाकले.

बराच वेळ काळजीमुळे तिला झोप आली नाही. मग जरा डोळा लागताच कोणाच्या तरी चाहुलीने ती उठून बसली. पंडितजी एका उंच्यापुऱ्या तरुणास घेऊन खोलीत येऊन म्हणाले, 'मुली, माझ्या मते तू आजच (युवकाकडे पाहून) माझ्या ह्या मित्राबरोबर सियालकोटला जावे हे उत्तम. तेथे तुझ्या राहण्याची उत्तम व्यवस्था होईल. तुला जरासुद्धा त्रास होणार नाही.'

गुरदेईने मोठ्या कृतज्ञतेने पंडितजींकडे पाहात म्हटले, 'आपले उपकार मी जन्मभर विसरणार नाही' आणि ती जाण्यास तयार झाली.

थोड्याच वेळात ती त्या इसमाबरोबर आगगाडीचा प्रवास करू लागली.

गुरदेई सियालकोटला पोहोचली आणि थोड्याच दिवसांत तिच्यासमोर ह्या नाटकाचा नवा प्रवेश आला. खरी गोष्ट तिच्यापासून फार दिवस लपून राहू शकली नाही. ज्या ब्राह्मणाची ती ईश्वरी अवतार समजून मनोभावाने पूजा करीत होती तो वास्तविक अस्तनीतील साप होता. त्याने गुरदेईच्या बांगड्या गिळंकृत करून तिला ताराचंद नामक एका युवकास विकले होते. जो मनुष्य तिला येथपर्यंत सोडण्यास आला होता तो वास्तविक पंडितजींचाच दलाल होता. ती बिचारी हतभागी अबला कपाळ बडवीत बसली. आता तिच्या हातात काय होते ? ह्या खेपेस तिला ताराचंदाने जी सुखस्वप्ने दाखविली त्यांच्या लोभाने ती आपल्या उद्देश्यापासून अधिकच दूर फेकली गेली. अल्लड, अबोध गुरदेईने त्याच्या जाळ्यात गुरफटून जाऊन आपले सर्वस्व त्याच्या चरणी अर्पण केले.

ताराचंद थोडाबहुत शिकलेला होता. एका सरकारी कचेरीत तो कारकून होता. त्याला महिना तीस रुपये मिळत असत. त्याने गुरदेईला सांगितले की 'माझे खरे घर गुजरांवालामध्ये आहे, पण बापाशी पटत नसल्यामुळे मी घरी जात नाही; तेथे माझी लाखो रुपयांची इस्टेट आहे.' पण खोट्या गोष्टी फार दिवस लपून राहत नसतात.

काही दिवसांतच ताराचंदाचा नीचपणा उघडकीस आला. एके दिवशी त्याच्या आईचे पत्र आले. ताराचंद घरी नव्हता. गुरदेईने ते पत्र कोणाकडून तरी वाचून घेतले. त्याच्या आईने लिहिले होते की, 'मी मजुरी करून कसंबसं पोट भरीत आहे. तू इथून गेल्यापासून एक पैदेखील पाठविली नाहीस. तू एका स्त्रीला पळवून आणले आहेस असेही मी ऐकले आहे. हे काही चांगले नाही...' वगैरे वगैरे.

बिचारी गुरदेई विवश होती. तिला आता सासरी माहेरी दोन्ही ठिकाणी स्थान नव्हते. ती मूर्ख आणि अशिक्षित होती. माणसाची तिला मुळीच पारख नव्हती. गोड बोलणाऱ्यावर ती लगेच भाळून जात असे. म्हणूनच तिला स्वाभिमान राखता आला नाही आणि ती पतित झाली.

सरतेशेवटी आहे ह्या स्थितीत राहण्यातच तिने समाधान मानले. काही नाही तरी शिळा-पाका तुकडा तरी पोटास मिळेल. बिचारीला हे कोठे माहीत होते की दुर्दैवाने अजूनही आपली तिची पाठ सोडलेली नाही. दुष्काळात तेरावा महिना म्हणजे याच वेळी सरकारी कचेऱ्यांतून अनेक लोकांना कमी करण्यात आले. ताराचंदालाही एखाद्या वाळक्या फांदीप्रमाणे वेचून काढून डच्चू देण्यात आला. इकडे गुरदेई आजारी पडून बिछान्याला खिळलेली होती.

हाच ताराचंद काही दिवसांपूर्वी गुरदेईच्या प्रेमाने वेडावून गेला होता. पण सात-आठ महिन्यांतच तो तिला इतका कंटाळून गेला की ती त्याला अगदी डोळ्यासमोर नकोशी झाली. एवढेच काय तो तिला औषधपाणी करण्याचेही टाळू लागला. तो हट्टीपणा, विलास आणि कलहाचा मूर्तिमंत अवतार होता. उठता लाथ आणि बसता बुक्कीवाचून गुरदेईचा दिवस जाईनासा झाला.

आता गुरदेई अगदी मृत्यूच्या पंथाला लागली होती. एक तर साऱ्या जगाचा तिरस्कार, दुसरे असा तिस्मारखाँ पती, तिसरे भयंकर गरिबी, आणि चौथी सर्वात भयंकर गोष्ट म्हणजे आता गुरदेईला आपले कमनशीब अधिकच खडतर दिसू लागले होते. वर्तमानकाळ जर इतका भीषण आहे तर मग भविष्यकाळी काय होणार ? ह्याच विचाराने तिच्या जिवाचा थरकाप होत असे. पतीपासून लहानसहान गोष्टीची आशा बाळगणे किती व्यर्थ आहे हे ती प्रत्यक्ष पाहात होतीच. शिवाय म्हणतात ना, भित्यापाठी ब्रह्मराक्षस ! ती विचार करू लागली की हा पापाचा गोळा घेऊन कुठे जावे ? शेष जीवन कोठे आणि कसे कंठावे ? हृदयाच्या घोर अंधःकारात ह्या सर्व प्रश्नांचे एकच उत्तर होते, 'काही नाही.'

ज्या क्षणाची तिला उठता बसता धास्ती वाटत होती तो क्षण अखेर येऊन ठेपला. तापामुळे तिला डोळा उघडवत नव्हता. ह्याच स्थितीत पुष्कळ वेळ निघून गेला पण ताप उतरला नाही.

एके दिवशी मध्यरात्री ती तळमळत पडली होती. तिला पाण्याचा एक घोट देणारे सुद्धा कोणी नव्हते. दोन दिवसांपासून ताराचंद घरी फिरकला नव्हता. त्याच्या येण्याची अपेक्षाही नव्हती. कारण जाण्यापूर्वीच तो सांगून गेला होता की, 'आता माझ्या परतण्याची मुळीच आशा बाळगू नकोस. नवऱ्याला खा, जग, मर, काय वाटेल ते कर. मी काही मोफतचा दवाखाना उघडला नाही. स्वतः उपाशी मरतो आहे, तुला कसे संभाळू ? दुसऱ्या कुठल्या तरी गावी जाऊन पोटापाण्याची व्यवस्था करता येईल आणि ह्या ब्यादेपासून तरी सुटका होईल.' ह्यावर कळस म्हणजे गुरदेईच्या बेशुद्धीचा फायदा घेऊन घरातील सारी चीजवस्तू घेऊन त्याने पोबारा केला. दुर्दैवाने त्यांचे घर अशा वस्तीत होते की जेथे जवळपास एकसुद्धा हिंदूचे घर नव्हते. तहानेने जीव कासावीस झाल्यामुळे ती कशी तरी पडत झडत खाटेवरून उतरली आणि पाण्याच्या माठाजवळ पोहोचली. पण तिच्या नशिबाप्रमाणे तो माठही रिताच होता. योगायोगाने एका ग्लासात मचूळ पाणी होते. गुरदेईने ग्लास कापऱ्या हाताने उचलून तोंडाला लावला. थोडे पाणी खाली सांडून गेले आणि थोडे तिच्या तोंडात गेले. आता तिची दशा इतकी बिघडली होती की, तिला परत उठता आले नाही व ती

तेथेच बेशुद्ध होऊन कोसळली. किती वेळ ती ह्या स्थितीत पडून होती हे एका ईश्वरालाच ठाऊक !

[8]

आश्विनातील उन्हामध्ये सबंध दिवस भागाबाईचा खेळ दाखवून रोडू कलंदर आपल्या डेऱ्याकडे परतला होता. त्याच्या झोळीत पोळीचे काही तुकडे व थोडीशी कणीक होती. एक फाटके कांबळे, मातीचे दोन पेले, दोन वाट्या, एक झोळी आणि अशाच तऱ्हेचे काही सटरफटर सामान म्हणजे त्याची इस्टेट होती. एक तो स्वतः आणि एक त्याची लच्छो माकडीण हाच त्याचा परिवार होता. साऱ्या दुनियेत त्याचे दुसरे कोणी नव्हते. तो दूधपिता असतानाच त्याचे आईबाप प्लेगने मेले होते. चकणा असल्याने त्याचे लग्नसुद्धा होऊ शकले नव्हते.

रोडूबाबा साठीच्या पलीकडे गेला होता. तरी ऐहिक मायाममतेचा त्याला अजिबात अनुभव नव्हता. जेव्हा एखाद्याच्या तोंडून ऐके की अमुक व्यक्ती तमक्यावर खूप प्रेम करते, तेव्हा ह्या निरर्थक गोष्टीचे त्याला खूप हसू येई. मनुष्य जन्मास येतो आणि मरतो हेच शाश्वत सत्य त्याला ज्ञात होते. हो, ईश्वरावर आणि आपल्या गुरुदेवतावर त्याची अपार श्रद्धा होती. खालच्या जातीचा हरिजन असूनही तो स्वतःला कट्टर हिंदू धर्मभक्त समजत असे.

खांद्यावरील झोळी उतरवून त्याने झोपडीच्या मधोमध बांबूवरील खिळ्याला ती अडकवली. माकडिणीला बांधावयाची त्याला कधीच गरज वाटली नाही. ती त्याची जन्मोजन्मीची सोबतीण होती—तिच्यावर मात्र त्याचे अतिशय प्रेम होते. ती आपली आपणच वडाच्या शीतल बुंध्यावर मस्तक ठेवून पहुडली. रोडूने बोटाने कपाळावरील घाम निपटला. घामाने थबथबलेली, ठिकठिकाणी शिवलेली बंडी उतरून त्यानेही जमिनीवर अंग टाकले.

थंडगार झुळकेने जेव्हा त्याच्या देहावरील घाम सुकला तेव्हा त्याने टांगलेल्या हंडीमधून पेल्यात पाणी ओतले. थैलीतून गुळाचा तुकडा शोधून काढून तो एका दगडाने बारीक कुटून त्याने सरबत तयार केले. निम्म्याहून अधिक सरबत दुसऱ्या पेल्यात घालून त्याने माकडिणीकडे पाहिले. ती वाटच पाहात होती. एका उडीत ती त्याच्या जवळ पोहोचली. पटकन पेला रिकामा करून ती परत आपल्या जागी जाऊन बसली.

थोड्याच वेळात कोठून तरी बरीच कुत्री तेथे एकत्र जमली आणि कूं कूं करीत

रोड्डभोवती घुटमळू लागली. रोड्डने झोळी उचलली आणि पिठातून पोळीचे तुकडे वेचून काढून कुत्र्यांना घालू लागला. झोळीमध्ये जेव्हा फक्त पीठच उरले तेव्हा झोळी परत टांगून ठेवून तो जमिनीवर पडला.

आज तो जरा उशिराच स्वयंपाकास लागणार होता. पडल्या पडल्या त्याचा डोळा लागला. थोड्या वेळानंतर त्याने कूस बदलली. थोडीशी जाग आली त्याला. पण तो परत झोपून गेला. एका मिनिटातच तो परत जागा झाला व उठून बसला. मग कान देऊन काही ऐकण्याचा प्रयत्न करू लागला. त्याला आवाज आणखी स्पष्ट ऐकू येऊ लागला. तशी तो ज्या दिशेने आवाजाचा भास होत होता त्या दिशेकडे चालू लागला. आपल्या धन्याला अशा तऱ्हेने जाताना पाहून माकडीण पण त्याच्या पाठोपाठ जाऊ लागली. जाता जाता तो एका झाडापाशी थांबला. आवाजावरून एखादे नवजात शिशू रडत असल्यासारखे वाटत होते. त्याने खाली वाकून झाडीकडे पाहिले तो त्याला एक लाल रंगाची वस्तू ओझरती दिसली. तो आणखी पुढे झाला. ती एक लाल रंगाच्या चिंध्यांत गुंडाळलेली बालिका होती. एका श्वासातच ती 'ट्याहां ट्यांहां' करून रडत होती.

रोड्डला त्या बालिकेची दुर्दशा पाहवली नाही. त्याने मागचा-पुढचा विचार न करता एकदम चिंध्यांसकट त्या मुलीला उचलले व परत तो आपल्या झोपडीत आला. जरी हवेत फारसा गारठा नसला तरी सायंकाळच्या हवेचा थंडपणा त्या कोवळ्या पोरीला जास्तच होता व चिंध्यांत गुंडाळलेल्या त्या बालिकेचे शरीर बधिर होऊ लागले होते. तिचे ओठ निळे पडत चालले होते.

रोड्ड घाबरून विचार करू लागला. आता ह्या पोरीचे काय करावे, हिला कोठे घेऊन जावे, हिचा जीव कसा वाचवावा? माकडांना निसर्गतःच लहान मुलांबद्दल अधिक प्रेम असते. रोड्ड त्या माकडिणीला नजरेच्या धाकाने बाजूला सारण्याचा यत्न करीत होता; पण ती वारंवार रोड्डच्या हातातून मुलीला हिसकावून घेण्याचा प्रयत्न करीत होती. रोड्डने घाईघाईत गोधडी नीट केली व त्यात मुलीला गुरफटून टाकले. मग त्याच्या डोक्यात प्रकाश पडला. मांजराच्या पिल्लाइतकी ही छोटीशी बालिका कोण जाणे किती दिवसांची भुकेली आहे. तिच्यासाठी दूध आणले पाहिजे. हा विचार करून त्याने मुलीला तेथेच झोपविली आणि तो स्वतः पेला घेऊन झटकन गावाकडे पळाला. वाटेत त्याला चिंता वाटू लागली, मी त्या पोरीला एकटीच सोडून आलो आहे, तेसुद्धा बंदरीसारख्या चंचल जनावराजवळ, ही चूक झाली खरी आपल्या हातून. आपल्या बरोबर मुलीला घेऊन आलो असतो तर कसली भीती होती? मला कोण काय म्हणाले असते? हं, विचारलेच कोणी तर सांगितले असते माझ्या नातेवाइकाची मुलगी आहे म्हणून. त्याच्या मनात आले परतावे झाले. पण त्या बालिकेच्या भुकेच्या विचाराने

त्याची पावले मागे वळू शकली नाहीत. त्याने हात जोडून डोळे मिटून शिव-पार्वतीचे नाव घेतले आणि तो पुढे चालू लागला.

त्याने अतिशय चपळतेने काम केले तरी जाण्यायेण्यात त्याचा अर्धा तास मोडलाच. तो दूध घेऊन झोपडीकडे परतला. त्याची छाती धडधडत होती. तो मनात म्हणत होता, माझ्या मूर्खपणामुळे देवाघरच्या एका जिवाचे जीवन नष्ट होऊ नये म्हणजे झाले.

झोपडीत आल्यावर तो आश्चर्याने आ वासून पाहू लागला. बंदरी त्या मुलीला माते-प्रमाणे मांडीवर घेऊन बसली होती व गोधडी एका कोपऱ्यात पडली होती. मुलीने डोळे उघडले होते पण आता ती मुळीच रडत नव्हती. आपल्या शरीराच्या उबेने बंदरीने तिची थंडी घालवली होती. आपल्या स्वामीला समोर उभे असलेले पाहून बंदरीने मुलीला गोधडीवर झोपविले व स्वतः भीतीने संकोचून एका बाजूला जाऊन उभी राहिली.

रोडूने गोधडीतून कापसाचा बोळा काढला व तो दुधात भिजवून तो मुलीला दूध पाजू लागला. दूध पिताच मुलगी झोपून गेली. रोडूने सुटकेचा निःश्वास टाकला. रात्री नेहमीप्रमाणे त्याने दगडाच्या चुलीवर तीन चपात्या भाजल्या. दोन स्वतः खाल्ल्या आणि एक बंदरीला दिली. आज रोडूला मातीतच झोपावे लागले. त्याने गोधडी उलगडून तिच्या अर्ध्या भागावर मुलीला झोपविले आणि उरलेला भाग तिच्या अंगावर घातला. मग ती गोधडी पोटाशी धरून तो झोपी गेला.

मध्यरात्री जेव्हा रोडूने कूस बदलली तेव्हा एकदम त्याला त्या बालिकेची आठवण झाली. तो उठून बसला. मुलीची हालचाल पाहण्यासाठी त्याने गोधडीचा वरचा भाग उचलला. पण मुलगी तेथे नव्हती. त्याला वाटले मुलीला एखाद्या जंगली जनावराने नेले की काय. त्याच वेळी त्याने मागे वळून पाहिले. मुलगी खरोखरच एका जंगली जनावराच्या ताब्यात होती—लच्छो तिला आपल्या मांडीवर घेऊन रात्रीचे दूध कापसाच्या बोळ्याने तिला पाजीत होती—अगदी हुबेहूब जसे तिने मघाशी रोडूला पाजताना पाहिले होते.

ईश्वरी लीलेचा हा अजब चमत्कार पाहून रोडूला हसू आले. तो विचार करू लागला, खरेच ईश्वराची लीला अगाध आहे. त्याने मुलीला मानवी मातेच्या हातातून काढून नेऊन ह्या जंगली मातेच्या हवाली केले आहे.

मोहमायेचा हा प्रथम किरण रोडूच्या अंधाऱ्या आणि थंड हृदयात चमकू लागला. त्याच्या उबेने व अस्पष्ट प्रकाशाने आज प्रथमच त्याला अवर्णनीय सुख दिले. जो रोडू रोज सूर्याशी पैज लावून झोपत असे तो आता क्षणाक्षणाला जागा होत असे

आणि कधी सुंदरी रात्री जागून हट्ट करू लागे तेव्हा तर तो तासनतास तिला कडेवर घेऊन अंगाईगीत गाई.

सदके सदके सद माईयां,
चंबे दीआं बूटियां रब्ब लाईयां।[1]

ह्याच अंगाईगीतांची तो प्रथम लोकांच्या तोंडून ऐकून टर उडवीत असे. पण आज त्याच गीतांमध्ये त्याला अलौकिक आनंद मिळत असे.

खरेच देव तारी त्याला कोण मारी? ज्या निष्पाप बालिकेला कोणीतरी जाणूनबुजून मृत्यूच्या दाढेत ढकलले होते, ती वाचली होती. कारण तिला हे जग बघायचे होते. शिवाय रोडूच्या एकाकी, रित्या अंतःकरणात वात्सल्याची ज्योत प्रज्वलित करण्याच्या कामगिरीवरच जर तिला देवाने ह्या जगात पाठविले होते तर ती आपली कर्तबगारी न दाखविताच ह्या जगातून कशी बरे गेली असती?

बालिका नाकी-डोळी अतिशय नीटस होती. तिचे पिंगट डोळे, गोरा रंग, सोनेरी रेशमी केस निसर्गाच्या अलौकिक कलाकुशलतेचीच साक्ष देत होते. तिचे सौंदर्य पाहूनच रोडूने तिचे नांव सुंदरी ठेवले होते.

म्हाताऱ्या रोडूला कधीपासून पडलेल्या प्रश्नाचे उत्तर आपोआपच मिळाले. हाच रोडू कधी कधी लोकांची चेष्टा करीत असे, 'पाहा तर खरे, पोरा-बाळासाठी साऱ्या दुनियेची चिंता डोक्यावर घेण्यात कसला शहाणपणा आला आहे? लोक उगीचच भ्रमात पडून मोहममतेचा जप करीत बसतात. मोह काय महत्त्वाची वस्तू झाली?'

वृद्ध कलंदर जो दोन जिवांचे पोट भरेल इतका आटा मागून वृक्षाच्या शीतल छायेखाली पाय पसरून झोपत असे तोच आता भल्या पहाटे घरातून बाहेर पडे आणि काळोख पडल्यावर घरी परते. आता आट्याव्यतिरिक्त त्याला पैशाचीही जरुरी भासू लागली. जे पोळीचे तुकडे तो पूर्वी कुत्र्यासमोर फेकीत असे, ते आता आपल्या निर्वाहासाठी तो ठेवीत असे. थोड्याच दिवसांत रोडूने पैसे साठवून सुंदरीसाठी एक छोटीशी खाट व कपडे खरेदी केले, दोन-चार खेळणीही आणली. पूर्वी मिळेल त्यावर तो समाधान मानीत असे. आता तो वारंवार लोकांची आर्जवे करी, 'साहेब, मुलीसाठी द्या ना एखादा फाटका-तुटका कपडा! बाबा, पोरीच्या दुधासाठी पैसा द्या ना!' रोडूपेक्षा लच्छो काकणभर अधिकच सुंदरीवर प्रेम करीत असे. क्षणभरसुद्धा ती सुंदरीला दृष्टीआड होऊ देत नसे.

प्रथम-प्रथम रोडू सुंदरीला एक ब्याद समजत असे पण आता सुंदरी त्याचे सर्वस्व

---

1. ईश्वराने चंब्याची रोपटी लावली आहेत, मी धन्य झालो ती पाहून.

होऊन बसली होती. तो आता नेहमी सुंदरीला बरोबर घेऊन भिक्षा मागण्यास निघत असे. पूर्वी त्याच्याजवळ एकच बंदरी होती, आता दोन झाल्या. पोरीची दया येऊन लोक त्याला काही ना काही देत असत, पण रोड्डू जेव्हा रडवेला चेहरा करून म्हणे, 'बाबा, ही जन्मताच हिची आई मरण पावली, दया करा हिच्यावर', तेव्हा लोकांची अंतःकरणे अधिकच द्रवित होत.

रोड्डूचे सुंदरीवर प्रेम होतेच पण एका मुक्या प्राण्याचेही सुंदरीवर जिवापाड प्रेम होते. ती माकडीण क्षणभरदेखील सुंदरीला डोळ्यांसमोरून दूर होऊ देत नसे.

सुंदरी आता दोन वर्षांची झाली. एका कलंदराच्या काळोख्या झोपडीत ईश्वराने प्रकाशाची ज्योतच प्रज्वलित केली होती. तिला कितीही पाहिले तरी रोड्डूचे समाधान होत नसे. बंदरी मातेच्या सहवासामुळे सुंदरीच्या सवयीमुद्धा माकडाप्रमाणे चंचल झाल्या होत्या. ती सुद्धा लच्छोप्रमाणे उलटसुलट कोलांट्या उड्या मारीत असे. कधी झोपडीच्या बांबूवर पाय ठेवून वर चढण्याचा प्रयत्न करीत असे. जे काम बंदरी करीत असे, तेच काम हीसुद्धा सहजतेने करी.

सुंदरीला गरीब लोकांच्या मुलांबरोबर खेळताना पाहून आणि सर्व मुले तिच्याशी प्रेमाने वागताना पाहून रोड्डूच्या आनंदाला पारावार राहात नसे. सौंदर्याबरोबरच निसर्गाने सुंदरीला तीव्र बुद्धीही दिली होती. जे काही ती पाही त्याचे तात्काळ ती अनुकरण करीत असे. जे तिच्या कानावर पडे, तसेच बोलण्याचा ती प्रयत्न करीत असे. रोड्डूला तिचे पालन-पोषण करण्यापलिकडे क्षणाचा अवकाश मिळत नसे.

रोड्डू केव्हाही घरी येताना सुंदरीसाठी काही ना काही तरी आणीत असे. त्याला ती सवयच लागून राहिली होती. जेव्हा तो एखादी वस्तू घेऊन येई तेव्हा त्याच्या चालीत विजेची चपलता येई आणि हृदयात एक अलौकिक इच्छा तरंगू लागे. सुंदरीला घास भरविताना त्याला इतका आनंद होत नसे जितका आनंद घराजवळ पोहोचल्यावर सुंदरीच्या पळत पळत येण्याने होत असे. ती धावत येऊन त्याच्या पायाला विळखा घालून त्याच्या चादरीचा कोपरा चाचपडी आणि उड्या मारीत म्हणे, 'बाबा, द्या पाहू माझी गंमत!' अगदी गडबड माजवून देई. चादरीची गाठ सोडून तो मिठाईचा द्रोण तिच्या हातात देई तेव्हा ती आनंदाने नाचत बागडत दुसऱ्या मुलींना आपली मिठाई दाखविण्यास निघून जाई. रोड्डूला एक धुंदी चढे. आनंदाने तो वेडावून जाई. राजामहाराजांनाही क्वचितच मिळत असेल असे सुख त्यावेळी त्याला लाभे.

मुलांशी खेळताना सुंदरी नेहमी त्यांच्या आयांना पाही. जेव्हा दोन मुले आपसात भांडत तेव्हा ती आपापल्या आयांना हाक मारीत, 'वेबे (आई), बघ ग, हा मला मारतो!', 'वेबे, हा माझ्या गोट्या देत नाही बघ ग!'

सुंदरीला 'बेबे' शब्दात काही गम्य नव्हते. बाबा रोड्डूच तिचे सर्वस्व होते. त्यानंतर होती लच्छो माकडीण. पण कधी कधी ती एखाद्या मातेला आपल्या मुलांना जवळ घेताना, त्यांच्या डोक्यावरून हात फिरविताना पाही तेव्हा तिच्या मनात मुद्धा 'बेबे'साठी तीव्र लालसा निर्माण होई. एखादे अप्राप्य खेळणे मिळविण्याची इच्छा व्हावी ना, तशीच !

एकदा रात्री मुंदर चांदणे पडले होते. म्हातारा रोड्डू झोपडीच्या बाहेर तरटावर झोपून सुंदरीला आपल्या गुडघ्यावर बसवून झुलवत होता. झुलवता झुलवता तो 'हूटे माईयां, सोने दी गड्डु चलाईयां' ही ओळ आळवीत होता. सुंदरी त्याला परत परत तेच म्हणण्याचा आग्रह करीत होती. एकसारखा झोका देऊन रोड्डूचे पाय दुखू लागले. तशी तो सुंदरीला म्हणाला, 'सुंदरी, आता तुला फुट्टी देतो.' तिचे चिमुकले हात आपल्या हातात पकडून, 'यहाँ पडी फुट्टी कौएने मारी झुट्टी' असे बोलत बोलत 'मिळाली रे मिळाली' असे ओरडून तो तिला गुदगुल्या करू लागला. सुंदरीची हसता हसता पुरेवाट झाली. तिच्या निर्मळ हास्यात रोड्डूला स्वर्गीय आनंद मिळत असे.

त्याच वेळी दूर एका मुलाने मोठ्याने ओरडून आपल्या आईला हाक मारली, 'बेबे !' तो आवाज ऐकून सुंदरीचे हसू मावळले. दोन्ही हातांनी रोड्डूची हनुवटी धरीत ती म्हणाली, 'बाबा, मेरी बेबे किथे ?' (बाबा, माझी आई कोठे आहे ?)

बिचारा म्हातारा ह्या छोट्याशा पण अती बिकट प्रश्नाचे काय उत्तर देणार ? त्याला धक्काच बसला. मग त्याने सुंदरीची एक पापी घेतली.

'बेटी, तुझी आई गेली.'

सुंदरीने परत विचारले, 'बाबा, माझी आई कोठे आहे ?'

'बाळ, तुझी आई दू...र निघून गेली.'

'बाबा, आई दू...र'

'हां बेटी दू...र'

'बाबा, आई वर... !'

'हो बाळ, वर निघून गेली !'

'आई चंदामामाजवळ—'

'हो बाळ, चंदामामाजवळ—'

'बाबा, आई कोको (घार)...'

'हो बेटा, आईला घार घेऊन गेली.'

'बाबा आई दूर...कोको ?'

'होय ग बाळे, दूर कोको घेऊन गेला.''

अशा तऱ्हेने बोलता बोलता काही वेळाने सुंदरी झोपी गेली. रोडूचाही डोळा लागला.

[9]

[दहा-बारा वर्षांनंतर]

कोणत्याही गोष्टीचा ध्यास, मग तो चांगला असो वा वाईट असो, माणसाला कुठल्या कुठे घेऊन जातो. ध्यास हा एखाद्या थेंबासारखा आहे. कधी विरजणाच्या रूपाने दुधाचे दह्यात परिवर्तन करतो. पण हाच थेंब कधी 'कांजी' होऊन दुधात पडला तर मात्र दूध नासते. दिवाणबहादुर जीवसिंहाचा पुत्र बचनसिंह यासही एकाच गोष्टीचा ध्यास लागून राहिला होता. दहावी पास करून तो खालसा कॉलेजमध्ये दाखल झाल्यापासून त्याने हा ध्यास घेतला होता. ह्याच ध्यासाने म्हणा किंवा एका महान व्यक्तीच्या सहवासाने म्हणा, त्याच्या जीवनात परिवर्तन घडून आले होते.

बचनसिंहाचे वय असेल १८–१९ वर्षांचे. अमृतसरच्या दूषित हवेत पुष्कळ वर्षे घालवूनही त्याच्या देहात अजून ग्रामीण रक्त सळसळत होते. धष्टपुष्ट शरीर, रुबाबदार चेहरा. नुकतीच मिसरूड फुटत असल्यामुळे चेहऱ्याला आलेली एक आगळीच शोभा. निर्मळ डोळे व मधुर वाणी यांमुळे तो आपल्या शाळेचा हिरो बनला होता. शिवाय त्याला कविता करण्याची, स्टेजवर भाषण झोडण्याची आवड होती. तो आपल्या शाळेच्या युनियनचा नेता होता. विद्यार्थ्यांची सभा, संमेलने वगैरे कार्यक्रमात तो अग्रेसर असेच. सार्वजनिक गोष्टींतही त्याला मान होता. मोठमोठ्या कविसंमेलनांत त्याच्या काव्यगायनास महत्त्व दिले जाई. त्याच्या कवितांची अनुभूती मोठ्या उच्च दर्जाची होती अशातील गोष्ट नाही. त्याच्या कविता साधारण दर्जाच्याच असत. पण त्याच्या गळ्यात जे माधुर्य व सुरेलपणा होता त्यामुळे त्याचे पितळही सोन्याच्या भावात विकले जाई. कोणत्याही समारंभात त्याची आवेशपूर्ण वाणी ऐकली की श्रोतृवर्ग पुतळ्याप्रमाणे स्तब्ध होई.

ज्या नवीन गोष्टीच्या ध्यासामुळे बचनसिंहाच्या जीवनात क्रांती निर्माण झाली होती त्याचा इतिहास अशा प्रकारचा आहे. दहावी पास झाल्यानंतर बचनसिंह खालसा कॉलेजमध्ये फर्स्ट इयरला दाखल झाला. त्या काळात शहरात-खेडेगावात ग्रामसुधारणांवर नेहमी सभा होत. खेडेगावांत प्रचलित असलेल्या वाईट चालीरीती व फालतू खर्चास आळा घालणे हे त्या सभांचे उद्दिष्ट असे.

अशाच तऱ्हेची एक सभा अमृतसरच्या जालियांवाला बागेत भरली होती. जवळ जवळ दहा हजार लोक जमले होते. सचिवाने बचनसिंहाचे नाव पुकारल्याबरोबर श्रोतृवर्गात खळबळ माजली. जयजयकाराच्या जल्लोषात तो स्टेजवर आला. त्याने आपली कविता म्हटली. श्रोतृवर्ग स्तब्ध झाला. त्याला ती कविता पुन्हा म्हणण्यास भाग पाडण्यात आले. सभा समाप्त झाली. आजच्या यशामुळे बचनसिंहाला अतिशय आनंद झाला. त्याचे पाय जमिनीवर ठरत नव्हते. त्याच्या प्रशंसकांनी त्याला घेरले होते. गर्दी थोडी कमी झाल्यावर एक पांढरीशुभ्र रेशमी दाढी असलेला, रुबाबदार, तेजःपुंज चेहरा त्याच्या समोर आला. तो पन्नास-साठ वर्षांचा म्हातारा. खादीच्या जाड्या-भरड्या वस्त्रांतही तो देवदूतासारखा दिसत होता. समोर आल्याबरोबर त्या वृद्धाने प्रेमाने बचनसिंहाचा हात धरला व मोठ्या सन्मानपूर्वक त्याला गर्दीतून बाहेर काढून एका बाजूला नेले. हिरवळीवर बसून तो म्हणाला, 'काकाजी[1], तुमच्या कवितेने मला तुमच्याकडे खेचून आणले.'

बचनसिंहाने त्याच्याजवळ बसून उत्तर दिले, 'बाबाजी, मोठी मेहेरबानी आहे. आपल्या या दगदगीसाठी मी...'

तो वृद्ध मध्येच म्हणाला, 'मी जास्त काही शिकलेलो नाही, म्हणून तुमच्या कवितेचा अर्थ विचारतो.'

त्याच्या हातात कागदाचा कपटा होता. त्याने तो वाचण्यास प्रारंभ केला,

'तेरे चरणोंकी कसम, ऐ हिंदमाता,
तेरी सेवामें ज़िंदगी बिता दूंगा मैं
घूम कर देशकी गलियों-मुहल्लों में
सब कुरीतियों को मिटा दूंगा मैं।'

ही कविता बचनसिंहाने नुकतीच समारंभात म्हटली होती. कविता खूपच मोठी होती. पण त्या वृद्धाने कागदावर फक्त दोनच कडवी उतरून घेतली होती. बचनसिंहाने म्हटले, 'बाबाजी, या ओळींचा अर्थ तर अगदी सोपा आहे.'

वृद्धाने बचनसिंहाकडे प्रेमाने पाहून म्हटले, 'नाही बाळ, इतका सोपा नाही. कठीण आहे. परत एकदा विचार करून पाहा बरं!'

बचनसिंह बुचकळ्यात पडला.

वृद्ध परत म्हणाला, ''तेरे चरणोंकी कसम...' याचा अर्थ तुला समजला आहे काय?'

---

1. पंजाबीत लहान मुलाला ' काका ' म्हणतात.

आता खरी गोष्ट बचनसिंहाच्या ध्यानात आली. त्याने परत एकदा बाबाजींकडे पाहिले. पण त्या नेत्रांतील तेज सहन न झाल्यामुळे त्याने आपली नजर खाली वळविली. तो निरुत्तर झाला.

त्या वृद्धाने बचनसिंहाची पाठ थोपटीत म्हटले, 'तरुणा, शपथ घेऊ नये कधी, पाप लागते मोठे.'

बचनसिंहाची नजर जमिनीलाच खिळलेली होती. 'बाळ, सेवाशुश्रूषेत जीवन व्यतीत करणे याचा अर्थ म्हणजे लोकांची वाहवा मिळविणे नव्हे.' बचनसिंहाचे मस्तक त्या वृद्धाच्या पायाशी झुकले. 'खरंच तुझ्या हृदयात क्रांतीची ज्वाला धगधगत असेल तर ह्या नुसत्या बढाया मारणे सोडून दे आणि काही तरी करून दाखव!' त्याच्या पाठीवरून हात फिरवीत बाबा म्हणाले.

बचनसिंहाचे डोळे खाडकन उघडले. खरोखरच, कवितेच्या ह्या ओळीचा अर्थ कठीण होता. आतापर्यंत बचनसिंह आवेशपूर्ण कविता वाचून जनतेत बेचैनी निर्माण करण्यात व वाहवा मिळविण्यात आनंद मानीत असे. हीच त्याला जनसेवा वाटत असे. आज त्याला प्रथमच समजले की तो जे काही करीत आहे ते ढोंग आहे, वरवरची कल्हई आहे. ह्या जीवनापेक्षा वेगळे आणि उच्च दर्जाचे जीवन असू शकते याचा ह्यापूर्वी त्याला कधी साक्षात्कार झाला नव्हता.

ह्या संक्षिप्त संभाषणानंतर तो वृद्ध तेथून निघून गेला. पण जाता जाता बचन-सिंहाच्या अंतःकरणात एका नवीन गोष्टीचा ध्यास निर्माण करून गेला. बचनसिंहाने त्याचा ठावठिकाणाही विचारून घेतला. त्याचे नाव दीदारसिंह होते. काही दिवसांसाठी म्हणून सध्या त्याचा अमृतसरला मुक्काम होता.

त्या दिवसापासून बचनसिंहाच्या जीवनात परिवर्तन घडून आले. ज्ञानी दीदारसिंह जितके दिवस अमृतसरला राहिले तितके दिवस न चुकता तो त्यांच्याकडे जाई आणि काही महिन्यांच्या सहवासाने त्याच्यात आमूलाग्र बदल घडून आला. कविता तो अजूनही करीत असे पण फक्त स्वान्तःसुखाय, दुसऱ्यांसाठी नव्हे. त्या दिवशी ज्ञानी दीदारसिंहांनी ज्या ओळी वारंवार म्हटल्या त्या तो कधीच विसरला नाही : 'तेरे चरणोंकी कसम,......'

ह्या खेपेस उन्हाळ्याच्या सुटीत बचनसिंहास घरी जावेसे वाटत नव्हते. तो आपल्या कवितांना मूर्त स्वरूप देण्यासाठी काही दिवस खेडेगावांचा दौरा करू इच्छीत होता; पण वडिलांच्या आजारीपणाचे पत्र आल्याने त्याला राहावले नाही व सुट्टी लागताच तो घरी आला. मुलाचे रंगढंग पाहून जीवासिंहाची अगदी लाहीलाही आली. सूटबूट, कॉलर, टाय जाऊन आता त्या जागी खादीचा जाडाभरडा कुडता-पायजमा व पायांत आठ-बारा आण्यांच्या वहाणा! रुग्ण जीवासिंह चिडला, संतापला. पण काय करणार? एकुलता एक मुलगा. तोंडावर काही बोलण्याची सोयच नव्हती. रागाच्या भरात घर सोडून गेला तर काय करणार? सरतेशेवटी त्याने मनाशी ठरविले की त्याचे शिक्षण बंद करून त्याला घरातील कामधंद्याला लावावे; नाही तर शिकविता शिकविता मुलालाच मुकावे लागेल तर काय घ्या?

बचनसिंहाला जनसेवेचा रोगच लागला होता. पण आई-बापांचे दुःखही त्याला बघवत नव्हते. म्हणूनच मन मारून तो घरातील कामधंद्यास लागला.

एक दिवस शेताची राखण करण्यासाठी तो गुरुद्वाऱ्यावरून चालला होता. गुरुद्वाऱ्याला कुलूप होते. तो विचार करू लागला : शिखांच्या इतक्या मोठ्या गावातील गुरुद्वाऱ्याची ही स्थिती! त्याने जवळ उभ्या असलेल्या एका मुलास विचारले,

'काय रे पोरा, गुरुद्वारात कोणी ग्रंथी[1] नाही?'

'ते बघा वर खिडकीमध्ये भायीजी बसले आहेत.'

बचनसिंह अधिकच विस्मित झाला. आपल्या शेतात दुसरी गुरे चरताना पाहून एखाद्याला आश्चर्य वाटावे व शेताचा राखणदार तेथेच बसलेला पाहून त्याचे आश्चर्य द्विगुणित व्हावे तशातीलच गोष्ट झाली ही. त्याने परत विचारले :

'मग काय भायीजी 'गुरुग्रंथसाहेबा'चा प्रकाश वरतीच करतात?'

त्या पोराला काही कळले नाही. तो म्हणाला, 'काय प्रसाद? कडाह प्रसाद? तो तर गुरुपौर्णिमेस तयार केला जातो.'

बचनसिंह समजला की पोराला त्याचे बोलणे कळले नाही. त्याने भायीजींना एकदोनदा हाक मारली. भायीजी खिडकीतून डोकावले. खाली जमीनदार सरदार जीवासिंहाच्या मुलास उभे असलेले पाहून ते झटकन खाली आले व आल्या आल्या दोन फूट वाकून

1. शिखांचा धार्मिक ग्रंथ 'गुरुग्रंथसाहेब' याचे पठण करणारा.

मोठ्या प्रेमाने हात जोडून ते म्हणाले, 'या, या सरदारजी, वाहे गुरुजीका खालसा श्री. वाहे गुरुजी की फतह! आपण मोठी कृपा केलीत येथे पायधूळ झाडून. आपल्या चरणस्पर्शाने गरिबाची ही झोपडी पवित्र झाली. यावे, यावे, वर येऊन दर्शन द्यावे.'

बचनसिंह ग्रंथीशी बोलण्याची संधीच शोधीत होता. गुरुद्वाऱ्यास 'गरिबाची झोपडी' व ग्रंथीच्या तोंडून 'पायधूळ झाडावी' असले शब्द ऐकून त्याला वाटले की उलट पावली परतावे; पण काही विचार करून तो भायीजींबरोबर वर गेला.

भायीजी जवळजवळ सव्वासहा फूट उंच होते. खाल्लेला खुराक त्यांचे मांस वाढविण्या-ऐवजी हाडांचा सापळाच वाढवीत आहे असे त्यांना बघून वाटत होते. गाल इतके खोल गेले होते की त्यात छोटासा चेंडू जरी ठेवला असता तरी तो दिसला नसता. पोट जरा दाबले असते तर त्याची पाठीच्या कण्याशी टक्कर झाली असती. खालच्या जबड्यात एक दात शिल्लक नव्हता. श्रद्धाहीन गुरुद्वाऱ्याप्रमाणे तो रिता होता. वरच्या जबड्यात एकूण चार दात होते; तेही पुढे आलेले. गवताच्या काटकीप्रमाणे असलेल्या काटकुळ्या तंगड्यांना पाहून मनात शंका यायची की, ही पृथ्वी तर सफेद बैलाच्या शिंगांवर उभी आहे पण ग्रंथीजींचा इतका लांबलचक देह कशाच्या आधारावर उभा आहे बरं? बेंबी पोटापासून अंगूळभर वरती आली होती. पोट इतके दुबळे होते की एखाद्या परातीला मळक्या कपड्याने वेढल्याप्राणे वाटत होते. ओघळलेल्या कानांतील भिकबाळ्यांनी भोकांना फाडून इतके मोठे केले होते की त्यातून गाजरमुळीसुद्धा जाऊ शकली असती. तंगड्यांची लांबी पाहून असे वाटत होते की कदाचित ईश्वर त्यांची लांबी थांबविण्यासच विसरला की काय! निसर्गाने भायीजींच्या शारीरिक रचनेचे काम रोजगारीवर न घेता ठेक्यावर घेतले असावे.

भायीजींनी खाटेवर पडलेली उशी, जी डोक्याच्या तेलामुळे तेलकट होऊन हलवाया-च्या दुकानाच्या ताडपत्रीप्रमाणे झाली होती, झटकन खाटेच्या खाली फेकून दिली आणि सतरंजीचा फाटलेला भाग दडवून तिची दुहेरी घडी घालून अंथरली. मग वरचा ओठ पुढे करून दंतपंक्ती लपविण्याचा प्रयत्न करीत ते म्हणाले, 'यावे, यावे, सरदारजी, बसावे. आन कर करके[1] आपलेच घर आहे. आपले तर कधीच दर्शन घडत नाही. आन कर करके आज तर मुंगीच्या घरी परमेश्वराचे येणे झाले. आन कर करके.'

'आपलीच कृपा आहे झालं' असे म्हणून बचनसिंहाने खोलीवरून नजर फिरविली आणि विचारले, 'महाराजांचा प्रकाश कोठे होतो?'

'काय सांगू, सरदारजी, इकडे तर कोणीही गुरुद्वाऱ्याकडे फिरकत सुद्धा नाही. (जरा

---

1. गळ्याची शपथ हा ग्रंथींचा सवयीचा शब्द आहे. वाक्यागणिक त्याचा प्रयोग ते करतात.

विचार करून) प्रकाश तर खाली होतो पण आज जरा आन कर करके जिवाला बरे वाटत नव्हते म्हणून प्रकाश नाही केला.'

बचनसिंह काही दूधपिते पोरगे नव्हते. एकदोन वाक्यांत तो समजून चुकला की गुरुजींची ही मखलाशी चालली आहे. पण गुरुजींचा खरेपणा पारखण्यासाठी त्याने विचारले, 'जरा चला, तुम्हांला थोडा त्रास देतो, खाली येऊन दार उघडा आणि महाराजांचा प्रकाश करा. घरी आल्यापासून पाठ करण्याची संधीच नाही मिळाली बघा!'

गुरुजींचा वार चुकला. अखेर विवश होऊन त्यांना खाली येणे भागच पडले. दहा-पंधरा मिनिटांनी किल्ली मिळाली; पण कुलुपाला किल्ली लावली तर कुलूप आपले तोंडच उघडीना. बचनसिंह जरा चिडून म्हणाला, 'चुकून दुसरीच किल्ली तर नाही ना लावीत?' गुरुजी झोकांड्या खात वर जाऊ लागले. जाता जाता म्हणाले, 'थांबा जरा, चावीच बदलली असेल. लौकर लौकर वर येऊन त्यांनी डिब्यामधील तेल किल्लीला चोपडले, आणि ते खाली आले. कुलूप उघडताच गुरुजी म्हणाले, 'तरीच म्हटले असा कोणता डोंगर कोसळला, आन कर करके खरेच ह्याची किल्ली दुसऱ्या फडताळात पडली होती आणि वेड्यासारखी बैटकीची किल्ली घेऊन आलो.'

गुरुद्वाऱ्याच्या आत जाऊन त्या दोघांनी जी स्थिती पाहिली त्याबद्दल फक्त एवढेच सांगणे पर्याप्त आहे की दोघे जण थरथर कापू लागले--बचनसिंह रागाने आणि भायीजी शरमेने. नंतर बचनसिंह गुरुजींना रागावून धमकावून शेताकडे निघून गेला.

[11]

'कसे काय ग्रंथीजी, आजकाल अगदी चैन आहे ना?' पालासिंहाने प्रेमाने 'सत्-श्री-अकाल' असे म्हणून गुरुजींना विचारले. गुरुजी गुरुद्वाऱ्याचे अंगण झाडीत होते. झाडू एकीकडे ठेवून धुळीने भरलेले हात कुडत्याला पुशीत ते म्हणाले, 'यावे, यावे, काय सांगावे महाराज, आन कर करके, त्या सरदार जीवासिंहाच्या छोकऱ्याने अगदी नकोसे करून टाकले आहे. जेव्हापासून तो आला आहे, आमचे तर रक्तच गोठून गेले आहे. भीतीमुळे काही बोलता येत नाही. सत्तेपुढे शहाणपण नसते ना?'

पालासिंह गावातील प्रसिद्ध बदमाश होता, त्याची टोळी त्याला देवाप्रमाणे भजत असे. आई-बाप मेल्यानंतर त्याच्याजवळ जी थोडीबहुत जमीन होती तिची त्याने वाट लावून टाकली होती. अगदी माजलेला पोळ होता तो. सारे गाव त्याला वचकून असे

कोणाला भांडणतंटा किंवा तसेच काही काम करायचे असेल तेव्हा पालासिंह आपल्या पार्टीसमवेत त्या कामासाठी स्वतःला वाहून घेत असे. जे मिळेल ते सर्वांनी वाटून घेण्याचा त्याचा एक गुण होता. त्यामुळे त्याचा आब कायम राहात असे. दर पंधरा दिवसांनी अथवा महिन्याने तो फेरफटका करण्यापूर्वी (चोरी करण्यास निघण्यापूर्वी) पहिल्याप्रथम गुरुद्वाऱ्यात येऊन प्रार्थना करीत असे. गुरुजी त्याचेवर खूश असण्याचे हेच कारण होते. शिवाय 'थंडाईचे लंगर'[1] त्याच्याच खर्चाने होत असे. काही दिवसांपूर्वी पालासिंह आपली फेरी मारण्यास गेला होता आणि पुष्कळ दिवसांनी चांगला लग्गा मारून गावी परतला होता.

पालासिंहाचा पुष्कळ दिवसांपासून जीवासिंहावर दात होता. तो त्याच्यावर दातओठ खात असे. त्याचा सूड घेण्याच्या संधीची तो वाट पाहात होता. पण एक तर जीवासिंह त्याची पर्वा करीत नसे; दुसरे म्हणजे एकदा अधिकाऱ्यांसमोर त्याने पालासिंहाची कुकर्मे उघडकीस आणली होती. म्हणूनच जीवासिंहापासून त्याला नेहमी धोका वाटत असे. आता तर तो बचनसिंहावरही जळत असे; कारण बचनसिंह त्याच्या मार्गातील धोंड होती.

गुरुजींचे बोलणे ऐकून पालासिंह म्हणाला, 'त्या पोरट्याची ही हिंमत की आपल्यासारख्या विद्वानांस अक्कल शिकवू लागला? सांगा तर खरे त्याने तुम्हांला कोणत्या अडचणीत टाकले ते?'

'महाराज, काही विचारू नका. आन कर करके ही जी चार बुकं शिकलेली मुले आहेत, नेहमी उलटच बोलणार. तो म्हणत होता रोज सकाळी उठून 'गुरुग्रंथसाहेब' नीट सजवून ठेवावेत. झाडझूड करून, दिवा लावून, संध्याकाळी पाठ केला पाहिजे. आन करकरके.'

पालासिंहाच्या कपाळावर आठ्या पडल्या. तो म्हणाला, 'पाहा तर खरे! काय अक्कल आहे बाळाची! त्याला हे अमृतसर वाटले की काय? आपली शेतीची कामे सोडून रोज-रोज कोण येईल गुरुद्वारी? कधीकाळी संक्रांत-अमावस्येला घटकाभर येऊन बसणे वेगळी गोष्ट आहे. गुरुजी, तुम्हांला माझ्या बोलण्याचा राग येईल पण तुम्ही अगदी शामळू आहात. तुम्ही काय जीवासिंहाकडून पगार घेता?'

आपल्या बाजूचे बोलणे ऐकून गुरुजींना धीर येऊन ते म्हणाले, 'तुमच्या मुलाला शंभर वर्षे आयुष्य लाभो. आन करकरके तुम्ही लाखमोलाची गोष्ट बोललात बवा. महाराज, कच्चे मडके आहे ते. त्याला कोण समजावणार? आम्ही तर जनसेवक पडलो. काय करणार? येथे राहावयाचे आहे ना? कोणाचे ऐकले नाही तर म्हणतील

1. धर्मासाठी मोफत खाणेपिणे

दीडदमडीचा ग्रंथी असून उलट बोलतो. म्हणून मूग गिळून बसावे लागते. गेला दिवस आपला म्हणून गप्प बसावे झाले. शिवाय कशासाठी एवढ्या झमेल्यात पडायचे? कोणी तुकडासुद्धा देत नाही. आन कर करके, आपल्यासारख्या उदार, दानशूर लोकांच्या आसऱ्याखालीच निर्वाह चालला आहे. गावात महिन्यातून कधीतरी एखादा खटला उभा राहतो, त्यासाठी पाठ ठेवणारे चार पैसे देतात, नाहीतर गुरुद्वाऱ्यात येतंय कोण मरायला, की आम्ही पहाटेची साखरझोप खराब करावी!'

'गुरुजी, म्हणून तर कोणीही आपला अपमान करतात. अशा तऱ्हेने वागून कसा निभाव लागणार? खुशाल 'अरे' ला 'का रे' करा. बघू कोण तुमच्या केसाला धक्का लावतो ते. आम्ही असताना कोणाची माय व्यायली आहे तुमच्याकडे वाकडा डोळा करून बघायची!'

पालासिंहाचे बोलणे ऐकून गुरुजींची सुप्त शक्ती जागृत झाली. ते आवेशाने म्हणाले, 'तसे नाही सरदारजी, मला त्याची पर्वा करण्याची जरूर काय? आन कर करके, मी विचार केला; तुम्ही सुद्धा त्याच्या नादानेच मला वाईटपणा दिला, तर काय घ्या हो? तुमचा विचार नसता तर त्याच वेळी त्याला झटकून मोकळा झालो असतो. सरदारजी, आम्ही ठरलो पट्टीचे नशाबाज. अफूमुळे झोप जास्त येते. आन कर करके, सकाळीच तर तलफ येते. आणि सडासंमार्जन करण्याची तीच वेळ असते. अरे हां, आणखी एक घोंगडे तो माझ्या गळ्यात बांधू बघतोय. आन कर करके!'

'काय ते?'

'म्हणतो कसा : गुरुजी, दिवसभर लोळत पडता त्यापेक्षा गावातील मुलामुलींना शिकवत जा जरा.' पालासिंह रागाने दातओठ खात म्हणाला, 'नाही, नाही, काही गरज नाही शिकवण्याबिकवण्या करण्याची. स्वतः बारा बारा वर्षे शिकून काय दिवे लावलेत, दिसतेच आहे. चांगला मुलगा होता, नीट बोलत-चालत होता. जेव्हापासून चार वेडी-वाकडी अक्षरे शिकला तेव्हापासून त्याची मतीच बिघडली आहे. पाहिलेत ना, काय काय तमाशा करीत आहे तो! जाटाचा मुलगा असून कसा भणंगभिकाऱ्यासारखा राहतो ते! लोक म्हणतात, खालसाकॉलेजमध्यें चांगले शिकविले जाते. हं, मग तुम्ही काय सांगितलेत त्याला?''

'काही नाही, मी काय त्याचे चार चव्वल खातो? आन कर करके. त्याला सांगितले, 'बाबा रे, दिवसभर मुलामुलींच्यासमोर डोकेफोड करणे आपल्याच्याने होणार नाही.' आन कर करके, सरदारजी, दुपारी तर अफीम-भांगेचा डोस घेण्याचा समय असतो. शिवाय शौचादी कार्याची तीच वेळ असते. ह्या भानगडीत पडावयास वेळ आहेच कोठे मला, आन कर करके.''

'अफीम-भांगेच्या' बोलण्याला पुष्टी देत पालासिंह म्हणाला, 'तुम्ही तर आजकाल अगदी चैन करीत असाल नाही? ध्यानसिंह आणि नरेनसिंह आज सकाळपासून माझ्या मागे लागले आहेत. म्हणतात कसे, गुरुजीच्या बैठकीत जाऊन 'चरणामृत' घेतले पाहिजे!'

'महाराज, कसली आहे चैन नि कसले काय! त्या पोराच्या भीतीने भांग वाटण्याचा रगडाही काढता येत नाही. कित्येक दिवसांपासून सुखा फराळ चालला आहे आमचा.'

'परत तेच. सांगितले ना, त्या पोरट्याची मुळीच पर्वा करू नका. मी सर्व सांभाळीन. तुम्ही खुशाल रगडा काढा. पाहतोच त्याची हिंमत!'

'अच्छा तर, आज मागची सर्व उणीव भरून काढू. तुम्ही सुद्धा येणार ना?'

'अर्थात.'

'जरा लवकर येण्याची मेहेरबानी करा. संध्याकाळ होण्याच्या आतच या. आपले दोस्तही येणार ना आन कर करके?'

'हो तर, ते लोक तर माझी पाठच सोडत नाहीत.'

'महाराज, ही तर मोठ्या आनंदाची गोष्ट आहे!'

'बरं आहे. वाहे गुरुजीकी फतह!' म्हणून पालासिंह निघून गेला. गुरुजींनी झाडू तेथेच टाकली व ते रगड्याच्या तयारीस लागले. सकाळीच तयार केलेली अफूची गोळी मेव्याबरोबर खाल्लीच होती. नशाही चांगलीच चढली होती, पण दात कोरून पोट थोडेच भरणार? सत्संगियांबरोबर बसून वाट्यावर वाट्या पिण्यात जी नशा चढते ती चिमूटभर अफूत कोठली?'

[12]

दुपारचा तीनचा सुमार. गुरुद्वाऱ्याच्या वरच्या भागातील बैठकीत जमून गुरुजींची मंडळी कामात गुंग झाली. गुरुजी एका बाजूला बसून मोठ्या प्रेमाने सावकाश वरवंटा स्वच्छ करीत होते. बचनसिंहाच्या भीतीमुळे कित्येक दिवस त्यांना वरवंटासुद्धा साफ करता आला नव्हता. पालासिंह आपल्या चादरीतून थोडासा गूळ काढून ठेवीत म्हणाला, 'भायीजी, जरा लवकर लवकर हात चालवा ना.'

एक दगडी कुंडी आणि वरवंटा आणून तो पंच्याने पुशीत गुरुजी म्हणाले, 'घ्या महाराज आन कर करके. तुम्ही गूळ पातेल्यात पातळ करू लागा, मी पटकन टरबुजाचे बी घेऊन येतो.'

एक जण गूळ पातळ करू लागला. दुसरा एक तरुण पाला धुवू लागला. भायीजी

ओले हात पुसून बाजारात निघाले तेव्हा पालासिंहाने चादरीच्या गाठीला बांधलेले चार आणे काढून त्यांना देत म्हटले, 'दुकानदाराला सांगा अगदी नीट दे. दोन आण्यांचे बी आणि दोन आण्यांचे बदाम.'

गोपाळसिंह आपली मळकट पिशवी सोडीत म्हणाला, 'भायीजी, बदाम नका आणू.' त्याने पिशवीतून जवळजवळ तीन पाव बदाम काढले.

पालासिंह म्हणाला, 'बरे तर मग चार आण्याचे बीच आणा.'

'सत् वचन' असे म्हणून गुरुजी घाईघाईने बाजारात पोहोचले. त्यांनी विचार केला, 'जाट तर अगदीच बुद्दू असतात.' त्यांनी दोन आण्यांचीच बी खरेदी केली आणि बाकीचे दोन आणे आपल्या खिशात टाकले.

घरी आल्यावर पाहतात तो सारी फौज दणादण बदाम फोडीत होती. देवसिंह म्हणाला, 'भायीजी, गेलात ते गुलच झालात की. द्या इकडे ती बी.' त्याने हात पुढे केला. भायीजींनी खिशातून पुड्या काढीत म्हटले, 'महाशय, मी तर अगदी पळत गेलो होतो.' ते ऐकून सर्व लोकांची हसता हसता पुरेवाट झाली. गुरुजींना सकाळच्याच भांगेची नशा चढलेली होती की काय देव जाणे! बियांची पुडी खिशातच सुटली आणि त्यांनी सुट्टा कागद देवसिंहाच्या हातात दिला. कागदाला चिकटलेली बी कागद फाटताच जमिनीवर विखुरली.

गुरुजी ओशाळून जमिनीवर बसले आणि खिशातून बी काढून कुंडीत टाकीत म्हणाले, 'अरेच्चा, बघा तर खरे, ह्या वाण्याच्या मूर्ख पोरट्यांना आन कर करके पुड्या बांधण्याची सुद्धा अक्कल नाही. खरे म्हणजे आईच्या पोटातून निघतात ते दुकानावर बसतात, तरी पाहा ही तऱ्हा आन कर करके.'

सर्व मंडळी गुरुजींभोवती गराडा घालून बसली. आणि पाळीपाळीने कुंडीसोट्याची कसरत सुरी झाली. घोटता घोटता पाऊण तास लोटला आणि पाला सुरम्याहून अधिक बारीक झाला तशी लक्खासिंह म्हणाला, 'चला, पुरे करा आता. रात्रभर हेच करीत बसायचे की काय?'

मायीजी जवळच बसून ग्लास धूत होते. एका वाटीला थोडासा तुपटपणा लागलेला होता तो बोटाने खरवडून गुडघ्यांना लावीत म्हणाले, 'अजून नाही महाराज, अजून आन कर करके दोनचार वळसे आणखी द्या. महाजनांचे म्हणणे आहे की,

सुक्खा घोटन सैनमें, जेता करो विलंब,
तेता बहु गुन करे, कहे शिव शंभु आप.[1]'

---

1. शिवशंभुनाथाने स्वत: म्हटले आहे—'भांग घोटताना जितका वेळ लावाल तितकी अधिक ती गुणकारी होईल.'

आज एक निरमला[1] साधू सुद्धा गुरुद्वाऱ्यात मुक्काम करून होता. ह्या लोकांच्या जवळच एका कोपऱ्यात बसून तो भावरसामृताची टीका वाचीत होता. भायीजींची कविता ऐकून पोथीवरून त्याचे लक्ष उडाले आणि तो पटकन म्हणाला, 'भायीजी, तुम्ही तर कवी दिसता, पण तुम्ही यमक नीट नाही साधलेत.' भायीजी आपला दबदबा कायम ठेवण्यासाठी म्हणाले, 'महाराज, ह्याला आन कर करके सिरखंडी छंद म्हणतात. मोठमोठे कवी ह्याच छंदात काव्यरचना करतात. बघा ना, एका कवीने म्हटले आहे.

मुख पर गंग सहाय, विश्वनाथ कैलाश पत।
जोऊ भजे सुख पाये, मन चित्त सेती ध्यान धर ॥[2]'

बाकी सर्वांच्या हे अगदी डोक्यावरून गेले, पण निरमला साधूला राहावले नाही. तो हसत म्हणाला, 'भायीजी, ह्याला तर सोरठा म्हणतात. मला वाटते हे आपलेच काव्य असावे. 'मुख पर गंग सहाय।' वा! काय सुंदर अलंकार आहे! गंगा शिवजींच्या मुखातून निघाली होती की मस्तकातून?'

विवादाच्या नादात म्हणा की झोकल्यामुळे म्हणा, गुरुजींच्या हे लक्षात आले नाही की ह्या अशिक्षित लोकांत एक परखड ज्ञानी व्यक्ती सुद्धा बसली आहे. आता ही ब्याद कशी टाळावयाची हीच फिकीर त्यांना पडली. पायावरील केस खाजवीत ते म्हणाले, 'महाराज, आन कर करके सोरठा आणि सिरखंडी एकच गोष्ट आहे. कविलोकांनी एकाच गोष्टीची वेगवेगळी नावे ठेवली आहेत झाले.'

साधूला आणखीनच हसू आले. तो म्हणाला, 'ठीक आहे ज्ञानीजी, समजलो. कारण दोघांची रास एक आहे ना? तुम्ही तर अगदी गाढे पंडित दिसता!'

आपल्या भायीजींच्या विजयावर सर्व लोक जोरजोरात टाळ्या वाजवू लागले. ह्याच गोंधळात अर्धा तास गेला. प्यारासिंह बोटाने खलाच्या कडेला लागलेली भांग निपटून काढीत म्हणाला, 'गुरुजी, आता पुरे की अजून घोटावयास पाहिजे?'

'पुरे पुरे' म्हणत भायीजी खुंटीवरून पंचा काढून पुढे बसले. बसताना त्यांच्या गुडघ्याच्या हाडांचा 'काडकन' आवाज झाला. जणू फटाकाच वाजला. पालासिंह बोटांनी पातेल्यातील गूळ फोडीत म्हणाला, 'खरंच गुरुजी, आज आणखी एक गोष्ट लक्षात ठेवा. दोन तऱ्हेची भांग बनवा. एक पक्क्या फौजेसाठी, दुसरी कच्च्या रिक्रूटांसाठी. (हाताच्या इशाऱ्याने) हे सरदार गंडासिंहाचे जावई आहेत. पहिल्यांदाच सासुरवाडीस

1. एक संप्रदाय.
2. विश्वनाथ कैलासपतीच्या मुखावर गंगा शोभत आहे. जो भक्ती करतो त्यास सुख मिळते. तेव्हा मनापासून भक्ती कर.

येत आहेत. कमीजास्त काही झालं तर ते सासुरवाडीला येणंच बंद करतील. हे वसावासिंह व मानासिंह पण नवीनच भरती झालेले आहेत.'

'सत् वचन' असे म्हणून गुरुजी आपल्या कामाला लागले. थोड्याच वेळात सर्व काम तयार झाले. गंडासिंहाचा जामात प्रतापसिंह शहरवासी असला तरी रटफच शिकला होता. तसा वेशभूषेमुळे, कॉलर-नेकटायमुळे, बी. ए. एम. ए. पेक्षा कमी शिकलेला वाटत नव्हता. बिचाऱ्याने ह्यापूर्वी क्वचितच भांग घेतली होती. आज ह्या अट्टल भांगीड्यांमध्ये फसल्यामुळे तो मनोमन प्रार्थना करीत होता: 'देवा, वाचव रे बाबा!' सर्वांना भांग देता देता प्रतापसिंहाने आपली पाळी आलेली पाहिली. तेव्हा त्याने मागे बसल्यावसल्याच गुरुजींना कोपरखळी मारून म्हटले, 'गुरुजी, सवाया घाला हं.'

गुरुजी जाटांच्या भाषेशी फारसे परिचित नव्हते. त्यांनी मागे न बघता 'सवाया'चा अर्थ घेतला थोडा अधिक. अस्सल भांग पिणाऱ्या लोकांना ह्याच गोष्टीची चीड येते. आपण अधिक पिऊन रिचवू शकतो अशी जर कोणी बढाई मारली तर द्वेषाच्या आहारी जाऊन ते त्याला इतकी दाट गाळून देतात की त्याच्या गर्वाचे घर खाली व्हावे.

गुरुजींनीं प्रतापसिंहाच्या बाबतीत हेच केले. वरवरची गुलाबी रंगाची पातळ भांग द्यायच्याऐवजी खालची लाल, अगदी दाट अशी भांग त्याला दिली. प्रतापसिंहाने 'कमी करा, कमी करा' असे परोपरीने सांगून पाहिले. पण गुरुजींनी कशीबशी घोटभर कमी करून ग्लास त्याच्या हाती दिला. घाबरत घाबरत त्याने भांग घेतली खरी पण एक-चतुर्थांश भाग तसाच टाकून दिला. सर्वांना हे चरणामृत वाटल्यावर उरले-सुरलेले दोन ग्लास गुरुजींनी झोकले.

ह्यानंतर इकडच्या तिकडच्या गोष्टी सुरू झाल्या. तोंडावरून हात फिरवीत उजागर-सिंह म्हणाला, 'गुरुजी, वा वा! आज तर स्वर्गातील हिंदोळ्यावर बसल्यासारखं वाटत आहे. सर्वत्र बहारच बहार दिसत आहे.'

दातओठ खात, डोळे बारीक करीत इंदरसिंह म्हणाला, 'काय म्हटलेस, बहार पिकली आहे? वेड्या, तू अजून लौटूवालच्या गोवऱ्या थापण्याच्या लायकीचाच आहेस. 'बहार' फुलते की पिकते?'

मानासिंह मोठ्या कष्टाने डोळे उघडून म्हणाला, 'पालासिंह! काय भानगड आहे? तुला तर घशाखाली उतरली नाही तोच चढलेली दिसते. तू पापीच होतास. आतापासून लागला आपले डोळे बारीक करायला.'

पालासिंह मोठ्या कष्टानें थुंकी गिळत म्हणाला, 'मानासिंह, मला म्हणतोस, पण तुझे स्वतःचे डोळे देखील मिटत चालले आहेत.'

भानासिंह चपापून म्हणाला, 'काय म्हणालास ? (त्यालाही चढू लागलेली होती.) मला तर माहीतच नाही.'

'जरा ऐका तर खरं ह्याचं बोलणं. तुझे डोळे नाही सांगत ?'

'बरं बाबा, नाही तर नाही. तुमचा विश्वास तर बसला पाहिजे ना! ठीक आहे. तुला पाहिजे ते विचार. जर मी नीट उत्तर दिले नाही तर नाव बदलीन.'

'ठीक आहे,' पालासिंह थोडा विचार करून म्हणाला. 'मग सांग पाहू, कोमाकीच्या कालासिंहाच्या खटल्यात कोणाकोणाच्या साक्षी झाल्या होत्या ?'

उत्तराच्या अपेक्षेने पालासिंहाने भानासिंहाकडे पाहिले. पण त्याचे डोळे तर केव्हाच मिटलेले होते. विजयानंदाने तो त्याला काही म्हणणार होता, इतक्यात काय सांगावयाचे तेच तो विसरला. विसरलेली गोष्ट आठवण्याचा तो प्रयत्न करू लागला, तसे त्याच्या हेही लक्षात राहिले नाही. थोड्या वेळाने तो हेही विसरला की तो कोणाबरोबर बोलत होता. सरतेशेवटी खूप प्रयत्नानंतर त्याच्या लक्षात आले. जणू हरवलेली वस्तूच परत मिळाली. परत विसरले जाण्याच्या भीतीने तो घाईघाईने म्हणाला, 'हं सांग, भानासिंह, कोणाकोणाच्या साक्षी झाल्या ?'

भानासिंहाची समाधी भंग पावली, पण त्याच्या बोलण्याचा अर्थ न समजून त्याने विचारले, 'काय म्हणालात ?'

डोळे तारवटून पालासिंह म्हणाला, 'अं ? मी तर काही म्हणालो नाही. (जरा विचार करून) हं, हं, मी म्हटलं होतं—लाख्या बैलाला नका जुंपू, बिचारा रात्रभर विहिरीवर जुंपलेला होता.'

ओठावरून जीभ फिरवीत पालासिंह म्हणाला, 'ओये, सोड रे, तू म्हणत होतास—म्हणत होतास—(विसरून जाऊन) हां, भेटला होता, पण ती माझ्याकडून भाड्याचे दोन रुपये (थांबून) घेऊन निघून गेली होती.' (हसू लागतो.)

अशी असंबद्ध बडबड करता करता अखेर काही खाण्याची इच्छा झाली. तेव्हा त्याला दिसले की उरलेल्या शेरभर गुळाचा फन्ना उडाला आहे. त्याने गुरुजींना म्हटले, 'भाईजी, जा काही तरी खाण्यासाठी घेऊन या.'

भाईजींचा नशेमुळे झोक जात होता. काहीही न बोलता ते एक रुपाया घेऊन बाहेर गेले. गल्लीच्या कोपऱ्यावर जाईपर्यंत त्यांना आपण कोणत्या कामासाठी जात आहोत हेच लक्षात राहिले नाही. पण लगेच आठवल्यावर ते दुकानदाराकडे गेले. आठ आण्यांच्या रेवड्या घेऊन मेंदूला खूप ताण देत ते घरी परतले. तेथे सर्व कच्ची रिक्रूटमेंट चीत झाली होती आणि पक्क्या मुरब्बी सैनिकांपैकी कोणी आढ्याकडे पाहात होता, कोणी हसत होता, तर कोणी जागच्या जागीच पुतळ्यासारखे होऊन बसले होते.

कोणी ओणवा होऊन दुसऱ्याला हाक मारण्याचा प्रयत्न करू लागला, तर त्याच स्थितीत बसून राहिला. झोपी गेलेले तसेच झोपून राहिले. पण जागे असलेल्यांच्या दाताला काही त्या मूठभर रेवड्या लागल्या नाहीत. पालासिंहाने आणखी एक रुपाया काढून गुरुजींना दिला. वास्तविक परत जाणे गुरुजींच्या अगदी जिवावर आले होते. पण आठ आणे कमावण्याच्या लोभाने आणि प्रथम आणलेल्या रेवडीतील एक दाणासुद्धा वाटणीला न आल्यामुळे ते परत निघाले.

पोहता न येणारा मनुष्य बुडण्याच्या भीतीने मिळालेला ओंडका हातचा सुटू नये म्हणून त्याला घट्ट पकडून ठेवतो त्याप्रमाणे ज्या कामाला आपण जात आहोत ते विसरू नये म्हणून किंवा रस्ता चुकू नये म्हणून ते ह्या खेपेस खूप सावध राहून आठवण ठेवण्याचा आटापीटा करीत होते.

भायीजी पंचा कोठे विसरले देव जाणे! (ह्याच पंच्यात आपण रेवड्या बांधून आणल्या हे ते पार विसरले.) पंचा शोधण्यासाठी ते खाटेखाली चाचपडू लागले. पुष्कळ वेळ झाला तरी गुरुजी रेवड्या घेऊन कसे आले नाहीत हे पाहून पालासिंहाला रेवड्यांची आठवण झाली. तो उठून भायीजींच्या मागोमाग गेला, तो परत आलाच नाही.

ह्या कामात निरमला साधू पक्का वस्ताद होता. तासभरात त्याची धुंदी उतरल्यावर त्याला आठवले की लोक रेवड्या आणावयास गेले त्यांपैकी एकही परतला नाही. परोपकार-भावनेने त्याला स्वस्थ बसू दिले नाही. मग ह्या भावनेच्या पायी, त्या रेवड्यांच्या तिळावर होता म्हणा की काही म्हणा, तो त्या लोकांच्या शोधार्थ बाहेर पडला.

तो बाजारात जाऊन पोचला, पण त्या लोकांपैकी कुणीही भेटले नाही. अखेर दमून भागून तो परत गुरुद्वाऱ्याकडे येत असता वाटेत एका ठिकाणी विहिरीच्या साचलेल्या पाण्याजवळ पालासिंह उपडा पडलेला दिसला. कित्येक लोक त्याला गदागदा हलवीत होते. पण त्याचे आपले एकच पालुपद होते, 'ओये, लोकहो, मला आग लागली आहे. माझे कपडे जळत आहेत. पाणी घालून पोटावरील आग तर विझविली आहे. पण माझी पाठ अजून जळत आहे. पाठीवर बादलीभर पाणी ओता ना! आई ग, मेलो मेलो!'

साधूने हा सर्व तमाशा पाहिला व तो निमूटपणे गुरुद्वाऱ्यात आला, तरी भायीजींचा पत्ता नव्हता. अंमळ लवंडण्यासाठी साधू खाटेवर बसतो न बसतो तोच त्याच्या पायाला कसला तरी स्पर्श झाला. खाली डोकावून पाहतो तो भायीजी लोळा-गोळा होऊन खाटेखाली झोपले होते. रुपाया त्यांच्या मुठीत होता.

साधूने भायीजींना हलवून हलवून बाहेर खेचण्याचा यत्न केला, पण ते आपले अंग आणखीनच आकसून घेत ओरडत होते, 'पकडो, पकडो, आन कर करके त्या बचन-सिंहाला पकडा. सरदार पालासिंहजी, तुम्ही म्हणाला होता ना की मी त्याची चांगली

खबर घेतो म्हणून ? (गयावया करून) जलदी करा. पाहा ना, आन करकरके हा माझा गळा दाबीत आहे. हा मला (आवंढा गिळीत) मारून टाकील. ओये, धावा, धावा. हा माझ्या तोंडात वाळू भरत आहे. माझे तोंड सुकत आहे. माझ्या तोंडातून आन कर करके वाळू काढा.'

इकडे सर्वजण बेशुद्ध होते. भायीजींच्या वेड्यासारख्या बडबडीकडे लक्ष देण्यास कोणाला शुद्ध होती ? मग साधुबुवांच्या लक्षात आले की रात्र बरीच झाली आहे. आता ह्या लोकांची काय वाट लावणार ? त्यांनी सर्वांना हलवून उठविण्यास सुरुवात केली. बाकीचे सर्व लोक कसेबसे उठले व पडत-झडत निघून गेले. पण लाख प्रयत्न केल्यावरसुद्धा प्रतापसिंह उठला नाही. साधुमहाराजांनी लक्षपूर्वक त्याच्याकडे पाहिले, तेव्हा त्यांची बोबडीच वळली. ते आपला गाशा गुंडाळून पळण्याच्या तयारीला लागले. पण ह्या स्थितीत बाहेर जाणेही कठीण आहे हे लक्षात घेऊन ते तेथेच खंडले.

दुसऱ्या दिवशी दिवस खूप वर आल्यावर साधुबुवा आळस देत उठले. त्यांनी सर्वत्र नजर फिरविली पण भायीजी कोठेही दिसले नाहीत. ह्यावेळी त्यांची दशा अतिशयच खराब होती. त्यांना एकदम रात्रीचा प्रसंग आठवला. हेही आठवले की गुरुजी खाटेच्या खाली झोपलेले होते. पण ह्यावेळी ते कोठे दिसत नव्हते. रात्री जमिनीवर जो तरुण उपडा पडला होता तोही बेपत्ता होता.

साधुमहाराजांना जरा भीती वाटली आणि ते तेथून निसटले. गावापासून जेमतेम अर्धा मैल दूर आले असतील नसतील, तेवढ्यात त्यांनी बचनसिंहाला भायीजींना खांद्यावर टाकून नेताना पाहिले; पण त्याचा डोळा चुकवून साधुमहाराज तेथून निसटले.

[13]

साऱ्या गावात खळबळ माजली. घरोघरी भांगप्रकरणाची चर्चा चालली होती. बाकीच्या साऱ्या घरांतील झाकून राहिले; पण गंडासिंहाच्या घरी अनर्थच झाला. जावईबापू पहिल्याप्रथमच घरी आलेले होते. आणि रात्रभर बिचाऱ्यांनी डोळा उघडला नव्हता. बचनसिंहाकडून त्यांना समजले की त्यांनी गुरुद्वाऱ्यात जाऊन भांग झोकली आहे. कारण रात्री बचनसिंह जेव्हा त्याला पाठीवर घेऊन आला तेव्हा त्याने सांगितले की, तो गुरुद्वाऱ्यात गेला असता भायीजी तिकडे नव्हते, पण एक साधू खाटेवर झोपला होता आणि प्रतापसिंह खाटेखाली पडला होता.

गंडासिंहाच्या कुटुंबियांनी लाख प्रयत्न केले. कानात तेल घालून पाहिले, डोक्याला

मालिश केले, तोंडात आंब्याचे लोणचे कोंबले, पण बिचाऱ्याच्या घशाखाली काहीच उतरत नव्हते. तूप आणि दूध मिसळून दिले पण ते सुद्धा तोंडाबाहेरच वाहून गेले. हळूहळू त्याची दशा अधिकच बिघडत गेली. डोळे निर्जीव झाले, चेहरा काळा-निळा पडला, सारा देह बांबूसारखा ताट झाला. सर्वांच्या तोंडचे पाणी पळाले. शेजारच्या गावात सरकारी दवाखाना होता. पहाटे तेथून डॉक्टरला बोलावण्यात आले. त्याने सांगितले की मुलावर विषप्रयोग करण्यात आलेला आहे. तावडतोब प्रतापसिंहाला सरकारी दवाखान्यात पोहोचविण्यात आले.

इकडे पालासिंह आणि कंपनीचे धाबे दणाणले. चोराच्या मनात चांदणे. पालासिंहाला जास्त काळजी ह्यासाठी वाटली की कालच्या कारवाईची माहिती पोलिसांना मिळाली तर सारे खापर आपल्या माथी फुटणार हे निश्चित. आधीच त्याचे नाव ब्लॅक-लिस्टमध्ये गेले होते. पोलिसांची नाना प्रकारची सेवा करून त्याने तो ससेमिरा कसाबसा चुकवला होता. प्रतापसिंहाला ज्या स्थितीत तो पाहून आला होता त्यानंतर तर त्याची धास्ती अधिकच वाढली.

त्याला एक युक्ती सुचली. एका दगडात दोन पक्षी मारले तर काय होईल? तावड-तोब ठाण्यावर जाऊन त्याने रिपोर्ट लिहून दिला की, 'जीवासिंहाचा मुलगा बचनसिंह याने गंडासिंहाच्या जावयाला भांगेत विष मिसळून पाजले आहे.'

दुपारी ठाणेदार दणदणत आला. आल्याबरोबर एका शिपायाला जीवासिंहाच्या दारावर बसवून तो स्वतः गंडासिंहाच्या घरी गेला. इकडे एक शिपाई बचनसिंहाच्या घराची झडती घेत होता, तर तिकडे ठाणेदार संधी साधण्यासाठी गुरुद्वाऱ्यात गेला. त्याच्या-बरोबर खूप गर्दी होती. गुरुद्वाऱ्यात गेल्यावर पाहतात तर बचनसिंह भायीजींच्या डोक्याला तेल चोळून मालीश करीत होता. गुरुजी त्याच्या पुढ्यात बसून अजून नशेत डोलत होते.

पोलिसांनी दोघांनाही ताब्यात घेतले. मग घराची झडती घेणे सुरू झाले. ज्या गोष्टीच्या ते शोधात होते ती तावडतोब मिळाली. जास्त शोधाशोध करावी लागली नाही. एका कोपऱ्यात पंचा पडला होता. त्यातच खरबुजांच्या बियांचा चोथा पडला होता. भांग गाळल्यावर गुरुजींनी तो चोथा जसाच्या तसा ठेवून दिला होता, पंचाही साफ करून ठेवला नव्हता.

डॉक्टरला बोलावण्यात आले. त्याने त्या चोथ्याची तपासणी करण्यासाठी तो चोथा थोडा कुसकरला. त्यात तांब्याचे दोन घासलेले पैसे मिळाले. ते इतके उगाळलेले होते की त्यांचे वजन अर्ध्यापेक्षाही कमी झालेले होते. आता डॉक्टरच्या लक्षात येण्यास वेळ लागला नाही की हेच पैसे भांगेत उगाळून ती प्रतापसिंहास पाजली गेली होती. बचन-सिंह व भायीजी यांच्या हातात बेड्या पडल्या. जीवासिंहाच्या घरात हाहाःकार उडाला.

पालासिंह आणि त्याची कंपनी जवळच उभी होती. भांगेमुळे अजूनही सर्वांची डोकी गरगरत होती. पण ही सोन्यासारखी संधी चालून आली असता ते ती हातची थोडीच दवडणार? बियांच्या चोच्यातून पैसे मिळालेले पाहून ते चकित झाले. त्यांच्या लक्षात येईना की हे काम कोणाचे असावे! काही का असेना, ज्या बचनसिंहाला गोत्यात आणण्यासाठी आणि आपल्या मागचे शुक्लकाष्ठ टाळण्यासाठी त्यांची खटपट चालली होती त्याच्याविरुद्ध पोलिसांना पुरावा मिळाला होता, ह्याचा त्यांना अत्यानंद झाला होता. त्यावर कळस म्हणजे तो ऐन मोक्याच्या वेळेस पकडला गेला होता; दुसरे म्हणजे प्रतापसिंहाच्या सासुरवाडीच्या मंडळींनी लिहून दिले होते की, रात्री नऊ वाजता बचनसिंह आमच्या जावयाला घरी पोहोचवून गेला, जाताना त्याने हेही सांगितले की जास्त भांग पिण्यामुळे प्रतापसिंह बेशुद्ध पडला आहे. शिवाय पालासिंहाच्या दोस्तांनी पोलिसांचा खिसा चांगलाच गरम केला होता.

दोन्ही आरोपींना न्यायाधिशासमोर उपस्थित करण्यात आले. खटला सुरू झाला. जीवासिंह दम्याने आजारी पडला होता पण त्याच्या बाजूने एक वकील उभा केला गेला. फिर्यादीच्या बाजूने पुढे केलेल्या साक्षीदारांपैकी पालासिंहाची साक्ष अशी होती : 'ज्या दिवशी हा प्रकार घडला, त्या दिवशी मी बरीच होतो. संध्याकाळी पाच वाजता जेव्हा गुरुद्वाऱ्यात मी पोहोचलो तेव्हा पाहतो तो बचनसिंह आणि प्रतापसिंह भांग घोटीत बसलेले. भायीजी पूजेअर्चेत मग्न होते. मी थोडा वेळ बसून परतलो. रात्री नऊ वाजता मी बोळातून जात असता बचनसिंहाला पाहिले. तो प्रतापसिंहाला पाठंगुळीस घेऊन त्याच्या सासुरवाडीस पोहोचवीत होता. मी त्याला पुष्कळ हाका मारल्या पण त्याने काहीच उत्तर दिले नाही.'

त्यानंतर पालासिंहाच्या दोस्तांच्या साक्षी झाल्या. सर्वांचा मथितार्थ तोच होता. जेव्हा आरोपीच्या जबान्या सुरू झाल्या तेव्हा भायीजींनीही त्यांच्याकडून पोपटासारखी पाठ करून घेतलेली जबानी दिली. ते म्हणाले, 'मला तर आन कर करके बचनसिंहाने भांग घोटावयास सांगितली होती. खरबुजाचे बी आणण्यासाठी त्याने चार आण्यांचे पैसे मला दिले होते आन कर करके. मीच दोन आण्यांची...' सांगता सांगता भायीजी एकदम थांबले.

जज ॲंग्लो-इंडियन होता. त्याने सरकारी वकिलाला विचारले, 'टेल! हा आरोपी जबानी देताना मध्येच 'कर कर कर' काय म्हणतो?' वकिलाने इंग्रजीत समजावले तेव्हा साहेबास हसू आले.

आपली जबानी सुरू करीत भायीजी म्हणाले, 'हुजूर, दोन आण्यांचे बी आणले होते. आन कर करके माझा काही दोष नाही हो. पाहिजे तर कोणाचीही शपथ घेतो.'

बचनसिंहाचा वकील चांगला मुरब्बी होता. त्याने उलटतपासणी घेताना मध्येच विचारले, 'तुम्ही या कोणत्या दुकानातून आणले होते?'

'देवीदयाळ वाण्याच्या मलाकडून आन कर करके.'

'त्याला तुम्ही काय दिले?'

'चार आणे.'

'त्याने तुम्हांला परत किती दिले?'

'दोन आणे.'

'अच्छा, त्या दोन आण्यांचे तुम्हांला किती पैसे दिले होते?'

यावेळी मागे उभा असलेल्या पालासिंहाने इशाऱ्यांनी दोन बोटे दाखवून पुष्कळ समजावण्याचा प्रयत्न केला पण भायीजींच्या मठ्ठ डोक्यात ते शिरले नाही. ते म्हणाले, 'आठ पैसे.'

मग वकिलाने विचारले, 'त्या पैशाचे तुम्ही काय केलेत?'

'मी ते सदऱ्याच्या खिशात टाकले, आन कर करके.'

'आणि बियांची पुडी?'

'ती पण खिशातच ठेवली होती.'

'घरी परत आल्यावर ते पैसे कोठे ठेवलेत?'

भायीजींना एकदम काहीतरी आठवून ते घाबरून म्हणाले, 'नंतर माझ्या खिशातून तर सहाच पैसे निघाले. कदाचित दोन पैसे रगड्यात...नाही नाही (विचार करून) जमिनीवर पडले असतील आन कर करके.'

'आणि जे पैसे त्या चोय्यातून निघाले होते ते (दरडावून) कोठून आले? आकाशातून?'

भायीजींचे पाय थरथर कापू लागले. उघडे गुडघे एकमेकांवर खट खट आपटू लागले. सर्व काही प्रकाशात आल्यावर ते बुचकळ्यात पडले. वकिलाने त्यांची अवस्था पाहिल्यावर डोळे वटारून म्हटले, 'खरे-खरे सांगाल तर वाचाल, नाही तर सारी हयात तुरुंगात घालवावी लागेल. मग बसाल रडत.'

गुरुजींचे उरलेसुरले धैर्यही पार पळाले. वकिलाच्या समोर हात जोडून ते म्हणाले, 'हुजूर, आन कर करके खरे खरे सांगतो. ते पैसे माझ्याच खिशातून बियांत मिसळून जाऊन रगड्यात पडले होते. नंतर माझ्या ही गोष्ट लक्षात आली.'

पालासिंह अँड को. चे चेहरे फोटो काढण्यासारखे झाले. त्यांचे तारू आता अशा नावाड्याच्या हाती होते की त्याला पाहूनच असे वाटत होते की नाव आता बुडते की मग बुडते.

वकिलाने भायीजींना मधुर वाणीत विचारले, 'शाबास, मी तुमच्यावर अतिशय प्रसन्न झालो आहे. गुरूचे सिक्ख आणि तेसुद्धा तुमच्यासारखे ग्रंथी कधी खोटे बोलत नाहीत.'

ह्या शाबासकीमुळे तर भायीजींचा कायापालटच झाला म्हणा ना! त्यांनी अथपासून इतीपर्यंत सर्व सत्य घटना सांगितल्या आणि हेही सांगितले की 'ह्यात बचनसिंहाचा तिळमात्र संबंध नाही.'

ह्यानंतर बचनसिंहाची जबानी झाली. त्याने सांगितले, 'हा प्रकार घडला त्या दिवशी मी सकाळी सात वाजता तालुक्याच्या गावी गेलो होतो. एका जमिनीच्या मंजुरीसाठी बापूने मला पाठविले होते. (ह्याच्या पुराव्यासाठी त्या तालुकेदाराची साक्ष झाली.) रात्री आठ-सव्वाआठ वाजता जेव्हा मी गावी परतत होतो तेव्हा म्हटले, चला, भायीजींना भेटून जावे. गावातील गुरुद्वाऱ्यामध्ये मुलामुलींची शाळा उघडण्यासंबंधी त्यांचे माझे बोलणे झाले होते.

'मी गुरुद्वाऱ्याच्या वरच्या मजल्यावर जाऊन पाहतो तो गुरुजी तेथे नव्हते. एक निरमला साधू (त्या दिवसापासून त्याचे नखही दृष्टीस पडले नाही.) खाटेवर झोपला होता, आणि प्रतापसिंह खाटेखाली पडला होता. मी दोघांनाही उठविण्याचा प्रयत्न केला; पण त्यांना काही जाग आली नाही. जवळच भांगेचे भांडे व घोटण्याचा रगडा पडलेला पाहून मी समजून चुकलो की मंडळी भांगेने तर्र होऊन पडली आहेत. प्रतापसिंहाची दशा पाहून मी घाबरून गेलो. गावाचा जावई होता तो, म्हणून त्याला पाठंगुळीस घालून त्याच्या सासुरवाडीस पोहोचवून आलो.

'सकाळी मी शेताच्या बाजूला गेलो तेव्हा कोणी तरी सांगितले, नदीजवळ एक शीख मरून पडला आहे. मी लगेच उक्त स्थानी गेलो. पाहतो तर भायीजी बेशुद्धावस्थेत पडलेले दिसले. त्यांना उचलून मी गुरुद्वाऱ्यात आणले. पुष्कळ खटपट केल्यानंतर कुठे स्वारी शुद्धीवर आली. त्यांनी सांगितले, 'भांगेच्या नशेत मी केव्हा खाटेखाली बुसलो ते कळले नाही. पण संध्याकाळी सात-साडेसात वाजता शौचास जाण्याची इच्छा झाली तेव्हा कसातरी पडतझडत गावाबाहेर आलो. जवळच आर्यसमाजवाद्यांचा एक बगीचा होता. त्यात शौचादी क्रिया आटोपून मी परतलो. तेव्हा मी कोठून आलो आणि मला कोठे जावयाचे आहे ह्याची शुद्ध राहिली नाही. कधी आणि कोणत्या रस्त्याने मी नदीकिनारी पोहोचून बेशुद्ध झालो हेही मला आठवत नाही."

त्यानंतर प्रतापसिंहाची साक्ष घेण्यात आली. तो अजून इस्पितळात होता व मोठ्या मुष्किलीने थोडाफार बोलू लागला होता. त्याला पढवल्याप्रमाणे त्यानेही पुष्कळ इकडच्या तिकडच्या बाता मारल्या; पण वकिलाच्या उलटतपासणीपुढे त्याचाही पाडाव लागला नाही.

खटल्याचे स्वरूपच पालटले. पालासिंह, भायीजी आणि पालासिंहाचे पाच दोस्त यांना कोर्टाच्या आज्ञेवरून पकडण्यात आले. कोर्टाने खटल्याचा निकाल दिला तो असा: 'बचनसिंहास सोडून देणे, भायी दसौंधासिंहास निष्काळजीपणामुळे एक जीवन धोक्यात घालण्याच्या आरोपावरून एक वर्ष कैद, पालासिंहास खोटा रिपोर्ट देण्याबद्दल दफा 177 कलमान्वये दोन वर्ष कैद, बाकीच्या पाच लोकांना खोटी साक्ष दिल्याबद्दल 196 कलमान्वये सहा-सहा महिन्यांची कैद.'

[14]

पालासिंहाला आणि त्याच्या मित्रमंडळींना त्याचप्रमाणे गुरुजींना आपल्या करणीचे फळ तर मिळाले, पण पालासिंहावर आणि त्याच्या दोस्तांवर ह्याचा उलटाच परिणाम झाला. ते बचनसिंहावर अधिकच दातओठ खाऊ लागले. विशेषत: पालासिंहाचे अगदी खास मित्र तर पालासिंह कधी एकदा तुरुंगाच्या बाहेर येतो आणि आपण बचनसिंहावर सूड उगवितो ह्या संधीचीच वाट पाहात होते. बचनसिंहानेच भांगेत तांब्याचे पैसे घालून पालासिंहाचे शत्रुत्व पत्करले होते आणि भायीजींची साक्ष उलटवून सर्वांना गोत्यात आणले होते असे त्यांनी गावात उठविले.

इकडे बचनसिंहाच्या मनात विचार आला की केवळ अविद्येमुळेच आमच्या बांधवांची अशी दुर्दशा होत आहे, त्यांच्या बुद्धीवर अज्ञानाचा पडदा पडला आहे, म्हणूनच ते गुरुद्वाऱ्यासारख्या पवित्र ठिकाणी भांग-अफूच्या मैफिली करून आपला आणि आपल्या दुसऱ्या बांधवांचा सत्यानाश करीत आहेत. ही अविद्या दूर करण्याचा आणि आपल्या बांधवांची सुधारणा करण्याचा ठाम निश्चय करून त्यासाठी एखादी व्यावहारिक योजना आखण्याचा त्याने विचार केला.

अमृतसरहून येताना बचनसिंहाने त्या वृद्ध महात्म्याकडून (ज्ञानी दीदारसिंहाकडून) आपण त्याच्या गावी येऊ असे वचन घेतले होते. तदनुसार त्याने ज्ञानीजींना बोलावणे पाठविले. तेही तावडतोब आले. ज्ञानी दीदारसिंह सियालकोटचे राहणारे असून तेथे त्यांची दोन मुले काही मामुली उद्योगधंदा करीत होती. पुष्कळ दिवस गृहस्थाश्रम तथा ऐहिक सुखांचा उपभोग घेतला, आता शेषजीवन जनसेवेत व्यतीत करावे, असा त्यांनी निश्चय केला होता. ते कुठेही असले तरी महिना दहा-दहा रुपये पाठविण्याचे त्यांच्या मुलांनी कबूल केले होते; ह्याशिवाय थोडीशी शिल्लक खुद्द त्यांच्याजवळही होतीच.

ज्ञानीजींच्या दर्शनाने बचनसिंहास अत्यानंद झाला. त्याने आपल्या गावाचे आणि जवळपासच्या खेड्यांचे इतके हृदयद्रावक वर्णन केले की ज्ञानीजींचे डोळे भरून आले. मागच्या खटल्याची हकीगत ऐकून ते अतिशय दुःखी झाले. बचनसिंह प्रामाणिक, दिलदार आणि निर्भय तरुण असून त्याच्या जीवनात आमूलाग्र परिवर्तन झाले असल्याचे ज्ञानीजींना दिसून आले. जेव्हा बचनसिंहाने त्यांनी गुरुद्वाऱ्यात नेऊन त्याची झालेली दुर्दशा दाखविली तेव्हा तर ज्ञानीजींना ते असह्य होऊन त्यांनी दीवाणपुरातच राहण्याचा निश्चय केला.

ज्ञानीजी अतिशय सरळमार्गी व मृदुभाषी होते. त्यांची वाणी अतिशय रसाळ होती. ते रोज नियमितपणे भल्या पहाटे उठत असत, स्नानसंध्या आटोपून गुरुग्रंथसाहेबाचा पाठ करीत. त्यांच्या येण्याचा जाट लोकांना एक फायदा झाला. पहाटे चार वाजता उठून ते विहिरीजवळ जात तेव्हा रहाटाच्या आवाजाने जाटांची झोप उडत असे आणि ते आपापला नांगर सांभाळीत शेताकडे जात. हळूहळू जाट स्त्रियांवरही त्यांचा प्रभाव पडला. शेतावर भाजी खुडण्यास किंवा जेवण पोचविण्यास त्या जात तेव्हा मूठभर धान्य, कापसाची बोंडे, मक्याची कणसे असे काही तरी ज्ञानीजींना देऊन त्यांना नमस्कार करीत. काही दिवस आणखी निघून गेले. आता जाट लोक जाता जाता नांगर बाहेर ठेवून गुरुद्वाऱ्याच्या आत येऊन आणि प्रणाम करून जाऊ लागले.

बचनसिंहाच्या खटपटीमुळे ज्ञानीजींनी जाटांच्या लहानलहान मुलांना एकत्र करून त्यांना शिकविण्याचा विडा उचलला. बचनसिंहाने एका सुताराकडून लाकडाच्या दहा-पंधरा पाट्या बनवून घेतल्या, बोरू तयार केले आणि मुलांना लेखन-साहित्य वाटले. जाटांच्या बिघडलेल्या मुलांना प्रथम प्रथम सबंध दिवस एका जागी बसणे शेतीच्या कामापेक्षाही कठीण वाटले. परंतु ज्ञानीजींच्या प्रेमळ स्वभावामुळे मुले चटकन आज्ञाधारक बनली. ज्ञानीजींनाही वेळ घालविण्यासाठी चांगले काम मिळाले. सबंध दिवस ते मुलांना शिकविण्यात मग्न असत. एका मुलाला रेषा आखून देतात न देतात तोच दुसरा तक्रार करी, 'बघा ना ज्ञानीजी, मंगूने माझी लेखणीच तोडली.' ज्ञानीजी त्याला नवीन लेखणी देत, तोच तिसरा एखादा म्हणे, 'ज्ञानीजी, हा बघा माझे बघून लिहितो.' तिकडे मुलींमध्येही आपसात बाचाबाची होई, त्याची दादफिर्यादही ज्ञानीजींनाच घ्यावी लागे.

ह्या कावळ्या-चिमण्यांना शिकविण्यात ज्ञानीजींनी रात्रीचा दिवस केला, तेव्हा कुठे दोन महिन्यांत ते त्यांना थोडेफार एका जागी बसायला शिकवू शकले. ज्ञानीजींची पांढरी शुभ्र दाढी छातीवर वर-खाली होई तेव्हा मुलींची हसता हसता मुरकुंडी वळे. ज्ञानीजी

जरा दृष्टीआड झाले की मुली लगेच आपल्या ओढण्या काढून त्या कमरेला बांधून पट्ट्या घेऊन लुटुपुटूची लढाई खेळू लागत, तर कधी एकीचा शेपटा दुसरीच्या शेपटीला बांधून भांगडा[1] सुरू करीत. पण ज्ञानीजींना वाटे की त्यांनी पाहिलेली स्वप्ने कधी ना कधी तरी साकार होतीलच.

एके दिवशी ज्ञानीजी व बचनसिंह कसली तरी चर्चा करीत बसले होते. समोरच एका चटईवर मुले-मुली अभ्यास करत होती. चर्चेचा विषय होता 'सेवा'. ज्ञानीजींचे म्हणणे पडले, 'सेवा करणे अतिशय कठीण आहे. लोक ज्या गोष्टीला सेवा समजून करतात, खरे पाहता ती सेवा नसून नुसते सेवेचे ढोंग...'

ज्ञानीजींच्या मुखातून बाहेर पडणाऱ्या प्रत्येक शब्दाचा बचनसिंहाच्या मनावर खोल परिणाम होत होता. बचनसिंहास आणखी काही शंका विचारावयाच्या होत्या. इतक्यात त्याचे लक्ष दुसऱ्याच एका गोष्टीने वेधून घेतले. तो दाराकडे तोंड करून बसला होता. उंबरठ्याबाहेर तेरा-चौदा वर्षांची एक मुलगी उभी असल्याचे खूप वेळापूर्वीच त्याच्या लक्षात येऊन चुकले होते. तिच्या डोक्यावर कचऱ्याने भरलेली एक टोपली होती. तिच्या ओझ्याने ती दमली होती. मधूनमधून मानेचा थकवा कमी करण्यासाठी ती टोपली हातात धरून ठेवी. गरिबीतही तिचे सौंदर्य लपत नव्हते. दाराजवळ बसलेल्या मुली त्या मुलीकडे पाहून फिदीफिदी हसत होत्या, हे बचनसिंहाने पाहिले. कोणी तिच्याकडे उसाच्या उष्ट्या चोयट्या फेकीत, तर कोणी चटईच्या काटक्या काढून तिच्याकडे फेकीत. काहीजणी काहीतरी निमित्ताने तिच्याजवळून जात व तिच्या अंगावर थुंकत. पण त्या मुलीचे लक्ष ह्या मुलींच्या माकडचेष्टांकडे मुळीच नव्हते. ती अगदी टक लावून त्यांच्या पाट्या, वर्णमालेची पुस्तके व लेखन यांकडे पाहात होती. तिने परत दोन्ही हातांनी टोपली वर उचलली. अचानक तिच्या डोक्यावरील चुंबळ खाली पडली. त्या पोरट्यांना थट्टा करण्यास नवीनच साधन मिळाले. त्यांनी हसू दाबण्याचा खूप प्रयत्न केला. पण दोघीतिघींची हास्याची उकळी बाहेर पडली. ज्ञानीजींच्या कानावर हसण्याचा आवाज आला. ती मुलगी बिचारी ओशाळून पुढे सटकली. ज्ञानीजींनी जरा दरडावताच सर्व मुली आपल्या पाट्यांमागे तोंड लपवून चिडीचूप झाल्या. ह्या कारट्या त्या गरीब बिचाऱ्या पोरीस कशा छळीत होत्या हे बचनसिंहाने ज्ञानीजींच्या कानावर घातले. त्यांना हा प्रकार माहीत नव्हता. त्यांना फक्त मुलींच्या खिदळण्याचा राग आला होता. ते म्हणाले, 'खबरदार, दंगा कराल तर! (बचनसिंहास) ह्या खरंच गावभवान्या आहेत. किती डोकेफोड केली तरी ह्यांच्यावर कसलाच परिणाम होत नाही. 'कुडीआं,

---

1. पंजाबमधील प्रसिद्ध लोक-नृत्य.

चिडियां, बकरियां तिन्ने जातां अथरीआं'[1] असे कोणीतरी म्हटले आहे ते किती खरे आहे. ते ह्यांना तर......'

बचनसिंह मध्येच म्हणाला, 'तुम्ही म्हणूनच ह्यांच्या टाळक्यात चार अक्षरे घुसविण्याचे धाडस करीत आहात, नाही तर ह्या काय शिकणार डोंबलं! ह्या पोरींना फक्त बैलांच्या मागे 'तत् तत् ' करीत फिरणेच माहीत आहे.' थोडा वेळ गप्पा मारून बचनसिंह निघून गेला.

[15]

रोडूबाबा संध्याकाळी भिक्षा मागून परत घरी येत होता. वाटेत अचानक त्याच्या लक्षात आले की, बऱ्याच दिवसांपासून सुंदरीसाठी काहीही आणले नाही. त्याने आपली पगडी सोडली. एका चबुतऱ्याजवळ बसून त्याने आपले सर्व वैभव मोजले. सर्व मिळून तीन आणे झाले. काय बरे येईल एवढ्या पैशांचे? हां, सुंदरी रोज बाजासाठी हट्ट करीत होती, नाही का? तो खेळणीवाल्याकडे गेला. अडीच आण्यांचा बाजा खरेदी करून त्याने हलवायाकडून पैशाची बर्फी घेतली व तो भरभर चालत घरी पोहोचला. घरी आल्यावर त्याने माकडिणीला दाराजवळच सोडले आणि स्वतः 'सुंदरो! सुंदरो!' अशा हाका मारीत घरात गेला. पण नेहमी सुंदरी जशी त्याच्या स्वागतास झोपडीच्या बाहेर उभी राहात असे, तशी आज काही दिसली नाही. त्याने घाईघाईने बाहेर येऊन इकडे-तिकडे पाहिले, पुन्हा हाका मारल्या, पण सुंदरीचा पत्ता नव्हता. त्याचा राग अनावर झाला. पण त्या रागात किती प्रेम, व्याकुळ-अधीरतेचे मिश्रण होते हे सांगणे कठीणच आहे! घाईघाईने तो झोपडीच्या मागच्या बाजूस गेला. पाहतो तो सुंदरी खाट उभी धरून तिच्या मागे बसली होती आणि बोटाने जमिनीवर काहीतरी लिहीत होती.

बिचाऱ्या रोडूच्या जिवात जीव आला. त्याला पाहताच सुंदरी लिहिणे थांबवून त्याच्याकडे बघून हसू लागली, आणि त्याच्या कमरेस विळखा घालून त्याला आपल्याकडे खेचू लागली. 'बाबा! तुला एक गंमत दाखवू? इकडे ये लवकर, हे बघ.' तिने रोडूला त्या जागेवर बसविले. त्याच्यामागे जाऊन दोन्ही हातांनी त्याचा चेहरा कुरवाळून ती म्हणाली, 'बाबा, इकडे पाहा ना!' त्याच्याभोवती ती इतक्या आनंदाने नाचू लागली, जणू तिला मोठा खजिना गवसला आहे. रोडू सुंदरीच्या चंचल बाललीला कौतुकाने

1. मुली, चिमण्या आणि बकऱ्या तिन्ही चंचल प्राणी आहेत.

पाहात होता. त्याने मोठ्या प्रेमाने तिला जवळ घेऊन तिच्या मस्तकाचे चुंबन घेत म्हटले, 'ही कसली चित्रं काढली आहेस बेटी!'

सुंदरीने त्याच्या मिठीतून सुटका करून घेऊन जमिनीवर लिहिलेली अक्षरे दाखवीत म्हटले, 'ही चित्रे थोडीच आहेत? (एकेका अक्षरावर बोट ठेवीत) बघ तर खरं; हे 'ऊड़ा'[1] आहे, हे 'सस्सा'[2] आहे...अं, काय बरं, थाब नावच विसरले हं, हं, ह्याला 'पप्पा'[3] म्हणतात.

बिचाऱ्या रोड्रूला 'सस्सा' काय किंवा 'पप्पा' काय कसे माहीत असणार? तो हसत म्हणाला, 'वा रे वा माझी बालिस्टर बेटी! तुला कसं लिहिता आलं?'

'बाबा, खरंच त्या असंच लिहीत होत्या.'

'कोण?'

'दुसरं कोण? त्या मुली.'

'कोणत्या मुली?'

'अहो त्या गुरुद्वाऱ्यात शिकणाऱ्या मुली.'

'बेटी, पण तुला काय माहीत त्या कशा लिहितात ते.'

'मला माहीत आहे ना! मी तर रोज पाहते. आज सुद्धा पाहिले. मी कचरा फेकायला गेले होते ना, तेव्हा त्या लिहीत होत्या.'

'लिहोत बापड्या, तुला काय करायचं आहे?'

लहान मुलासारखा हट्ट करीत, रडवेल्या चेहऱ्याने सुंदरी म्हणाली, 'नाही बाबा, मी पण शिकणार.'

उदासपणे हसत रोड्रूने तिची हनुवटी पकडून म्हटले, 'तोंड बघा, मोठी आली आहे शिकणारी. लिहिणे-वाचणे आपल्यासारख्यांचे थोडेच काम आहे?'

सुंदरी हिरमुसली. तिने त्याच्याकडे पाहून म्हटले, 'मग कोणाचे काम आहे?'

'बेटी, त्या शेठ-सावकारांच्या मुली, आपण आहोत भणंग भिकारी. आपला असल्या गोष्टींशी काय संबंध?'

गरीब माणसे शिकू शकत नाहीत हे ऐकून सुंदरी निराश झाली. खरंच आपण वेड्यासारखा हट्ट धरला असे तिला वाटले. तरी पण हट्टाने ती म्हणाली, 'पण बाबा, मला...मी शिकू शकणार नाही का?'

---

1. पंजाबी वर्णमालेचे पहिले अक्षर ऊ.
2. स.
3. प. .

'बाळ, आपल्यासारखे गरीब शिकू लागले तर मग कामधंदा कोण करील?' तरीसुद्धा तिची समजूत पटली नाही. तिने ठेकाच धरला, 'नाही बाबा, मी शिकणार, मी आत बसून लिहीन. मग त्यांना कसे कळेल? दिवसा कचरा फेकायला जाईन तेव्हा त्या मुलींची अक्षरे पाहून येईन आणि रात्री...'

रोड्डू मध्येच म्हणाला, 'जाऊ दे ह्या फालतू गोष्टी. हे घे.' त्याने सुंदरीला बाजा आणि मिठाईचा द्रोण दिला.

ह्याच बाजाची फर्माईश गेले कित्येक दिवस सुंदरी करीत होती, तो तिला आज मिळाला. रोड्डूची कल्पना होती की बाजा मिळाल्यावर ती अगदी आनंदाने नाचेल, पण तिने बेपर्वाईने दोन्ही वस्तू घेऊन आत कोनाड्यात ठेवून दिल्या.

[16]

बचनसिंह रोज नियमितपणे ज्ञानीजींच्या जवळ बसत असे. त्या दोघांत निरनिराळ्या विषयांवर चर्चा होत असे. ह्या चर्चेने बचनसिंहास मानसिक समाधान मिळत असे. ज्ञानीजींच्या सत्संगाने दिवसेदिवस त्याचा कायापालट होत होता. त्याच्या जीवनप्रवाहास नवीनच वळण लागत होते.

तीच मुलगी रोज कचऱ्याची टोपली कधी हातात तर कधी डोक्यावर घेऊन, तासनतास ते ओझे सहन करीत दाराजवळ उभी राहून त्या मुलांचे लेखन पाहात असल्याचे त्याच्या लक्षात आले. एके दिवशी तो जेव्हा गुरुद्वाऱ्यात पोहोचला, तेव्हा ज्ञानीजी मुलामुलींना नीट अभ्यास करण्याची ताकीद देऊन कुठेतरी बाहेर जाण्यास निघाले होते.

बचनसिंहाने विचारले, 'कोठे निघालात?'

'तुझीच वाट पाहात होतो, कपडे मळले होते. म्हटलं विहिरीवर जाऊन धुवावेत. तू बरोबर असलास म्हणजे तेवढे फिरणेही होईल.'

'चला तर मग,' असे म्हणून बचनसिंह त्यांच्याबरोबर निघाला. दोघेजण दरवाजाच्या बाहेर पडले, तेव्हा तीच मुलगी कचऱ्याची रिकामी टोपली एका बाजूला ठेवून भिंतीकडे तोंड करून बसली होती आणि जमिनीवर काहीतरी लिहीत होती. तिच्याजवळ एक फाटका कागदाचा तुकडा होता आणि त्यातून पाहून ती लिहीत होती. तिचे अक्षर मोत्याच्या दाण्यासारखे होते, अगदी छापील वाटत होते. ते पाहून दोघेही चकित झाले. तो कागद बालबोधाचे पहिले पृष्ठ होते. त्याच्यावर जाड अक्षरांत पंजाबी भाषेची वर्णमाला

छापली होती. त्या मुलीने कागदाच्या कडांना कणीक लावून सर्व कपटे चिकटविले होते आणि तिने तो कागद इतक्या हळुवारपणे काळजीपूर्वक भरला होता, जणू काही तो एखादा शाही हुक्मनामाच आहे.

दोघजण एकमेकाकडे पाहून त्या मुलीच्या हस्ताक्षराबद्दल आश्चर्य व्यक्त करू लागले. त्या मुलीने सर्वात शेवटचे अक्षर लिहिण्यासाठी कागदाकडे पाहिले. तेव्हा तिची नजर समोर उभ्या असलेल्या दोन माणसांकडे गेली. ते पाहून ती इतकी घाबरली की आपली टोपली तेथेच सोडून पळू लागली. त्या मुलीची तीव्र बुद्धी आणि सुंदर हस्ताक्षर पाहून ते दोघेही तिच्यावर अतिशय प्रसन्न झाले. ती चारपाच पावले जाते न जाते तोच ज्ञानीजींनी तिला हाक मारली, 'कुडीये[1]!' आवाज ऐकून तिला वाटले असेच पळून जावे. पण पाऊल उचलेना. ती तेथेच थांबली.

इतक्यात ज्ञानीजींनी परत हाक मारून म्हटले, 'मुली, घाबरू नकोस. मी तुला मारीत नाही. इकडे ये, मी काय म्हणतो ते ऐक.'

मुलीच्या जिवात जीव आला. ती खाली मान घालून अपराध्यासारखी हळूहळू त्यांच्यासमोर येऊन उभी राहिली. ज्ञानीजींनी प्रेमाने विचारले,

'काको[2], ही अक्षरे तू कोठून शिकलीस?'

ती मुलगी परत घाबरली. चोरास चोरी कबूल करावयास लावण्याचा हा नवीनच मार्ग आहे हे तिच्या लक्षात आले. ज्ञानीजींच्या प्रश्नाचे तिने उत्तर दिले नाही.

ज्ञानीजींनी तिच्या डोक्यावरून हात फिरवीत तिला जवळ घेत म्हटले, 'काको! घाबरू नकोस. आम्ही काही तुला रागावणार नाही. तुझे सुंदर अक्षर पाहून मी अतिशय प्रसन्न झालो आहे. कोठून शिकलीस सांग ना!'

मुलीला आता जरा धीर आला. तिचा संकोचही दूर झाला. ती हळूच म्हणाली 'मी स्वतःच लिहिले.'

बचनसिंह आतापर्यंत चकित होऊन हे सर्व नाटक पाहात होता. मुलीचे बोलणे ऐकून त्याने एकदम विचारले, 'स्वतःच लिहिले? कोणी शिकविले नाही?'

तिने नकारार्थी मान हलविली. ते पाहून त्यांना अत्यानंद झाला. ज्ञानीजींनी विचारले, 'तुला या अक्षरांची नावे माहीत आहेत?'

'होय.'

'सांग बरं.'

---

1. ए मुली.
2. बाळ, बेटी.

मुलीने पटापट वर्णमाला म्हणून दाखवीत म्हटले, 'मला बाराखड्याही येतात.' ज्ञानीजींनी बचनसिंहाकडे पाहून म्हटले, 'बचनसिंह, लिहिणे तर ही कागद पाहून शिकली; पण वाचणे?'

मुलगी म्हणाली, 'ही मुलं-मुली रोज दुपारी बाराखड्या म्हणतात ना, मी त्या ऐकते.'

ज्ञानीजींनी तिच्या पाठीवरून हात फिरवून म्हटले, 'शाबास बाळ, शाबास. तू खूप हुशार आहेस. मी तुला पाटी-पेन्सिल देतो. तू शिकत जा. बाळ, तुझे नाव काय?'

'सुंदरी.'

बचनसिंह म्हणाला, 'बाबाजी, मला वाटतं ही हरिजन-कन्या आहे. तुम्ही तर हिला निस्संकोचपणे शिवत आहात. मला काही वाटणार नाही पण गावातील लोक काही सरळ नाहीत.'

ज्ञानीजींनी बेपर्वाईने म्हटले, 'अशा लायक मुलीला शिवण्यास व शिकवण्यास जर त्यांनी हरकत घेतली तर हा अन्याय आहे. अशा लोकांची मी पर्वा करीत नाही.'

बचनसिंह गप्प बसला. ज्ञानीजींनी आत जाऊन पाटी व लेखनसाहित्य आणले. सर्व वस्तू त्या मुलीला देत ते म्हणाले, 'घे बाळ, रोज नियमितपणे अभ्यास कर. तुला वाटलं तर येथे येऊन शिकत जा.'

त्या मुलीने सर्व वस्तू घेतल्या आणि हे प्रेमळ बोलही ऐकले. आंधळा मागतो एक डोळा आणि... नंतर सर्वजण आपापल्या वाटेने गेले.

सुंदरीच्या पायांना जणू पंखच लागले होते. ती पळत पळत घरी आली.

[17]

'बाबा! बाबा! पाहा तर खरं मी काय गंमत आणली आहे ती.' आनंदाने नाचत नाचत सुंदरीने ज्ञानीजींनी दिलेल्या सर्व वस्तू रोडूला दाखविल्या. 'तूं सांगत होतास : ते तुला मारतील—शिकू नकोस. पण ते तर सांगत होते तू शीक. आम्ही तुला शिकवू. बघ किती सुंदर पाटी, तक्ता, दोन-दोन लेखण्या, आणि मुल्तानी मातीसुद्धा. मी ही कुटून दौतीत घालते. आज तर बाबा आपण पाटीवर लिहिणार.' ह्या सर्व वस्तू पाहून रोडू चकितच झाला. कोणी दिल्या तिला ह्या वस्तू? कोणाच्या उचलून तर नाही ना आणल्या तिने? त्याने विचारले, 'कोणाच्या वस्तू उचलून आणल्यास? जा बेटा, ज्याच्या त्याला देऊन टाक. उगीच माझं डोकं फोडतील ना ते.'

'नाही बाबा, देवाशपथ. ज्ञानीजींनी मला ह्या वस्तू दिल्या आहेत. चल, तूच विचार त्यांना.' ती त्याचा हात धरून ओढू लागली. तिच्या चेहऱ्यावरील दृढता आणि निर्भयता पाहून रोडूची खात्री पटली. सुंदरीने सर्व हकीगत सांगितल्यावर तर त्याच्या मनात तिळमात्र शंका उरली नाही.

त्याच दिवसापासून सुंदरीला शिकण्याची परवानगी मिळाली. फुरसतीचा सर्व वेळ ती अभ्यास करण्यात घालवीत असे. झोपताना सुद्धा तिचे लक्ष अभ्यासातच गुंतलेले असे. रोज तास-दोन-तास ती ज्ञानीजींकडे शिकण्यास जात असे. शाळेतील दुसऱ्या मुलींबरोबर तिने बसावे अशी ज्ञानीजींची खूप इच्छा होती, पण त्यामुळे येणाऱ्या अडचणी लक्षात घेऊन त्यांनी तिची बसण्याची व्यवस्था दाराबाहेर केली. एका पोत्यावर बसून ती एकटी अभ्यास करीत असे. तिला बरेच झाले. कारण इतर मुलांच्यात बसून तिचा अभ्यास मुळीच झाला नसता. पण तिच्या एकटेपणातही अडथळे येण्यास सुरवात झाली. मुलगे-मुली येताजाता तिची काही ना काहीतरी खोडी काढीत. एखादी मुलगी दुसऱ्या मुलीस मुद्दाम धक्का देऊन तिला सुंदरीच्या अंगावर पाडीत असे. पडणारी मुलगी हट्टाला पेटून दुसऱ्या मुलीस शिवण्यासाठी धाव घेई. कोणी हळूच पायाने तिची दौत लवंडून टाकी तर कोणी केळीचे साल काढून दोन्ही बोटांचे धनुष्य करून तिच्या तोंडावर फेकी. पण सुंदरीने कोणाविरुद्ध कधीही तक्रार केली नाही. त्यामुळे त्या माकडांना ऊतच आला. ती कोणाकडेही लक्ष न देता आपले सर्व लक्ष अभ्यासावर केंद्रित करीत असे. पण आणखी दुसरा अडथळा तिच्या मार्गात येत होता. पालसिंहाच्या दोस्तांच्या चिथावणीवरून गावातील सभ्य स्त्री-पुरुषांत कुजबुज सुरू झाली. काहीतरी निमित्ताने तेथे येऊन लोक ज्ञानीजींना धमक्या देऊ लागले. पण ज्ञानीजींनी सुंदरीला शिकविणे तसेच चालू ठेवले.

पाहता पाहता ह्या गोष्टीने उग्र स्वरूप धारण केले. चंदासिंहाच्या आईची तिरडी उचलण्यासाठी सर्व लोक त्याच्या हवेलीत जमले असतानाही हाच चर्चेचा विषय होता. ज्वालासिंह म्हणाला, 'डॉक्टर गावातील विहिरीत औषध टाकीत आहेत.' सुंदरसिंह म्हणाला, 'आमच्याच फायद्यासाठी औषधे टाकतात. त्या दिवशी जीवासिंहाचा बचना सांगत होता की ह्या औषधामुळे पाण्यात असलेले सगळे रोगराईचे जंतू मरतात.'

डोळ्यावर आलेली पगडी वर करीत नत्थासिंह म्हणाला, 'ऐका! उलट त्या औषधांनीच रोगराई पसरते. तिगरता प्लेग का पसरला माहीत आहे? इंग्रजांनी औषधी गोळ्या टाकल्या होत्या ना, त्या खाऊन उंदीर मेले; त्यांच्या सडण्यामुळे प्लेग पसरला आणि घरेच्या घरे ओसाड पडली.'

सुंदरसिंह म्हणाला, 'बाबा, आमच्यासारख्या अडाण्यांना काय माहीत! कोणी जे सांगतं, तेच खरं वाटतं. चार बुकं शिकलेल्या लोकांना सर्व समजतं.'

इतक्यात बाबा भानसिंह मध्येच म्हणाला, 'ओये, ह्या शिकलेल्या लोकांची अक्कल पण पाहिली बरं. खरी गोष्ट सांगितल्याने तुम्हांला रागच येईल; पण जीभ बोलल्या-शिवाय राहात नाही. जीवासिंहाने आपल्या मुलास शिकविलं खरं पण त्यामुळे त्याची अक्कलच फिरली आहे. ही पोरटी चार अक्षरं शिकून येतात आणि त्यांना वाटतं ढोरा-चांभारांबरोबर बसण्याउठण्याचा आपल्याला परवानाच मिळाला आहे. काल रात्री वरियाभा सांगत होता, की बचनसिंहाच्या सांगण्यावरून धर्मशाळेतील भायी करंदराच्या कारटीला शिकवीत असतो.' आणखी एकजण म्हणाला, 'लाखमोलाची गोष्ट सांगितलीस, बाबा. मी स्वतः त्या कारटीला गुरुद्वाऱ्यांच्या दाराशी बसलेली पाहिली आहे. पुष्कळ वेळा विचार केला, जीवासिंहास समज द्यावी आणि त्या ज्ञानीलाही विचारावं, पण म्हटलं आपल्याला काय करायचं आहे? शिवाय बिचारा जीवासिंह आधीच बिछान्याला खिळून राहिला आहे. त्याला सांगून काय फायदा? पण हे किती दिवस चालणार? आज ती गुरुद्वाऱ्यात जाते, उद्या ती विहिरीवर सुद्धा जाऊ लागेल!'

दुसरा : नाही तर काय, ह्या नीच लोकांना जवळ येण्यास काय लागते? खाणी गावात केवढा गोंधळ झाला होता माहीत आहे? खाल्सा जातीच्या लोकांनी महार-मांगांना शुद्ध करण्याचा विडाच उचलला होता.

तिसरा : लोकहो, मी खरी गोष्ट तोंडावर सांगण्यास मुळीच घाबरत नाही. अजून वेळ गेलेली नाही. त्या ज्ञानीला बंदी घातली नाही तर खाणी गावातील गोंधळाचे लोण येथेही पोहोचेल. प्रथम तो बचना काय कमी होता—आता हा ज्ञानी त्याला येऊन मिळाला आहे.

चौथा : म्हणूनच म्हणतात ना, संग तारे, कुसंग डुबोये! आपले पहिले भायीजी अगदी देवमाणूस हो! तोंडातून ब्र काढतील तर शपथ! अडीनडीला वाटेल ते काम करीत. सांगू ते ऐकत.

दुसरा : म्हणून तर बचना आल्या-आल्या त्याचा शत्रू बनला. त्याला हुसकून लावण्यासाठी कधी त्याला सांगे मुलांना शिकवीत जा. कधी सांगे ग्रंथसाहेबांचा रोजच्या रोज प्रकाश कर. पण भायीजी थोडीच त्याला दाद देतात. त्यांनी...

तिसरा : नाही तर काय? म्हणूनच रागारागाने बचन्याने त्या बिचाऱ्याला तुरुंगात डांबलं. आम्हांला या आपसातील भानगडी काय माहीत? बचना रोज आमच्या मागे टुमणं लावी, मुलांना शिकण्यासाठी पाठवा म्हणून—आम्ही सुद्धा त्याच्यावर विश्वास ठेवला.

चौथा : इतके दिवस काय शिकवलं डोंबलं ! उलट पोरं घरी लहानसहान कामं करीत ते पण राहिलं. बाबांनो, आता यापुढे आपण नाही मुलीला शाळेत पाठविणार. चुलीत गेलं ते शिकणं. ह्या शिकण्याचा काय उपयोग ?

पाचवा : तू जर मुलीला पाठवलं नाहीस तर बाकीचे लोकही आपल्या मुलांना पाठविणार नाहीत. मी तर साऱ्या पाट्या-लेखण्या विहिरीत फेकून देतो. माझी मुलगी घरी चांगलं काम करायची, पण ह्या शिक्षणाच्या सोंगास सुरुवात केली मात्र, पठ्ठी एकाही कामाला हात लावीनाशी झाली. पाटी घेऊन कोपऱ्यात बसून राहाते.

सहावा : पालासिंह तुरुंगाबाहेर असता तर एव्हाना सर्वांनी आपली आसनं गुंडाळली असती.

सातवा : लोकहो, तोंडातून निघालेली गोष्ट दूरवर पोहोचते. मी नक्की सांगत नाही, पण लोकांमधून ही गोष्ट लपून राहिली आहे काय ? पालासिंहाने आणि ....

पहिला : जाऊ दे रे, ह्या गोष्टी उकरून काढून काय फायदा ! त्याची कैद थोडीच राहिली आहे. प्रत्यक्ष येईल तेव्हाच खरंखोटं उघडकीस येईल. आपल्याला काय करायचं आहे !

पुष्कळ वेळ अशाच तऱ्हेच्या चर्चा चालल्या होत्या. पण कोणीही कुठल्याही एका निर्णयाप्रत जाऊन पोहोचला नाही. कारण गावाचा मुकुटमणी पालासिंह आणि त्याची कंपनी तुरुंगाची हवा खात होती ना !

[18]

जवळजवळ वर्ष-दीड-वर्ष अंथरुणाला खिळून राहिल्यानंतर जीवासिंहाने आपली जीवनयात्रा समाप्त केली. घराचा भार सर्वस्वी बचनसिंहावर पडला. बचनसिंहाची आई केवळ त्याच्याकडे पाहून दिवस कंठीत होती. बचनसिंह तिचा एकुलता एक मुलगा होता.

इकडे पालासिंह आणि त्याचे साथी, त्याचप्रमाणे भायी दर्शौधसिंह कारावास भोगून आले होते. तुरुंगातच त्यांच्या कानी आले होते की बचनसिंहाने गुरुद्वाऱ्यामध्ये दुसरा ग्रंथी आणून ठेवला आहे. प्रथम ह्या नव्या ग्रंथीला आपले चंबूगवाळे उचलून पळवून लावायचे आणि मगच गावात पाऊल टाकायचे, तरच आपला दबदबा राहील, हे त्यांनी ओळखले. पालासिंह आणि त्याचे दोस्त भाई दर्शौधसिंहांच्या साक्षीने तुरुंगात पडले होते खरे, पण त्यांना माहीत होते की भायीजींच्या हातून हे काम केवळ

वेअकलीपणामुळे झाले आहे. म्हणून त्यानी त्यांना माफ करून टाकले. भायीजींचा आपणांस अतिशय उपयोग करून घेता येईल हे त्यांना माहीत होते, म्हणूनच त्यांनी भायीजींना परत बोलावणे घाडले.

ज्या दिवशी पालासिंह सुटून आला, त्या दिवशी काहीजणांना सोडून गावातील सर्वांनी त्याचा स्वागत-सत्कार केला. विशेषतः भायीजींचे वजन गावात दसपट वाढले. सर्वांच्या तोंडी एकच गोष्ट होती की, 'पाहिलं, ईश्वरस्वरूप निर्दोष भाईजींना अडकवून वचनसिंहाला काय मिळालं? बाप गमावून बसला ना? माणसाने ईश्वरी प्रकोपाला नेहमी घाबरून असावं. गरिबांचे शाप फुकट जात नाहीत!'

आता ज्ञानीजी तर लोकांना डोळ्यांसमोर नको होते. जे थोडेसे लोक त्यांच्या बाजूचे होते तेही आता त्यांच्याविरुद्ध झाले. कित्येक लोकांनी आपापल्या मुलांमुलींना शाळेतून काढून टाकले. ज्ञानीजी अतिशय खिन्न झाले. ह्या डोकेदुखीपासून सुटका करून घेणेच त्यांनी हिताचे मानले व एक दिवस वचनसिंहाच्यासुद्धा आग्रहाला न जुमानता ते गाव सोडून निघून गेले. गावात राहिल्याने उगीच तंटेबखेडे वाढतील असे त्यांना वाटले. न जाणो त्यापासून गावाला धोकाविका निर्माण व्हायचा!

पालासिंहाच्या मित्रांना वाटले होते, ज्ञानीजींना घालविण्यासाठी दोन हात जरी करावे लागले तरी हरकत नाही; पण तशी पाळीच आली नाही, आणि भायी दसौंधसिंह हळूच गुरुद्वाऱ्यात स्थानापन्न झाले. आणखी एक गोष्ट त्यांना ह्याहीपेक्षा जास्त खटकली, ती म्हणजे ज्ञानीजींनी गुरुद्वाऱ्याच्या स्वरूपात खूपच सुधारणा केली होती. कसेही करून आपण जास्त शोभा वाढवून ज्ञानीजींवर ताण करावयाची असा त्यांनी निश्चय केला. हो, गावात थोडेबहुत लोक ज्ञानीजींच्या पक्षाचे होते त्यांनाही व्र काढण्यास जागा राहता कामा नये.

श्री गुरुनानक देवांचा गुरुपूरब जवळच आला होता. त्या निमित्ताने ह्या लोकांनी भजनी मंडळ बोलावण्याची व्यवस्था केली.

वचनसिंहानेच काहीतरी सांगून आणि न्यायाधिशांना लाच देऊन आपल्याला उलट-सुलट साथ देण्यास भाग पाडले, त्यामुळेच सर्वांना कारावास भोगावा लागला, असे आल्याआल्याच भायीजींनी सर्वत्र पसरून दिले. त्यामुळे गावकरी मंडळींच्या मनात भायीजींबद्दलचा श्रद्धाभाव तर वाढलाच, शिवाय ते वचनसिंहाचा अधिक राग राग करू लागले. वचनसिंहाचा त्या कलंदराच्या पोरटीशी संबंध वाढत आहे, तो रोज तिला शिकविण्याच्या निमित्ताने रोडूबाबाच्या झोपडीत जातो, तिथे तासनतास घालवितो, तेव्हा त्याला वाळीत टाकावे, असेही आतल्या गोटात शिजू लागले. गुरुपौर्णिमेच्या दिवशी जेव्हा सर्व जमात एकत्र होईल तेव्हा त्या बाबतीत विचारविनिमय करून अंतिम निर्णय

घेतला जावा असे ठरविण्यात आले. आता सुंदरी काही पहिली सुंदरी राहिली नव्हती. सतत अभ्यासाने आणि ज्ञानीजींच्या व बचनसिंहाच्या संगतीने तिची बुद्धी अधिकच प्रखर झाली होती. आता शीखसंप्रदाय, साहित्य आणि इतिहास तिला चांगले परिचित झाले होते. बचनसिंहाची आई जुन्या विचारांची होती. शेजारणी रोजरोज बचन-सिंहाच्या बाबतीत अगदी तिखटमीठ लावून काही ना काही सांगून तिला चिथवण्याचा प्रयत्न करीत. पण बचनसिंहाच्या आणि ज्ञानीजींच्या समजावण्यामुळे ह्या गोष्टींचा तिच्या मनावर परिणाम होत नसे.

गुरुपूरब जवळ आला होता. तो अलौकिक सोहळा पाहण्याची सुंदरीच्या मनात उत्कट इच्छा होती. ज्ञानीजींकडून गुरूंच्या व हुतात्म्यांच्या हकीगती ऐकल्यामुळे तिच्या मनात त्यांच्याविषयी असीम श्रद्धा निर्माण झाली होती, पण आपणास हा सोहळा पाहता येणार नाही ह्या विचाराने तिच्या मनात कळ उठत असे. रोडूबाबाने तिला सर्वांत अधिक घाबरविले होते. पण गुरुपौर्णिमेच्या दिवशी सत्‌गुरूंच्या मंदिरी चोरून वा सर्वांसमक्ष माथा टेकावयाचाच असा तिने ठाम निश्चय केला.

गुरुपूरब एक दिवसावर आला होता. गुरुद्वाऱ्यात जोराची तयारी चालली होती. उद्या सकाळी भजनी मंडळ कीर्तन करणार असल्याचे सुंदरीला कळले. रात्रभर तिला झोप आली नाही. बंदरीच्या सहवासात राहिल्यामुळे तिच्या सवयीमुद्धा बंदरीसारख्याच झाल्या होत्या. घटकेत तिला वाटे, 'गुरुद्वाऱ्याचा दरवाजा उघडण्याच्या वेळेस पहाटेच सर्वांची नजर चुकवून आत जावे आणि अंगणातील बोरीच्या फांदीवर चढून बसावे.' घटकेत ती विचार करी, 'नको, कोणीतरी बघेल. शिवाय सत्‌गुरूंच्या दरबारी उच्च स्थानावर कसे बसावयाचे, कसेही करून कोणाच्याही दृष्टीस पडणार नाही अशीच जागा शोधली पाहिजे.' रात्रभर ह्याच विचारात असता कधी तिचा डोळा लागला हे तिला समजले नाही.

ती जागी झाली तेव्हा तिला रुभोवार प्रकाश दिसला. दिवस इतका वर येईपर्यंत झोपून राहिल्याची तिला अतिशय हळहळ वाटली. आता क्षणभरही घरात राहणे तिला अशक्य वाटत होते. रोडूबाबा तर चांगला घोरत होता.

चोरपावलाने ती झोपडीच्या बाहेर पडली व सरळ गुरुद्वाऱ्याकडे निघाली. तिला वाटले दुरूनच कीर्तनाचे स्वर कानी पडतील, पण तिचा कयास चुकला. गुरुद्वाऱ्याचा दरवाजा अजून बंद होता. 'अरे, अजून उजाडलेच नाही. चांदण्याच्या प्रकाशामुळे आपला गैरसमज झाला तर.' तिला अतिशय आनंद झाला. आता आत शिरकाव कसा करावा बरे! एकदम तिला आठवले की ज्या दालनात श्री गुरुग्रंथसाहेबांचा प्रकाश केला जातो त्याच्या शेजारची भुशाची खोली उघडीच असते. तिचा दरवाजा

गुरुग्रंथसाहेबांच्या खोलीत उघडतो. कित्येक वेळा तिने बाहेरून अंगणातून ह्या खोल्या पाहिल्या होत्या. आता फक्त अंगणातील दरवाजाच्या मार्गाने आत घुसणे शिल्लक राहिले. चांदण्यामुळे तिच्या मार्गात अडथळा येत होता. विचारमग्न स्थितीतच ती गुरुद्वाऱ्याच्या मागच्या बाजूस जाऊन पोहोचली. तेथे तिला जनावरांना चारा घालण्याचे एक रुंद तोंडाचे मोठे मातीचे भांडे दिसले. ते जमिनीपासून जरा उंचावर होते. पटकन उडी मारून ती त्या भांड्यावर चढली आणि एका भोकात पाय ठेवून छपरावर चढली. कच्च्या खोलीचे छप्पर कितीसे उंच असणार? आणि असले तरी ते या बंदरीला काय उंच वाटणार! छपरावर चढून तिने बोरीची फांदी पकडून खाली अंगणात उडी मारली. चटकन भुशाच्या खोलीत जाऊन ती एका कोपऱ्यात लपून बसली. गुरुग्रंथसाहेबांच्या खोलीचा दरवाजा उघडा आहे की नाही हे पाहण्यासाठी तिने दाराला धक्का मारला, दार पटकन उघडले व ते गुरुग्रंथसाहेबांच्या खोलीतच उघडते हे तिला कळून चुकले. आत भुशाचा ढीग असल्यामुळे दार बाहेरच्या बाजूस जोरात उघडले गेले होते आणि पुष्कळसा भुसा गुरुग्रंथसाहेबांच्या खोलीत पडला होता.

सुंदरीला थोडी काळजी वाटली, पण ती निराश झाली नाही. एका सतरंजीवर तीन-चार माणसे झोपली असल्याचे तिने पाहिले. पण त्यांपैकी कोणीही जागे झाले नाही. शिवाय आत अंधारच होता. फक्त एका झरोक्यातून चांदणे आत येत होते. ती परत बाहेर पडली आणि बोरीचा एक तुकडा घेऊन आली. त्यावर भुसा घालून ती खोलीत फेकू लागली. सतत तासभर मेहनत करून तिने आपल्याला उभे राहण्यासाठी जागा तयार केली. तिच्या मागे डोक्यापर्यंत भुशाचा ढीग झाला होता. नंतर तिने दुसऱ्या बाजूचा भुसा उचलून ती जागा स्वच्छ केली आणि दरवाजा बंद करून ती दाराजवळच बसली. बसल्याबसल्या तिला डुलकी लागली. तिला बचनसिंहाने म्हणून दाखविलेल्या गुरुनानकजींच्या साक्या आठवू लागल्या. हळूहळू प्रत्यक्ष पाहात असल्याप्रमाणे सर्व घटना तिच्या नजरेसमोर येऊ लागल्या. त्याच दिवशी बरोबर ह्याच वेळी अरशी पित्याने अवतार घेतला. साऱ्या विश्वातील वनस्पतींनी मिळून ते स्थान सुगंधित केले होते. तृता मातेच्या मांडीवर निराश हृदयांना आशान्वित करणारा आणि शीतल प्रकाश देणारा चंद्रमा चमचमू लागला. जो एकदा डोळे भरून ते रूपडं पाहतो त्याच्या हृदयात एक अलौकिक ज्योती प्रज्वलित होते व तो हर्षगद्गद होतो. तलवंडीमध्ये आनंदीआनंद झाला, काळू पटवाऱ्याच्या घरी लक्षदीप उजळल्यासारखा प्रकाश पसरला. नंतर त्या किशोर प्रियतमाला बालकांबरोबर आंधळीकोशिंबीर खेळताना तिने पाहिले. स्वप्नावस्थेतच हर्षविव्हल होऊन ती ईश्वराच्या चरणावर कोसळली आणि आपल्या अश्रूंनी ईशचरण धुवून काढीत ती विनंती करू लागली, 'हे प्रीतम, माझ्याकडेही एकदा

आपली अमृतमय कृपादृष्टी वळव. सांग बरं माझ्या हातून अशी कोणती चूक घडली, की तुझ्या चरणावर मस्तक ठेवण्याचा अधिकारसुद्धा मला मिळू नये. ईश्वरा, किती लोकांचा डोळा चुकवून मी येथे आले आहे. प्रभो, आपल्या सवंगड्यांबरोबर तू खुशाल आंधळीकोशिंबीर खेळ. पण तुला शोधण्याची शक्ती माझ्यात नाही. माझ्याबरोबर नको खेळूस आंधळी कोशिंबीर.'

इतक्यात तिला आकाशातून आवाज ऐकू आला. जणू कुणीतरी नगाऱ्यावर थाप मारली! आणि त्याच वेळी एका मधुर वाद्याच्या झंकाराने सारे आसमंत निनादित झाले. त्या नादाबरोबरच सारे ब्रह्मांड सुगंधित झाले. तिला तेच प्रिय रूप आपल्या दोन सवंगड्यांसह आकाशातून उतरताना दिसले. एका निसर्गरमणीय स्थानाधर ते विराजमान झाले. त्याचे सवंगडी त्याच्या डाव्या-उजव्या बाजूस बसले. स्वप्नलोकातच सुंदरीने धावत जाऊन ईश्वराचे चरण पकडले व आपल्या अश्रूंनी त्यांना स्नान घालीत म्हटले, 'हे प्रभो, आता मला सोडून कुठेही जाऊ नकोस. तुझ्या चरणी येण्यास मला बंदी घालू नकोस. मला जे अडवतील त्यांची तू समजूत घाल. मला दुःख देऊ नकोस.' तिला भास झाला की प्रभू तिच्या मस्तकावरून हात फिरवून म्हणत आहे, 'सुंदरी, वत्से, तुला कोणीही बंदी घालू शकत नाही. कोणत्याही अडथळ्यांची तू पर्वा करू नकोस. ऊठ आणि मी काय सांगतो ते ऐक.' त्यानंतर सुंदरीने मस्तक वर उचलले. तिला एक प्रकारची मादक नशा चढली होती. भक्तिरस तिच्या हृदयात दुथडी भरून वाहात होता. तिच्या कानात कीर्तनाचे स्वर महान संगीताच्या स्वरूपात घोळत होते.

हर अमृत भिन्ने लोईना, मन प्रेम रतन्ना रामराजे
मन राम कसवटी लइया, कंचन सो विन्ना
गुरमुख रंग चलूलिया, मेरा मन तन भिन्ना
जन नानक मुसक झकोलिया सब जनम धन धन्ना।

सुंदरीने डोळे उघडले. स्वतःला त्या भुशाच्या खोलीत पाहून तिला आश्चर्य वाटले. दाराच्या भोकातून कीर्तनाला प्रारंभ झालेला तिने पाहिला. सुंदरी तेथेच बैठक मारून बसली, आणि कीर्तनाचा स्वाद घेऊ लागली. आयुष्यात प्रथमच तिला गुरुग्रंथसाहेबांचे दर्शन झाले होते! पण पुढे होऊन मस्तक कसे बरे टेकावे? ह्याच इच्छेने ती बेचैन झाली होती व एका जागी मन एकाग्र करू शकत नव्हती.

कीर्तनाबरोबरच सुंदरीचा उत्साह वाढू लागला. दिवस चांगलाच वर आला होता. नमनाचे चार-पाच श्लोक उरले होते. आता माणसांची तुरळक रहदारीही सुरू झाली होती. सुंदरीला वाटत होते की आजचा दिवस संपूच नये. तिचे मन असेच सद्गुरु-चरणी संलग्न राहो, ब्रह्मा-विष्णू सुद्धा तिला अमृतरसपान करण्यात अडथळा न आणोत.

बिचारे कीर्तनकार निराश झाले. मदिरेचा नैवैद्य दाखविण्यात येणार होता. अजून त्या मंडळींचा पत्ता नव्हता. त्यांना वाटले, असेच झाले तर त्यावेळचा गुरुपूरब वाया जाईल. त्यातील एकजण उठून भायीजींच्या जवळ जाऊन म्हणाला, 'भायीसाहेबजी, नैवेद्याची वेळ झाली अजून संगतीचा पत्ता नाही.' भायीजी महाराजांच्या तैनातीसाठी बसल्या बसल्या पेंगत होते. एकदम दचकून डोळे चोळीत ते म्हणाले, 'काय म्हणालात, आन कर करके?'

रागीसिंहाने परत आपले म्हणणे सांगितले. भायीजी म्हणाले, 'महाराज, आन कर करके हे पडले खेडवळ लोक. बरं, मी जाऊन बोलावून आणतो.' ते बोलावणे करण्यास निघाले. रागीसिंह जाणूनबुजून वेळ लावीत होते, लोक गोळा होण्याची ते वाट पाहात होते. भायीजींनी तीन खेपा घातल्या. दुपारपर्यंत प्रसादाचा सुगंध दूरवर दरवळू लागला तेव्हा गुरुद्वारा स्त्रिया, पुरुष, पोराबाळांनी गजबजून गेला.

संगतीला येऊन थोडा वेळ होतो न होतो तोच लोक रागीसिंहाला कोपरखळ्या मारू लागले. 'लवकर आटपा, नैवेद्य दाखवा. आम्हांला दुसरीकडे सुद्धा जावयाचे आहे!' असे आवाज येऊ लागले. शेवटी नैवेद्य दाखविल्यावर भायीजी प्रार्थना करण्यासाठी मोठ्या आनंदाने पुढे सरसावले. आज भरपूर प्रसाद तयार होता. पालासिंह आणि मंडळींनी अकरा रुपयांचा प्रसाद अर्पण केला होता. पंचायतीचा प्रसाद निराळाच. "सिक्ख पढदे मुणदे सरबत लाहे बंद, जो आवे सो राजी जाये। गुरु नानक नाम चढ़दी कला, तेंगे भाणे सरबत दा भला।" असे म्हणून साऱ्या संगतीने माथा टेकला; आणि......

त्याच वेळी धाडकन भुशाच्या खोलीचा दरवाजा उघडल्याचा आवाज झाला. भुशाचा ढीगच्या ढीग खोलीत पडला. त्याबरोबर धडपडत एक मुलगी सपशेल पालथी पडली. श्री गुरुग्रंथसाहेबांच्या चरणी मस्तक टेकण्याची जी जागा होती बरोबर तेथेच तिचे मस्तक लागले आणि ती जवळजवळ पूर्णपणे भुशाच्या खाली दाबली गेली.

सर्वांचे लक्ष तिकडेच लागले. जेव्हा त्यांना समजले की ही त्या कलंदराची कारटी आहे तेव्हा आश्चर्याने आणि रागाने सर्वजण थरथरू लागले. लोक त्या बिचारीवर तुटून पडले. लाथा-बुक्क्या आणि थपडा-ठोशांनी त्यांनी तिला अर्धमेले करून टाकले. एक तर आधीच लोकांनी तिच्या बाबतीत काही ना काहीतरी भानगड उपस्थित करण्याचे ठरविले होते. त्यात ह्या हरिजनकन्येने अनर्थच केला. आता एवढा प्रसाद कावळ्याकुत्र्यांना घालण्याच्या लायकीचा झाला होता.

तिला अजून किती यातना, मार सहन करावा लागला असता देव जाणे! पण मध्येच काही लोकांना काळजी वाटली, ही मेली तर काय घ्या? आधीच एका खटल्यातून लोकांची मोठ्या मुष्किलीने मान सुटली होती, आता उगीच नवीन ब्याद कशाला?

त्या लोकांनी शिव्यागाळी करीत करीत तिला बाहेर अंगणात फरपटत आणले. तिच्या नाका-तोंडातून भळभळा रक्त वाहात होते. सारे कपडे रक्ताने थबथबले होते. काही लोकांना वाटले, बस, मुलीचा खेळ आटपलाच समजा. त्याच वेळी बाहेरून बचनसिंह आला. त्याला पाहून लोकांचा राग अधिकच वाढला. ते आधीच त्याच्या-वर राग काढण्यासाठी निमित्त शोधीत होते, आता तर त्यांना सुवर्णसंधीच मिळाली. इतकेच काय, पुष्कळांची तर खात्रीच झाली की हे सर्व बचनसिंहाचेच कारस्थान असले पाहिजे.

बचनसिंहाला कोणालाही काहीही विचारण्याचे सुचले नाही. सुंदरीला रक्तबंबाळ आणि बेशुद्ध स्थितीत पाहून त्याचे रक्त तापले. त्याने दरडावून विचारले, 'हिला का मारले? काय पाप केले हिने?'

ह्या एक प्रश्नाच्या उत्तरासाठी शेकडो जिभा वळवळू लागल्या. 'हिचे येथे काय काम होते?' 'हिला इकडे कोणी आणले?' 'आम्हांला सारे समजले!' 'धर्माचा नाश झाला!' 'कलियुगातील चमत्कार हो हा!' 'आता ह्या प्रसादाचे काय करायचे?' वगैरे वगैरे.

आरडाओरडा करीत लोक सुंदरीला सोडून बचनसिंहाभोवती जमले. उंदराची शिकार करताना मांजरी जशी उंदराकडे पाहते तसे लोक त्याच्याकडे टवकारून पाहू लागले. पण बचनसिंहाचा क्रोधाग्नी थोडासुद्धा शांत झाला नाही. रागाने थरथर कापत तो म्हणाला, 'ही कसाईपणाची अगदी सीमाच झाली. भजनकीर्तन ऐकण्यासाठी बिचारी मोठ्या भक्तिभावाने येथे आली, त्यात कोणता अनर्थ झाला? किती निर्दयतेने मारलं आहे बिचारीला...' बोलता बोलता त्याचा गळा दाटून आला. डोळे डबडबले. पण दारूच्या गुत्त्यात बसलेल्या दारुड्यांवर वेदपठनाचा जो परिणाम होतो तोच प्रकार येथे होता. सर्व लोक अशा प्रकारे खिदळत होते, जणू बचनसिंह कसल्या तरी नशेत बडबडत आहे.

एक जण पुढे सरसावून म्हणाला, 'काय म्हणालात? भजन ऐकण्यासाठी आली होती? सरदारजी, या असल्या थापा दुसऱ्या कोणाला तरी जाऊन मारा.'

दुसरा म्हणाला, 'मोठा चतुर चोर आहे साला.'

तिसरा म्हणाला, 'आम्ही आधीच ओळखले होते की एक दिवस हा तोंडाला काळोखी फासून घेईल. पाप किती दिवस छपून राहणार हो!'

चौथा म्हणाला, 'बिचाऱ्याला वाटलं सर्वजणं ज्ञानीजीच आहेत आणि ह्याच्या प्रत्येक गोष्टीला होयबासारखी मुंडी हलवतील. ह्याला हे माहीत नाही की आमचे भायीजी गुरुद्वाऱ्यात अशा प्रकारची पापकृत्ये होऊ देत नाहीत!'

बचनसिंहाला ह्या लोकांच्या बोलण्याचा मथितार्थ काही केल्या लक्षात येईना. त्यांचे ते विलक्षण हावभाव पाहून तो जरा चरकला.

त्याचे लक्षण सुंदरीकडे गेले. तो एकदम चमकला. कदाचित ती वाचणारही नाही! हा विचार मनात आल्याने तेथे अधिक वेळ थांबणे त्याला धोक्याचे वाटले. पुढे होऊन त्याने सुंदरीला उचलले. 'दुष्टांनो, हे पाहा मी हिला आपल्या घरी घेऊन जात आहे. जा माझ्यावर बहिष्कार टाका. मला वाळीत टाका. थुंकतो मी तुमच्या तोंडावर.' असे म्हणत तो बाहेर निघून गेला.

सर्वांनी 'होये! होये!' असे ओरडून त्याची हुर्यो केली, तोंडाला येईल ते ते बरळत सुटले. त्यांचा राग जवळजवळ निवळला होता. जेव्हा मनुष्य हे पाहतो की आपला शत्रू नवीनच संकटात अडकला आहे अशा वेळी त्याला आपल्या नुकसानीतही फायदा दिसून येतो. ह्याशिवाय बचनसिंहाविरुद्ध ते जे करू इच्छीत होते त्याची आता आवश्यकता उरली नव्हती. त्यांचे उद्देश आपोआपच पूर्ण झाले होते.

सत्संगत परत गुरुद्वाऱ्यात जाऊन बसली. त्यांनी सर्व प्रसाद बाजूला केला आणि नवीन शिधा आणवून नवीन प्रसाद तयार करविला. पहिल्या प्रसादाचे काय झाले? ईश्वर जाणे!

दिवस खूपच वर आला होता. लोक परत जाण्यासाठी अधीर झाले होते. ह्याच वेळी गावातील नंबरदार नत्थासिंहाचा लहान मुलगा गुरुद्वाऱ्यात आला. त्याच्यामागे एक हिंस्त्र दिसणारे कुत्र्याचे पिल्लूही शेपटी हलवीत आत आले. नंबरदाराला पाहताच ते पटकन त्याच्या मांडीवर जाऊन बसले, आणि शेपूट हलवीत त्याचे अंग चाटू लागले. त्यालाही प्रसादाचा वास लागला असावा. नंबरदार त्याला लहान मुलासारखे थोपटू लागला, कुरवाळू लागला.

जवळ बसलेल्या ज्वालासिंहाने हात लांब करून त्याची पाठ थोपटीत म्हटले, 'ही भेट कोठून मिळविलीत नंबरदार? कुत्रा तर चांगल्या जातीचा दिसत आहे!' नंबरदार कुत्र्याची स्तुती ऐकण्यासाठी तयारच होऊन बसला होता. तो म्हणाला, 'खरं आहे ज्वालासिंह. मोठ्या मुष्किलीने मिळाला आहे. तहसीलदार टेकचंदाचे आमच्या बापूशी चांगले संबंध होते. गुदस्ता एका हपिसराने विलायतेला जाताना त्याला एक कुत्री दिली. कुत्र्याला पिल्लं होण्याआधीच बापूंनी त्याला सांगून ठेवले होते. मी सुद्धा पाच-सहा खेपा घातल्या. चांगले पंचवीस रुपये मोजले. शिवाय कितीतरी नाकदुऱ्या काढल्या. पण मोठं शहाणं कुत्रं आहे. बापू सांगत होते, एकदा तहसीलदाराची म्हैस चोरीला गेली, ह्या कुत्र्याच्या आईने चोराच्या घरी जाऊन म्हशीला खुंटापासून सोडवून आणलं म्हणे.'

जरा वेळ थांबून नंबरदार पुढे म्हणाला, 'अर्धा शेर मटण रोज मागवतो. शिवाय वाटेल तितके दूध पितो, ते वेगळेच. (पिल्लाच्या तोंडात चार बोटे घालून) पाहा ना.

काही केलं तरी चावत नाही. पण जर का परका मनुष्य आला तर मग विचारू नका. सारं घर डोक्यावर घेईल. साखळी तोडावयास बघेल. जणू सांगेल : मला सोडा, आता जाऊन त्याला पकडतो बघा!'

प्रसाद तयार होऊन वाटण्यात आला. नंबरदाराने कुत्र्याच्या वाटणीचा प्रसाद तर त्याला भरवलाच, शिवाय आपल्या द्रोणातील अर्ध्याहून अधिक प्रसाद त्याला दिला, आणि उरलेला थोडासा आपल्या तोंडात टाकला. प्रसाद वाटल्यानंतर रागीसिंहाला द्यावयाच्या दक्षिणेचा प्रश्न समोर आला. नंबरदार लद्धासिंहाचा या कामात पहिला मान असल्याने त्याला अग्रभागी बसविलें जाई.

प्रथम भायीजींनी उठून म्हटले, 'खालसाजी! रागीसिंहांनी आन कर करके मनापासून रसपूर्ण व्याख्यान दिले. आता त्याच्यासाठी माया एकत्र करून आपला जन्म सार्थकी लावा.'

सर्वांची नजर लद्धासिंहावर खिळून राहिली, की तो काय देतो पाहू. पुष्कळ वेळ 'आधी तू, नाही आधी तू' असे होत राहिले. शेवटी लद्धासिंहाने आपली पगडी सोडून आठ आणे काढून दिले. हे पाहून रागीसिंह खट्टू झाले. इतक्यात मागे बसलेल्या देवासिंह सुताराने ठणकन एक रुपया दिला. हे पाहून लद्धासिंह रागाने लालपिवळा झाला. सगळ्या गावात हलक्या जातीचा असून त्याने आपल्यापेक्षा जास्त पैसे द्यावेत म्हणजे काय? उठून त्याचे थोबाड रंगवावे असे त्याला वाटले. पण काही विचार करून हे काम त्याने पुढे ढकलले.

बाबा करमसिंह मोठा प्रामाणिक आणि फटकळ मनुष्य होता. फटकन खरी गोष्ट कोणाच्याही तोंडावर सांगण्यास तो मागेपुढे पाहात नसे. तो पटकन म्हणाला, 'बाबा नंबरदार! तू तर कमालच केलीस. द्यायचेच तर मग जरा हात सैल सोडला असतास तर काय बिघडले असते? फक्त एक जुनी पुराणी अधेली टाकलीस. त्या देवासिंहाने बघ कसा ठणकन रुपया फेकला?'

पहिला घाव नंबरदाराने कसा तरी झेलला होता, पण वर अजून एक घाव. सहनशीलतलाही सीमा असते. स्वतःवरील ताबा सुटून तो म्हणाला, 'करमसिंहा! तुला किती वेळा तरी सांगितले ना, बोलताना जरा तोंड सांभाळून बोलत जा म्हणून. बरं, स्वतःला अक्कल नाही तर दुसऱ्याने सांगितलेले तरी ऐकावे. माहीत आहे तू किती मोठा आहेस ते. आठवत नाही वाटते, जेव्हा तुझे दिवाळे वाजले होते, गुराढोरांवर सुद्धा जप्ती आली होती, तेव्हा तू माझ्याच बापूंच्या पायांवर पगडी ठेवून रडत भेकत होतास ते? त्यावेळी बापू मध्ये पडले नसते तर तू अगदी धुळीला मिळाला असतास.'

बाबा करमसिंहाची दोन्ही मुले तेथेच बसली होती. बापाचा पाणउतारा होत असलेला

पाहून वेलासिंह म्हणाला, 'जरा तोंड संभाळून बोल. आम्हांला फक्त कुंभार समजू नकोस. बिचाऱ्याचे पैसे बळकावून उलट त्यालाच तुरुंगांत पाठविलेस. आता ऐकून घेतले. पण ह्यापुढे खबरदार आमच्या बापूचे नाव घेतलेस तर. आमच्यासारखे वाईट कोणी नाही मग. आपली अब्रू आपल्याच हातात असते.'

नंबरदार काही बोलणार इतक्यात जवळच बसलेला त्याचा पुतण्या फौजासिंह म्हणाला, 'बस कर बडबड. तुटक्या वहाणेसारखा जास्त फैलावू नकोस. शामभटाची तट्टाणी ऐरावताशी बरोबरी करण्यास निघाली आहे. जा, जा, कर तुला काय करायचे ते. दुसऱ्याच्या तुकड्यावर तर जगत नाही आम्ही.'

करमसिंहाचा धाकटा मुलगा खीवासिंह म्हणाला, 'हो बाबा, तुझी जीभ हातभर वाढल्यास नवल काय? आजोबांनी तिकडे अन्नाच्या कणाला महाग होऊन प्राण सोडला आणि इकडे नातवाचा दिमाख पाहा!'

नंबरदार म्हणाला, 'कसला दिमाख पाहिलास तू आमचा?'

करमसिंहाच्या बाजूचा एक मनुष्य म्हणाला, 'तुझा दिमाख कसा वाढणार नाही? निपुत्रिक सासऱ्याकडून इस्टेट मिळाली. बाकी जी कमतरता होती ती पोटच्या पोरी विकून पुरी केलीस. मग मगरुरी कशी येणार नाही? तो दिवस विसरलास वाटतं, जेव्हा तिन्ही भाऊ एका दरोड्यात पकडले गेले होते आणि बाप घरोघर जाऊन रडत बसला होता. जर आम्ही लोकांनी मदत केली नसती तर घरच्या बायकांच्या कपड्यांचा सुद्धा लिलाव झाला असता.'

'पुरे, पुरे, कुत्र्या!'

'चूप बस, लुच्चा कुठला!'

'पकडा त्याला. जातो कोठे?

'कोणाची माय व्याली आहे मला हात लावायला!'

'असं?'

'हो.'

'घे तर मग.'

'असा पुढे ये ना!'

मग काय विचारता? दोन्ही पक्षांकडून महाभारत सुरू झाले. नशीब एवढेच की सर्वजण गुरुद्वाऱ्यात आले असल्यामुळे कोणाजवळही लाठी किंवा फरशी नव्हती. नाही तर आज किती मुडदे पडले असते सद्गुरूच जाणे! रागीसिंहाच्या पेटी-तबल्याने काही काळपर्यंत हत्यारांचे काम केले. पण जास्त वेळ त्यांनी टिकाव धरला नाही. ज्यांच्या ज्यांच्या टाळक्यावर लागले, डोके फुटण्याआधीच त्यांचे तीन तेरा वाजले. भायीजी तत्त्.।शीच्या

खाली जाऊन लपले. रागीसिंह 'जान बची लाखो पाये' हीच भेट घेऊन पायांत चप्पलही न घालता इतक्या वेगाने पळाले की रेल्वेस्टेशनावर पोहोचल्यावरच त्यांनी निःश्वास टाकला.

संध्याकाळ होता होता पोलिस येऊन थडकले आणि लहानमोठ्या सर्व मंडळींना पकडून घेऊन गेले.

सरतेशेवटी परिणाम काय झाला? व्हावयाचा तोच. थोड्याच दिवसांत गावाची संपत्ती थोडी वकिलांच्या खिशांत, थोडी सरकारी कचेरीत आणि उरलीसुरली पोलिसांच्या घशात गेली.

[19]

बचनसिंह सुंदरीला घरी तर घेऊन आला, पण हे उपकार त्याला खूप महागात पडले. त्याची आई आधीच सुंदरीमुळे दुःखी होती. जेव्हा तिने हा तमाशा पाहिला तेव्हा ती इतकी घाबरली की काय करावे ते तिला सुचेना. बचनसिंहाला ह्या बाबतीत काही सांगण्याची तिची हिंमत नव्हती. कलंदराच्या पोरटीची ब्याद बचनसिंहापासून दूर करण्यासाठी तिने आधीच अनेक उपाय योजले होते, पण तीच पोरटी आता तिच्या घरात बुसली होती. शिवाय बचनसिंहाच्या ह्या कृत्याचा पाढा घरोघरी वाचला गेल्याने लोकांनी मायलेकांशी बोलणे-चालणे जवळजवळ बंदच केले होते.

बचनसिंहाने ह्या गोष्टीकडे दुर्लक्ष केले नव्हते. त्याला आईचे दुःख समजत होते. गावातील लोक आता कोठपर्यंत जाऊन पोहोचतील याचीही त्याला जाणीव होती. पण सर्व काही माहीत असूनही तो सुंदरीला घरी घेऊन आला होता आणि एका न्हाव्याला बोलावून त्याने सुंदरीची मलमपट्टीही केली होती. रोडूबाबाला सर्व हकीगत सांगून तो त्याला घेऊनही आला होता.

सुंदरीला पाहिल्याबरोबर रोडूला चक्करच आली. त्याला वाटले की, बचनसिंह आधीच आपल्यासाठी किती संकटे झेलीत आहे, कोण जाणे बिचाऱ्याला ह्या अपराधासाठी जातवाल्यांकडून किती दंड भोगावा लागेल. तो बचनसिंहाच्या पायाशी कोसळला आणि त्याचे आभार मानू लागला. सुंदरीला बेशुद्धावस्थेतच घरी नेण्याची तो परवानगी मागू लागला. खरे म्हणजे तिला तेथून हलविण्याची त्याची मनापासून इच्छा नव्हती, कारण त्याला हे माहीत होते की इथल्यासारखे उपचार आपल्या झोपडीत करणे शक्य नाही. आपल्याला साधे औषधपाणी सुद्धा आणता येणे अशक्य आहे. तरी

बचनसिंहाची अब्रू धोक्यात घालण्यापेक्षा सुंदरीचा जीव धोक्यात घालणे त्याने अधिक पसंत केले. पण त्याने लाख विनवण्या केल्या तरी बचनसिंह काही सुंदरीला पाठविण्यास तयार झाला नाही.

शेवटी असे ठरले की जोपर्यंत सुंदरी पूर्ण बरी होत नाही तोपर्यंत ती बचनसिंहाच्या घरी राहील. पण रोड्डूला सुंदरीशिवाय राहणे कठीण वाटत होते. त्याला कळत होते की सुंदरीला आपल्या सेवा-शुश्रूषेची मुळीच गरज नाही, पण मायेचे बंध त्याला तोडता येईनात. शेवटी कसेतरी मन घट्ट करून तो काही दिवसांसाठी सुंदरीचा वियोग सहन करण्यास तयार झाला. नंतर दोनतीन दिवस ओळीने तो सुंदरीला पाहण्यास गेला. पण त्याला हा सौदा इतका महागात पडला की त्याने जाणेच बंद करून टाकले. कारण जेव्हा तो त्या आळीतून जाई तेव्हा लोकांचे काही ना काही कुजके-नासके टोमणे त्याच्या कानावर पडत.

इकडे बचनसिंहाची परिस्थितीही अशीच होती. पण ठामपणे तो आपल्या निश्चयास चिकटून बसला. पावलोपावली त्याला लोकांचे टोमणे ऐकावे लागत असूनही तो कृत-निश्चयापासून ढळला नाही. मोठ्या उत्साहाने तो सुंदरीची शुश्रूषा करीत होता.

सुंदरी सतत दोन दिवस बेशुद्ध होती. मधूनमधून ती केव्हातरी डोळे उघडीत असे, पण लगेच मिटून घेई. तिसऱ्या रात्री नऊच्या सुमारास रोड्डूबाबा सर्वांचा डोळा चुकवून सुंदरीच्या उशाशी येऊन बसला. त्याच वेळी तिने कूस बदलली. आज दिवसासुद्धा तिने तीनचार वेळा हालचाल केली होती आणि काहीतरी बडबड केली होती.

हळूहळू तिने पापण्या उचलून लक्षपूर्वक सभोवारच्या वस्तू न्याहाळल्या. रोड्डूच्या जिवात जीव आला. सुंदरीच्या डोक्यावरून हात फिरवीत भरल्या गळ्याने तो म्हणाला, 'सुंदरो!'

सुंदरीने खोल आवाजात म्हटले, 'काय बाबा!'

'पुत्त! माझ्याकडे पाहा तर खरं.'

सुंदरी कुशीवर वळली आणि तिने उशाशी बसलेल्या आपल्या पालनकर्त्या बापाकडे पाहिले. सुंदरीने त्याच्याकडे आपले नाजूक हात पसरले. रोड्डूने लगेच आपले डोके पुढे केले. त्याला मिठी मारून सुंदरी हळूच म्हणाली, 'बाबा, मी कोठे आहे?'

'पुत्त! तू आपल्याच घरी आहेस.'

'नाही बाबा. हे कुठले आपले घर, आपल्या घरी खाट कधी होती?' ती चकित होऊन इकडेतिकडे पाहू लागली. आपल्या डोक्याला, कपाळाला, हनुवटीला पट्ट्या बांधल्या असल्याचे तिला जाणवले. हातानेच ती रोड्डूचे डोके चाचपडून म्हणाली,

'बाबा, मला येथे कोणी... ?'

ती मध्येच गप्प बसली. आपल्या प्रश्नाचे उत्तर तिला आपोआप मिळाले. त्या दिवशीचे सारे प्रकरण तिला आठवले. तिने विचारले, 'मी बेशुद्ध झाले होते का ?'

'होय, बाळ.'

'बाबा, चल आता घरी जाऊ या.'

'जाऊ हं. अजून जरा चांगली बरी हो !'

'नाही बाबा, मी तर खडखडीत बरी झाले आहे.'

ती हळूहळू खाटेवर बसू लागली. एव्हाना चांगलीच रात्र झाली होती. रोडूने तिला आधार देऊन खाटेवर झोपविले आणि प्रेमाने तिच्या डोक्यावरून हात फिरवीत म्हटले, 'बाळ, झोपून राहा, मी सकाळी तुला घेऊन जाईन.'

बचनसिंहसुद्धा जवळच बसला होता. रोडूने आदवीने हात जोडून त्याला म्हटले, 'सरदारजी ! सुंदरी शुद्धीवर आली आहे. मी चलतो आता. सकाळी येईन.'

बचनसिंह म्हणाला, 'काही काळजी करू नका. तुम्ही जा आता.'

सुंदरीचा डोळा लागला. रोडूने एकदा व्याकुळ नजरेने तिच्याकडे पाहिले व छडी घेऊन तो बाहेर निघून गेला.

तो गेल्यावर सुमारे अर्ध्या तासाने सुंदरीने परत कूस बदलून पाणी मागितले. बचनसिंह तिच्याजवळच बसला होता. त्याने पाणी आणून ग्लास तिच्या तोंडाला लावला. सुंदरी पुष्कळ वेळ त्याच्या तोंडाकडे पाहात राहिली. मग ती म्हणाली, 'तुम्ही मला येथे घेऊन आलात ?'

बचनसिंहाने होकार देऊन बिछान्यावरील सुरकुत्या नीट करीत म्हटले, 'सुंदरी, तू मुळीच चिंता करू नकोस. आता तू ठीक झाली आहेस. तरीसुद्धा हालचाल करू नकोस. जास्त बोलूसुद्धा नकोस.'

सुंदरीचा स्वभाव चंचल होता. ती थोडीच गप्प बसणार ? खस्त्याळपणे म्हणाली, 'नाही, मी आता बरी झाले आहे.' आपले हळदीसारखे पिवळे झालेले हात उलट-सुलट करीत पाहून तिने परत विचारले, 'तुम्ही मला येथे आणलेत ?'

'होय.'

'का ?'

'तुला बेशुद्धावस्थेत उचलून आणले.'

'म्हणजे मला स्पर्श करून...'

'का ? तुला शिवण्यात कसली हरकत ?'

'आम्ही नीच जातीचे नाही का ?'

'नाही. माझ्या मते तू जगातील तमाम जातींहून श्रेष्ठ आहेस. सुंदरी, मी नाही तुला नीच समजत.'

'तुम्ही मला नीच समजत नाही?'

'नाही.'

'मग काय समजता?'

'आपल्याचसारखा मनुष्यप्राणी. जाऊ दे ह्या गोष्टी. मला असं सांग, तू त्या दिवशी, गुरुद्वाऱ्यात कशाला गेली होतीस?'

ज्या गोष्टीची तिला आठवणसुद्धा नको होती, त्याच गोष्टीचा उल्लेख बचनसिंहाच्या तोंडून ऐकून ती घाबरली. आधीच पश्चात्तापाने ती होरपळली होती. मी त्या दिवशी गुरुद्वाऱ्यात कशाला गेले होते? स्वैर वागण्याचे ईश्वराने चांगले फळ दिले. ती ओशाळून म्हणाली, 'चूक झाली माझी.'

'चूक? नाही, सुंदरी. तिकडे जाण्यास माझी काही हरकत नाही. मला असं विचारायचं आहे की, तू येथे पोहोचलीसच कशी? तुला कोणी अडवले नाही?'

सुंदरीला थोडा धीर आला. तिने त्या रात्रीची सर्व हकीगत सांगितली. हेही सांगितले की, 'रागी कीर्तन करीत होते आणि मी दारामागे उभी राहून ऐकत होते. नंतर आरती झाली, मी हात जोडून उभी राहिले. नैवेद्य दाखविल्यानंतर माझ्या लक्षातच राहिले नाही की मी दाराजवळ उभी आहे ते. डोके टेकण्यासाठी मी जेव्हा वाकू लागले, तेव्हा माझ्या डोक्याच्या हलक्याशा धक्क्याने दार एकदम उघडले, दाराच्या हलण्यामुळे त्याच्या मागे असलेला भुशाचा ढीग माझ्या अंगावर पडला आणि मी श्रीगुरुग्रंथसाहेबांच्या खोलीत जाऊन पडले. ज्या स्थानावर डोके टेकण्याची माझी इच्छा होती, बरोबर त्याच ठिकाणी माझे डोके टेकले गेले. गुरुसाहेबजीने माझी डोके टेकण्याची इच्छा पूर्ण केली, त्याचबरोबर माझ्या धीटपणाची शिक्षाही दिली.'

सुंदरीची श्रद्धा, तिचे समर्पण व प्रबळ निश्चय पाहून बचनसिंहास गहिवरून आले. त्याने मोठ्या श्रद्धेने सुंदरीचा हात पकडून म्हटले, 'सुंदरी, तू धन्य आहेस. मला तुझ्याबद्दल अतिशय आदर वाटतो.'

आजपर्यंत सुंदरीचा समज होता की जगात केवळ रोडू आणि बंदरीशिवाय कोणी कोऽणी आपल्यावर प्रेम करीत नाही, उलट सारी दुनिया आपला तिरस्कारच करते. म्हणूनच ती आजपर्यंत प्रेमाच्या महत्त्वाच्या बाबतीत अनभिज्ञ होती. उच्च घराण्यातील असूनही बचनसिंह तिच्यावर प्रेम करीत असलेला पाहून तिला एक आगळाच आनंद झाला. एक नवाच उत्साह वाटू लागला. चौदा-पंधरा वर्षांच्या त्या बालिकेला प्रेमाची किंमत कळत नसली तरी प्रेमाचे स्वरूप ती ओळखत होती.

बचनसिंह तिची अगदी मनोभावाने सेवा करीत होता. तिची जखमही भरत आली होती. त्याचे खरे कारण योग्य औषधपाणी होते की बचनसिंहाचे निर्मळ प्रेम होते हे सांगणे कठिणच आहे. जशीजशी तिची प्रकृती सुधारू लागली तसेतसे तिच्या हृदयात त्याचे स्थान पक्के होत गेले. केवळ तिच्याखातर त्याने साऱ्या गावाची वक्रदृष्टी आपल्यावर ओढवून घेतली होती, याची तिला जाणीव होती. इकडे बचनसिंहसुद्धा ह्या सुंदर, कोवळ्या, कोमल मनाच्या बालिकेकडे आकर्षित होऊ लागला होता.

स्त्रीचे मन किती विचित्र असते ! कधी ते वज्राहूनही कठीण बनते तर कधी मेणाहूनही मऊ बनते. सदाकौर (बचनसिंहाची आई) सुरवातीला ह्या कलंदराच्या पोरीचा तिरस्कार करीत होती, पण ज्या दिवशी बचनसिंह सुंदरीला जखमी स्थितीत घरी घेऊन आला आणि त्याच्या तोंडून सुंदरीची करुण कहाणी तिने ऐकली त्या दिवसापासून सुंदरी-बद्दल तिलाही आस्था वाटू लागली. सुंदरीचे सुंदर रेखीव गोरेपान शरीर, चंचल भाव-पूर्ण डोळे आणि भोळाभावडा हसरा चेहरा पाहून कोणीही व्यक्ती, मग ती स्त्री असो अथवा पुरुष, सुंदरीचा तिरस्कार करणे शक्यच नव्हते.

पंधरा दिवस आणखी गेले. सुंदरी आता जवळजवळ पूर्ण बरी झाली होती. तिच्या जखमा आता वाळल्या होत्या. कपाळाचा घाव थोडा मोठा असल्यामुळे, ती पट्टी सोडण्यास अजून दोनतीन दिवसांचा अवकाश होता. केवळ जखम मोठी होती म्हणूनच बचनसिंह जास्त काळजी घेत होता असे नाही, तर तिच्या सौंदर्याला आच लागू नये म्हणूनही तो जपत होता. पण ज्या दिवशी पट्टी सोडली, त्या दिवशी बचनसिंहाच्या आश्चर्याला सीमाच राहिली नाही. कारण अर्धचंद्राकृती जखमेच्या खुणेने तिच्या सौंदर्यात भरच पडली होती.

रात्रीचा दहाचा सुमार झाला असेल. सुंदरीची खाट अंगणात असलेल्या एका छोट्याशा सोप्यात घातली होती. सदाकौर आणि बचनसिंहाच्या खाटा मागच्या बाजूला पडवीत घातल्या होत्या. कामकाज आटपून सदाकौर झोपी गेली होती. आज सुंदरीला खूपच हुशारी वाटत होती. खाटेवर पडल्यापडल्या ती कसल्या तरी गहन विचारात गुंग झाली होती. तिचे कान दरवाजाला लागले होते. कोणाच्या तरी चाहुलीची ती वाट पाहात होती. उद्या आपल्या झोपडीत परत जावयाचे असल्यामुळे आज तिला बचनसिंहाशी मनमोकळेपणाने गप्पा माराव्याशा वाटत होत्या. काय बोलावे बरे ? कोण जाणे ! पण बचनसिंहाचा वियोग म्हणजे देहापासून प्राणाचा वियोग असे तिला वाटत होते एवढे मात्र खरे !

अजून कसा आला नाही बरे बचनसिंह ! ठीक-ठाक तर आहे ना ? ह्याच विचारात गर्क होऊन ती जरा कुठे खुट्ट वाजले तरी दाराकडे पाहू लागे. सदाकौर अगदी निश्चिंत

होती; कारण तिला बचनसिंहाचा स्वभाव चांगला माहीत होता. कधी कधी तर तो अर्धी रात्र उलटल्यावर परतत असे.

अकरा वाजले. सुंदरीला धड बसावेसे वाटत नव्हते, धड झोपावेसे वाटत नव्हते. ती उठून अंगणात फेऱ्या घालू लागली. तिला बचनसिंहाशी काही महत्त्वाच्या गोष्टी बोलावयाच्या होत्या. मनात इतके विचारतरंग उठत होते, सर्व कसं लक्षात राहणार ? हाच विचार तिला सतावत होता.

तेवढ्यात कुणीतरी दार वाजविले. तिने जाऊन दरवाजा उघडला. बचनसिंह घाईघाईने आत आला. त्याची घाईगर्दी पाहून सुंदरीला लहान मुलासारखे हसायला आले. तिने विचारले, 'आज एवढा वेळ का झाला ?'

बचनसिंहाने लगेच उत्तर दिले नाही. तो सरळ सुंदरीच्या खाटेपाशी असलेल्या खुर्चीवर जाऊन बसला. त्याच्या पाठोपाठ सुंदरीही आपल्या खाटेवर जाऊन बसली. वारा जोराचा सुटला होता. बचनसिंहाला वाटले, सुंदरीला थंडी वाजत असेल. तिच्या प्रश्नाचे उत्तर देण्यापूर्वीच तो म्हणाला, 'सुंदरी, तुला थंडी वाजत असेल. चल, तुझी खाट आतल्या खोलीत घालतो.' तिचा हात धरून त्याने तिला खाटेवरून उठविले. सुंदरीचा हात बर्फासारखा थंडगार पडला होता.

'अरे, तू थंडीत फिरत होतीस का ? परत आजारीबिजारी पडावयाचा विचार आहे वाटते ?' असे म्हणून त्याने सुंदरीची खाट, बिछाना व खुर्ची सर्व आतल्या खोलीत नेऊन ठेवले. तिला खाटेवर बसवून तिच्या अंगावर रजई घालीत बचनसिंह रागारागाने म्हणाला, 'अशाने तू नक्कीच आजारी पडणार.' तरीसुद्धा सुंदरी गप्पच. बचनसिंहाने तिचा खांदा हलवून विचारले, 'काय झाले, सुंदरी ?' सुंदरीच्या डोळ्यांतून अश्रू ओघळले.

बचनसिंहास आपल्या रुक्ष व्यवहाराबद्दल वाईट वाटले. तो खुर्चीवरून उठून खाटेवर जाऊन बसला. सुंदरीचा हात दोन्ही हातांत घट्ट पकडून तो म्हणाला, 'सुंदरी ! माझ्या बोलण्याचा राग आला का ?' पण सुंदरी कोठे होती ? सोनेरी स्वप्नलोकात वावरत होती. तिच्या मनात हाच एक विचार चालला होता की बचनसिंहाला तिची किती काळजी आहे, किती सहानुभूती, किती प्रेम आहे. जरा हात थंड पडलेला पाहून त्याची बाबरगुंडी उडाली. 'मी किती नशीबवान आहे. नाही नाही, कमनशिबी आहे मी अगदी.' ह्याच विचारात ती गुंग होती. बचनसिंहाच्या प्रश्नाचे उत्तर देण्याऐवजी तिला रडूच कोसळले.

बचनसिंहाने तिचा हात आणखी घट्ट दाबून म्हटले, 'सुंदरी !' ह्याच्यापुढे काही बोलण्याची त्याला शुद्धच राहिली नव्हती. एका वेगळ्याच रसात तो बुडून गेला. त्याच्या तोंडून शब्दच फुटेना.

वचनसिंह सुंदरीच्या डोळ्यांसमोर होता पण तिला दिसत नव्हता. तिला फक्त झोपडीत पडून राहिलेला आपला निष्प्राण देह दिसत होता. होय, बचनसिंहाशिवाय सारे जीवन सुने होईल; कारण रोड्याबाबाने दिवस उगवताच सुंदरीला पाठवून देण्यास सांगितले होते.

तिला आपल्या रितेपणाची जाणीव झाली. जणू बचनसिंह आणि ती एक मन दोन शरीर झाली आहेत. नाही, त्यांच्याशिवाय आपण जिवंतच राहू शकणार नाही. पण हे बचनसिंहाला थोडेच सांगता येणार होते ? ह्याच विचारात ती इतकी गर्क झाली की, वचनसिंहाने पकडलेल्या हातातून अमृतधारा निघून त्या साऱ्या नसानसांतून वाहात आहेत असा तिला भास झाला. त्याचबरोबर एक मधुर आवाज तिच्या कानी आला, 'सुंदरा ! माझी सुंदरा, तू अशी गप्प का ! मला तर आज तुझ्याशी खूप खूप बोलावयाचे होते.'

ह्याच्यापूर्वी सुद्धा वचनसिंहाच्या तोंडून 'सुंदरा' .ही प्रेमळ हाक तिने ऐकली होती. आज त्याच संबोधनामुळे तिचे मन अवर्णनीय अशा आनंदाने भरून आले. तिने मान वर करून बचनसिंहाकडे पाहिले आणि त्याच्या डोळ्यांत एक वेगळाच गूढार्थ भरलेला तिला दिसला. तो वाचण्याचा ती प्रयत्न करू लागली. तो वाचता वाचता तिच्या हे लक्षातही राहिले नाही की तो अर्थ त्याच्या डोळ्यांतील आहे की आपल्या ! त्या मजकुराचे शीर्षक होते 'प्रेम'. किती वेळ हा नजरेचा खेळ चालू होता कुणास ठाऊक ! वचनसिंहाने आपल्या घड्याळात पाहिले, तेव्हा त्याच्या मनात विचार आला, 'अरे दीड तास कसा गेला ? साडेबारा वाजले.' शेवटी ही मौनकथा समाप्त झाली. बचनसिंहाने पुन्हा तेच म्हटले,

'सुंदरी, मला तुझ्याशी खूप बोलावयाचे होते.'

'बोलावयाचे होते ना ? आता नाही ना ?' तिने हसत विचारले.

'रात्र खूप झाली, सुंदरी.'

'अच्छा, तुम्हांला झोप येत असेल तर...'

'मला नाही झोप आली, पण तुझ्या झोपेची काळजी आहे ना.'

'माझी झोप ! मला तर आज मुळीच झोप येणार नाही.'

'का ? का येणार नाही ?'

सुंदरी निरुत्तर झाली.

बचनसिंहाने म्हटले, 'सुंदरी !'

'हूं.'

'तू उद्या जाणार ?'

सुंदरी काही बोलली नाही, केवळ नख कुरतडत बसली.

'सुंदरी, जायचेच होते तर आलीस कशाला ?'

सुंदरीने निःश्वास सोडला. बचनसिंह म्हणाला, 'सुंदरी, तुझ्यामुळे माझे जीवन अमृतमय झाले आहे.'

तरी आपली ती गप्पच. मूकपणे ती बचनसिंहाच्या साऱ्या प्रश्नांची उत्तरे देत होती. तोंडाने तिला उत्तरे द्यावीशी वाटत होती, पण शब्द फुटत नव्हता. बचनसिंहाची भाषा ती समजू शकत होती, पण आपल्या मनोभावना साकार करण्यास असमर्थ होती. तिच्या भावनांस शब्द अपुरे पडत होते, म्हणूनच ती स्तब्ध होती.

बचनसिंहाने परत विचारले, 'सुंदरी, तू बोलणार नाहीस का? बरं, मग मी जातो तर.' असे म्हणून तो खाटेवरून उठला.

सुंदरीने त्याचा शर्ट पकडला आणि त्याला परत बसवून ती म्हणाली, 'आज एवढा वेळ का झाला?'

जी सुंदरी स्वतःच बचनसिंहाशी गप्पा मारण्यास उत्सुक होती, तीच आता संधी मिळताच विषयांतर करून तो प्रसंगच टाळीत होती. म्हणूनच बचनसिंहाने विचारलेल्या प्रश्नाचे उत्तर न देता तिने नवीनच गोष्ट काढली, 'आज उशीर का झाला?'

खरं म्हणजे सुंदरीच्याच भावना बचनसिंहाने शब्दरूपात व्यक्त केल्या होत्या. पण निसर्गाने स्त्रीचे हृदय किती विशाल केले आहे – किती सहनशील बनविले आहे तिला! सागरासारखे गहन आणि पर्वतासमान दृढ विचार ती आपल्या हृदयाच्या छोट्याशा मंजूषेत बंद करून ठेवीत असते.

बचनसिंहाचे व तिचे प्रेम सफल होणे अशक्यप्रायच आहे ह्याच विचाराने तिने आपले तोंड बंद ठेवले होते. मनात उठणाऱ्या वादळास थोपवून धरले होते.

सुंदरीने संभाषणाचा ओघ बदलण्यासाठी तो प्रश्न विचारला होता. पण बचनसिंह पुन्हा हरिदासाची कथा मूळपदावर घेऊन गेला. पुन्हा त्याच जागी बसत त्याने म्हटले, 'तुझ्याचमुळे उशीर झाला मला. संध्याकाळी जेवून खाऊन मी सरळ विहिरीवर गेलो होतो. तेथे तुझ्या चिंतनात इतका बुडून गेलो की दहा वाजलेले कळलेच नाहीत.'

'माझ्या चिंतनात?' सुंदरीने आश्चर्याने विचारले.

'होय, सुंदरी! तुझ्याच चिंतनात.'

'सुंदरीला घरी आणून चांगली घोरपड गळ्यात अडकवून घेतली, असाच विचार करीत असाल. होय ना?'

'नाही. असा विचारसुद्धा मनात डोकावला नव्हता.'

'मग?'

'मी विचार करीत होतो, उद्या तू जाणार...'

'मग काय?'

'सुंदरी, मी...'

'हं सांगा ना, लाजू नका.'

'सुंदरी, मी तुझ्यापासून दूर राहू शकणार नाही. माझे मन...'

'तुमचे मन...हं, हं, पुढे काय?'

'सुंदरी, तू अजून लहान आहेस. प्रेमाचा अर्थ तुला कळत नाही. तो कळला असता तर मी न सांगताही तुला माझी स्थिती समजली असती.'

'मला समजत नाही असे का म्हणता? ज्ञानीजींनी आणि तुम्हीच तर मला सर्व काही शिकविले आहे. प्रेम म्हणजे काय हे मी जाणत नाही काय? आपल्याला सर्वांशी प्रेमाने वागले पाहिजे. गुरुवाणीत म्हटलेच आहे ना, 'जिन प्रेम किओ, तिन ही प्रभु पायो।'[1]

तिच्या या सरळ उत्तराने बचनसिंह निरुत्तर झाला. त्याची थोडीशी निराशाही झाली. तरीसुद्धा आपले घोडे पुढे दामटीत तो म्हणाला, 'मला दुसऱ्या प्रेमासंबंधी म्हणावयाचे आहे.'

'दुसरे कोणते बाई प्रेम?' सुंदरीने विचारले. 'ते प्रेम कसे असते? तुम्ही तर अभ्यासक्रमात कधी सांगितले नव्हते.'

'ह्या गोष्टी अभ्यासक्रमात नसतात, वेडाबाई.'

'बरं, शाळा-कॉलेजात तरी?'

'नाही वेडे, तू तर अगदी...'

'मग तुम्ही का सांगत नाही?'

बचनसिंहाचा अगदी नाइलाज झाला. त्यामुळे सरळ शब्दांत आपले विचार प्रकट करण्यासाठी त्याने म्हटले, 'जाऊ देत ह्या गोष्टी. तू उद्या जाणार ना?'

'हो. बाबाने निरोप पाठविला आहे ना?'

'नसता पाठविला तर?'

'मग नसते गेले.'

'बरं, तिकडे गेल्यावर माझी आठवण करशील?'

'तुम्ही येणार नाही तिकडे?'

'नाही.' सुंदरीला असह्य वेदना झाली. 'का? मग मला कोण शिकविणार?'

'मी काहीतरी व्यवस्था करीन.'

'मी नाही शिकणार हं दुसऱ्या कोणाकडून, सांगून ठेवते.'

1. ज्याने प्रेम केले त्याला ईश्वराची प्राप्ती झाली.

'जास्त शिकून तुला काय करावयाचे आहे? गुरुमुखी तर तुला चांगली लिहिता वाचता येते. पुष्कळसे दोहे तर तुला तोंडपाठ आहेत.'

'तुम्हीच सांगितले होते ना, की तुला दहावीपर्यंत शिकवीन म्हणून?'

'पुढे शिकण्याचा तुझा विचारच असेल, तर शहरातील एखाद्या मुलींच्या शाळेत तुझे नाव घालीन.'

'तुम्ही सुद्धा तेथे येऊन राहाल?'

'मी? घर सोडून मला कसे राहता येईल?'

सुंदरी गप्प बसली. तिला वाटले आपण भलताच प्रश्न विचारला.

बचनसिंह परत म्हणाला, 'सुंदरी! तुला माझ्याजवळ राहावेसे वाटते?'

'तुमच्याजवळ? लोक मला राहू देतील?'

'बरं, सुंदरी! तू माझ्यावर प्रेम नाही करीत?'

प्रेमाचा उल्लेख करताच सुंदरीच्या चेहऱ्यावर मधुर हास्य उमटले. तिने आपले मस्तक त्याच्या खांद्यावर टेकवून म्हटले, 'तुम्ही...तुम्ही...मी...' प्रयत्न करूनही ती वाक्य पूर्ण करू शकली नाही.

पण बचनसिंहाला आपल्या प्रश्नाचे उत्तर मिळाले. सुंदरीच्या अंगोपांगांतून सळसळणाऱ्या प्रेमप्रवाहाने बचनसिंह मुग्ध झाला. प्रेमी जनांना एकमेकांस जे सांगावयाचे होते ते तसेच मनात राहिले. पण ते बाहेर प्रकट करण्याची काय जरूर? आपण दोघे एकरूप असल्याची अनुभूती दोघांनाही झाली.

ह्यानंतर बचनसिंहाने घड्याळात पाहिले तर अडीच वाजले होते. तो म्हणाला, 'बरं, सुंदरी, आता झोप तू. खूप रात्र झाली आहे.' त्याने तिच्या हाताचे हळुवारपणे चुंबन घेतले. त्याच्या ओठाच्या स्पर्शाने ती इतकी धुंद झाली की तो कधी निघून गेला हेच तिला कळले नाही.

[20]

सायंकाळच्या सावल्या हळूहळू पसरत होत्या. माघातील झोंबणारी थंडी असूनही दिवाणपुराच्या बाहेरील विहिरीवर चांगलीच वर्दळ होती. रहाट चालू होता, रहाटावर बसलेला तेरा वर्षांचा मुलगा 'हूं हूं' करीत बैलजोडी हाकीत होता. विहिरीचा 'झूं-झूं' आवाज कानाला किती गोड वाटत होता. गावातील बऱ्याचशा मुली विहिरीजवळ घोळका करून बसल्या होत्या. जवळच लहानलहान मुले ठिकऱ्या खेळत होती.

रहाटाजवळच कापसाचे शेत होते. पण सध्या त्याला कपाशीचे शेत न म्हणता मुकलेल्या झाडांचे शेत म्हणणेच ठीक होईल. कारण एकाही रोपट्याला हिरवे पान किंवा फूल लागलेले दिसत नव्हते. हो, कपाशीच्या रित्या बोंडांनी झाडे भरली होती. हवेच्या झुळकीने त्यांचा 'खड-खड' आवाज येत होता. त्याच्या जवळच्या जमिनीवर मुळ्यांचे हिरवेगार वाफे होते. जमिनीच्या बाहेर अर्धवट निघालेल्या शुभ्र मुळ्यांवर हिरवीगार पाने झुलत होती, जणू एखाद्या शाहजादीवर चवऱ्याच ढाळल्या जात आहेत. वृद्ध पित्याच्या मांडीवर लाडकी लेक खेळावी त्याप्रमाणे शुष्क कपाशीच्या शेतात हे हिरवेगार वाफे दिसत होते. एखादे पोर घाबरून बापाला मिठी मारण्यासाठी हात पसरते त्याप्रमाणे हवेच्या जोराच्या झुळकीबरोबर मुळ्याची कोमल रोपटी वठलेल्या कपाशीकडे झुकत होती.

ह्या वेळी मुळ्याच्या शेताच्या बांधावर तीन माणसे बसली होती. एक नरम नरम मुळी उपटून त्यावरील माती झटकत एका माणसाने दुसऱ्याकडे पाहून म्हटले, 'तर मग हा झगडा निकालात निघणार ? की असाच आपल्या छातीवर मूग दळत राहणार ?'

दुसरा : पण भाई पालासिंह, ह्यात आमचा काय दोष ? तूच स्वतः टाळाटाळी करीत आहेस. तुला तर आम्ही सांगितलेच होते की एक घाव दोन तुकडे करून टाक म्हणून.

पालासिंह : मी कुठं नाही म्हणतो ? पण तुम्ही सगळे नालायक आहात. ह्या कालच्या पोरट्याला तुम्हांला वठणीवर आणता येत नाही, तर तुमच्या हातून काय होणार कपाळ ?

तिसरा : पण मला हे समजत नाही की जो पालासिंह मोठे-मोठे दरवडे घालण्यास भीत नाही तो त्या बचन्याला का घाबरतो ?

दोन्ही सवंगड्यांचे हे टोमणे पालासिंहास बाणासारखे बोचून गेले. त्याने जोशात म्हटले, "कोण ? मी डरलो ? गुरूशपथ, माझ्या हातात असतं तर दोन सेकंदांत त्याचा मुटका वळला असता. पण ती कारटी त्याच्यासाठी किती मरत असते दिसत नाही ? मी म्हणतो, असं होऊ नये की आपण बचनसिंहाला इजा करायची आणि जिच्यासाठी हे सर्व करायचे तीच दुःखाने झुरून मरून जायची. सवायासिंहा, असा काही उपाय शोधून काढ ना, की एका दगडाने दोन्ही पक्षी मारले जावेत. बचन्याचासुद्धा रोज-रोजचा तंटा संपावा आणि ती 'हूर की परी' सुद्धा ताब्यात यावी."

वीरू : आणि त्या तिसऱ्या चकण्या बुड्ढ्याचे काय ?

पालासिंह : ओये, त्याची चिंता नको. मला तर आपल्या जिवाची फिकीर आहे. त्या थेरड्याचे काय घेऊन बसलात ? त्याला चुटकीसरशी चिरडून टाकू. त्याची दाद-फिर्याद करणारे कोणी आहे का ?

सवाया : जाऊ देत ह्या गोष्टी. हे सांग, आता कशाला बोलावलेस ? किती कडक थंडी पडली आहे ?

पालासिंह : अरे, थंडीची सबब कशाला ? सरळ सांग की घसा ओला करायचा आहे म्हणून.

पालासिंहाचे बोलणे ऐकून त्याचे दोन्ही मित्र ओठांवरून जीभ फिरवीत हसू लागले.

पालासिंह म्हणाला, 'थंडीसाठीही औषध देतो. दीड बाटली पडली आहे त्या दिवसाची.'

'दीड बाटली' हे शब्द ऐकून दोन्ही मित्रांच्या चेहऱ्यावर आनंद पसरला. वीरसिंह म्हणाला, 'भाई, आम्ही तुझ्या शब्दाच्या बाहेर थोडेच आहोत ? जोपर्यंत तुला बाशिंग बांधले जाणार नाही, तोपर्यंत आम्हांला चैन पडणार नाही.'

सवाया : पण आमची वहिनी आल्याबरोबर तू आम्हांला विसरणार तर नाहीस ना ?

आपल्या मित्रांचे बोलणे ऐकून पालासिंहाला दारू न पिता हलकीशी नशा चढल्यासारखे झाले. तो म्हणाला, 'बाजारात तुरी आणि भट भटणीला मारी ! त्या बाईसाहेब तर अजून बचनसिंहाच्याच कैदेत आहेत आणि हे भाभीची स्वप्ने बघत आहेत.'

वीरसिंहाने उतावळेपणे म्हटले, 'कोण म्हणतो ? पाच दिवसांपूर्वीच बुड्ढा तिला घरी घेऊन आला.'

'अस्सं ?' पालासिंहाने आश्चर्याने विचारले, 'गेली असेल. तुला तर माहीत आहेच, मी सात दिवसांनी घरी आलो आहे.'

वीरू : तू तिला जखमी झाल्यापासून पाहिले नाहीस ना ?

'नाही.'

'खरं सांगतो, भैय्या, आता तर ती फारच मारू दिसते आहे. सफेत मैद्यात सिंदूर मिसळावा तसा वयेचा रंग उजळला आहे. थोड्याच दिवसांत केवढी उंच झाली आहे जर हे काम फत्ते झाले तर तुझे अगदी भाग्य फळेल.

पालासिंह : मला तर तिने आधीच पागल बनवून टाकले आहे. भडव्यांनो, आता तर उरलं सुरलं जेवण पण सुचणार नाही. तुमच्याकडून इतकंही काम झालं नाही त जीव घेईन तुमचा.

सवाया : हं:, हे काय मोठे काम आहे ? ईश्वराची कृपा असेल तर चुटकीसरश होईल. पण आधी बचनसिंहाचा काटा काढायला हवा. बचनसिंह असेपर्यंत ती काबू येणे कठीण आहे.

पालासिंह : पण सवायासिंहा, तुला काय वाटतं आहे ? बचना तिच्याशी ल करील ?

वीरू : मग काय उगीच शिकवून तिला पंडिता बनवीत आहे ?

पालासिंह : पण मला नवल हे वाटतं, की बचन्याला लग्नासाठी काय कमी मुली पडल्या आहेत ? चांगला शिकलासवरलेला आहे. मोठ्यामोठ्याच्या मुली सांगून येत आहेत असे ऐकले. ती मुलगी तर माझ्यासारख्या आगापीछा नसलेल्या रेड्यालाच टीक आहे.

सवाया : बाबांनो, तुम्ही फुकाच्या बडबडीत कशाला वेळ दवडता ? कामाचे बोलणे करायचे असेल तर करा, नाही तर मला रजा द्या. थंडीने माझे हातपाय आखडून गेले आहेत अगदी.

पालासिंह विचार करून म्हणाला, 'माझ्या मते बचन्याला एखाद्या खटल्यात अडकवून द्यावे.'

वीरू : मलाही असंच वाटतं.

सवाया : माझेही हेच मत आहे; मीच तुम्हांला सुचविणार होतो. पण बचन्याच्या ऐवजी त्या थेरड्याला.

नंतर पालासिंहाने आळीपाळीने दोघांच्या कानात काहीतरी सांगितले. थोड्याशा कुजबुजीनं तर सर्वजणांनी एक निश्चित निर्णय घेतला आणि ते उठून गेले.

[21]

सुंदरीला बचनसिंहाच्या घरून परत आल्याला खूप दिवस झाले होते. बचनसिंह रोडूबाबाच्या घरी नेहमी जायचा. त्याच्या मदतीने सुंदरीचा अभ्यासही चांगला चालला होता. आज दुपारी बचनसिंह जेव्हा विहिरीवरून घरी परतला तेव्हा आई अगदी उदास होऊन बसली असल्याचे त्याला दिसले. बचनसिंहाने कारण विचारल्यावर तिने निःश्वास सोडून सांगितले, 'काय सांगू, तुझ्यापासून काही लपविले आहे का ?'

'तरी पण आज विशेष काय झालं ?'

सदाकौर : 'काका, हेच ते घर, जेथे अष्टौप्रहर लोकांची वर्दळ चालू असे. आज कोणी इकडे ढुंकूनसुद्धा पाहात नाही. मुंरनचा मुलगा सुट्टीवर होशियारपूरहून आला आहे. सकाळी आपल्या दारावरून जाताना मला प्रणाम करण्यासाठी म्हणून आत आला. मला काय ठाऊक, मी आपली त्याला ग्लासभर लस्सी दिली. ती पिऊन तो निघून गेला. बाहेर दारातून कोणीतरी त्याला लस्सी पिताना पाहिले, घरी पोहोचल्यावर सर्वजण त्याच्यावर तुटून पडले. त्याला जाब विचारू लागले, 'तू त्या घरी का लस्सी प्यायलास ? त्यांना

सर्व गावाने वाळीत टाकले आहे!' मग दीनानाथ भटाने घरून गंगाजल आणून पाजले तेव्हा कोठे त्याला स्वयंपाकघरात शिरू दिले.'

बचनसिंह गेले कित्येक दिवस लोकांचे आपल्याशी चाललेले रंगढंग पाहात होता, पण त्याला स्वप्नातसुद्धा वाटले नव्हते की येथपर्यंत त्यांची मजल जाईल. लोकांचे अत्याचार व आईचे दुःख यांनी तो अतिशय व्याकुळ झाला. पण वरवर तिला धीर देत तो म्हणाला, 'तर मग काय झालं आई, नाही कोणी येत तर गेले उडत. आपण थोडेच कोणाच्या घरचं खात आहोत ?'

'काका, आपण कुणाचं खायला-प्यायला जात नाही, पण माणूस आपल्या जातीतच शोभून दिसतो. झाडाचे पान फांदीवरच शोभून दिसते, फांदीवरून काढल्यावर नाही. जीवन-मरण, सुख-दुःख सारे बरोबर भोगण्यात मजा असते, एकट्याने भोगण्यात नाही. किती वधूपिते आपले उंबरठे झिजवत होते आणि आता कोणी आमच्याकडे पाहातसुद्धा नाही. सांग मी कोठे जाऊ ?'

आतापर्यंत बचनसिंह आपल्या स्वभावानुसार वागत होता, पण आईच्या मनावर इतका खोल घाव बसला असेल याची त्याला आजपर्यंत कल्पना नव्हती. आईला काय उत्तर देणार ? इकडे-तिकडे पाहात तो म्हणाला, 'मग काय करावयाचे ?'

'करायचे काय ? जातीच्या बाहेर तर आपण राहू शकत नाही. बेटा, त्या कलंदराच्या मुलीवाचून आपले काय अडले आहे ? तीच तर ह्या साऱ्या तंट्याचे मूळ आहे. मेली ह्या गावात आलीच नसती तर हे रामायण घडले नसते.'

बचनसिंह जरा आवेशात म्हणाला, 'आई, त्या गरीब बिचाऱ्या पोरीचा काय दोष बरे ? एका गरीब अनाथ मुलीचा जीव वाचविणे इतका मोठा गुन्हा ठरत असेल, त्यासाठीच आपल्याला अशी शिक्षा दिली जात असेल, तर मी एकदा नाही हजार वेळा अशी शिक्षा भोगण्यास तयार आहे.'

आईने मुलाचा हा आवेश पाहून बोलणे आवरते घेतले आणि ती परत आपल्या कामधंद्याला लागली.

बचनसिंहसुद्धा मन रमविण्यासाठी फिरावयास बाहेर पडला. फिरत फिरत तो रोडू-बाबाच्या झोपडीकडे वळला. तेथे जाऊन पाहतो तो रोडूबाबा तेथे नव्हता. आणि सुंदरी कसल्या तरी गहन विचारात गर्क होती.

बचनसिंहाने दारात उभे राहून हाक मारली, 'सुंदरी !'

सुंदरीने चमकून म्हटले, 'हां जी !'

'कसल्या विचारात बुडाली आहेस एवढी ?'

'तुम्ही आलात ? मी तुमचीच वाट पाहात होते.'

बचनसिंहाने तिच्या चेहऱ्याकडे पाहिल्याबरोबर ताडले की ती खूप रडली आहे. त्याने उतावीळपणाने विचारले, 'सुंदरी, तू रडत होतीस वाटतं?'

सुंदरीने काहीच उत्तर दिले नाही. बचनसिंहाची व्याकुळता आणखी वाढली. त्याने पुन्हा म्हटले, 'विचारायला हरकत असेल तर नाही विचारणार पण...'

'तुम्हांला सांगण्यात कसली हरकत आहे?' सुंदरीने बळेच हसण्याचा प्रयत्न करीत म्हटले, 'आमची लच्छो बेपत्ता झाली आहे.'

'बेपत्ता झाली? कशी? ती तर सहसा कोठे जात नाही. मोकळी इकडे तिकडे हिंडत असते.'

'कोणास ठाऊक!' एक निःश्वास सोडून सुंदरी म्हणाली, 'ती जात तर नव्हती, कोणीतरी तिला घेऊन गेले आहे. काल रात्रीपासून तिचा पत्ता नाही. बाबा तर रात्री जेवलासुद्धा नाही. रात्रभर रडत होता. सकाळपासून तिच्या शोधार्थ बाहेर पडला आहे. शिवाय...'

'शिवाय काय?'

'बाबा तुमच्या घरी येणार होता, पण मी जाऊ दिले नाही; मला माहीत होते की तुम्ही याल येथे.'

'का?' बचनसिंहाने आतुरतेने विचारले, 'काही जरुरीचे काम होते का?'

सुंदरीचा चेहरा उदास झाला. तिचे डोळे भरून आले. बचनसिंहाचा जीव घाबरा झाला. त्याने खिशातून रुमाल काढून तिचे डोळे पुशीत म्हटले, 'सुंदरी, लवकर सांग. काय झाले?'

त्याच्या हातातून रुमाल घेऊन डोळे पुशीत ती म्हणाली, 'बाबा म्हणत होता की आम्ही येथून निघून जाणार.'

'निघून जाणार?' बचनसिंहाने चकित होऊन म्हटले, 'कोठे?'

'दुसऱ्या वस्तीत जाऊन राहू.'

'पण का?'

सुंदरी रुमालाचे एक टोक आपल्या बोटाभोवती गुंडाळत राहिली. ह्या चाळ्याने जणू आपल्या मनाची व्यथा ती विसरू पाहात होती. त्या 'का' चे उत्तर देण्यासाठी तिने मान वर केली, पण तिचे शब्द गळ्यातच अडकले.

बचनसिंहाने तिचा हात पकडून म्हटले, 'सुंदरी, सांग ना लवकर.'

त्यावेळी सुंदरीने मनातील विचार जबरदस्तीने बाहेर ढकलण्याचा प्रयत्न करीत म्हटले, 'लोक आम्हांला राहू देत नाहीत.'

'राहू देत नाहीत? का?'

'आमच्या खोड्या काढीत राहतात, उगीच !'

बचनसिंहास अजूनही सर्व गोष्टींचा उलगडा झाला नाही तरी यापेक्षा अधिक विचारण्याचे धाडसही झाले नाही. सुंदरीला धीर देत तो म्हणाला, 'पण तुमच्या बंदरीला पळवून कोणाला काय मिळणार ?'

जास्त काही सांगावे लागले नाही म्हणून सुंदरीने सुटकेचा निःश्वास सोडला. ती म्हणाली, 'कोणास ठाऊक काय मिळणार ते.'

ह्याच वेळी रोड्डूबाबा आत आला. बचनसिंहाने मान झुकवून त्याला 'सत् श्री अकाल' केले. त्याने विचारले, 'लागला का बंदरीचा पत्ता ?'

'नाही.' त्याबरोबरच रोड्डू जोरजोरात रडू लागला. त्याच्या तोंडून शब्दही फुटेना. सुंदरी घाईघाईने उठली आणि रोड्डूच्या गळ्यात पडून तिने विचारले, 'काय झालं बाबा ?'

'सुंदरी,' धोतराच्या शेवाने डोळे पुशीत रोड्डूने म्हटले, 'सुंदरी, तुझी लच्छो मेली ग.'

'मेली ?' सुंदरी किंचाळली आणि त्याचे खांदे घुसळीत म्हणाली, 'कशी मेली, बाबा ?'

'कोणी तरी तिला विहिरीत ढकलून दिले.'

'हाय ! हाय ! मेले मी ! विहिरीत...'

ज्याप्रमाणे एकाच दुर्बिणीतून दोन वस्तू पाहाव्यात, त्याप्रमाणे बचनसिंहाच्या एकाच हृदयास त्या दोघांच्या वेदना जाणवत होत्या. दोघे जण धाय धाय रडत होती.

काही वेळाने रोड्डूचे मन थोडे हलके झाल्यावर तो हात जोडून बचनसिंहास म्हणाला, 'सरदारजी ! तुम्ही अतिशय मेहरबानी केली आहे. आपल्या कातड्याचे जोडे करून सुद्धा तुमच्या उपकारांची फेड मी करू शकणार नाही. तुम्ही माझ्या मुलीला माणसात आणले आहे. शिवाय हिचा जीव वाचविण्यासाठी तुम्ही जी जी संकटे झेललीत त्याबद्दल मी तुमचे कोणत्या शब्दांत आभार मानू ? इतकी जिंदगी गेली तसेच आयुष्यातील उरलेसुरले दिवस तुमच्या पायापाशी घालवावेत अशी इच्छा होती. पण आमचे येथील अन्नपाणी संपले असे मला वाटते. आम्ही येथून सुखरूपपणे जाऊ असा आशीर्वाद द्या.'

बचनसिंहाला असंख्य सुया टोचल्याप्रमाणे वेदना झाल्या. तो म्हणाला,

'पण का ? बाबाजी ? असं का ?'

'सरदारजी, काय सांगू ? (सुंदरीकडे पाहून) ह्या पोरीला मी मोठ्या कष्टाने लहानाची मोठी केली आहे. हिला मी येथे घेऊन आलो तेव्हा ही अगदी नखाएवढी होती.' त्यानंतर त्याने सुंदरी कशी मिळाली ती सर्व दुःखद कहाणी सांगितली. तो पुढे म्हणाला,

'लोक सख्ख्या मुलावर किती प्रेम करतात हे मला माहीत नाही. पण हिच्यावर माझे किती प्रेम आहे हे मी सांगूच शकत नाही. जेव्हा ही लहानशी होती तेव्हा मला फक्त हिच्या पालनपोषणाचीच चिंता होती. पण तुम्हांलाही कळत असेल की ही आता लहान पोर नाही. मी तर असा भणंग भिकारी. माझ्यात एवढी शक्ती नाही. मी कोणाकोणाला तोंड देऊ सांगा.' असे म्हणून तो हमसाहमशी रडू लागला. पुन्हा थोड्या वेळानें म्हणाला, 'कित्येक दिवसांपासून पाहतो आहे, गाववाले आमच्याशी नीट वागत नाहीत. रात्री कित्येक तरुण पोरें आमच्या झोपडीपाशी येऊन गिद्धा[1] नाचतात, अचकटविचकट बोलतात. आम्हांला ऐकविण्यासाठी इतके घाणेरडे बोलतात की अंगाचा अगदी तिळपापड होतो. तुमचंसुद्धा नाव घेऊन... '

बचनसिंह आधीच आईच्या बोलण्याने कष्टी झाला होता, त्यावर उपाय शोधीत होता. रोडूची कहाणी ऐकून तो आपले सारे दुःख विसरला. पुष्कळ वेळ विचार करून तो म्हणाला, 'बाबा, हे ऐकून मला अतिशय वाईट वाटत आहे; कळत नाही यावर काय उपाय योजावा ते. अच्छा, तुम्ही काय विचार केलात?'

'आम्ही येथून निघून जातो,' रोडू डोळे पुशीत म्हणाला. 'सरदारजी! काय सांगू, मुंदरीची काळजी नसती तर मरेपर्यंत येथून हललो नसतो. ह्या जागेचा, ह्या झोपडीचा अतिशय मोह जडला आहे. हिला सोडून जाताना माझ्या मनाचे किती हाल होतील देव जाणे! पण काय करू? जवान बेटी घरात असताना ह्या असल्या गोष्टी कशा सहन होतील सांगा. शिवाय मुंदरीची आता काळजी घ्यायला हवी. वळणाचे पाणी वळणावर नेऊन एकदा सोडले की सुटलो. शिवाय सरदारजी, ह्या हिऱ्याला कवडीमोलाच्या कोंदणात बंद करून ठेवणेही कठिण झाले आहे. तुमच्या कृपेने ती एवढी चार बुकें शिकली, आता एखाद्या डोंबाऱ्याच्या गळ्यात तिला कसं बांधू? मलाच ते सहन होणार नाही. मुंदराला साजेसा वर शोधावा असे मला वाटते, पण एवढे कुठले भाग्य?'

बचनसिंह अजून आपल्याच विचारात होता. अखेर कसलासा निश्चय करून तो म्हणाला, 'बाबा, मी तुम्हांला जाऊ देणार नाही.'

रोडू गप्प बसला. बचनसिंहच पुढे म्हणाला, 'निसर्गाने मुंदरीला असे मातीमोल होण्यासाठी नाही जन्माला घातले. मला वाटते तिने अजून पुढे शिकावे.'

जन्मठेपेची शिक्षा अपेक्षित असलेल्या आरोपीला एखाद्या वकिलाने सुटका करण्याची हमी दिल्यावर जसा आनंद होईल तसाच आनंद रोडूला झाला. त्याने बिचकत बिचकत

1. पंजाब लोकनृत्य.

विचारले, 'सरदारजी ! तुम्ही आधीच काय कमी त्रास घेतला आहे ? आमच्यामुळे तुमच्यावर किती संकटे आली पाहा. तुम्ही सुखात राहा. आमच्यासाठी आणखी किती त्रास घ्याल ? माझ्या नशिबात असेल ते होईल. तुम्ही नका चिंता करू. आम्हांला जाऊ द्या.'

बचनसिंह धीर करून म्हणाला, 'पण बाबाजी ! मला लोकांचा जुलूम सहन होत नाही.'

रोडू गहिवरून म्हणाला, 'जशी तुमची मर्जी. पण तुम्हांला परिस्थिती कशी काय आहे ते माहीतच आहे.'

'हे सर्व सुंदरी येथे राहात असल्याने झाले आहे. मी सुंदरीला एखाद्या शाळेत दाखल करून टाकतो.'

सुंदरी आतापर्यंत गप्प बसून राहिली होती. आयुष्याची आशा नसलेल्या निराश रोग्याला प्राणदान मिळावे तसे तिला झाले. तिने गोड हसून बचनसिंहाकडे पाहिले. बचनसिंहानेही हसून प्रत्युत्तर दिले आणि तो निघून गेला.

[22]

रोडूबाबाचे म्हणणे खरे ठरले. सर्व झगड्याचे मूळ सुंदरी होती. ज्या दिवशी सुंदरी दिवाणपुरातून गेली, त्या दिवसापासून जवळजवळ सर्व चर्चा बंद झाल्या. पण पालासिंहाच्या हृदयावर मात्र जबर घाव बसला. तो सुंदरीला पळवून नेण्याचे उपाय योजीत होता, आणि आता तिची सावलीसुद्धा दृष्टीस पडत नव्हती.

पालासिंह पहिल्यापासून बचनसिंहावर जळफळत होता. जेव्हा त्याला कळले की बचनसिंहानेच आपली शिकार पळविली आहे तेव्हा तर त्याच्या आगीत तेलच पडले. सुंदरीला परत कसे आणावे ह्या गोष्टीशिवाय त्याला काहीही सुचेनासे झाले. पुष्कळ वेळ डोके खाजवूनसुद्धा त्याला काही सुचले नाही. सरतेशेवटी तो ह्या निर्णयाप्रत जाऊन पोहोचला की जोपर्यंत रोडूबाबा किंवा बचनसिंह यांच्यावर काही गंभीर परिस्थिती ओढवत नाही तोपर्यंत सुंदरीने अभ्यास सोडून येणे आणि त्याच्या जाळ्यात सापडणे कठिणच आहे. हळूहळू त्याने आपले प्रयत्न चालू ठेवले, त्या प्रयत्नांचे फळ त्याला तीन वर्षांनंतर मिळाले.

सुंदरीला लाहोरच्या एका कन्या आश्रमात दाखल केल्यानंतर बचनसिंहाला वाटले की त्याच्या डोक्यावरील मोठा भार उतरला आहे. एवढेच नाही तर तो कितीतरी

भावी संकटांपासून बचावला आहे. पण विरोधी पक्षात कसले कारस्थान शिजत आहे याचा त्याला पत्ताच नव्हता. वरवर सर्व मामला खतम झाल्यासारखे वाटत होते. सुंदरीच्या वियोगामुळे बचनसिंहास अगदी चुकल्याचुकल्यासारखे वाटत होते. तो दर महिन्याला तिला पैसे पाठवीत असे, त्याचबरोबर रोड्डबाबाचीही चौकशी करीत असे. दिवसातून एकदा त्याच्या झोपडीत जाऊन अर्धा-एक तास बसत असे, निरनिराळ्या गोष्टींनी त्याचे दुःखी मन रिझवत असे. समयचक्र आपल्या गतीने चाललेच होते.

सुंदरी सतत तीन वर्षे अभ्यासात गर्क होती. दहावीची परीक्षा पास झाल्यावरच ती दिवाणपुरात परत आली. ती का आणि कशी आली ? प्रेमिकांची तीन वर्षे कशी गेली ? ह्या सर्व गोष्टींचा उलगडा त्या प्रेमीजनांच्या आपापसातील पत्रव्यवहारावरून होईल. पवित्र आणि आदर्श प्रेमाने रंगलेली ही पत्रे रसपूर्ण होती. म्हणूनच कादंबरीचे कथानक पुढे चालू करण्याच्या आधीच ती पत्रे पाठकांच्या समोर ठेवणे मी आपले कर्तव्य समजतो. कारण ह्या पत्रात पवित्र प्रेमाचे उच्छ्वासच आहेत असे नसून मानवी मनावर परिणाम करणाऱ्या भावनाही ओतप्रोत भरलेल्या आहेत.

[पत्र पहिले]

कन्या आश्रम
लाहोर

आदरणीय, मम...

सर्व अध्यापिका माझ्यावर प्रेम करतात. माझ्या वर्गातील मुलीही माझ्यावर बहिणीसारखे प्रेम करतात. बोर्डिंगाची सुपरिंटेंडेंट क्षणभर सुद्धा मला दृष्टीआड होऊ देत नाही. कोणत्याही गोष्टीचा त्रास नसला तरी मनाची व्याकुळता वाढत आहे. काही गोड वाटत नाही. आतल्या आत रितेपण जाणवते. सारखे वाटते की काहीतरी हरवले आहे. सारी शक्ती त्याचा शोध करीत आहे. असे का होते हो ? ही स्थिती मी कशी दूर करू सांगा ना ? मन नेहमी कसल्यातरी चिंतेत गुंतलेले असते. पण आता तुम्हांला पत्र लिहिताना मनाला कसाबसा धीर आला आहे. तुम्हांला सारखे लिहीतच राहावे असे वाटते. पण मग काही विचार करून स्वतःला आवरते. तुमच्या पत्राची उत्सुकतेने बेचैन होऊन वाट पाहात राहते. बाबाला माझा 'सत् श्री अकाल' सांगा. वाहे गुरू आणि तुम्ही यांच्याशिवाय त्याला कोणाचाही आधार नाही हे सांगण्याची जरुरी नाही.

सुंदरी

[पत्र दुसरे]

दिवाणपूर

सुंदरीजी,

तुमच्या विचारात गुंतलो असतानाच तुमचे पत्र मिळाले. कसले विचार ते मला सांगता येणार नाही. पत्र वाचून मनाला अत्यानंद झाला की आणखी काही झाले तेही सांगता येणार नाही. मला स्वतःलाच काही समजेनासे झाले आहे. पत्र लिहिताना तुमची जी स्थिती होती ना, तशीच पत्र वाचताना माझी स्थिती होती. तुमच्या उदासीनतेचे वर्णन वाचून मन अतिशय कष्टी झाले. पण हे काही नवीन नाही. नव्या ठिकाणी गेल्यावर आपल्या माणसांची आठवण होऊन मन उदास होते. मग जिने आतापर्यंत घराच्या बाहेर पाऊलही ठेवले नसेल, तिचे मन नव्या जागी जाऊन उदास होणे साहजिकच आहे. लवकरच तुम्ही दिवाणपूरच्या वियोगाचे दुःख विसराल असे वाटते. शिवाय तुमचे आपल्या धर्मपित्यावर अतिशय प्रेम असल्यामुळेही अशी स्थिती होणे स्वाभाविक आहे.

तरीसुद्धा ताकीद देऊन ठेवतो की तुम्ही अगदी मन लावून अभ्यास करा. तुम्ही आता लहान नाही. स्वतःचे नफा-नुकसान चांगले जाणता. तुम्ही लवकरात लवकर आपल्या विद्येत निपुण व्हावे अशी माझी इच्छा आहे. म्हणजे ज्या घरात तुम्ही पडाल तेथील माणसांना तुमच्यापासून खराखुरा आनंद होईल. तुम्ही ज्याच्या गळ्यात माळ घालाल तो हे पाहून आनंदाने वेडा होऊन जाईल, की सुंदरी केवळ सौंदर्याची पुतळीच नसून सरस्वतीही आहे.

तुमचे बाबा खुशाल आहेत. काळजी करू नये.

बचनसिंह

[पत्र तिसरे]

कन्या आश्रम

लाहोर

दीर्घ प्रतीक्षेनंतर तुमचे पत्र मिळाले. तुमचे पत्र पोस्टात टाकताच मी उत्तराची वाट पाहात बसले. तुमचे पत्र वाचून माझी काय मनःस्थिती झाली हे कसे सांगू? पत्र लिहायला बसले तेव्हा मनात हाच विचार होता की आज कितीतरी पांढरे कागद काळे करीन. पण आता लिहावयास सुरवात केली आहे, तर जे लिहावेसे वाटते ते

लिहिता येत नाही. कुणास ठाऊक कोण लेखणी अडवून धरीत आहे. कितीतरी कागद लिहिले आणि फाडले.

तुम्हांला माझी काळजी आहे. कसली चिंता आहे हे तुम्ही सांगू शकत नाही. पण मी काही कुकुलं बाळ नाही. तुम्ही स्वतःच लिहिले आहे ना, तू आता लहान नाहीस म्हणून? तुमची चिंता मी समजू शकते. एका अनाथ मुलीचा जीव वाचविण्यासाठी, एवढेच नव्हे, तर तिला अविद्येच्या कर्दमातून काढून विद्येच्या उच्चासनावर बसविण्यासाठी तुम्ही जो संघर्ष केला आहे, त्याची फेड करणे तर जाऊच द्या, पण त्याचे वर्णन करणेही कठिण आहे, आणि तेसुद्धा तुमच्याचसमोर !

तुम्ही ज्या संकटातून मला वाचविले आहे, त्यापेक्षा दसपट संकटांनी तुम्हांला घेरले आहे. अजून कोणकोणती संकटे तुमच्यावर येणार आहेत देव जाणे! मला हे सर्व समजत नाही का? ह्या स्थितीत तुम्हांला नाही तर इतर कोणाला काळजी वाटणार? ह्या सर्व गोष्टींचा विचार केल्यावर असे वाटते की धरणीमाता मला पोटात घेईल तर बरे. म्हणजे तुमच्या मागची पीडा तरी टळेल. पण काय करू? निर्लज्जपणे जगत आहे.

परक्या ठिकाणामुळे माझे मन उदासीन झाले आहे हे तुमचे म्हणणे चूक आहे. ज्या ठिकाणी तुमची छत्रछाया माझ्या डोक्यावर आहे, मग तो ज्वालामुखी पर्वत असला तरी मला स्वर्गच वाटतो. माझ्या उदासीनतेचे कारण हे नाही ह्याची खात्री बाळगा.

काय म्हणालात? दिवाणपूरचे रस्ते मी विसरून जाईन? माफ करा. मला वाटते तुम्ही मुद्दाम माझ्या मनाचा थांगपत्ता लावण्यासाठी हा खडा टाकून पाहिला आहे. दिवाणपूरचे रस्ते मी ह्या जन्मात विसरू शकणार नाही आणि दिवाणपुराच्या हकिगती तर पुढच्या शेकडो जन्मांतसुद्धा विसरणं अशक्य आहे. धर्मपित्यावरील माया काही साधी गोष्ट नाही हे ठीक आहे, पण...!

तुमच्या पत्रातील शेवटच्या ओळी वाचून अत्यंत खेद वाटला. मी आतापर्यंत लग्नासंबंधी कधी विचारसुद्धा केला नव्हता. माझ्या आशा-आकांक्षांचा खून झालेला पाहणे हेच माझ्या नशिबात आहे काय? अशी वेळ येण्याच्या आधीच मी जगातून निघून जाईन हे पक्के लक्षात ठेवा. ह्या अभागिनीवर कशासाठी इतके दिवस उपकार करीत होता? तिला जिवंतपणी भट्टीत लोटण्यासाठी? हाय! ह्या बाबतीत काही लिहिण्याइतपत मनाची तयारी झाली आहे. पण अजून शुद्धीवर आहे. असा मूर्खपणा करत करणार नाही. पत्र पूर्ण करते.

सुंदरी

[पत्र चौथे]

दिवाणपूर

सुंदरीजी,

तुमचे पत्र मिळाले. माझ्या मूर्खपणामुळे तुमच्या मनास किती दुःख झाले असेल ह्या विचाराने आता ह्या वटकेला मुद्दा मेल्याहून मेल्यासारखे होत आहे. मी किती अनुचित आणि असभ्य काम करीत आहे असेच आतापर्यंत मला वाटत होते. माझे मन किती उलट दिशेला धावत आहे? ज्या फुलाला त्याचे सौंदर्य नष्ट होऊ नये म्हणून मी कोणालाही हात लावू दिला नाही, ज्याच्या रोपट्याची जोपासना आणि संरक्षण करण्यासाठी मी आपली सारी शक्ती पणाला लावली, त्याच फुलाच्या सुगंधाने मला इतके कसे वेड केले की मी त्याच्यावर आपला अधिकार गाजवू लागलो!

सुंदरीजी, माणसाचे मन अतिशय चंचल आहे. कधी ते गगनाला गवसणी घालू इच्छिते तर कधी एखाद्या चरणापाशी आत्मसमर्पण करते. खरे म्हणजे मनाचा हाच कमकुवतपणा मी केवळ तुमच्यापासूनच नव्हे तर खुद्द स्वतःपासूनही लपवू इच्छीत होतो. म्हणूनच तुम्हांला जे काही लिहीत होतो ते मन घट्ट करूनच, नाहीतर तुम्हांला वाटायचे, हा मनुष्य किती असभ्य आहे!

आतापर्यंत मला वाटत होते की मी माझे हृद्गत तुमच्यासमोर कधीही प्रकट होऊ देणार नाही. सर्वस्व पणाला लावावे लागले तरी चालेल, पण तुमच्या मार्गात अडथळा आणणार नाही. पण मी आपल्या तत्त्वापासून च्युत तर होणार नाही ना? मग आतापर्यंतचे सर्व कष्ट वाया जातील. हीच चिंता माझ्या मनाला सतावत आहे. तुम्हांला लिहिलेल्या पत्रात ह्याच चिंतेचा मी उल्लेख केला होता. पण तुम्ही गैरसमज करून घेतलात. मला थोडेफार तुमच्या उपयोगी पडता आले, ते उपकार समजून तुम्ही आपल्या मनावरील भार वाढवीत आहात. तुमच्या ह्या चुकीबद्दल मी तुम्हांला कधीच माफ करणार नाही. मी तुमच्यासाठी जे काही थोडेफार केले, ते माणुसकीच्या कर्तव्यापेक्षा अधिक होते काय?

पण सुंदरीजी, आता मला वाटते, जी गोष्ट प्राप्त करून घेण्यासाठी मी उतावीळ झालो आहे, ती वस्तू स्वतःच माझ्याकडे आकृष्ट झाली आहे. एवढेच नाही, तर खऱ्या किंवा खोट्या विचारांमुळे मी माघार घेतली तर त्या सुख-निधानाचा नाश होण्याची भीती आहे. म्हणूनच विचार केला, आता माझे खरे रूप तुमच्यासमोर का प्रकट करू नये?

सुंदरीजी, तुम्हांला ज्या दिवशी गुरुद्वाऱ्याच्या बाहेर फरशीवर लिहिताना पाहिले

त्याच क्षणी तुमच्या बाह्यगुणांनी माझ्या मनात घर केले. पण सहवासाने आता तुमच्या आत्मिक सौंदर्याने मला गुलाम करून सोडले आहे. आता प्रयत्न करूनमुद्धा मी तुमच्यापासून दूर राहू शकत नाही.

हे सर्व खरे. पण एक अडथळा आपल्या मार्गात सतत राहणार आहे. त्या दृष्टीने विचार केल्यास मला वाटते दैवाला आपले मीलन मंजूर नाही. आपल्याला नेहमीच एकमेकांपासून दूर राहावे लागणार. म्हणूनच ह्या मार्गाने पुढे जाण्यापेक्षा आताच मागे हटण्याचा प्रयत्न करणे चांगले नाही का ?

तुमचा
बचनसिंह

[पत्र पाचवे]

कन्या आश्रम
लाहोर

प्राणधन,

तुमच्या संगतीने माझे जीवन आमूलाग्र बदलून टाकले आहे. ह्या खेपेस तुम्ही जे लिहिले आहे अगदी तसाच मजकूर काल सध्याकाळी मी माझ्या पत्रात तुम्हांला लिहिला होता. मला वाटते ज्या वेळी तुम्ही हे पत्र मला लिहीत होता, त्याच वेळी मी-सुद्धा तुम्हांला हेच लिहीत होते. दोघांच्याही संयमाचा बांध एकाच वेळी कोसळला. साऱ्या शंका, मनाचा चंचलपणा, तर्क-वितर्क त्यात वाहून गेले; उरली फक्त मनातील शुद्ध, प्रामाणिक भावना !

काय लिहीत होते मी ? ऐकायचे आहे? ऐका सांगते. माझ्या पत्राच्या उत्तराची प्रतीक्षा करण्याच्या आधीच मी लिहीत होते. तुमच्या डोळ्यांत धूळ फेकाली हे मी सहन करू शकत नाही. ओठावर एक आणि पोटात दुसरेच हे मला आवडत नाही. आतापर्यंत मी हा अपराध केला; पण आता नाही करणार. ह्या जगात केवळ तुमच्यावरच मी प्रेम केले आहे. ह्याचा प्रारंभ कधी झाला हे मला माहीत नाही. मला एवढेच माहीत आहे की ह्या हृदयात आता दुसऱ्या कोणालाही थारा नाही, भविष्यातसुद्धा होणार नाही. पण ज्या पर्वताच्या उत्तुंग शिखरावर चढण्याची माझ्या वेड्या मनाची इच्छा आहे, तेथपर्यंत मी पोहोचू शकेन काय ? पोहोचणे तर दूरच पण त्याचा नुसता विचारही अशक्यप्राय आहे हे मला चांगले कळते. तरीमुद्धा मी

निराश झाले नाही. मला खात्री आहे की जेथे माझे मन जडले आहे, जेथे माझे प्रत्येक स्फुरण, भावना आणि श्वास केंद्रित झाला आहे, तेथे माझा देह पोहोचला नाही तरी चालेल. शरीराने दूर राहूनही त्या चंदनवाडीच्या सुगंधाने मी स्वतःचे चंदन करीन. माझ्या पत्राचे हेच सार आहे.

आपल्या मार्गात अडथळे आहेत असे म्हणालात? नाही प्रियतम, मला हे पटत नाही. अडथळा हाच ना की आपला विवाह...किती भोळे आहात तुम्ही! ही गोष्टच डोक्यातून काढून टाका. ह्याचे उत्तर मी वर दिलेच आहे. इतकेच नाही तर मीच तुम्हांला सांगते, तुम्ही खुशाल लग्न करा. लवकरात लवकर घराचा दरवाजा वधूसाठी उघडा आणि आपल्या आईची इच्छा पूर्ण करा. तुमच्या विवाहाची बातमी ऐकून मला केवढा आनंद होईल ह्याचे उत्तर काळच देईल.

तुमची
सुंदरी

[पत्र सहावे]

दिवाणपूर

सुंदरी,

खरोखर मी किती भाग्यवान आहे! तुझ्यासारख्या अलौकिक देवीचे प्रेम मला लाभले. सुंदरी, पवित्र भावना, उदात्त विचार आणि अलौकिक प्रेम यांनी मला सुंदर प्रकाश दिला. माझ्या अंतःकरणात माधुर्य भरून राहिले. एक मधुर राग माझ्या हृदयात तू छेडलास, त्याने माझे हृदय झंकृत होऊन गेले. तुझ्या पत्राचा प्रत्येक शब्द मला इंद्राच्या बागेतील फुलासारखा आहे. सुवासाने माझे हृदय इतके सुगंधित झाले आहे की त्याच्यापुढे जगातील सर्व सुखे व ऐश्वर्य मला तुच्छ वाटत आहे.

सुंदरी, किती उच्च विचार तुझे! मला माहीत नव्हते एवढ्या छोट्याशा हृदयात प्रेमाचा एवढा मोठा खजिना सामावलेला आहे ते.

आपल्या मार्गात खूप अडथळे आहेत असे मी तुला लिहिले होते. पण समाजाला घाबरून मी तुझ्याशी लग्न करू शकत नाही हा तुझा समज चुकीचा आहे. ही भीती तर मी पार सोडली आहे. ज्ञानीजींचा उपदेश आणि आपले कर्तव्य डोळ्यांसमोर ठेवून आपले सारे जीवन समाजसेवेस वाहून घेण्याची मी प्रतिज्ञा केली आहे. आई जिवंत असेपर्यंत मी घरी राहणार आणि त्यानंतर घरादाराचा मोह सोडून ह्या कामास वाहून घेणार.

सुंदरी, मी ह्या मूर्ख आणि जुलमी समाजाची स्थिती पाहात आहे. दिवसेदिवस ह्या समाजाच्या अग्निकुंडात लाखो सुकुमार जीवनांच्या आहुत्या पडत आहेत. मी विवाह-बंधनात अडकलो तर माझ्या ध्येयापासून दूर जाण्याची भीती आहे. जर मी आपले मन मारून ह्या कामापासून दूर झालो नाही तर परिणामतः तुझे जीवन दुःखी होईल. तुला नेहमीच माझ्यापासून दूर राहावे लागेल किंवा माझ्याबरोबरच तहानभूक विसरून गावोगाव भटकण्याचे कष्टमय जीवन जवळ करावे लागेल.

पण तुझे पत्र वाचून सर्व शंकांचे निरसन झाले. मी क ख ग शिकणारा सामान्य विद्यार्थी असूनही आपल्याच वर्गातील एका योग्य आणि हुशार विद्यार्थ्याला सांगत आहे की, बाबा रे, तुझी माझी मैत्री होणे शक्य नाही. कारण मी फक्त एका वर्षात सर्व कायदेशास्त्र शिकण्याचा निश्चय केला आहे. या वेडेपणाची माझी मलाच लाज वाटते.

सुंदरी, मला साऱ्या प्रश्नांची व शंकांची उत्तरे मिळाली आहेत. ज्या दिवशी सामाजिक दृष्ट्याही माझा पूर्ण अधिकार राहील, त्या दिवशी मी स्वतःला अगदी भाग्यवान समजेन. सारी दुनिया ह्या कामाच्या आड आली तरी मी थांबणार नाही. मग मला कितीही कष्ट आणि दुःख सहन करावे लागले तरी हरकत नाही. मी यातच स्वतःचा गौरव समजेन.

तुझा,
वचन

[पत्र सातवे]

कन्या आश्रम
लाहोर

जीवनाधार!

माझी जीवनधारा जसजशी तुमच्याकडे वाहात आहे, तसतसे मला वाटत आहे की मी एका अलौकिक राज्याजवळ जात आहे. हृदयातून प्रेमाचे नवनवीन झरे पाझरत आहेत.

आपण ह्या गोष्टीकडे शंकाकुल नजरेने पाहात आहोत, एकमेकांना याचा जाब विचारत आहोत, पण सरतेशेवटी आपण ह्याच निर्णयाप्रत [illegible] पोहोचतो की ज्याला आपण संशय समजत होतो तो खरे पाहता दोन्ही हृदयातील एक उत्कट इच्छा, आशा-आकांक्षा असून साऱ्या दुनियेत त्याला तोड नाही.

मम जीवनसर्वस्व ! तुमच्या उदारपणामुळे माझ्या अपेक्षेपेक्षा हजारोपट अधिक मी सुखी आणि सौभाग्यशाली झाले आहे. माझ्या आनंदाला पारावारच राहिला नाही. तुमच्यासमोर कसे वर्णन करू त्याचे !

एका विशिष्ट मर्यादेनंतर प्रत्येक गोष्ट आपल्या उंचीपासून मागे सरू लागते, असे म्हणतात. मनुष्य अतिशय हसत असला तर शेवटी त्या हसण्याचे रडण्यात रूपांतर होते. ह्यात काही तथ्य असेल तर त्याच्या नुसत्या कल्पनेनेच माझ्या हृदयाचा थरकाप उडतो. मला वाटते माझ्या आकांक्षांनी आणि सुखाने आता मर्यादा ओलांडली. मला एवढे सुख पेलवत नाही. भरलेल्या घागरीत आणखी पाणी घातल्यास ते जसे वरच्यावर बाहेर वाहू लागेल तसे माझे हे सुख ओसंडून वाहात आहे. प्रियतम, त्याच वेळी कुठून तरी एक सूक्ष्मशी चिंतारेखा येऊन माझ्याभोवती फेर धरून राहते आणि मी अगदी बेचैन होऊन जाते. ही चिंता कधी कधी इतके रौद्र रूप धारण करते की, तिच्या भयानक चेहऱ्याखाली माझ्या हृदयातील सुखाचा आणि आनंदाचा खजिना पार दबून जातो. माझे चंचल मन तऱ्हेतऱ्हेचे तर्कवितर्क लढवत बसते. मनात विचार येतो : प्रभातकाळच्या शीतल हवेच्या झुळकीस जेव्हा असे दिसून येते की बागेतील कळ्या तिरप्या दृष्टीने तिच्याकडे पाहात हळूच हसत आहेत, सुगंधित लहरी सोडत आहेत, तशी प्रेमाच्या मस्तीमध्ये ती हवा शुद्धबुद्ध विसरून जाते आणि कळ्यांबरोबर प्रेमक्रीडेत मग्न होते. ह्या प्रेमसागरास कलिकेचे नाजूक हृदय सहन करू शकत नाही आणि आनंदोन्मादात ती उमलू लागते, ती उमलताच मदमस्त हवेचे प्रेम तिच्या कोमल पाकळ्या कुस्करून टाकते आणि तेव्हाच कलिकेचा जीवनान्त होतो.

प्राणाधार ! ह्या काल्पनिक चिंतेच्या जंजाळातून मला वाचवा. मला तुमच्या हृदयात लपवा. अशा जागी लपवा की जेथे असले दुष्ट विचार माझ्या जवळसुद्धा फिरकणार नाहीत. ह्या पत्रात मी काय लिहिणार होते आणि काय लिहीत आहे देव जाणे ! असे वाटते आता लिहिण्यासारखे काय उरले आहे ? किंवा इतके उरले आहे की आयुष्यभर लिहीत बसले तरी ते संपणार नाही. जे काही लिहिण्यास प्रारंभ करते ते लिहिण्याआधीच त्याचे प्रतिबिंब मला तुमच्या हृदयात दिसते. एकदा सांगितलेली गोष्ट परत कशाला सांगू ? प्रियतम ! विवाहाचा उल्लेख वारंवार कशाला करता ? विवाह एक अशी बाब आहे ज्यामुळे मनुष्याचे जीवन सुखी आणि अलौकिक होते असे मी ऐकले आहे. हे खरे असेल तर मी ह्यापासून दूरच राहाते. कारण जे सुख व जो आनंद मला तुमच्या प्रेम व औदार्यामुळे लाभला आहे, तो असताना दुसऱ्या सुखाची इच्छाच काय पण कल्पनाही मी करू शकत नाही. माझे हृदय तृप्त आहे. प्रियतम, तुम्ही आपले जीवन ज्या मार्गात घालणार आहात, त्या रस्त्याने तुम्ही एकटे [illegible] शकत नाही.

एक पाऊलसुद्धा उचलू शकत नाही. किती दृढ आणि उदार आहे तुमचे मन! ज्या समाजाने तुमची अशी दशा केली त्याच्याबद्दल तुमच्या मनात अजूनही किती दयाभाव आहे! मागच्या जन्मी तुम्ही एक महान तपस्वी असावेत असे मला वाटते. दोन ओळींनीच तुम्ही माझे हृदयपरिवर्तन केलेत. ह्याआधी माझे काय विचार होते माहीत आहे? माझे मन विषाक्त झाले होते ह्या समाजाबद्दल. ज्या समाजाने माझ्या निर्दोष परमेश्वरावर इतके अत्याचार केले—त्या नीच समाजाचा मी असा बदला घेईन, ह्या समाजाच्या दुतोंडी आणि ढोंगी पुढाऱ्यांची नाके अशी ठेचीन, की साऱ्या दुनियेला आठवण राहील. तुम्हांला सुद्धा असेच करण्यास भाग पाडता येईल असे मला वाटत होते.

पण प्रियतम! आता माझे आणि तुमचे जीवन एक झाले आहे. माझ्या जीवन-प्रवाहाला जी दिशा दाखवाल, त्या दिशेने तो जाईल. हो, परत एकदा बजावते, ज्या कठिण मार्गाने तुम्ही जाणार आहात, त्या मार्गाने एकटे जाऊ नका. मलाही येऊ द्या. पाहा तर खरे, मी तुमच्या रस्त्यात बाधा बनून राहणार नाही, ह्याविषयी मुळीच शंका बाळगू नका.

हं, विवाहाचा विचार मनातून काढून टाका, हे परत सांगावयास हवे का? विवाहाची किंमत आपल्याला चुकती करावयाची आहे. काही काळ तपश्चर्या करावयाची आहे. त्यानंतर आपण नेहमीसाठी एक होऊ, प्रलयकाळापर्यंत. त्यानंतरही एकच राहू. माझी वरील शंकासुद्धा निराधार समजू नका, हेही सांगून ठेवते. एकाच वेळी इतके सुख आपणच काय दुसरे कोणीही पचवू शकणार नाही.

तुमची
सुंदरी

[पत्र आठवे]

दिवाणपूर

सुंदरी,

आज मी तुला ज्या दुःखद घटनेची हकीकत लिहिणार आहे, ती वाचून तुझे हृदय घायाळ होईल. मला कळत नाही सारे तू कसे सहन करू शकशील ते. तुझ्या विचारानेच मी सुन्न झालो आहे. लिहिताना माझा हात कापत आहे. ही दुष्ट वार्ता दुसरे कोणी सांगेल, तर किती बरे होईल. पण दुर्दैवाने हे काम मलाच करावयाचे आहे. काय लिहू?

सुंदरी, तुझा बाबा! प्रत्येक क्षणाला तुझ्या नावाची माला जपणारा तुझा धर्म-पिता, तुला अखेरचा आशीर्वाद देऊन—तुला बघण्याची आस मनातच ठेवून—ह्या नश्वर जगातून निघून गेला. बिचाऱ्याचे मरण किती भयानक स्थितीत झाले, ही तर त्यापेक्षाही हृदयविदारक हकीकत आहे. काय सांगू? कित्येक दिवसांपासून त्याचे शरीर इतके कमजोर झाले होते की तो क्वचितच झोपडीबाहेर पडत असे. नेहमीप्रमाणे मी संध्याकाळी जेवण पोहोचविण्यास गेलो तेव्हा तो रडत होता. मी कारण विचारल्यावर तो म्हणाला, 'सुंदरीला भेटण्यासाठी जीव अडकून राहिला आहे. कोण जाणे मी किती दिवसांचा सोबती आहे ते. पोरीला एक वेळ डोळे भरून पाहता आले तर बरे होईल.'

मी म्हटले, 'बाबा, यात कठिण काय आहे? सकाळीच जाऊन तिला घेऊन येतो.'

पण त्याने मला असे करण्यापासून परावृत्त केले. 'तिच्या अभ्यासात अडथळा येईल, शिवाय तिला येथे आणण्यात धोका आहे. सुंदरीचे आपल्याशी लग्न लावून द्यावे म्हणून तो बदमाश गुंड पालासिंह हात धुवून माझ्यामागे लागला आहे. पहिल्यापहिल्यांदा त्याने मला खूप लालूच दाखविली, मी त्याला बधत नाही असे पाहिल्यावर त्याने मला नाना प्रकारच्या धमक्या देण्यास सुरुवात केली. शेवटी त्याने असेही सांगितले की 'जर तू बऱ्या बोलाने ऐकले नाहीस तर माझ्या माणसांकडून तुझा खून करवीन—सुंदरी तुझ्या मरणाची वार्ता ऐकल्यावर येथे आली की तिला जबरदस्तीने पळवून नेईन.''

सुंदरी, ज्या वेळी बाबा ही हकीगत सांगत होता त्यावेळी त्याची दशा बघवत नव्हती. मी रागाने थरथर कापत होतो. त्याला धीर देत मी म्हटले, 'बाबाजी, मी जिवंत असताना सुंदरीकडे वाकडा डोळा करून पाहायची कोणाची छाती आहे?'

त्यानंतर मी त्याला आपल्याबरोबर घेऊन जाण्याचा खूप प्रयत्न केला. पण त्याने ऐकले नाही. तो म्हणाला, 'सरदारजी, माझे काय, मी तर आधीच काठावरचे झाड आहे. आज नाही तर उद्या कोसळणारच. माझे हातपाय चालताहेत, तोवरच मला घेऊन जा अशी मी ईश्वराजवळ हात जोडून प्रार्थना करीत आहे. हा देह तर अगदीच जर्जर झाला आहे. सुंदरीचीच काळजी होती, ती आता तुमच्या कृपेने मिटली आहे.'

मग मी त्याला सांगितले, 'बाबाजी, माझ्याबरोबर लाहोरला चला आणि सुंदरीला भेटून या.' तो तयार झाला आणि दुसऱ्या दिवशी निघण्याचे ठरले. त्याच दिवशी मध्यरात्री कसल्यातरी गोंगाटाने मी जागा झालो. लोक 'आग आग' करीत पळत असलेले पाहून मी गडबडीने बाहेर आलो. गल्लीजवळ आल्यावर कळले की रोडूबाबाच्या झोपडीला आग लागली आहे. मी जीव घेऊन धावत धावत तेथे पोहोचलो. तेथे जाऊन पाहतो तो पुष्कळ गर्दी झाली होती. लोकांनी बाबाचे दग्ध शरीर बाहेर काढून एका बाजूला ठेवले होते. झोपडी पूर्ण जळून खाक झाली होती. वर पाणी घातल्यामुळे

झोपडीची अर्धवट जळलेली लाकडे धुमसत होती. मी गर्दीतून वाट काढीत बाबाच्या जवळ जाऊन पोहोचलो.

अरेरे ! सुंदरी, त्यावेळी बाबाची स्थिती काय होती त्याचे वर्णन करून मी तुझ्या दुःखाग्नीत तेल टाकू इच्छीत नाही. माझ्यात ते दृश्य वर्णण्याची शक्ती नव्हती. मन घट्ट करून त्याचे शरीर मी चाचपले. ठाणेदार आणि तीन शिपाई तेथे उपस्थित होते. प्रथम तर लोकांचा समज झाला की बाबाचे प्राण केव्हाच उडून गेले आहेत. पण थोड्या वेळानंतर त्याच्या शरीराने हालचाल केली. मी त्याला पुष्कळ हाका मारल्या. त्याने डोळे भरून माझ्याकडे पाहिले आणि म्हटले, 'सरदारजी !' मी 'हां जी' असे म्हणून त्याला काही विचारणार इतक्यात ठाणेदार याच संधीचा फायदा घेऊन त्याची जबानी घेण्यासाठी त्याला प्रश्न विचारू लागला. बाबाला थोडी थोडी शुद्ध येत होती असे वाटले. ठाणेदाराने हाक मारली, 'बाबा !' बाबाने मान हलविली. ठाणेदाराने पुन्हा विचारले, 'बाबा ! कोणी लावली आग ?' बाबाने उत्तरादाखल एक वार फक्त आकाशाकडे पाहिले. पवित्रात्मा बाबा आपल्या खुन्याला बदनाम करू इच्छीत नव्हता आणि ह्या घटनेला ईश्वरेच्छा समजून संतोष प्रकट करीत होता.

त्यानंतर त्याने ठाणेदाराला काहीच उत्तर दिले नाही. इशारा करण्याचीही त्याच्यात शक्ती राहिली नव्हती. त्याने आपल्या आजूबाजूला जमलेल्या गर्दीकडे एकवार नजर टाकली. परत त्याची नजर माझ्यावर स्थिरावली. मी पुढे होऊन तोंड खाली करून विचारले, 'बाबाजी ! काही सांगावयाचे आहे काय ?' तो काही बोलू शकला नाही. त्याचे डोळे भरून आले. मग वाटले की, त्याला काही बोलायचे आहे, पण बोलता येत नाही. मला काही समजेना. बाबाने मला जवळ येण्यास खुणावले. मी जेव्हा कान अगदी त्याच्या ओठाला लावले तेव्हा मोठ्या मुश्किलीने मला एकच शब्द समजला : 'स...स...सुं...द...री !' मी विचारले, 'बाबाजी, सुंदरीला भेटावयाचे आहे का ?'

डमरूवाला जसा हात हळूहळू हलवितो तसा त्याने आपला हात हलविला. मला त्याचा अर्थ समजला. त्याला म्हणावयाचे होते, 'आता खेळ संपला. मी सुंदरीला भेटू शकत नाही.' मी परत विचारले, 'बाबाजी, सुंदरीला काही सांगावयाचे आहे का ?'

त्याने काहीच उत्तर दिले नाही. पण त्याचे डबडबलेले डोळे एकटक माझ्याकडे पाहात होते. जणू त्याला माझ्याकडून कसले तरी उत्तर हवे होते. त्याच्या मनातील भावना समजून मी म्हटले, 'बाबाजी, सुंदरीची चिंता करू नका, मी तिच्याशी लग्न करीन.'

मी हे सांगण्याचा अवकाश की त्याच्या डोळ्यात एक चमक आली, चेहऱ्यावर समाधानाचे हास्य दिसू लागले. मग त्याने हाताची अशी हालचाल केली की जणू

त्याला हात जोडावयाचे आहेत. हळूहळू तो आपले हात एकमेकांजवळ आणण्याचा प्रयत्न करू लागला. पण एका वितीच्या अंतरावर येऊन त्याचे दोन्ही हात शिथिल होऊन त्याच्या छातीवर पडले. त्याने मान टाकली. जणू माझ्या तोंडून ते आश्वासन ऐकण्या-साठीच त्याचे प्राण घुटमळत होते. सुंदरी, तो चिरनिद्रेत मग्न झाला.

पोलिसांनी पालासिंह आणि त्याचे चार साथीदार सवायासिंह आणि वीरसिंह वगैरे मंडळींना संशयावरून अटक केली.

उफ! किती भयानक घटना होती ती! अजून त्याचा चेहरा माझ्या डोळ्यांसमोर दिसत आहे. माझी आई हे ऐकल्यापासून सारखी रडत आहे. तिचे हृदयपरिवर्तन झाल्यासारखे वाटते.

सुंदरी! ईश्वरेच्छा कोण बदलू शकणार? सूड घेण्याचा विचारसुद्धा आपल्या मनात येता कामा नये. सूड घेणे ईश्वराच्या हातात आहे. जगातील कोणतीही शक्ती आपणांस पथभ्रष्ट करू शकणार नाही. यातच आपली बहादुरी आहे.

हे पत्र वाचून तुझ्या मनाची काय स्थिती होईल याची मला कल्पना आहे. म्हणूनच आता जास्त काही लिहीत नाही. मन जास्त कष्टी करू नकोस. धैर्याने हे दुःख सहन कर. पत्र लिहिता लिहिता नुकतीच बातमी मिळाली आहे की पालासिंह आणि त्याचे साथीदार यांना पोलिसांनी थोड्याशा जामिनावर सोडून दिले आहे. याचे कारण पैशाचा चमत्कार की गाववाल्यांची उदारता देव जाणे. कारण गावातील लोक त्यांना वाचविण्याची मोठी जोरदार खटपट करीत आहेत. मला वाटलेच होते की हे असे घडणार आहे.

तुझा
बचनसिंह

[पत्र नववे]

कन्या आश्रम
लाहोर

प्राणनाथ!

पत्र मिळाले. आई ग, बाबांच्या मृत्यूमुळे माझ्या हृदयात जी भयंकर खळबळ माजली आहे, तिचे कसे वर्णन करू मी! बाबांची शेवटची भेटसुद्धा झाली नाही, माझी मोठी इच्छा राहून गेली. किती प्रेमाने त्यांनी माझ्या पाठीवरून हात फिरविला असता आणि

पितृस्नेहाच्या पाळण्यात मी अखेरचा झोका घेतला असता! पण माझ्या नशिबात हे सुख लिहिले नव्हते. हृदय धाय मोकलून रडत आहे, लाख प्रयत्न करूनसुद्धा मनाचे समाधान होत नाही. प्रत्येक क्षणी मनात एक कळ उठतो व हृदय छेदून आतल्या आत नाहीसा होतो. पण तुमचा विचार मनात येताच मला एक प्रकारचा दिलासा मिळतो.

अरेरे, जो कोणाच्या अध्यात ना मध्यात, वाटेवरील काटकोळ तुडावण्यासदुद्धा जो कचरत असे, त्या दुर्दैवी प्राण्याला चांडाळांनी जगू दिले नाही. त्या मारेकऱ्यांना कडक शिक्षा देण्याऐवजी लोक त्यांना वाचविण्यासाठी जिवाचा आटापिटा करीत आहेत! हं, नाहीतर समाजातील दुष्ट अपराधी कमी होतील ना!

स्वामी, तुम्ही ह्याच समाजास सुधारण्यासाठी तळमळत आहात, आणि अजून आशा बाळगून आहात की समाज सुधारेल म्हणून? एवढे सर्व रामायण झाल्यावरसुद्धा तुम्हाला असे वाटत नाही का की ज्यांची मने गुन्हेगारीत जळून गेली आहेत, त्यांच्यावर काही इलाज नाही? ज्यांच्या मनांत द्वेषाग्नी धगधगलेला आहे, ज्यांची बुद्धी अहंकारदग्ध झाली आहे, ज्यांचे बाहू श्वेत रक्ताने निर्जीव झाले आहेत, त्या लोकांना सुधारण्याची स्वप्ने तुम्ही पाहात आहात! ह्या प्रस्तरमय, खडकाळ जमिनीत सुधारणेचे बी लावून ते उगवण्याची आशा तुम्ही करता!

नाही, नाही प्राणनाथ, हा विचार मनातून समूळ उपटून टाका. ज्या पर्वताला तुम्ही टक्कर देत आहात तो असा कधीच तुटणार नाही. उलट तुम्हीच जमीनदोस्त व्हाल. ह्या पहाडाला फोडण्याचा उपाय एकच आहे—त्याचा बुंधा पोकळ केला पाहिजे किंवा त्या लोकांच्या शरीरातील अपवित्र श्वेत रक्त काढून टाकले पाहिजे. जोपर्यंत ह्या श्वेत रक्ताचा एक थेंबसुद्धा शिल्लक राहील तोपर्यंत भावी पिढ्यांवर होणारा याचा परिणाम थांबविता येणार नाही.

अरे, मी रागाच्या भरात काय वाटेल ते लिहीत आहे! प्रियतम! मला माफ करा. ह्या वेळी माझे डोके ताळ्यावर नाही. ह्यामध्ये माझ्या मनोभावनाचा रंग जरूर दिसून येईल, पण हे माझ्या अल्पबुद्धीचे लक्षण आहे. म्हणूनच मी आपल्या अनर्गल विचारांना नेहमी मनातून काढून टाकण्याचा प्रयत्न करीत असते. कदाचित हे विचार काढून टाकलेही नसते, त्यांना मूर्त स्वरूप देण्याचा प्रयत्न केला असता. पण तुमच्यासमोर या सूड-भावनेला मनातून काढून टाकणे भाग पडते. वाहे गुरु तुमचे आदर्श सफल करो आणि माझ्या मनात जे थोडफार हिंसक विचार आहेत त्यांना सापाप्रमाणे ठेचून त्यांच्यापासून आपली सुटका करून घेण्याची आणि तुमच्या सिद्धान्ताप्रमाणे चालण्याची शक्ती मला देवो हीच माझी मनोकामना आहे. प्राणनाथ! माझ्या चंचल मनाचा मला भरवसा वाटत नाही. ते मला वाकड्या मार्गाला नेण्याचा प्रयत्न करीत आहे. कधी कधी माझ्या

मनातील सूडाची भावना इतकी भडकते की माझा स्वतःवर ताबा राहात नाही. म्हणून कृपा करून मला आपल्या आज्ञेत ठेवा आणि माझ्यावर तुमची छत्रछाया राहू द्या.

आज मन अतिशय उदास असल्यामुळे अधिक काही लिहीत नाहीं. जे काही लिहिले आहे ते पाठवावे असे वाटत नव्हते. तरी सुद्धा पाठवीत आहे. मला माहीत आहे की आपले हृदय किती विशाल आहे, आणि आपण किती धीरगंभीर आहात. आपण माझ्या सर्व चुका पदरात घ्याल याची मला पूर्ण खात्री आहे, मला येऊन घेऊन जा. आपल्या धर्मपित्याची दग्ध झोपडी पाहण्यासाठी मी बैचैन झाले आहे. शिवाय माझे शिक्षणही जवळजवळ संपत आले आहे.

तुमची
सुंदरी

[पत्र दहावं]

सुंदरी,

इतकी व्याकुळता? इतका राग? पण तुझे लेखन इतके तर्कपूर्ण आहे की त्यापुढे मी सर्व काही विसरून जातो. वेडे, तू दिलेला पर्वतांचा दृष्टांत वाचून मला हसू आले. त्यात तू स्वतःच अडकली आहेस. तूच लिहिले आहेस ना की हा पर्वत टकरा देऊन नव्हे तर मुळापासून उखडण्यानेच कोसळेल—या बाबतीत तुझा वेत टक्कर देण्याचाच आहे. अर्थात एखाद्या खुनाचा बदला खुनाने घेऊन समाज-सुधार करण्याचा विचार पर्वताशी टक्कर खेळण्यासारखाच आहे. याच्या उलट सत्याचा प्रचार आणि उच्च विचारांनी समाजाचा कायापालट करणे पर्वतास मुळापासून उखडण्यासारखेच आहे.

पण त्याबरोबरच तुझ्या उदार विचारांचा मी ऋणी आहे. तू आपल्या विचारांची पुष्टी करीत असतानाही माझे अनुकरण करण्याचा विचार करीत आहेस. मला पूर्ण आशा आहे, तू जेव्हा माझ्या मार्गाने येशील तेव्हा तुला कळून येईल की तुझे सध्याचे विचार किती चुकीचे आहेत.

आपल्या समाजाचे रक्त दिवसेंदिवस जास्तच पांढरे होत चालले आहे, हे मीसुद्धा पाहात आहे. पण त्याला सुधारण्याचा जो उपाय तू सुचवलास ना तो अतिशय भयानक. पिसाळलेला कुत्रा चावलेल्या माणसास आंघोळपांघोळ घालून ठीक करण्यासारखेच झाले हे.

सुंदरी, प्रचाराची लस टोचून ह्या अपवित्र पांढरे रक्त असलेल्या रोग्यावर उपचार करायलाच हवा, त्यामुळेच त्या लोकांच्या रक्तातील शुभ्र (निर्जीव) पेशी मरतील आणि त्या जागी लाल (सजीव) पेशी उत्पन्न होतील.

कार्यासाठी मी बद्धपरिकर झालोच आहे. आपण एक आणि एक मिळून अकरा होऊ. मी चार-पाच दिवसांत तुला घेऊन जाईन. आईला मी तयार केले आहे. ती माझ्या कार्यात काही अडथळा आणणार नाही. तुझ्याबरोबर काम करण्यास तिचा विरोध नाही. पण त्याबद्दल तिची एक अट मला मान्य करावी लागली आहे. त्यानुसार ती जिवंत असेपर्यंत तिला मी सोडून जाऊ शकत नाही. आशा आहे तू मुला स्वतःच्या मनाची आतापासूनच तयारी करशील.

ह्या बाबतीत आपले लक्ष्य काय असेल ह्याबद्दल विचारविनिमय भेटल्यावर करू. सध्या आपल्याला एक छोटेसे काम मिळाले आहे—त्या कामानेच आपण आपल्या नवजीवनाचा श्रीगणेशा करू या. थोड्याच दिवसांनी आपल्या गावातील लाला रलाराम सावकाराच्या मुलीचे लग्न आहे. मी ऐकले आहे की या विवाहात वेश्यांचे नाच-मुजरे, सोंगाड्यांचे खेळ, दारू आणि दुसऱ्या अनेक वायफळ खर्चानिमित्त हजारो रुपये पाण्यासारखे खर्च केले जाणार आहेत.

सुंदरी, आपली वडील माणसे मिशयांवर ताव मारीत वेश्यांचा मुजरा ऐकत असणार आणि पोरीबाळी खिडक्यांमध्ये बसून हे दृश्य बघत असणार! किती लाजिरवाणी गोष्ट आहे! मला वाटते त्यांना समजावून ह्या घृणित कामापासून परावृत्त करावे. बस, आणखी काय लिहू? आजपासून पाचव्या दिवशी मी तुझ्याजवळ असेन.

तुझा
बचनसिंह

ता. क.—पत्र संपविले होते. पण एकदम आठवण झाली. तुझे अभिनंदन केले पाहिजे. आजकाल पंजाबी मासिकातून तुझ्या नावावर सारख्या लघुकथा येत असतात. त्या दिवशी शहरात गेलो होतो तेव्हा हे पाहून चकितच झालो. खरोखर कमाल केलीस हं! समाजाच्या निष्ठुरपणाचं वर्णन करण्यात तू अगदी पराकाष्ठाच केली आहेस. माझे मन ग्वाही देत आहे की एक दिवस माझी सुंदरी प्रथितयश लेखिका म्हणून चमकणार.

सुंदरी, मी तुझ्या साहित्यिक यशाबद्दल अभिनंदन करताना एक सूचना देण्याची परवानगी मागतो. तुझ्या लेखनात ऋजुता आणि सहनशीलता यांची अत्यावश्यकता आहे. समाजाने पीडिलेल्या एका दुःखी आत्म्याच्या लेखणीतून असेच साहित्य उतरगार हे कबूल, पण हिंसाविरहित आणि कटुताविरहित अशा साहित्याची तुझ्याकडून अपेक्षा. रक्ताने रक्त साफ होऊ शकत नाही. तुझ्या आगामी रचनांमध्ये हे परिवर्तन करण्याचा प्रयत्न करशील का?

सुंदरीने दिवाणपुरात आल्यावर पहिल्याप्रथम आपल्या पूज्य पित्याच्या दग्ध स्मृतीस वंदन केले. त्या स्थानाची धूळ मस्तकी लावली. विझलेल्या लाकडांची थोडी राख अजून शिल्लक होती. सुंदरीच्या दृष्टीने ती साधारण राख नव्हती, तर तिच्या गतायुष्याची प्रतिमाच होती. कळू लागल्यापासून ते लाहोरला जाण्याच्या दिवसापर्यंतचा सारा चित्रपट तिच्या डोळ्यासमोरून तरळून गेला. रोहूच्या पितृस्नेहाच्या एकेका घटनेची आठवण येऊन तिच्या हृदयाचे शतशः तुकडे होत होते. किती वेळ तरी स्तब्ध बसून ती अश्रू टाकीत राहिली. बचनसिंहाच्या आग्रहावरून ती तेथून उठली. सुंदरीच्या राहण्याची व्यवस्था बचनसिंहाने आधीच करून ठेवली होती. तिला आपल्या घरी नेऊन तो आईला दुखवू इच्छीत नव्हता.

काही दिवसांपासून खाणी गावाच्या काही लोकांनी गावात एक मुलींची शाळा उघडली होती. येथील काही लोकांच्या मनात बचनसिंहाबद्दल आदरभाव होता. चार-पाच लोकांच्या हिमतीमुळे येथे चांगलीच जागृती झाली होती. म्हणूनच बचनसिंहाबद्दल सर्वांचे चांगले मत होते. आपले प्रचारकेंद्र म्हणून बचनसिंहाने हेच गाव निवडले होते. सुंदरीला ह्या शाळेत अध्यापिकेची जागा मिळाली. मनासारख्या ठिकाणी तिला पोहोचविल्यावर बचनसिंहाची पुष्कळशी काळजी मिटली. शिवाय दिवाणपुराहून खाणी गाव अधिक दूर नव्हते, फक्त पाऊण मैलाचेच अंतर होते.

लाला रलारामाच्या घरी लग्नाचे वऱ्हाड येणार होते. या निमित्ताने होणारा गोंधळ थांबविण्यासाठी बचनसिंह कित्येक दिवसांपासून धावपळ करीत होता. पण अद्यापपर्यंत त्याला यश मिळाले नव्हते. एक तर सारा गाव त्याच्या विरुद्ध होता. आणि अशा तऱ्हेची मौज कधी करावयास मिळते याची तर ते सर्वजण वाटच पाहात होते. शिवाय लाला रलारामने साऱ्या गावाला मेजवानीचे आमंत्रण दिले होते. गाववाल्यांच्या कानावर जेव्हा दिल्लीहून कोणीतरी प्रसिद्ध नर्तकी आल्याची कुणकुण लागली तेव्हा तर त्यांचे चेहरे प्रसन्नतेने चमकू लागले. ते मोठ्या कष्टाने धीर धरत होते.

इकडे खाणीला पोहोचल्यावर सुंदरी आपली खोली लावीत होती. तेवढ्यात दिवसभर धावपळ करून बचनसिंह तेथे आला. त्याने बाहेरून हाक मारली. सुंदरी हातातील काम टाकून त्याच्याजवळ येऊन म्हणाली, 'सकाळपासून गेलात ते आता उगवलात होय ?'

प्रेमाने हसून बचनसिंह म्हणाला, 'काय सांगू सुंदरी! मी तर भटकून अगदी टेकीस आलो आहे!' असे म्हणत तो आत येऊन खाटेवर बसला.

सुंदरीने घाबरून विचारले, 'का?'

बचनसिंहाने शर्टाचे बटन सोडीत, रुमालाने घाम पुशीत म्हटले, 'शुक्रवारी रला-रामाच्या घरी वऱ्हाड येणार असल्याचं तुला सांगितलं होतं ना?'

'होय.'

'आणि आज तर गुरुवार आहे.'

'बरं मग?'

'उद्या वऱ्हाड येणार.'

'तर मग?'

'आपल्या कामाचं वर्तितलं पाहिजे!'

सुंदरीने मोठ्या प्रेमाने त्याकडे पाहात म्हटलं, 'मग उशीर का करता?'

'मला वाटतं कदाचित ह्या कामात मला यश मिळणार नाही.'

'का बरं?'

'एकट्या रलारामाचं मन वळविण्याचं काम असतं तर हे काही कठीण नव्हतं पण येथे सारा गावच मोठ्या उत्कंठतेनं त्या वेश्येची वाट पाहात आहे!'

'म्हणजे आपला हा पहिलाच सौदा तोट्यात जाणार तर!'

'नुसता तोटाच नाही तर सारी रक्कमच बुडणार असं धरून चाल.'

'मग तुमचा काय विचार आहे?'

'रलारामाच्याकडे पुन्हा एकदा जाऊन पाहतो. कदाचित खडा लागला तर लागून जाईल.'

'ह्या वेळी कोठून आलात?'

'एक ठिकाण असेल तर सांगू ना? कित्येक ठिकाणी खेपा घालून आलो आहे.'

'काय उत्तर मिळालं?'

'नुसती टाळाटाळ.'

'रलारामाची भेट का घेतली नाहीत? परत आता मैलभर खडावं लागणार.'

'फक्त तुलाच भेटावयास नाही आलो काही. येथील एकदोन प्रतिष्ठित मंडळींना घेऊन जायचा विचार आहे.'

थोडा वेळ गप्पा मारून बचनसिंह निघून गेला, आणि सुंदरी तेथेच बसून विचार करू लागली.

थोड्या वेळानंतर बचनसिंह दिवाणपुरास निघून गेला, आणि सरळ रलारामाच्या बैठकखान्यात जाऊन पोहोचला. खाणी गावाचा दुसरा एकही मनुष्य त्याच्याबरोबर जाण्यास तयार झाला नाही. लग्नाची तयारी जोरात चालली होती. एका बाजूला शिंपी 'दहेज' मध्ये देण्याचे कपडे शिवत होते, दुसऱ्या बाजूला गावातील प्रमुख पंच हुकुमाची वाट पाहात उभे होते. सावकाराचा मुलगा दीनानाथ प्रत्येकाला कामे वाटून देत होता. आतून मिठाईचा आणि पक्वान्नांचा वास दरवळत होता. पोरीबाळी ढोलके घेऊन खूप धुमाकूळ घालीत होत्या.

गावातील पंचांमध्ये पालासिंह आणि त्याचे साथीदारही बसले होते. त्यांना पाहिल्यावर खरे म्हणजे बचनसिंहाचे रक्त खवळून गेले. पण त्याने कसेबसे मनावर नियंत्रण ठेवले. त्याला आत येताना पाहून ते एकमेकांना खाणाखुणा करू लागले. त्याने सर्वांना 'सत् श्री अकाल' म्हटले आणि तो एका बाजूला जाऊन बसला. कोणालाही डोके खाजविण्यास सुद्धा फुरसत नव्हती. सर्वजण आपापल्या कामात गर्क होते. बचनसिंहाच्या हृदयास सहस्र इंगळ्या डसत होत्या. तो ज्या कामासाठी आला होता ते काम तर दूरच, पण तो विषय काढण्याची सुद्धा संधी मिळत नव्हती. तो बराच वेळ योग्य संधीची वाट पाहात बसला. इतक्यात खडावांचा खटखट आवाज करीत भायीजी येत असलेले त्याला दिसले. बचनसिंहास भायीजींचे सारे पराक्रम माहीत होते, त्यांच्या चालचलणुकीबद्दलही तो अनभिज्ञ नव्हता, तरीसुद्धा त्याला आपले वाटले की भायीजी आपल्या म्हणण्यास दुजोरा देतील. सर्व लोकांनी मोठ्या प्रेमाने आणि आदराने भायीजींना 'सत् श्री अकाल' केला आणि 'इकडे बसावे', 'येथे बसावे' असा एकच गिल्ला केला. रलारामाला तेव्हाच थोडीशी सवड मिळाल्याने तोही तेथे येऊन भायीजींशी गप्पा मारू लागला. बचनसिंहाने हीच संधी साधण्याचे ठरविले. जिवाचा धडा करून तो म्हणाला, 'सेठजी !' रलाराम सावकाराने बेपर्वाईने, जरा त्रासिकपणे त्याच्याकडे पाहून म्हटले, 'हं, काय म्हणणं आहे तुमचं बचनसिंहजी ?' बचनसिंहाच्या बाबतीत पालासिंहाने त्याचे कान चांगलेच भरले होते.

त्याच्या तीक्ष्ण नजरेमुळे बचनसिंहाचे उरलेसुरले धैर्यही गळून गेले. पडणाऱ्या झोपडीला हाताचा सहारा देऊन काही काळ उभे करण्याचा प्रयत्न करावा त्याप्रमाणे बचनसिंहाने नेट धरीत म्हटले, 'मला एक विनंती करावयाची आहे.'

'सांगा.'

'यात माझा काहीच फायदा नाही हे तुम्हांला माहीतच आहे. हा समाजाच्या नफ्यातोट्याचा प्रश्न आहे. आणखी काही नाही तरी एवढं झालंच पाहिजे की ह्या गावात वेश्येचं पाऊल पडता कामा नये. याचा सर्वांत वाईट परिणाम आपल्या लेकीसुनांवर होईल !'

रागानें रलारामाच्या भिवया वक्र झाल्या. तो जरा आवेशात म्हणाला, 'बचनसिंहजी, मी पहिल्यांदाच तुम्हाला बजावलं होतं की आमच्या आनंदात बिब्बा घालू नका. शिवाय ज्या कामात माझा संबंध नाही ते मी कसं थांबवू शकणार ? व्याह्यांचं प्रेम हे कच्च्या सुतासारखं असतं हे तुम्हांला माहीतच आहे. थोडंसं बिनसलं तरी जन्मभर वाकडेपणा धरतील. म्हणतात ना साखरपुड्याचा आनंद लग्नापर्यंत आणि लग्नाचा आनंद जन्मभर...'

त्याचे बोलणे संपण्याच्या आधीच जवळ बसलेला एक इसम म्हणाला, 'हे काय झालं? नाच-मुजरा तर अमीर-उमरावांचा शृंगार आहे. बचनसिंह, बेटा, खुशीच्या कामात अशा नकारघंटा वाजवून खो घालू नये. शिवाय सेटजींच्या सुदैवाने चारही घरांतील ही एकटीच मुलगी आहे. हिचं सुख नाही पाहणार तर कोणाचं? (भायीजींना) काय भायीजी, बरोबर आहे ना ?'

भायीजी आतापर्यंत नखाने दात कोरण्यात गर्क झाले होते. आपल्यापुढे आलेल्या दातावरून जीभ फिरवीत ते म्हणाले, 'ठीक आहे महाराज! आन कर करके रोज रोज थोडीच संधी येते?'

बचनसिंह घाबरून म्हणाला, 'भायीजीसाहेब, तुमच्यासारख्या सभ्य लोकांनी वेश्यांचा आणि दारूचा प्रचार करावा हेच धर्मात सांगितलं आहे का? तुम्ही गुरुद्वाऱ्याचे ग्रंथी आहात, आपल्या कर्तव्याला कलंकित करणं तुम्हांला शोभत नाही.'

भायीजी जरा गडबडून गेले. पण पालासिंहास स्वस्थ बसवले नाही. 'ज्या गरीब बिचाऱ्यांना कोणी सहायक नाही त्यांच्या तोंडातून भाकरीचा तुकडा हिसकावून घ्यावा असेच तुमच्या धर्मात सांगितले आहे ना? शिवाय त्या काय फुकट थोडाच पैसा घेतात? आपल्या गाण्याबजावण्याने शेकडो लोकांचे मनोरंजन करतात. आता राहिला दारूचा प्रश्न. त्यात कोणती वाईट गोष्ट घातली जाते सांगा. बाभळीची सालं आणि गूळ.'

पालासिंहाच्या प्रश्नाला बचनसिंहाने काहीच उत्तर दिले नाही. काय बोलणार ?

इकडे पालासिंहाच्या समर्थनाने भायीजींच्या जिवात जीव आला. ते पायजम्याची नाडी खाजवीत म्हणाले, 'दारू तर आन कर करके एक औषधच आहे. काही वाईट-साईट गोष्ट नाही. पण जास्त घेणं मात्र वाईट असतं हो आन कर करके!'

बचनसिंहाचे तरुण रक्त सळसळून येत होते. पण त्याला कळून चुकले ह्या गाढवां[illegible] गीता गाण्यात काही अर्थ नाही. तरीसुद्धा भायीजींच्या युक्तिवादास उत्तर दिल्या-शिवाय त्याला राहावले नाही. तो त्यांच्याकडे डोळे वटारून पाहात म्हणाला, 'वाईट गोष्ट नाही असं धरून चालू या. फार चांगली गोष्ट आहे. पण मग काय, 'झूठा मद [illegible] ना पीचई जे का पार बसायें' याचा अर्थ काय हो?'

काही वेळ विचार करून भायीजी कानातील भिकबाळी फिरवीत म्हणाले, 'महाराज!

याचा अर्थ असा की, दारू पिऊ नये हे खरं, पण जेथे माणसाचा नाइलाज होतो तेथं काय करावं ?'

रागाच्या भरातही वचनसिंहास हसू आवरले नाही. ही दोन्ही कामे वाईट नसल्याचे प्रत्येकजण समर्थन करू लागला. वचनसिंहाने ह्या मूर्खांना समजाविण्याचा खूप प्रयत्न केला. पण पालथ्या घागरीवर पाणी. पाण्यात रवी घुसळून काय मिळणार ? हे ओळखून शेवटी तो गप्प बसला, आणि थोड्या वेळाने उठून निघून गेला. त्याचे पाऊल बाहेर पडताच सर्वजण त्याची टवाळी करू लागले.

त्याच वेळी पालासिंह आपल्या एका साथीदाराच्या कानात कुजबुजला,

'वीरू ! पाहिलीस ह्या गाढवाची अक्कल ?'

'अकलेचे जाऊ दे रे. तो मुद्दाम अशा खोड्या काढीत आहे. जेथे जेथं आम्ही जाऊ ना, तेथे तेथे हा मुद्दाम अडथळा आणणार. बेशरम माणसाचं इतकं नाक ठेचलं तरी मस्ती जात नाही.'

'हा असा ऐकणार थोडाच भैया ? चांभाराच्या देवाला खेटराचीच पूजा पाहिजे.''

'मला वाटतं हा रोज-रोजचा तंटा...'

हाताने इशारा करीत पालासिंह म्हणाला, 'चूप ! मुकाट्याने बघत राहा काय होतंय ते. जर माझा डाव यशस्वी झाला तर बघा. त्याचं नावनिशाण जरी राहिलं तरी माझ्या तोंडावर थुंका. शिवाय हा झगडा मिटला नाही तर ते पाखरू (सुंदरी) कसं तावडीत येणार ?'

[24]

संध्याकाळची वेळ होती. वऱ्हाड आल्याचे ऐकून आणि दिल्लीची प्रसिद्ध नर्तकी 'मिस अनवरजान' येणार असल्याचे ऐकून सारा गाव उरूस असल्यासारखा बाहेर पडला. एवढेच नव्हे तर आसपासची गावे सुद्धा ओस पडली.

लाला रलारामाच्या घरी असेच वऱ्हाड येणे म्हणजे काही मामुली गोष्ट थोडीच होती ! वऱ्हाड घेऊन येणारे व्याही सुद्धा आपल्या भागातील सर्वात मोठे सावकार होते.

संध्याकाळी पाच वाजता गाडीतून वऱ्हाड उतरले, आणि मोठ्या थाटामाटाने गावात पोहोचले. अनवरजानला नुसतं पाहताच प्रत्येकाचा काळजा खलास होत होता. तिचे वय असेल सुमारे तीस-पस्तीस. पण बाजारी लाली-पावडरीच्या व्यवस्थित उपयोगाने ती

जेमतेम वीस वर्षांची दिसत होती. तिचा कमनीय सुंदर देह, गुलाबी पावडरीने रंगविलेला चेहरा, काळेभोर डोळे, लाल ओठ आणि घनदाट केशकलाप सारे काही रंगेल लोकांना घायाळ करून टाकण्याचा विडा उचलूनच आले होते.

वऱ्हाड गावाच्या बाहेर एका बागेत उतरले होते. तेही काही कमी शौकीन नव्हते. सर्वांनी नवरदेवाच्या भावाला सांगून तयार केले, आणि बागेत मुजऱ्याची तयारी सुरू झाली. एक खुला आखाडा तयार करण्यात आला. त्यात मोठी सतरंजी घातली गेली आणि मधोमध गादीचा अंथरून त्यावर साजिंद्यांच्या बसण्याची व्यवस्था केली गेली.

सर्वांत पुढे नवरदेव, त्याचा मोठा भाऊ आणि त्याचा मुख्य सल्लागार म्हणून एक वृद्ध पंडित बसले. त्यांच्याजवळच आठदहा प्रमुख व्यक्ती आणि मग सर्व वऱ्हाडी आपापल्या मानाप्रमाणे बसले होते. वऱ्हाडी मंडळींच्या बसण्याच्या जागी अधिक सजावट केलेली होती. हे काम इतक्या कौशल्याने केले होते की वऱ्हाडी व यजमान मंडळी वेगवेगळी दिसून येत होती.

जेव्हा सर्व जय्यत तयारी झाली, तेव्हा नवरदेवाच्या मोठ्या भावाने आपल्याजवळ बसलेल्या पंडितजींकडे परवानगी मागितली. पंडितजींनी मोठ्या प्रेमाने म्हटले, 'तथास्तु'. पंडितजी जीवनाच्या शेवटच्या पायरीवर उभे होते. कंबर अगदी वाकली होती आणि शरीराचा वरचा भाग सुद्धा पुढे झुकला होता. ते चालू लागत तेव्हा असे वाटे की धरणीच्या [illegible] घालीत आहेत. [illegible]सुद्धा मांड्यांच्या खाली ओघळले. गाल आणि डोळ्याच्या खालील मांससुद्धा लोंबत होते. अगदी 'अंगं गलितं पलितं मुण्डं' अशी त्याची अवस्था झाली होती.

[illegible] ढगांच्या गडगडाटांचा आवाज [illegible] आणि त्याबरोबरच [illegible] चंद्रमा बाहेर आला. [illegible]जानच्या पहिल्याच गाण्याने असा चमत्कार केला की लोक अगदी [illegible] झाले. [illegible], मुरडत, [illegible] आपल्या टपोऱ्या डोळ्यांनी कामोत्तेजक तीर फेकीत [illegible]जान नाचत होती. [illegible] कव्वाली म्हणण्यास प्रारंभ केला :

'तमाशा तेरा कुदका
ऐ मसीहा हम भी देखेंगे
कि मुर्दा होते हैं कितने
ये जिंदा हम भी देखेंगे।'[1]

[illegible] एकेक [illegible] सर्व लोक [illegible] झाले. पण नवरदेवाच्या भावावर आणि

---

1. हे [illegible], [illegible] आहोत. [illegible] मृत व्यक्ती [illegible] ते आम्ही [illegible]

पंडितजींवर तर जणू इश्काची विजलीच पडली. अनवरजान गाण्याबरोबरच तिरप्या नजरेने हेही पाहात होती की तिच्या निशाणबाजीने कोण कोण घायाळ झाले आहे आणि कितपत घायाळ झाले आहे. पण जेव्हा तिने पाहिले की तीर योग्य जागी घुसून बसला आहे, तेव्हा तिने त्या दोघांकडे अधिक तिरपे कटाक्ष फेकण्यास सुरुवात केली आणि गालातल्या गालात हसत ती परत गाऊ लागली :

'कहा मैंने कि मरता हूँ
किया अफसोस कातिलने
कि कल मरना है आज मरजा
जनाजा हम भी देखेंगे।'[1]

करमचंद (नवरदेवाचा भाऊ) अगदी अधीर झाला, पंडितजी तर त्याच्याही पुढे गेले. करमचंदाने दहाची नोट काढून समोर धरली. अनवरजानने नोट अशी नखऱ्याने पकडली की करमचंद अगदी खलास. नवरदेव जवळच बसून आपल्या वडील बंधूची दशा पाहात होता. पंडितजींच्या संकेतावरून करमचंदाने काही नोटा हळूच हात मागे करून पंडितजींच्या मुठीत कोंबल्या. लगेच एक नोट पंडितजींनी देखील अनवरजानच्या पुढे केली. नोट पकडताना तिने पंडितजींच्या बोटाला ओझरता स्पर्श केला. बस, एवढ्यानेच पंडितजींचा कलिजा खलास झाला.

आता तिच्यावर नोटांचा वर्षाव होऊ लागला. तिला रुपये गोळा करणे कठिण झाले आणि तिला नाचण्यागाण्याला अवकाशच राहिला नाही. तिने एक कमनीय कटाक्ष पंडितजींकडे व एक करमचंदाकडे फेकून गाण्यास प्रारंभ केला :

'जरा तीरे नज़र फेंको
जिगर और दिलभी हाज़िर है।
कि कैसे मारते हो तुम,
निशाना हम भी देखेंगे।'[2]

पंडितजी व्याकुळतेने 'हाय हाय' करीत उठले, आणि हाताला लागतील तितक्या नोटा घेऊन त्यांनी तिच्याकडे फेकल्या. करमचंद काय कमी होता? त्याने तर नोटांचा पाऊस

1. मी म्हटले की मी मरत आहे. पण त्या दुष्टाने शोक करीत म्हटले, उद्या मरणार असलास तर आज मर, प्रेतयात्रा आम्ही देखील पाहणार आहोत.

2. जरा नजरेचे तीर आमच्याकडेही फेक. आमचे मन व हृदय त्यासाठी हजर आहे. तू कसा वेध घेतेस ते आम्ही देखील पाहणार आहोत.

पाडला. त्याचा उदारपणा पाहून लोक अगदी धन्य झाले, अनवरजानच्या अपूर्व सामर्थ्याची दाद देऊ लागले.

आता अनवरजानने दुसरी गजल सुरू केली :

'साकिया घनघोर पर
काली घटा छाई न हो
मैं की प्याली बन के दुलहन
बागमें आई न हो ।[1]

त्याबरोबरच तिने बाटलीतून दारू ओतून ग्लास भराभर वाटण्यास सुरुवात केली. प्रारंभ अर्थातच पंडितजींपासून झाला. 'वाह वा! सुभान अल्ला! क्या कहने! शाबास!' अशा आरोळ्यांनी आखाडा दुमदुमून गेला.

एकीकडे मद्य व संगीत जोरात होते तर दुसरीकडे रुपयांचा खणखणाट चालूच होता. दारूसुद्धा भरपूर होती. लहानापासून थोरापर्यंत, रंकापासून रावापर्यंत सर्वांना अगदी पोटभर दारू मिळाली. मांजरीने ग्लास लवंडला तर उंदरांनाही चूळ भरायची आठवण झाली. ज्यांनी आजपर्यंत जन्मात मद्याचे दर्शनसुद्धा घेतले नव्हते त्यांनीसुद्धा फुकट मिळत असलेली पाहून आपला घसा चांगलाच ओला करून घेतला. यजमानमंडळींचे शिरोमणी सरदार पालासिंह आणि त्यांचे पुष्कळसे साथीदार तेथे उपस्थित होते. आमचे ग्रंथीसाहेबही तेथे विराजमान झाले होते.

जेव्हा जाट मंडळी नशेने तर्र झाली, तेव्हा शामियान्याच्या मागून आवाज येऊ लागले, 'पंजाबी दा कोई चोंदा-चोंदा गाण हो जावे!'[2]

अनवरजानने पंजाबी गीत म्हणण्यास प्रारंभ केला :

'मैनू कमली कमली आखदे
कमली वाला तूं
मेरे दिल कोलों पुच्छ के देख लै
बहुत निहाला तूं
हुण कलियां सेज विछानी आं
भर भर जाम पिलानी आं

1. प्रियतमा, दाट काळे मेघ आभाळात भरून आलेले नसावेत. मद्याची प्याली वधू होऊन बागेत आलेली नसावी.

2. पंजाबमधील एखादे रसपूर्ण गीत होऊन जाऊ द्या.

मैं साकी मैखाने दी
बण मतवाला तूं।'[1]

गाणे म्हणता म्हणता अनवरजान खरोखरच मयखान्याची साकी बनली. अशा वेळी तिच्या हातचा जाम पिऊन मस्त न होणारा अभागीच म्हटला पाहिजे. पालासिंह आणि त्याचे साथीदार आधीच दारूतील किडे होते, पण भायीजींना कधीही छटाक-दोन-छटाक-पेक्षा जास्त मिळत नसे. आज अशी सुवर्णसंधी मिळाली होती. पिण्याचे तर राहोच, पण दारूत आंघोळ करण्याची सुद्धा पूर्ण मुभा होती. भायीजींनी मनसोक्त झोकली.

करमचंद आणि पंडितजी यांना तर आज जन्माचे सार्थक झाल्यासारखे वाटत होते. बाकीच्या लोकांना अनवरजान फक्त ग्लासच भरून देत होती, पण ह्या दोघांच्या ओठाला ग्लास लावून स्वतः पाजीत होती. हळूहळू अनवरजानच्या नखऱ्याने आणखी एक पाऊल पुढे टाकले. ह्या खेपेस तिने जे दोन ग्लास भरून आणले होते, त्यातील एक एक घोट स्वतः पिऊन बाकीचे ग्लास अगदी कामुक हावभावाने दोघांच्या ओठाला लावले. दोघे सपशेल चीत झाले.

हळूहळू जलशाचा रंग पालटू लागला. सारे प्रेक्षक आता एका दुसऱ्याच दुनियेत जाऊन पोहोचले होते. कोणी डोळे मिटून डोलत होता, तर कोणी अनवरजानशी तऱ्हतऱ्हेच्या नव्या आणि अस्पष्ट शब्दांनी प्रेमालाप करीत होता; पण बेहोष लोकांची संख्याच अधिक होती.

शेवटी अनवरजानने आपली लीला समाप्त केली. तिने साजिंद्यांना वाद्ये आवरण्यास सांगितली. सारंगीने आज आशातीत चाकरी बजावली होती. तिचे पोट रुपये आणि नोटांनी तुडुंब भरले होते. साजिंदे आपले सामान आवरून आपल्या मुक्कामाच्या जागी गेले. श्रोतृवृंदही डुलतडुलत उठला. ज्यांना जास्तच चढली होती ते तिथेच आडवे झाले.

---

1. लोक मला वेडी म्हणून चिडवतात पण मला वेड लावणारा तूच आहेस. माझ्या मनाला विचारून बघ वाटल्यास. तू विलक्षण आहेस. मी कळ्यांची शेज तयार करीन, जाम भरभरून प्यायला देईन, मी मयखान्याची साकी आहे, तू मदोन्मत्त होऊन जा.

बचनसिंह रात्री आठ वाजता खाणी गावात सुंदरीच्या घरी पोहोचला. निराशेने त्याची चमत्कारिक अवस्था झालेली दिसत होती. त्याची दशा पाहून सुंदरी घाबरून गेली. तिने प्रेमाने त्याचा हात पकडून विचारले, 'काय झाले ? सर्व ठीक आहे ना ?'

बचनसिंहाने एक निःश्वास सोडून म्हटले, 'सुंदरी! मी पूर्णपणे अपयशी ठरलो ग!' नंतर त्याने सांगितले की तो कसा सारा दिवस फिरत होता पण प्रत्येक ठिकाणी त्याला अपयशच मिळाले. नंतर मुजऱ्याचे वर्णन करताना दिवाणपुरात आज कशा दारूच्या नद्या वाहात आहेत आणि सोन्याचांदीचा पाऊस पडत आहे हेही त्याने सांगितले.

सुंदरीचा गुलाबी चेहरा पांढराफटक पडला. आपल्या प्रियतमाच्या कार्यात आतापर्यंत आपण काहीच मदत केली नाही ह्या विचाराने ती अगदी बैचैन झाली. ह्या कामाचा विडा दोघांनीही बरोबरच उचलला होता, आणि बचनसिंह एकटाच धडपडत होता. बराच वेळ विचार केल्यानंतर तिच्या मनात एक कल्पना आली. तिच्या चेहऱ्यावरील चिंतेचा भाव कमी झाला आणि त्या जागी प्रसन्नता झळकू लागली. ती एकदम म्हणाली, 'ठीक आहे, आता माझी पाळी आहे तर.'

'तुझी ?' बचनसिंहाने आश्चर्याने विचारले, 'सुंदरी, तू हे काम कसे करणार ? इतके दिवस धडपडून सुद्धा मला जेथे यश आलं नाही, तेथे तुला कसं यश येणार ?'

सुंदरी म्हणाली, 'यश नाही मिळालं म्हणून काय झालं ? मी परत येईन. आपल्याकडून प्रयत्न करीत राहिलं पाहिजे. यश देणं न देणे वाहेगुरूच्या हाती आहे.'

'नाही सुंदरी, मी तुला जाणूनबुजून आगीत उडी घेऊ देणार नाही.'

'ऐका तर खरं.'

'हं.'

'मला किनई एक युक्ती सुचली आहे.'

'काय ?'

'फांद्या सोडून बुंध्यालाच हात घातला तर ?'

'म्हणजे काय ?'

'म्हणजे असं की त्या वेश्येकडे जाऊन तिचीच समजूत घातली तर ?'

बचनसिंह खो खो हसत म्हणाला, 'वा, सुंदरी, ज्या मंत्राने गांवीलमाशा आवरता येत नाहीत त्या मंत्राने तू सापाला पकडू पाहतेस ? हे कसे शक्य आहे ?'

'कधी कधी बंदुकीच्या गोळीनें ससा मारता येत नाहीं, पण त्याच गोळीने वाघ मरू शकतो. तुम्ही मला नुसती परवानगी द्या.'

'बरं, तुझी इच्छा आहे तर मी तुला अडवीत नाही. पण हे वाळूतून तेल काढण्यासारखं आहे.'

'असू द्या.'

'ठीक आहे, जशी तुझी मर्जी.'

'चला तर मग, आताच्या आता मला दिवाणपुरात घेऊन चला. मी सुद्धा प्रयत्न करून पाहते.'

'पण इतक्या रात्री तू परत कशी येशील ?'

'परत येण्याची जरुरी नाही. उरलेली रात्र मी तुमच्याकडे घालवीन.'

'चल तर मग' असे म्हणून बचनसिंहाने सुंदरीला बरोबर घेतले आणि दोघे दिवाणपुराच्या दिशेने निघाली.

[26]

रात्रीचे दहा वाजून गेले आहेत. अनवरजानच्या घरी अजून पुष्कळ सद्गृहस्थांची वर्दळ होती. पण तिने डोकेदुखीचे निमित्त करून कशीबशी आपली सुटका करून घेतली. तिच्या मोलकरणीने दरवाजा बंद करून अनवरजानचा बिछाना घातला आणि ती आपल्या जागेवर जाऊन लवंडली. तिचा डोळा लागतो न लागतो तोच खालून दार वाजविल्याचा आवाज आला. अनवरजान वैतागून पुटपुटली, 'मेले दोन घटका झोपूसुद्धा देत नाहीत. मोठ्या मुश्किलीने ह्या लोकांची बोळवण केली होती.' आधी तिच्या मनात आले, मोलकरणीकडून आपण झोपलो असल्याचा निरोप पाठवावा, पण नंतर तिनें मोलकरणीला दार उघडण्यास पाठविले.

पावलांचा आवाज ऐकून ती उठून बसली. पाहते तो मोलकरणीच्या मागोमाग एक सुंदर व वेलीसारखी सडपातळ सोळा-सतरा वर्षांची मुलगी येत होती. अनवरजानला आश्चर्य वाटले की ह्या मुलीचे येथे काय काम असावे ? तिने आदराने तिला जवळ बोलावून विचारले, 'ये बाळ ! या वेळी तू कोठून आलीस ? '

सुंदरीने जन्मात प्रथमच एखाद्या स्त्रीच्या तोंडून स्वतःला 'बाळ' संबोधलेले ऐकले. लहानपणी दुसऱ्या मुलींच्या आया त्यांना 'पुत्तर', 'बची' अशा हाका मारताना पाहून तिच्या हृदयात एक बारीकशी कळ उठत असे. तिच्या मनात विचार येई,

'माझी आई असती तर तिनेही मला अशीच हाक मारली असती.' जन्मापासून तिचे कान हा छोटासा शब्द ऐकण्यासाठी आसुसलेले होते. अग्नी जळताच धूर लुप्त व्हावा त्याप्रमाणे 'बाळ' हा शब्द ऐकताच जे विचार घेऊन ती जिना चढली होती ते लुप्त झाले.

स्त्रीजातीला बट्टा लावणाऱ्या ह्या कुटिल आणि नीच वेश्येसमोर मी कशी जाऊ, जिच्या खोलीतील प्रत्येक वस्तू पाप आणि दुराचारात लडबडलेली असेल तिला मी कसा स्पर्श करू, हाच विचार ती रस्ताभर करीत होती. दूर उभी राहूनच त्या वेश्येशी बोलावे असा तिचा बेत होता, पण ती स्वतःच तिच्याकडे आकर्षित होऊन तिच्या खाटेजवळ जाऊन पोहोचली. अनवरजानची मोलकरीण एव्हाना आपल्या खोलीत परत गेली होती. सुंदरी मुकाट्याने उभी राहिली. अनवरजानने परत विचारले, 'बाळ, माझ्याकडे काही काम होते?'

तिच्या पहिल्याच शब्दाने सुंदरीच्या मनातील घृणा पार वितळून गेली. परत तिच्या तोंडून 'बेटी' हे संबोधन ऐकून तिच्या मनात मोह निर्माण झाला. ती खाली मान घालून म्हणाली, 'होय, मांजी, एक काम होते.'

अनवरजानला तिचे हावभाव अतिशय आवडले, आणि 'मांजी' ह्या संबोधनाने तर तिच्या कानात अमृत ओतले. सुंदरीचा हात पकडून तिला खाटेवर बसवीत ती म्हणाली, 'हं सांग.'

सुंदरी बेधडक खाटेवर जाऊन बसली, आणि तिच्याकडे पाहात म्हणाली, 'मांजी! मी एक विनंती करण्यास आले आहे, पण...'

ती गप्प बसली. अनवरजानने तिला न्याहाळून पाहात तिच्या मनातील विचार हळूहळू अजमावण्याचा प्रयत्न केला, पण तिला काहीच आकलन झाले नाही. हात लांब करून सुंदरीच्या पाठीवरून फिरवीत तिने तिला आपल्याजवळ ओढून घेत विचारले, 'सांग ना बेटा, गप्प का बसलीस?'

ज्या हातांना ती अपवित्र आणि घृणित समजत होती, त्याच हातांचा स्पर्श झाल्यावर तिला एक मधुर आत्मीयतेची अनुभूती झाली. सुंदरीने तिचा दुसरा हात आपल्या हातात घेऊन आपले मस्तक तिच्या खांद्यावर टेकीत म्हटले, 'मांजी, माझे काम फार कठिण आहे, मला सांगावयास संकोच वाटतो.' अनवरजानने हळूच आपला हात तिच्या हातातून सोडवून तिच्या कमरेभोवती विळखा घालीत म्हटले, 'नाही मुली, संकोच कसला? तू जे म्हणशील ते करीन.' अनवरजानने असे सांगण्यात जरा घाईच केली; नंतर तिचे तिलाच वाटले, विचारल्याशिवाय मी अशी संमती द्यावयास नको होती.

सुंदरी तिला अगदी चिकटून बसली होती. ती म्हणाली, 'मांजी,...' ह्यापुढे तिच्या तोंडून एक शब्द फुटला नाही. तिला वाटत होते, 'मांजी' ह्या शब्दात किती माधुर्य

आहे ? तिचा रोमरोम स्नेहाने झंकृत होऊन गेला. सुंदर फुलाचा वास परत परत घ्यावासा वाटतो त्याप्रमाणे सुंदरीला 'मांजी' हा शब्द परत परत उच्चारावासा वाटत होता. ती म्हणाली, 'मांजी !'

अनवरजानला तिचे बोलणे ऐकू आले नसावे. तिने तिला ओढून जवळ बसविले, आणि तिच्या केसावरून ती हात फिरवू लागली. सुंदरी आपल्याला विचारीत आहे हे तिच्या लक्षात आले नाही. निसर्गाने निर्माण केलेले हे सुंदर खेळणे तिला अतिशय आवडले. ज्याच्या अभावी तिचे हृदय नेहमी तडफडत असे तो वात्सल्यरस तिला ह्या नाजूक खेळण्यात मिळाला असावा. सुंदरीने तिच्या छातीवर आपले डोके ठेवून डोळ्यात पाहात म्हटले, 'मांजी !'

अनवरजानने निरखून पाहिले, तिला दिसले की सुंदरीचे डोळे पाण्याने डबडबले आहेत. तिने उशाखालून रुमाल काढून तिचे डोळे पुसले, अचानक तिच्या नकळत तिने आपले ओठ सुंदरीच्या कपाळावर टेकले. सुंदरीने आपले दोन्ही हात तिच्या गळ्यात टाकले. अनवरजानचे हृदय भरून आले. मग प्रेमाने तिच्या पाठीवरून हात फिरवीत ती म्हणाली, 'बेटी, काय सांगणार होतीस ? तू सांगशील ते ऐकेन.'

सुंदरी ह्या बोलण्याचा पडताळा तिच्या चेहऱ्यावरून पाहात म्हणाली,

'मांजी, तुम्हांला ह्या धंद्याची घृणा नाही वाटत ?'

'घृणा ?' अनवरजान तिच्या डोळ्यांत काहीतरी शोधण्याचा प्रयत्न करीत म्हणाली, 'तुला जितका तिरस्कार वाटतो, तितकाच मलाही वाटतो.'

'मग तुम्ही हे काम सोडून का देत नाही ?'

'कारण माझ्यासाठी ह्या जगात दुसरी जागा नाही.'

अनवरजानच्या नजरेतून एका निर्दोष अपराध्यासारखे भाव प्रकट होत होते.

'म्हणजे काय ?' सुंदरीने विचारले.

'याचा अर्थ तुला कळणार नाही बेटी.'

'का मांजी ?'

'कारण तू अजून कुमारी आहेस—होय ना ?'

'होय' म्हणून सुंदरीने खाली मान घातली.

'म्हणून म्हणते की तुला माझी परिस्थिती समजणार नाही. जिचा विवाह तर झाला आहे, पण डोलीतून उतरताच जिचे कुंकू पुसले गेले आहे, विधवा होताच तांदुळांतील खड्याप्रमाणे जिला घरातील लोकांनी काढून बाहेर फेकून दिले आहे, फेकले तेसुद्धा बदमाश, चांडाळ सैतानांच्या दुनियेत—तीच स्त्री माझ्या बोलण्याचा अर्थ समजू शकेल !'

बोलता बोलता अनवरजानच्या चेहऱ्यावर विद्रोही आणि हिंसक भाव दिसू लागले.

तिच्या कपाळावरील शीर तट्ट फुगली आणि डोळ्यांत रक्त साकळले. सुंदरीला वाटले, एखादी बुभुक्षित वाघीणच आपल्यासमोर डरकाळ्या फोडीत आहे. ती घाबरली. हिचा डोळा चुकवून पळून जावे असाही विचार तिच्या मनात आला.

अनवरजानच्या शब्दांतून ठिणग्या उडत होत्या : 'जेथे पावलागणिक मानवी मुखवटे घातलेले धोकेबाज मित्रद्रोही आहेत, जेथे माझ्यासारख्या दुर्दैवी स्त्रीला भाकरीच्या एका तुकड्यासाठी आपले शरीर विकण्याशिवाय दुसरा उपाय नाही, जेथे कोणी बाप बनून तर कोणी भाऊ बनून माझ्यासारख्या निराधार स्त्रीच्या अब्रूशी खेळू पाहतो, जेथे एका आईच्या काळजाच्या तुकड्याला—आई ग !—एका दूधपित्या मुलीला तिच्या छातीपासून ओढून कावळ्याकुत्र्यांच्या पुढ्यात फेकले जाते, त्या जगात ह्या धंद्याशिवाय आणखी काय करणे शिल्लक राहते ? मी आताच म्हटले की ह्या धंद्याचा मला तिरस्कार वाटतो. पण नाही—नाही, या पेशाची मला मुळीच घृणा वाटत नाही. ह्या धंद्याच्याच कृपेने आज मोठमोठे अमीरउमराव, पुढारी, चौधरी, माझ्या उंबरठ्यापाशी नाक घाशीत येतात; ह्या धंद्याचा मी कसा तिरस्कार करू ? मी तर ह्या धंद्याला ईश्वरी कृपाच समजते. ह्या पेशाने मला काय दिले नाही ? प्रतिष्ठा, पैसा, आराम, कीर्ती, सर्व काही मिळाले. फक्त एका गोष्टीपासून मी वंचित राहिले—माझ्या तान्ह्या मुलीला सोयराच्या दिवसांतच एका क्रूर सैतानाने फसवून माझ्यापासून हिरावून नेले. आई ग ! माझ्या अंतःकरणात आगीचा डोंब उसळून राहिला आहे. मी...मी...त्या...आई ग !...' असे म्हणत अनवरजान हमसाहमशी रडू लागली. दुःखाच्या आवेगाने तिच्या शरीराच्या चिंधड्या उडतात की काय असे वाटत होते. ती उशीवर पालथी पडली आणि गदगदून रडू लागली.

हे दृश्य पाहून सुंदरी चक्रावून गेली. भयाने आणि चिंतेने तिच्या डोळ्यांसमोर काजवे चमकू लागले. पुढचे काही न ऐकता, अपयशामुळे गळून जाऊन, अनवरजानला तशाच स्थितीत सोडून ती जिना उतरून खाली आली. खाली उतरून ती जिकडून आली होती त्या बाजूला वळली. पण दहा-पंधरा पावले जाऊन ती परत थबकली. नकळत ती परत अनवरजानच्या दाराशी जाऊन पोहोचली. असे का ? तिलाही त्याचे कारण कळले नाही.

जिन्याचा दरवाजा अजून उघडाच होता. आत पाऊल टाकताच तिची कशाशी तरी टक्कर झाली. झोपेत घाबरून एखादे अबोध बालक आईला बिलगते, त्याप्रमाणे घाबरून जाऊन सुंदरी त्याच वस्तूला बिलगली.

सुंदरी गेल्यानंतर अनवरजान कितीतरी वेळ अश्रू ढाळीत बसली होती. थोड्या वेळाने भानावर आल्यावर उशीवरून मान वर करून तिने खोलीत नजर फिरविली,

पाहते तर ती मुलगी तेथे नव्हती. एका अज्ञात शक्तीने अनवरजानला ओढले आणि उगाचच ती जिन्यावरून खाली आली. खाली उतरताच ती अंधारात कशाला तरी अडखळली, तीच वस्तू तिला बिलगून बसली. ती सुंदरी होती. दोघीजणी मुकाट्याने जिना चढून त्याच खोलीत आल्या. सुंदरी अनवरच्या मांडीवर डोके ठेवून पडली. थोडा वेळ गप्प बसल्यानंतर तिच्या डोळ्यांत पाहात अनवरने विचारले, 'बाळ, तुझे नाव काय?'

'सुंदरी.'

'कोठे राहतेस तू? बाळ, का कुणास ठाऊक तुझ्याबद्दल मला अतिशय माया वाटू लागली आहे. तू खाली दरवाजाजवळ भेटली नसतीस तर मला कुठवर तुझा पाठलाग करीत यावे लागले असते देव जाणे. हं, तुझे वडील काय करतात बाळ?'

सुंदरी म्हणाली, 'ते वारले.'

'काय काम करीत होते?'

'डोंबारी होते.'

'डोंबारी? माकडांचा खेळ करणारे?'

'हो.'

अनवरजानने परत एकदा डोळे भरून तिच्याकडे पाहिले. तिच्या मनात आले: डोंबाऱ्याच्या घरात एवढे सौंदर्य? मग तिने विचारले, 'तुझी आई?'

'मला आई नाही.'

'अरेरे! बिचारी अनाथ पोर! पुत्तर, तुझी आई मरून किती दिवस झाले?'

'मला माहीत नाही.'

'माहीत नाही?'

'मला कोणी आई नव्हती!'

हेऐकून अनवरजानला हसू आले. तिने विचारले, 'लहानपणीच वारली का?'

'नाही.'

'मग?'

'ती नव्हतीच मुळी.'

'तर मग तुझा जन्म कसा झाला?'

'मी जन्मले नव्हते!' पटकन सुंदरीच्या तोंडातून निघून गेले, पण आपल्या मूर्खासारख्या बोलण्याची तिची तिलाच लाज वाटली. ती म्हणाली, 'खरंच नाही, बाबाने मला झाडीतून उचलून आणले होते.'

अनवरच्या चेहऱ्यावरील चढ-उतार पाहून सुंदरी विचार करू लागली, 'मी हिच्या

झोपेचे खोबरे केले आहे. आता मला गेले पाहिजे.' ती उठून म्हणाली, 'बरं आहे, मांजी, आता मी रजा घेते. मी तुमचा पुष्कळ वेळ घेतला. तुम्ही अस्वस्थही दिसत आहात. मी परत कधी तरी भेटेन.'

अनवरने तिचा हात पकडून तिला खाली बसवीत म्हटले, 'पुत्तर! त्याने तुला कुठल्या गावातून उचलून आणले होते?'

सुंदरी म्हणाली, 'याच गावातून—नाही याच गावाच्या बाहेर—आपल्या झोपडी-जवळून आणले होते.' नंतर सुंदरीने त्या जागेचा पत्ता आणि बाकीची हकीगत सांगितली. तिने जेव्हा अनवरकडे नजर टाकली तेव्हा ती धाय मोकलून रडत असलेली तिला दिसली. तिला वाटले हिचेसुद्धा मूल मेले असेल किंवा हरवले असेल, त्याच्या आठवणीने बिचारी रडत असेल. तिने प्रेमाने तिचा हात धरून विचारले,

'मांजी, तुम्ही का रडला?'

अनवरला अधिक धीर धरवला नाही. तिने आवेगाने सुंदरीला जवळ घेतले. रडून-रडून तिची छाती फुटावयाची वेळ आली होती. ती काहीतरी बोलणार होती, पण तिच्या तोंडून शब्द फुटत नव्हता. मोठ्या कष्टाने ती म्हणाली, 'दुर्दैवी बाळे, मीच तुझी आई आहे. माझ्याकडून हिसकावून घेऊनच तुला जंगलात फेकून देण्यात आले होते.'

'खरंच?' सुंदरीला एकदम चक्कर आल्यासारखे वाटले. नंतर एकमेकींच्या गळ्यात गळा घालून त्या कितीतरी वेळ रडत राहिल्या. जेव्हा दोघींच्या डोळ्यांत टिपूससुद्धा शिल्लक राहिले नाही तेव्हा दोघीजणी वेड्यासारख्या एकमेकींकडे पाहात राहिल्या. एकदम सुंदरीच्या अंतःकरणातून मोहाचा सागर उफाळून आला. ती आवेगाने म्हणाली, 'मांजी...तुम्ही...तुम्ही!'

पण अनवरने काहीही उत्तर दिले नाही. तिला काय वाटले कोण जाणे! ती गड-बडीने उठली व सुंदरीच्या मिठीतून स्वतःला सोडवून मागे सरकून म्हणाली, 'अरेरे, बाळ, तू माझ्या अपवित्र आणि अपराधी देहाला स्पर्श करण्यात मोठी चूक केलीस. हतभागी मातेच्या पोरी, माझा तू खूप तिरस्कार कर. ज्या स्थानाची प्रत्येक वस्तू पापकर्दमात लडबडलेली आहे, तेथे तुझ्यासारख्या पवित्र मुलीला एक मिनिटसुद्धा थांबता येणार नाही. ताबडतोब येथून...' बोलता बोलता दोन्ही हातांनी आपले तोंड झाकून, ती आपले शरीर आखडून बसली. तिला वाटले धरणीमाता पोटात घेईल तर बरे. आतापर्यंत तिच्या हृदयात प्रेमलहरी उसळत होत्या, त्या ठिकाणी लज्जा, ग्लानी आणि पश्चात्ताप दिसू लागला. आपण वेश्यापुत्री आहोत हे कळल्यावर तिला काय वाटले असेल, ह्या विचाराने ती वेड्यासारखी धावत जाऊन एका कोपऱ्यात पडून बसली आणि छाती पिटून रडू लागली.

हे काय चालले आहे हेच सुंदरीला काही वेळ समजले नाही. तिला हा सर्व प्रकार स्वप्नवत वाटत होता. मग तिला अनवरचा आवाज ऐकू आला. परीक्षेत नापास झालेला मुलगा आपल्या आईवडिलांचा राग शांत करण्यासाठी स्वतःचे निरपराधित्व सिद्ध करण्यासाठी धडपडत असतो, त्याप्रमाणे ती वेड्यासारखे बडबडत होती. तिचा आवाज थरथरत होता. सुंदरीकडे दोन्ही हात पसरून हुंदके देत ती म्हणाली, 'नाही, नाही, बेटी, यात माझी थोडीसुद्धा चूक नाही ग! मी जाणूनबुजून काही केले नाही. मला कोणी तरी करणे भाग पाडले. सर्व हकीगत कळल्यावर तुझे तुलाच पटेल की मी निर्दोषी आहे.'

सुंदरीला वाटले की कोणीतरी आपलेच मांस ओरबाडून काढीत आहे, आपल्याच काळजावरून सुरी फिरवीत आहे. ती पळत पळत अनवरकडे गेली व तिला सावरून धरीत म्हणाली, 'मांजी, तुम्ही निर्दोष आहात याबद्दल मला मुळीच शंका नाही, पण कोण्या दुष्टाने तुमची अशी दशा केली ते तरी सांगा.'

आपल्या मुलीच्या प्रश्नाचे उत्तर देण्यासाठी अनवरने स्वतःला सावरले आणि ती खाटेवर जाऊन बसली. नंतर तिने आरंभापासून ते ज्या दिवशी ती आपल्या वीतभर पोरीला जंगलात टाकून गेली होती त्या दिवसापर्यंतची हकीगत सांगितली.

ती हकीगत ऐकून सुंदरीच्या हृदयात आगीचा डोंब उसळला. ज्या समाजाच्या अत्याचाराने तिचा रोमरोम दुःखी झाला होता, ज्या समाजाने तिच्या धर्मपित्याचा बळी घेतला होता, त्याच समाजाने तिच्या मातेचीही दशा केली होती हे ऐकून सुंदरी नखशिखांत भडकली. यावेळी बचनसिंहाने केलेले सारे उपदेश ती विसरून गेली. तिला तेथे बसणे कठीण झाले. तिचा श्वास भात्यासारखा सुरू झाला. तिचे शरीर कापू लागले. पण अजून बाकीची हकीगत ऐकावयाची आहे हा विचार करून तिने आपले मन आटोक्यात आणण्याचा प्रयत्न करीत विचारले, 'मग काय मांजी ?'

अनवरने सांगण्यास सुरुवात केली, 'बाळ, तुझ्या लहानशा शरीराविषयी माझ्या मनात किती माया होती हे सांगण्याची माझ्यात शक्ती नाही. गिधाडांनी तुला खावे म्हणून तुला असे फेकून देण्यात आले होते. ज्यावेळी तुझा दुष्ट बाप (ताराचंद) मला आजारी स्थितीत टाकून गेला होता त्यावेळी घरात एक छदामही नव्हता आणि स्वयंपाकाच्या चार-दोन भांड्यांखेरीज बाकी काही सामान नव्हते. बाकी सर्व वस्तू तो आधीच गोळा करून घेऊन गेला होता.'

ताराचंदाचा उल्लेख करताना तिच्या चेहऱ्यावर असे भाव होते, जणू ती आता कुणाचा तरी खून करणार आहे. ती धापा टाकीत होती आणि तिची छाती लोहाराच्या भात्यासारखी धपापत होती, इतकी की बोलता बोलता काय बोलायचे हेच ती विसरून

गेली. तिने उठून पेलाभर पाणी घेतले आणि मग म्हणाली, 'तो निघून गेला आणि मी अस्वस्थपणे त्याच्या नावाने बोटे मोडीत बसले. रात्रीचा दोनचा सुमार होता, दूरपर्यंत हिंदूंचे एकही घर नव्हते. एवढ्यात जवळच्या गच्चीवरून दोन मुसलमान स्त्रिया उड्या मारून आत आल्या. माझ्या घरातून लहान मुलाच्या रडण्याचा आवाज त्यांनी ऐकला असावा. त्यांनीच मला आधार दिला. भले होवो त्या बिचाऱ्यांचे. किती निर्लज्ज होता माझा जीव! इतके धिंडवडे निघाल्यावरसुद्धा त्याला ही कुडी सोडून जावेसे वाटले नाही. त्यातील एकीला सुइणीचे काम थोडेफार येत होते. तिने जिवाभावाने माझी सेवा केली.

'दुसऱ्या दिवशी त्यांच्या नातेवाइकांनी जवळच्या एका हिंदू मोहल्ल्यात ही बातमी दिली आणि तेथील लोकांना ते घेऊन आले. त्या मोहल्ल्याचा चौधरीही आला. पण माझं भाग्यच खोटं बघ. ज्या बाईने मला वाचविले होते तिच्या नवऱ्याने त्याला आपण रात्रीपासून हिची शुश्रूषा करीत असल्याचे सांगितले. त्याने हेही सांगितले की, आमच्या बायकांनी हिच्या तोंडात पाणी घालून हिला शुद्धीवर आणले, नंतर तिला दुसऱ्या काही गरम वस्तू खाण्यास दिल्या, तेव्हा कुठे हिचा जीव वाचला.

'हे ऐकताच चौधरीने कानावर हात ठेवून तेथून पळ काढला. जाताजाता तो म्हणाला, 'मुसलमानांच्या हातचे खाल्ल्यावर ही आता आमच्या घराचा उंबरठा चढू शकत नाही. हिचा धर्म भ्रष्ट झाला आहे.'

'बिचारे मुसलमान घाबरून गेले. त्यांना आपल्या कृत्याचा पश्चात्ताप झाला. मी त्यावेळी चांगली शुद्धीवर होते. एक तर सुरवातीपासून मला अशीच वागणूक मिळाली होती आणि दुसरे म्हणजे चौधरीच्या निर्दयपणामुळे माझे मन अधिकच कठोर झाले होते. मी आवेशात त्या मुसलमानांना म्हटले, 'वीरूजी[1], हिंदू मला आश्रय देत नाहीत, पण तुम्हीसुद्धा माझ्यासारख्या ओल्या बाळंतिणीला दहा दिवस आपल्या घरात राहू देणार नाही का?'

'त्यातील एकजण म्हणाला, 'बहनजी, दहा दिवस काय, दहा वर्षेसुद्धा तुम्ही खुशाल आमच्या घरी राहा. आमच्या लेकीबाळी जे काही ओले कोरडे खातात तेच सर्वांत आधी तुम्हांला देऊ. पण काय करणार? तुमच्या राहण्याला हिंदू समाज हरकत घेईल.'

'मी रागाने तडफडत म्हटले, 'हिंदू समाज? ज्या समाजाने माझी अब्रू अगदी कस्पटासमान मानली, ज्या समाजाने माझा काहीही दोष नसताना मला धुळीला मिळविले, त्या समाजाला थोडीतरी माणुसकी आहे का? ह्या समाजाच्या तोंडावर

---

1. भाईसाहेब.

थुंकते मी. अगदी मरेपर्यंत मी ह्या समाजाचा तिरस्कार करीत राहीन. तुमच्या मनात देवाच्या भक्ताविषयी दयाभाव असेल तर मला काही दिवस येथेच राहू द्या.'

'यानंतर दुसरा एकजण म्हणाला, 'बहन, तू आमच्या सख्ख्या बहिणीपेक्षाही अधिक आहेस. आम्ही तुला शक्य तितके सुखी करण्याचा प्रयत्न करू. पण काय करणार ? आम्ही पडलो गरीब मजूर. आमच्यासारखे गरीब लोक हिंदू आजाऱ्याची व्यवस्था कशी करू शकणार ?'

'मी त्यांना म्हटले, 'मला त्याची आवश्यकता नाही. मी तुमच्याच हातचा स्वैपाक खाईन. मी हिंदू समाजाचा अगदी तिरस्कार करते.'

'त्या दिवसापासून ते लोक माझी अधिकच मनोभावे सेवा करू लागले. माझ्या देहाचा कण न् कण त्यांना आशीर्वाद देऊ लागला. जवळजवळ दोन आठवडे मी त्यांच्या घरी घालविले. तुझ्या जन्मानंतर पंधराव्या दिवशी तो चौधरी परत माझ्याकडे येऊन मोठ्या प्रेमाने म्हणाला, 'बीबी, मला तर त्या दिवसापासूनच तुझी काळजी लागून राहिली होती. आता मी तुला दिल्लीच्या एका विधवा आश्रमात पाठविण्याची व्यवस्था केली आहे. तेथे तुला चांगला आराम मिळेल. तुला शिक्षणही देण्यात येईल.'

'आधी मी तयार झाले नाही, कारण त्याचे त्या दिवशीचे वर्तन माझ्या ध्यानात होते. पण माझ्या मुस्लीमबांधवांनी मला खूप आग्रह करून तेथे जायला तयार होण्यास भाग पाडले.

'दुसऱ्या दिवशी तो आला आणि मला आपल्याबरोबर टांग्यात घालून घेऊन गेला. त्याच दिवशी आम्ही दोघं दिल्लीची तिकिटं काढून गाडीत बसलो. त्याच्या धीराच्या आणि गोडगोड बोलण्याने माझ्या मनाला मोठा आधार मिळाला.

'गाडी वेगाने चालली होती. मी खिडकीला पाठ टेकून बसले होते. तो माझ्या समोरील बाकावर बसला होता. तो मला आश्रमाच्या सुव्यवस्थेचे रसभरित वर्णन ऐकवत होता. शेवटी जरा चिंतेच्या स्वरात त्याने म्हटले, 'पण एका गोष्टीचा विचार माझ्या डोक्यात अजून आला नव्हता.'

'मी विचारले, 'कोणती गोष्ट ?'

'तो म्हणाला, 'आश्रमात दाखल होणाऱ्या स्त्रीजवळ दूधपितं मूल असता कामा नये असा आश्रमाचा नियम आहे.'

'बाळे, तेव्हा मी तुला दूध पाजीत होते. मोठ्या आशेने तुझ्याकडे पाहात मी विचारले, 'मग आता ?'

'तो म्हणाला, 'पुढच्या स्टेशनच्या जवळच माझा एक नातेवाईक राहतो. तू म्हणत

असशील तर सध्या ही मुलगी त्याच्या हवाली करावी. तिचे अंगावरचे पिणे सुटेल तेव्हा तिला पाठवून देण्यास सांगू!'

'त्याचे बोलणे ऐकून मी घाबरले. माझ्या मनात नसते विचार येऊ लागले. पण त्याने गोडगोड बोलून मला ह्या कामासाठी तयार केलेच. त्यानंतर तो पुढील स्टेशनावर स्वतः उतरला आणि मलाही उतरण्यास सांगितले. भाड्याचा टांगा करून आम्ही एका गावात पोहोचलो. ते गाव म्हणजेच हे दिवाणपूर—हे मला नंतर कळले.

'मला ह्या गावाच्या बाहेर एका झाडाखाली बसवून तो निघून गेला. आणि थोड्या वेळाने परत येऊन सांगू लागला, 'मी आपल्या नातेवाइकाकडे ह्या मुलीला सांभाळण्याची जबाबदारी सोपवून आलो आहे. तू जाऊन तिला त्या झाडीमध्ये सर्वांत उंच झाडाखाली, त्या झोपडीपाशी नेऊन ठेव. ते लोक स्वतः येऊन तिला घेऊन जातील. त्या लोकांसमोर तू जाणे योग्य नाही, असे मला वाटते.' मी अगदीच अल्लड होते. मन घट्ट करून त्याने सांगितल्याप्रमाणे केले. नंतर मला कळले की ती फसवणूक होती. खरं म्हणजे त्याने तुला कोणाच्याही हवाली केले नव्हते.

'यानंतर मला धीर देऊन तो म्हणाला, 'थोड्याच दिवसांत मुलगी थोडी मोठी झाली की तिला तुझ्याकडे पोहोचविण्याची व्यवस्था मी करीन.' त्याने असे सांगितले नसते तर मला वाटते मी बेशुद्ध होऊनच कोसळले असते.

'दिल्लीला पोहोचल्यावर आम्ही एका टुमदार घरात गेलो. ते घर अतिशय सुंदर होते आणि मूल्यवान सामानाने सजविले होते. दिवाणखान्यात कोणी नव्हते. त्याने हे आपल्या मित्राचे घर असल्याचे सांगितले. रात्री तो एका मोलकरणीला तेथे सोडून गेला. जाताना म्हणाला, 'सकाळी येऊन मी तुला विधवा आश्रमात घेऊन जाईन.'

'ती रात्र तशी मी आरामात घालविली, पण राहून राहून तुझाच विचार मला सतावत होता. सारी रात्र मला स्वस्थ झोप लागली नाही. त्या मोलकरणीने माझी खूप सेवा केली, पण माझे अश्रू काही थांबत नव्हते.

'सकाळी मी आंघोळपांघोळ करून आले, पाहते तर एक म्हातारी कुंटीण खोलीत बसलेली. तिच्या वेशभूषेवरूनच ती वेश्या असल्याचे दिसून येत होते. मी काही बोलण्यास तोंड उघडण्यापूर्वीच ती म्हणाली, 'बेटी! रात्री काही त्रास झाला नाही ना? मी कामात असल्यामुळे मला येता आले नाही. पण ही म्हातारी दाई अतिशय विश्वासू आहे. तिने तुझी चांगली देखभाल केली असेल.'

'तिचे बोलणे ऐकून मी चकित झाले. तिला आपादमस्तक न्याहाळीत मी विचारले, 'हे घर तुमचे आहे?'

'होय बाळ.'

''लालाजी अजून नाही आले ?' मी तिला विचारले.

''कोणते लालाजी ?'

''मला विधवा-आश्रमात घेऊन जाणार होते ना, तेच.'

'माझ्या बोलण्याला हसत ती म्हणाली, 'बेटी! ह्या घरात लाला आणि खानसाहेबांची मोजदाद तरी कशी करायची ? येथे रोज शेकडो लोकांची ये-जा चालते. पण आले माझ्या लक्षात. ज्याने तुला माझ्यापाशी विकले त्या माणसाची तू चौकशी करीत असावीस. तो रात्रीच्या गाडीनेच परत गेला. त्याने माझ्याशी जो सौदा केला तो पूर्ण झाला. बाळ, त्याने तुला विधवा-आश्रमातच दाखल केले आहे. दुसरीकडे कोठेही नाही. ज्याला तू विधवा-आश्रम म्हणतेस ते एक ढोंग आहे. हाच खरा विधवा-आश्रम आहे. येथे आपल्या देशातील हजारो, लाखो विधवांना आश्रय मिळतो; त्या चैनीत, आरामात जीवन व्यतीत करतात.'

'तिचे बोलणे ऐकून मी सुन्नच झाले. पण आता काय उपयोग ? मी खूप रडले-भेकले, कित्येक दिवस उपाशी राहिले, पण कोणाच्याही हृदयास पाझर फुटला नाही. ती थेरडी रोज तऱ्हेतऱ्हेची आमिषं दाखवून मला वश करण्याचा प्रयत्न करीत असे. तिला यश न मिळाल्याने तिने हे काम एका तरुण मुलीवर सोपविले. ती दिवसरात्र माझी खुशामत करीत बसे. शेवटी तिने मला ह्या मार्गाकडे वळविलेच. कदाचित मी आपल्या हट्टाला चिकटून बसलेही असते, पण तिने आपली जीवनकथा मला ऐकवली. तीसुद्धा ब्राह्मणकन्या होती. उच्च खानदानी कुळातील सून होती. पण ह्या समाजाने तिच्यावर जे अन्याय आणि अत्याचार केले त्यामुळेच तिला हा पेशा पत्करावा लागला. तिची हकीगत ऐकून मी विरघळले. आणि माझे पातिव्रत्य कायमचे विकून हा घाणेरड धंदा करायला तयार झाले. त्यानंतर मी तिला माझी आत्मकहाणी ऐकवली. माझी जीवनगाथा ऐकून ती अतिशय दुःखी झाली. माझे मन वळविण्यास तिला एक साधनच मिळाले. ती म्हणाली, 'ज्या लोकांनी तुला तुझी काहीही चुकी नसताना आभाळातून पार पाताळात लोटून दिले, त्यांच्यासाठी तुझा जीव एवढा का कासावीस होत आहे ? अशा लोकांसाठी, अशा समाजाच्या बाबतीत आमचं हेच कर्तव्य आहे की भरबाजारात ह्या मेल्यांची नाकं कापून त्यांची गाढवावरून धिंड काढावी....'

'खलास ! त्या दिवसापासून मी आपला उरलासुरला धर्म, शील, मर्यादा, मान—सारे काही पायदळी तुडवले. गुरदेईची अनवरजान बनून नाच-गाणे शिकू लागले, सौंदर्य तर मला ईश्वराने मुक्तहस्ताने बहाल केले होतेच. थोड्याच दिवसांत मी आपल्या कामात प्रवीण झाले. इतकी की, माझे नाव सर्वतोमुखी झाले.'

'बाळ, आज तू समाजाची दशा पाहतेस ना ? जेव्हा मी हिंदुधर्माची पवित्र कन्या

होते, तेव्हा ह्या समाजाने मला जोडे मारून मेलेल्या उंदराप्रमाणे बाहेर फेकून दिले होते. पण आज ? मी मुसलमान आहे, कलावंतीण आहे, पण तोच समाज. आणि स्वतःला संस्कृतीचे व धर्माचे मक्तेदार समजणारे ह्या समाजाचे पुढारी आज माझ्या बैठकीला येऊन माझे जोडे चाटतात. त्यातच स्वतःला धन्य समजतात. दुसऱ्या शब्दांत सांगू ? जेव्हा मी समाजाचे एक निरोगी आणि सुदृढ अंग होते, तेव्हा समाजाने मला आपल्यापासून तोडून टाकून ह्या घाणीत फेकून दिले, पण आज ज्यात किडे वळवळत आहेत, ज्याच्या दुर्गंधीने चांगला मनुष्य सुद्धा महारोगी होईल अशा समाजाचे घाणेरडे सडलेले हे अंग चाटण्यासाठी, त्याची हांजीहांजी करण्यासाठी तोच समाज लाळ घोटीत आहे.

'हे मोठ्या थाटामाटात कोणाचे लग्न होत आहे, माहीत आहे ? माझ्या सावत्र मुलाचे लग्न आहे हे. तू अर्धा तास अगोदर आली असतीस ना, तर तुला एक तमाशा दाखविला असता. ज्याने भाकरीच्या एका तुकड्यासाठी मला मृतप्राय अवस्थेत घराबाहेर काढले, फक्त एक रात्र मी एका चांगल्या मुसल्मानाच्या घरी राहिले ह्या सबबीवर मला कायमचेच तेथे ठेवले, तशी मुद्दाम व्यवस्था केली—तोच करमचंद, नवरदेवाचा मोठा भाऊ, माझा थोरला सावत्र मुलगा, नुकताच येथे येऊन गेला. त्याच्याबरोबर तो सैतान पंडितही होता. ते कशासाठी येथे आले होते माहीत आहे ? करमचंद आपल्या आईबरोबर प्रेमालाप करण्यासाठी, एका वेश्येच्या पायावर डोके ठेवून प्रेमाची भीक मागण्यासाठी आणि तो थेरडा पंडित—ज्याने प्रथम 'मुली मुली' करून मला आश्रय दिला, ज्या पापी चांडाळाने मला तुझ्या बापाकडे (ताराचंद) विकले—तो चांडाळ आपल्या यजमानकन्येकडे प्रेमाची भीक मागण्यास आला होता. सुंदरी ! त्या लोकांची 'हाय, मार डाला, तुझ्या नयनबाणांनी मी जखमी झालो, तुझ्या नखऱ्यांवर आम्ही फिदा झालो' ही बडबड ऐकली असतीस आणि एक मुलगा आईजवळ, एक बाप मुलीजवळ कशी प्रेमयाचना करतो हे पाहिले असतेस तर तूही जमीनदोस्त झाली असतीस. मी उद्याचा वायदा करून त्यांची ब्याद टाळली नसती तर आज रात्री कुत्र्याप्रमाणे लाळ घोटाळीत ते माझ्या दारात पडून राहिले असते.

'मी येथे कशाला आले आहे हे तुला ऐकावयाचे आहे काय ? मुजऱ्यासाठी ? आणि तेही ह्या लोकांत ? नाही, असं मी कधीच करणार नाही. मी एका दुर्दम्य इच्छेच्या ओढीने येथे आले आहे. त्या विचाराने माझी तहानभूक हिरावून घेतली आहे. सुंदरी, बाळ, ऐक; मी ह्या दोघांच्या नरडीचा घोट घेण्यासाठी येथे आले आहे. म्हणूनच कधीपासून ह्या लग्नाची वाट पाहात होते. ह्या कामासाठी मी आपल्या दोन दलालांनाही लावले होते. आणि तो तिसरा कसाई ! ज्याने मला त्या वेश्येकडे विकले होते, त्याची

तर मी कधीच विल्हेवाट लावली. आजपर्यंत मी त्या गोष्टीची ह्या कानाची त्या कानाला खबर लागू दिली नाही. ती फार मोठी कहाणी आहे. त्याच्या खुनाची हकीगत सांगून तुझ्या कोमल हृदयाला धक्का का देऊ? हो, एक इच्छा आहे, बहुधा ती मनातच ठेवून मला मरावे लागणार. त्या कसायाच्या (ताराचंदाच्या) रक्ताने मला हात रंगवायचे होते. पण हाय, हजारो खटपटी करूनसुद्धा मी त्याला शोधू शकले नाही. जर मिळाला असता... '

ह्यापेक्षा अधिक काही ऐकण्याची ताकद सुंदरीत नव्हती. तिचे सारे शरीर भट्टी-सारखे तापले होते. बचनसिंहाच्या उपदेशाने तिच्या मूळ विचारात थोडेबहुत परिवर्तन झाले होते. एखाद्या छोट्याशा रोपट्याभोवती छोटेसे कुंपण घालून त्याचे रक्षण करावयास जावे, पण वादळी झंझावाताच्या एका फटक्याने त्याचा समूळ नाश व्हावा, त्याप्रमाणे ते बदलते विचार उडून गेले. आपल्या पायाखालील जमीन सरकते आहे की काय असे तिला वाटले. सबंध खोली आपल्याभोवती फिरत आहे असा तिला भास झाला.

अनवरचे बोलणे ऐकता ऐकता तिचे अखेरचे शब्द मधेच पकडून ती आवेशाने उठून म्हणाली, ' मी त्याच्या नरडीचा घोट घेईन. आई, जर मी तुझी मुलगी असेन तर त्याचा गळा दाबून माझ्या आणि तुझ्या हृदयांत भडकणारी आग विझवीन. आता-पासून त्या चांडाळाला शोधण्याचा प्रयत्न सुरू करते.' असे म्हणतच ती तेथून उठली व दडदड जिना उतरून खाली आली. काही तरी खूळ अंगात संचारल्यागत ती वागत होती, कशाने तरी झपाटल्यागत तिची अवस्था झाली होती.

सुंदरी गेल्यावर अनवरजान स्तब्ध बसून राहिली. तिच्या डोक्यात आपणच म्हटलेले वाक्य घुमत होते, ' मी खऱ्या मनाने स्वीकार करते...'

आजची घटना तिला स्वप्नवत वाटत होती.

सुंदरीने खाली उतरून पाहिले तर बचनसिंह तिचीच वाट पाहात इकडे-तिकडे फिरत होता. रात्रीचे दोन प्रहर झाले होते. बचनसिंह सुंदरीला घेऊन घराकडे निघाला तेव्हा तिसरा प्रहर सुरू झाला होता.

[27]

सुंदरी घरी पोहोचल्यावर रात्रीचा तिसरा प्रहर दोघांनी गप्पा मारण्यातच घालविला. खोलीत गेल्यावर दिव्याच्या उजेडात बचनसिंहाने सुंदरीचा चेहरा पाहिल्यावर त्याला

जरा भीतीच वाटली. सुंदरीच्या डोळ्यांतून स्फुलिंग बाहेर पडत होते. तिच्या चेहऱ्यावर एक भयानक आणि हिंस्र हसू दिसत होते.

घाईघाईने तिचा खांदा हलवून त्याने विचारले, 'सुंदरी, काय झालं ?'

'काही नाही, सर्व ठीक आहे.' सुंदरीला वाटले, बचनसिंह तिच्या मनातील विचार जाणण्याचा प्रयत्न करीत आहे. तिने जिवाचा आटापिटा करून आपल्या मनातील वादळ थांबविण्याचा प्रयत्न केला. विषयांतर करीत तिने म्हटले, 'तुम्ही परत त्या वऱ्हाडाकडे गेला होता वाटतं ?'

'नाही. घरीच होतो. सुंदरी ! तुझे डोळे खूप लाल दिसत आहेत. काय झालं ?'

जागरणाचे निमित्त करून डोळे चोळीत ती म्हणाली, 'हे सर्व आपल्याच कृपेचं फळ आहे.'

'कसं काय ?'

'तुम्ही असं काम सोपविलं होतं ना ?'

सुंदरीच्या ह्या उत्साहपूर्ण उत्तराने तिला थोडे तरी यश मिळाले असले पाहिजे हे बचनसिंह समजून चुकला. त्याने तिला धीर देण्यासाठी म्हटले,

'अरे हो, सांग काय झाले ते.'

'मी जे करावयास गेले होते तेच झाले.'

'काम फत्ते ?'

'अगदी पूर्ण.'

'हे अशक्य आहे.'

'अपेक्षेपेक्षाही अधिक यश मिळाले.'

'म्हणजे !'

ह्यावर सुंदरीने फक्त एवढेच उत्तर दिले की, 'मी अनवरकडून कबूल करून घेतले की मुजरा करणार नाही.'

बचनसिंहाचा यावर विश्वास बसला नाही. त्याने अविश्वासाने तिच्याकडे पाहात म्हटले, 'सुंदरी ! तिने तुझी ब्याद टाळण्यासाठी तुला खोटे सांगितले असेल.'

सुंदरीचा चेहरा दृढ होता. ती म्हणाली, 'काही का असेना, ती मुजरा करणार नाही हे नक्की कळेलच तुम्हांला.'

'सुंदरी, ती नाचली नाही तर तू वाळूतूनही तेल काढण्यास यशस्वी झालीस असे मी समजेन. ती सकाळचा मुजरा करणार नाही हे धरून चालू पण वऱ्हाड परवा जाणार आहे. ती जोपर्यंत दिवाणपुरात आहे तोपर्यंत मुजरा करणार नाही असे का कबूल करून घेतले नाहीस ?'

सुंदरी हळूच म्हणाली, 'मी तर तिच्याकडून फार मोठे वचन घेतले आहे.'

'काय?'

'तिच्या जिवात जीव असेपर्यंत ती हे काम करणार नाही. माझ्या म्हणण्याचा अर्थ असा की ती हा धंदा कायमचा सोडून देणार आहे. कालचा मुजरा तिच्या जीवनातील [illegible] म मुजरा होता असे समजा ना!'

'हें कसं शक्य आहे सुंदरी?' बचनसिंहाला वाटले सुंदरी थट्टा तर करीत नाही ना! त्याने सुंदरीकडे पाहून म्हटले, 'गिधाडाची मुडदे खाण्याची सवय सोडवून त्याला शाकाहारी करण्यासारखंच हे अशक्य वाटतं.'

सुंदरीने त्याची खात्री पटविली. पण जे घडले त्यातील अवाक्षरसुद्धा सांगितले नाही. जी प्रतिज्ञा तिने आईसमोर केली होती, तिचा पत्ता बचनसिंहाला लागला तर तो तिची टरच उडवील, आणि तिला त्यापासून परावृत्त करण्याचा प्रयत्न करील, अशी तिला भीती वाटली.

बचनसिंहास आनंदाने वेड लागण्याची पाळी आली. पहिल्याप्रथम इतके घवघवीत यश आणि तेही सुंदरीच्या हातून! तो गहिवरून म्हणाला, 'सुंदरी, तर मग आपल्याला जरूर यश मिळेल.'

ती त्याचे बोलणे अजमावून म्हणाली, 'नाही, नाही. आपण यशस्वी झालो असंच म्हणा ना.'

'सुंदरी, आपण दोघांची एक होऊन जाऊ.'

'एक तर आपण आधीच झालो आहोत.'

'नाही सुंदरी, आपण अजून दोन आहोत. त्याचप्रमाणे साफल्यही अजून खूप दूर आहे. आताशी कुठे आपण पहिले पाऊल उचलले आहे.'

'काय म्हणालात? आपण दोन आहोत? आपण तर कधीच एक झालो आहोत आणि ही एकात्मकता अमर, अटळ आहे.'

'आध्यात्मिक दृष्टीने पाहिले तर ही गोष्ट ठीक आहे, सुंदरी. पण समाजाच्या दृष्टीने पाहिले तर अजून आपण दोन आहोत.'

सुंदरीने मोठ्या प्रेमाने बचनसिंहाचा हात हातात धरून म्हटले, 'समाज? कोणत्या समाजाबद्दल बोलता? ज्या समाजाच्या डोळ्यांत द्वैत, ईर्ष्या, उपेक्षा, जुलूम वगैरे रोगांचा मोतीबिंदू झाला आहे त्या समाजाबद्दल बोलता का? ह्या समाजाला आपण एक दिसत नाही याचा अर्थ असा नव्हे की आपण एक नाही. समाजाच्या दृष्टीला आपण एका-ऐवजी दोन वेगवेगळी दिसतो तो दोष सामाजिक दृष्टीचा आहे, आणि कोट्यवधी जन्मांनंतरही ती दृष्टी सुधारणार नाही. समाज...तुम्ही ह्या समाजाला माणसांची जात

समजता...पण मी...मी ..!'

बोलता बोलता सुंदरीचा चेहरा तापलेल्या सांडशीसारखा लाल झाला. तिची छाती वेगाने खालीवर होऊ लागली. तिची अवस्था पाहून बचनसिंह घाबरून गेला. बारकाईने सुंदरीच्या चेहऱ्याकडे आणि तिच्या डोळ्यांकडे पाहिल्यावर त्याला वाटले, हिला वेड-बीड तर लागले नाही ना ?

कोणताही असाध्य रोग सहजासहजी मागे हटत नाही, पण एखाद्या कुशल वैद्याच्या मेहनतीने रोग्यात थोडाफार फरक जरी दिसून आला, तरी जराशा कुपथ्याने तो रोग परत उफाळून येतो म्हणतात.

ह्यावेळी सुंदरीची मनःस्थिती पण अगदी अशीच होती. बचनसिंहाने मोठ्या मुश्किलीने तिला चुकीच्या रस्त्यावरून सरळ रस्त्यावर आणले होते; पण तेवढ्यात अनवरजानच्या प्रकरणाने तिला परत आपल्या मूळ जागी नेऊन पोहोचविले.

'सुंदरी, तुला झालं आहे तरी काय ?' बचनसिंहाने तिला गदागदा हलवीत विचारले. 'तू तर परत हिंसेचा अवतार झाली आहेस. काय झालं ?' पण लगेच त्याला वाटले ह्यावेळी ह्या विषयावर चर्चा करीत राहिले तर सुंदरी अधिकच भडकेल, म्हणून त्याने हा विषयच टाळला. विषयांतर करण्यासाठी तो म्हणाला, 'असो. जाऊ देत ह्या गोष्टी. खरंच सुंदरी, आता आपल्यास पुढील कार्यक्रम आखला पाहिजे. तुझा काय विचार आहे ?'

आता सुंदरीने स्वतःला चांगलेच सावरले होते. आपल्या मनाच्या कमकुवतपणाबद्दल तिला पश्चात्ताप होत होता. ज्या गोष्टीचा मागमूसही ती बचनसिंहाला लागू देणार नव्हती तीच गोष्ट आपल्या वागण्याने आपण उगीचच प्रकट केली असे तिला वाटले. ह्या विषयावर जास्त बोलले तर आपल्या तोंडून कमीअधिक काही निघून जाईल असा विचार करून सुंदरीही हा विषय टाळणेच योग्य हे समजली आणि तिने बचनसिंहाच्या प्रश्नाचे उत्तर दिले, 'पण मागच्या पत्रात तुम्ही तर लिहिले होते की तुम्ही दूर कोठे जाऊ शकणार नाही, शिवाय अशा स्थितीत...'

'ठीक आहे, पण जोपर्यंत येथे राहावयाचे आहे तोपर्यंत काही ना काही काम सुरू ठेवलेच पाहिजे. सुंदरी, पहिल्याच कामात यश मिळाल्यामुळे माझा जोम वाढला आहे. पण माझी अधिक मदार तुझ्यावर आहे. जे काम मी कित्येक दिवस एकसारखी वणवण करून सुद्धा करू शकलो नाही, ते काम तू फक्त एकदा जाऊन करून टाकलेस. म्हणून म्हणतो आपण लौकरात लौकर...'

सुंदरी म्हणाली, 'मी तर काहीच केले नाही. थोडेफार जे केले ते आपल्याच शिकवणुकीचे आणि सहवासाचे फळ आहे. नाहीतर ह्या वानरिणीला थोडेच हे साध्य झाले असते ? आणखी तुम्हांला ह्या बाबतीत काय म्हणावयाचे आहे ?'

'मला तेच म्हणावयाचे आहे, पण ते ऐकून मघाशी तुझी तब्येत एकदम बिघडली.'

'म्हणजे काय?'

'याचा अर्थ हाच की लौकरात लौकर आपला विवाह झाला पाहिजे म्हणजे आपल्या उद्देश्याच्या सिद्धीसाठी आपणांस उजळ माथ्याने वावरता येईल.'

सुंदरी संकोचाने हळूच हसून म्हणाली, 'पण याच्याशिवाय आपले मनोरथ सफल होणार नाहीत का?

'नाही सुंदरी, हे अशक्य आहे.'

'मला नाही असं वाटत.'

'मग तुझे म्हणणे काय आहे?'

'माझ्या मते आपल्याला काही दिवस वेगवेगळे राहून काम केले पाहिजे. काम पूर्ण झाल्यावर मग आपण कायमची एक होऊ या.'

'सुंदरी, तुझे बोलणे ऐकून मला भय वाटू लागले आहे. तुझ्या म्हणण्याचा अर्थ मी नाही समजलो.'

'प्रेमाच्या मार्गात भीतीचे काम काय? तुमच्या तोंडून हे भलतेच काय ऐकते आहे मी? माझ्या म्हणण्याचा अर्थ असा की...' बोलता बोलता ती एकदम गप्प बसली. बचनसिंहाची अस्वस्थता आणखी वाढली.

तो म्हणाला, 'सांग ना ह्याचा अर्थ?'

'माझ्या म्हणण्याचा अर्थ असा की...काही काळ तुम्ही मला विसरून जा.'

'तुला विसरून जाऊ?' बचनसिंह कळवळून म्हणाला, 'सुंदरी, हे तू काय बोलतेस? अनवरच्या घरी जाण्याच्या आधी तर तुझी ही स्थिती नव्हती.'

'खरंच मला विसरून जा' त्याच्या बोलण्याकडे दुर्लक्ष करून ती म्हणाली, 'तुम्ही मला विसरू शकत नसाल तर माझ्या स्मृतीलाच सुंदरी समजून तिला आपल्या हृदयात कोरून ठेवा.'

बचनसिंहाचे डोळे भरून आले. त्याने व्याकुळतेने सुंदरीचे हात पकडून म्हटले, 'सुंदरी, कृपा करून असे बोलू नकोस. माझ्यावर दया करून माझी मनःस्थिती समजावून घे.'

सुंदरीने बचनसिंहाचा हात पकडून हृदयाशी घट्ट धरून आपली मनःस्थिती लपवीत म्हटले, 'तुम्हांला असे काय झाले आहे? मी तर अगदी तुमचीच, फक्त तुमचीच आहे. असे अश्रू ढाळून माझ्या संयमाचा बांध फोडू नका. माझी प्रतिज्ञा अर्धवटच राहू देऊ नका.'

बचनसिंहाच्या हृदयातील अग्नी शमन करण्यासाठी सुंदरीजवळ जे पाणी होते त्याचे जणू अग्नीत रूपांतर आले. आगीनेच आग विझवण्याचा तिचा प्रयत्न चालला होता.

तिला आपल्या हृदयातील आग विझवण्यासाठी पाणी हवे होते, पण दुसऱ्या बाजूला सुद्धा आगच होती. एखाद्या घराला आग लागावी आणि ती विझविण्यासाठी आणण्यात आलेले इंजिनही जळत असावे तशीच स्थिती झाली ही.

बचनसिंहाने परत म्हटले, 'सुंदरी, असे कोड्यात बोलू नकोस. जे मनात असेल ते साफ साफ सांग.'

सुंदरीने बळेबळेच हसण्याचा प्रयत्न करीत म्हणाली, 'साफसाफच सर्व सांगत आहे. केवळ माझ्यासाठी तुम्ही जी जी संकटे झेललीत ती का मला माहिती नाहीत? ही संकटपरंपरा संपली असती तर मला थोडेफार हायसे वाटले असते. पण माझ्यासाठी अजून तुम्हांला खूप सहन करावे लागणार आहे असे वाटते. म्हणून सध्या काही दिवस तुम्ही मला आपल्यापासून अलग ठेवावे, असे मला वाटते. माताजींच्या जिवात जीव असेपर्यंत तुम्ही त्यांची सेवा करा. घरात सूनमुख पाहिल्यावर त्या आपले सर्व दुःख विसरून जातील.'

बचनसिंहाला शेकडो इंगळ्या डसल्याप्रमाणे वेदना होत होत्या. एका हाताने डोळे झाकून दुसऱ्या हाताने सुंदरीला गप्प बसण्याचा संकेत करीत तो म्हणाला, 'पुरे, पुरे. सुंदरी, कृपा करून ही कहाणी समाप्त कर. तुझ्याशिवाय जर दुसऱ्या कोणाशी लग्न करावे लागले तर त्याचा परिणाम म्हणजे माझा मृत्यू लोकांना पाहावा लागेल, ह्यापेक्षा अधिक मी काही सांगू शकत नाही, ऐकण्याचीही इच्छा नाही.'

सुंदरीचे त्याच्या बोलण्याकडे लक्ष नव्हते. ती कसल्यातरी गहन विचारात गर्क झाली होती. बचनसिंह देखील अधिक काही बोलणे उचित नाही हे ओळखून उठू लागला. परत कधी तरी सुंदरी खुशीत असेल तेव्हा तिच्या मनातील हा चुकीचा विचार काढून टाकण्याचा प्रयत्न करावा, असे त्याने ठरविले.

इकडे सुंदरी विचार करीत होती की, बचनसिंहाचे मन कसे वळवावे, तिच्याशी फक्त आत्मिक संबंध ठेवून एखाद्या कुलीन घराण्यातील मुलीशी विवाह करून आपले जीवन सुखमय करण्यासाठी त्याला कसे तयार करावे बरे!

हळूहळू सकाळची प्रभा फाकू लागली. बचनसिंह उठून आपल्या खोलीत जाऊ लागला. सुंदरीने मधुर स्वरात त्याला विचारले, 'चाललात?'

'परत कधीतरी तुझे मन वळविण्याचा प्रयत्न करीन.' असे म्हणून बचनसिंह आपल्या खोलीत गेला. सुंदरीच्या अर्धोन्मीलित डोळ्यांसमोर अनवर नाचत होती. अशाच स्थितीत तिचा डोळा लागला.

तीन प्रहरांच्या जागरणानंतर चौथ्या प्रहरी थंड हवेमुळे सुंदरीला झोप लागली खरी, पण किती भयंकर स्वप्ने तिने पाहिली. जणू झोपेने तिला एखाद्या खुनी दुनियेत फेकून दिले होते. सुऱ्या, कट्यारी, गंडासे यांचे ढीगच्या ढीग तिच्या नजरेसमोर नाचू लागले. त्या दुनियेचा कोपरानकोपरा 'खून खून' अशा आरोळ्या ठोकीत होता. झाडावर बसलेले पक्षीसुद्धा खुनाचे गाणे म्हणत होते. नदी, नाले, तळी, विहिरी यांचे पाणी रक्तमय बनले होते. ती जाई तेथे तिला खुनाची विलापगीते ऐकू येत होती. तिचे कपडे, केस, डोळे, तोंड सर्वोतून रक्ताचे पाट वाहात होते. ती या रक्ताच्या नदीतून वाहात वाहात खोलवर गेली, तेथे छोट्या छोट्या माशांपासून ते मोठमोठ्या मगरींपर्यंत सर्वांची पोटे रक्ताने तुडुंब भरली होती. ह्या जीवजंतूंना माणसासारखे बोलता येत होते. 'खून, खून' करीत ते एकमेकांच्या मागे धावत होते. शिकार व शिकारी सर्वांच्या तोंडी एकच शब्द होता, 'खून, खून, खून'.

सुंदरीला वाटले आता आपण त्या खुनी नदीच्या तळाशी जाऊन पोहोचलो आहोत. ती गुदमरली होती. घाबरून तिने किंकाळी फोडली, पण ती किंकाळी ओठाबाहेर पडण्याआधीच आतल्याआत विरून गेली. तिने गडबडीने कूस बदलली, पाहते तो तिचे दोन्ही हात छातीवर होते. सूर्यप्रकाशाने खोली न्हाऊन गेली होती. त्या किरणांच्या पिवळ्या रंगाऐवजी सुंदरीला ती रक्तासारखी लाल वाटत होती. अजूनही 'खून, खून'-च्या आरोळ्या तिच्या कानात घुमत होत्या.

तिने डोळे उघडले पण पुन्हा गपकन मिटून घेतले. 'खून, खून' हा आवाज अजून तिच्या कानांचे पडदे फाडीत होता. तिने परत डोळे उघडले आणि ती खाटेवरून उठून बसली. दिवस खूपच वर आला होता. सर्व वर माणसांनी गजबजले असून चारही बाजूंनी 'खून, खून' असे आवाज येत असल्याचा तिला भास झाला.

ती पटकन खोलीच्या बाहेर पडली. सारा गाव बचनसिंहाभोवती जमला होता. पोलिसांनी बचनसिंहास हातकड्या घातल्या होत्या. त्याची आई हमसाहमशी रडत होती. कोणी म्हटले, 'अरे, बचनसिंहाने तीन खून केले आहेत. एक त्या वेश्येचा, दुसरा म्हाताऱ्या पंडिताचा आणि तिसरा नवऱ्या मुलाच्या भावाचा – करमचंदाचा.'

'ऑं! तीन खून! बचनसिंहाने!' सुंदरीच्या डोळ्यांसमोर अंधेरी आली. त्याच वेळी पोलीस बचनसिंहास ठाण्यावर नेत होते. घरातून बाहेर पडून गर्दीतून वेड्यासारखी धावत जाऊन सुंदरीने बचनसिंहास मिठी मारली आणि जोरात किंकाळी फोडून

त्याच्या पायाशीच ती बेशुद्ध होऊन पडली. गर्दी पुढे निघून गेली आणि ती तशीच पडून राहिली.

बचनसिंहाला तर हे सर्व स्वप्नवतच वाटत होते. पण सुंदरीची दशा पाहून त्याचा धीर सुटला. कित्येकदा त्याने मागे वळून पाहिले. एकदोनदा त्याने थांबण्याचा प्रयत्न केला. पण शिपायांच्या धक्क्यांपुढे त्याचे काही चालले नाही. क्षणार्धात सर्व काही शांत झाले.

सगळ्या गावभर एकच बातमी पसरली—बचनसिंहाने एका रात्रीत तीन खून केले.

काही वेळानंतर सुंदरी शुद्धीवर आली. आपले सारे शरीर मातीत लडबडले असल्याचे तिला आढळून आले. ती खाणी गावातील आपल्या खोलीत होती. खाणीच्या काही लोकांनी तिला बेशुद्धावस्थेत उचलून येथे आणून पोहोचविले होते. तिच्याजवळ अनेक लोक बसले होते. ती उठून बसली. कोठूनतरी तिच्या कानावर आवाज आला, 'बचनसिंहाने तीन खून केले आहेत.'

सुंदरीच्या डोळ्यांभोवती काजवे चमकू लागले. आपल्या डोक्याशी अचानक बॉम्ब-स्फोट झाला असून त्याने आपल्या शरीराच्या ठिकऱ्या ठिकऱ्या उडाल्या आहेत असे तिला वाटले. पाचेक मिनिटे ती अशाच अवस्थेत पडून राहिली. विचार करण्याची ताकदच तिच्यात उरली नव्हती. तिला चक्कर येऊन ती परत बेशुद्ध पडली.

कितीवेळ ती अशा अवस्थेत पडून राहिली देव जाणे. जेव्हा ती दुसऱ्यांदा शुद्धीवर आली तेव्हा तिला बचनसिंहाला अटक झाल्याची बातमी आपण स्वप्नातच ऐकली असे वाटले.

ती वेड्यासारखी धडपडत दिवाणपूरच्या रस्त्याकडे धावली. कित्येक लोकांनी तिला थांबविण्याचा प्रयत्न केला पण ती थांबली नाही. रस्त्यावरून जाणाऱ्या एका टांग्यात ती बसली.

बचनसिंहाच्या घरी जाऊन पाहते तर बचनसिंहाची आई खाटेवर बेशुद्धावस्थेत पडली होती आणि शेजारच्या बायका तिला शुद्धीवर आणण्याच्या खटपटीत होत्या.

सुंदरीने वेड्यासारखे सर्वांकडे पाहिले. पण कोणीही तिची विचारपूस केली नाही. त्याच वेळीं बचनसिंहाच्या आईने डोळे उघडले. सुंदरीनें तिच्याकडे धाव घेतली.

सुंदरीला पाहताच सदाकौर रागाने लाल झाली. तिला हाताने दूर ढकलीत ती कडाडली, 'चालती हो येथून! कुत्री! कमजात! जा तोंड काळं कर एकदाची! तूच या साऱ्या

अनर्थास कारणीभूत आहेस ! पांढऱ्या पायाची कारटी ! ज्या दिवशी तुझा अपशकुनी चेहरा पाहिला, त्याच दिवशी माझा मुलगा धुळीला मिळाला. तू आली नसतीस तर माझे असे निस्संतान झाले नसते. चालती हो काळतोंडे !' बोलता बोलता सदाकौर इतकी आवेशात आली की खाटेवरून उठून सुंदरीला शिव्या देऊ लागली.

दुसरी वेळ असती तर असले बोलणे ऐकून सुंदरीने काय केले असते देव जाणे ! जंगलात राहणारा सिंह आपल्याजवळ कोणालाही फिरकू देत नाही, इतका त्याचा दरारा असतो. पण बिचारा पिंजऱ्यात बद्ध होऊन प्राणिसंग्रहालयात डांबला गेला की माकडांनी आणि अस्वलांनी दाखविलेल्या वाकुल्याही त्याला निमूटपणे सहन कराव्या लागतात. सुंदरीची अशीच स्थिती होती. उलट्या पावली ती पोलिसठाण्याकडे धावली.

शरीराला एखादी जखम झाल्यावर उष्णतेमुळे तत्काळ वेदना होत नाहीत, पण काही वेळाने जखम थंड झाल्यावर ती ठणकू लागते, त्याप्रमाणे रस्त्याने चालता चालता एकदम सुंदरीला जाणीव झाली, 'आं, खुनाचा खटला, बचनसिंहावर ?' प्रसंगाचे गांभीर्य आता तिच्या लक्षात आले. समोर शिकारी टपून बसले आहेत, मागे जंगलात आगीचा डोंब उसळला आहे, उजव्या बाजूला नदी वाहात आहे, डाव्या बाजूला वस्ती आहे, अशा तऱ्हेने सर्व बाजूंनी घेरलेल्या भयग्रस्त हरिणीप्रमाणे तिची स्थिती झाली.

तिने पुन्हा एकदा प्राप्त परिस्थितीचा विचार केला, तेव्हा भीतीने तिचा थरकाप झाला. तिचे सर्वस्व, तिचा प्रियतम खुनाच्या खोट्या आरोपात अडकला होता. त्याची आई बिचारी अगदी कोलमडून गेली होती. तिच्याभोवती जमलेले लोक नक्राश्रू ढाळीत होते. पहिल्यापासूनच सबंध गाव बचनसिंहाचा शत्रू बनला होता. बचनसिंह खुनी असल्याच्या आरोपावर त्यांचा विश्वास बसला होता, यात नवल नव्हते.

आपण ज्या नावेत बसलो आहोत तिचा नावाडी मगरीच्या तावडीत सापडला असून नाव एका भयंकर भोवऱ्यात गरगर फिरत असल्याचे तिला दिसत होते. रोडूचा आधार होता तोही दुष्टांनी हिरावून घेतला. आई मिळाली पण अंधेऱ्या आकाशात विजलीप्रमाणे एकदाच चमकून कायमची लुप्त झाली होती. ह्याशिवाय तिला कळत होते की, गावात आता तिला थारा दिला जाणार नाही, कारण सारा गाव पालसिंह आणि कंपनीला घाबरत होता. म्हणूनच बचनसिंहाची विचारसरणी पटत असूनही खाणी गावातील लोकांनी यावेळी तिला मदत केली नाही. एवढेच नव्हे तर आपण बचनसिंहाच्या बाजूचे आहोत असा डांगोरा पिटणारे लोक आता आपण त्या गावचेच नाही असे दाखवून तिला चुकवू लागले.

ह्या साऱ्या परिस्थितीचा आढावा घेतल्यावर सुंदरीने विचार केला, 'आता आपले येथे राहणे व्यर्थच नसून धोक्याचेही आहे. पण कोठे जावे बरे ? तेही आपले सर्वस्व

मृत्यूच्या दाढेत अडकले असताना कोठे जावे? दियाणपुरातील लोक तर पहिल्यापासून आपल्याकडे तिरस्काराने किंवा कामुकतेने पाहतात.' स्त्री किती निर्बल आणि असमर्थ आहे याची जाणीव तिला आज पहिल्याप्रथम झाली.

याच विचारात गर्क होऊन तिने अनेक बेत केले, पण ती कोणत्याही निर्णयाप्रत जाऊन पोहोचली नाही. आपल्या प्रियकरास आपण काहीच मदत करू शकत नाही याच गोष्टीचे तिला सर्वात अधिक दुःख होत होते. तिला स्वतःचीच घृणा वाटू लागली. आणखी अधिक दुःख पाहण्यापूर्वीच आपल्या जिवाचे बरेवाईट करावे असे तिला वाटले. म्हणजे सगळ्या कटकटी व दुःखापासून तरी सुटका होईल! पण कोणत्या तरी सुप्त शक्तीने तिला हे करू दिले नाही. ती वारंवार हाच विचार करीत होती : 'आपल्या आईने किती घाई केली! आपल्या शत्रूंचा नाश करूनच तिला मरावयाचेच होते तर एखादे पत्र तरी लिहून ठेवावयाचे होते, म्हणजे असा दुसऱ्याच्या गळ्याला तरी तात लागला नसता.'

ह्याच विचारात ती ठाण्यावर जाऊन पोहोचली. तिने बचनसिहाची भेट घेण्याचा खूप प्रयत्न केला पण पोलिसांचे धक्के आणि शिव्या खाण्याशिवाय तिला दुसरे काहीच मिळाले नाही. सबंध दिवस ती वणवण फिरत होती. गावातील अनेक प्रतिष्ठित वजनदार लोकांपुढे जाऊन तिने नाक घासले, पोलिसांना सांगून केवळ एकदा आपली बचनसिंहाशी भेट करून द्या अशा विनवण्या केल्या, पण कोणीही तिचे म्हणणे ऐकले नाही. ती कोठेही गेली तरी तिला फक्त शिव्यांच्या लाखोल्या आणि नाकक्याकुचक्या टोमणे याशिवाय काहीच मिळाले नाही. शेवटी रडत रडत संध्याकाळी ती खाणी गावातील आपल्या खोलीत येऊन पडली. एखादा पक्षी स्वच्छंदाने आकाशात उडत असता अचानक कोणीतरी त्याचे पंख ओरबाडून त्याला धुळीत फेकून द्यावे त्याप्रमाणे तिची गत झाली होती. उपाशी पोटी सबंध रात्रभर ती तशीच पडून राहिली. आज कोणीही जवळ येऊन तिच्याशी बोलले नाही. तिला त्याची आवश्यकताही वाटली नाही.

अजून नीट उजाडलेही नव्हते. पहाटे-पहाटेच तिला कोणी तरी हाक मारली. तो एक शिपाई होता. बचनसिहाने त्याच्या हाती तिला एक पत्र पाठविले होते. पत्र देऊन शिपाई लगेच निघून गेला. सुंदरी आत येऊन पत्र वाचू लागली.

सुंदरी,

स्वप्नातसुद्धा ज्याचा कधी विचार केला नव्हता ते घडले. मनातील सर्व इच्छा-आकांक्षांवर तुषाराघात झाला. मला अटक केल्यामुळे तुझी काय दशा झाली होती— ते मी विसरलो नाही. माझे मन जळत आहे, जो हिरा मोठ्या मुश्किलीने प्राप्त करून शिरोधार्य करण्याचा माझा विचार होता तोच हिरा आज मातीमोल झालेला पाहून

माझे मन भडकून उठले आहे; आणि दुनियेच्या, ह्या मूर्ख समाजाच्या, दृष्टीने तर तो हिरा कवडीमोलाचा सुद्धा नाही.

सुंदरी, मी तुला सुखी करू शकलो असतो तर! पण मीच फुटक्या नशिबाचा आहे. इतके मोठे सुख माझ्या नशिबात नव्हते. तुझ्या मागच्या पत्रातील विचारांना मी हसलो होतो, पण आज तेच खरे ठरले. तुझे ते 'फूल' आणि 'हवे'चे गूढ तत्त्वज्ञान मी आज समजू शकलो. देवी, आता आपला कायमचा वियोग होणार असे माझे मन सांगत आहे. आपण आतापर्यंत एकमेकांच्या सहवासाचे सुख भोगले तेवढेच आपल्या नशिबात होते असे माझे अंतर्मन सांगत आहे. एका वेळी तीन खुनांचा खटला माझ्यावर गुदरला गेला आहे. सुंदरी, हा काही मामुली खटला नव्हे. यातून मी वाचण्याची आशा कमीच आहे. ज्या प्रकाराने गावकऱ्यांनी माझ्याविरुद्ध हा खटला तयार केल्याचे माझ्या ऐकिवात आहे ते खरे असेल तर तुझा माझा सहवास इतकाच होता असे समज.

पण सुंदरी, तुलाही वाटते का की मी खुनी आहे? तुलाही माझ्या निर्दोषीपणाबद्दल शंका आहे का? सारे जग मला खुनी समजू दे, न्यायालयात मला खुनी समजून फाशीची शिक्षाही मिळू दे, मला त्यामुळे मुळीच दुःख होणार नाही. पण सुंदरी, तूही असेच समजत असशील तर मात्र मला मरणप्राय दुःख होईल.

जास्त काही लिहिण्यास वेळ नाही. हा थोडा मजकूर पोहोचविण्याची व्यवस्थासुद्धा मोठ्या मुश्किलीने झाली आहे. हाच मनुष्य परत तुझ्याकडे येईल तेव्हा त्याच्याजवळ पत्राचे उत्तर दे. पण या कानाचे त्या कानाला कळू देऊ नकोस. नाहीतर बिचाऱ्याची नोकरी जाईल. आज ज्ञानीजींनाही पत्र टाकीत आहे. ते आजकाल हरिद्वारला असतात. ते लगेच येऊन तुला आपल्याकडे घेऊन जातील. दिवाणपुराच्या जवळपाससुद्धा राहणे तुला धोक्याचे आहे. एक गोष्ट सांगू—माझी भेट घेण्याचा विचारसुद्धा मनातून काढून टाकशील तर बरे होईल. तुला कशीतरी पत्र पोहोचविण्याची व्यवस्था करीन. पत्ररूपानेच आपली भेट होत राहील. तुला पाहून माझी काय स्थिती होईल माहीत आहे? माझा धीर सुटून जाईल. मृत्यू येण्यापूर्वीच मी मरून जाईन. शिवाय तुझी काय स्थिती होईल बरे?

ह्या कठोर परीक्षेत उतरण्यासाठी तू आपले हृदय किती बळकट करतेस तेच मला पाहावयाचे आहे. मी हे लिहीत आहे पण माझी मनोदशा अतिशय खराब झाली आहे. ठाण्यावरील घड्याळ दर एक तासाने टन-टन असा आवाज करते. हा टन-टन आवाज माझ्यासाठी काही नवीन संकटे आणीत आहे की काय असे मला वाटते. हृदयात एक कळ उठते आणि मनावर ताबा ठेवणे कठीण जाते. काय सांगू माझी मनःस्थिती, सुंदरी! मी तुला धीर देत आहे पण मला धीर देणारा कोणी नाही. नशिबात जे लिहिले असेल ते चुकते थोडेच!

ह्यावेळी मला वाटत आहे की मी खरेच तुझ्याशी बोलत आहे. ह्या गप्पागोष्टींनी मला किती सुख मिळत आहे! क्षणभर मला वाटते की जगातील सारी दुःखे आणि दुःखाच्या चिंता माझ्यापासून दूर पळाल्या आहेत.

तुझा
बचनसिंह

पत्र वाचता वाचता सुंदरीच्या चेहऱ्यावरील भाव क्षणाक्षणाला पालटत होते. शेवटी तिच्या कपाळावरील शीर तटकन फुगली. डोळ्यात सूडभावना दिसू लागली आणि सूड घेण्यासाठी हात वळवळू लागले. ती चटकन उठली, दौत-टाक घेऊन पत्राचे उत्तर लिहू लागली.

जीवनसर्वस्व!

तुमचे पत्र वाचले. काय, इतक्या लवकर हातपाय गाळून बसलात? पुरुष आणि ते सुद्धा निर्दोषी असून घाबरलात? कशाने? कोणत्या दुःखाच्या संभावनेची भीती वाटली? माझी काळजी वाटली?

किती भोळे आहात तुम्ही! परत ही गोष्ट उच्चारूसुद्धा नका. तुमची माझी प्रथम भेट झाली तेव्हा माझे हृदय फुलासारखे कोमल होते, पण काही दिवसांनी (बाबाच्या मृत्यूनंतर आणि तुमच्यावर अत्याचार सुरू झाल्यानंतर) ते दगडासारखे कठीण बनले. तुमचे पत्र वाचून तर ते वज्रापेक्षाही कठीण झाले आहे.

प्रियतम, जगाच्या दृष्टीने मी कवडीमोल असेन, पण ह्या स्वार्थी आणि नीच दुनियेला मी कवडीइतकीही किंमत देत नाही. काय म्हणालात, तुम्ही मला सुख देऊ शकला नाहीत? चूक आहे. हे जे सुख तुम्ही मला दिलेत ते केवळ माझ्याच वाट्याला आले. जेव्हा मी तुम्हांला आपल्या पत्रात 'फूल' आणि 'हवे'चा दृष्टान्त दिला होता तेव्हा प्रेम-मार्गासंबंधी मी अजाण होते, पण आता मी त्याच्या महानतेशी, दिव्यतेशी नुसती परिचितच झाले नाही, तर त्याला आपल्या जीवनाचा आधार बनविले आहे; म्हणून त्या काळातील विचार मला पोकळ आणि उथळ वाटतात.

प्राणनाथ, प्रथम मी तुमच्या शरीरावर प्रेम करीत होते, म्हणूनच माझ्यावर संकटे आली. पण आता माझे प्रेम तुमच्या आत्म्यावर आहे, म्हणूनच मी संकटरहित आहे. प्रलयकाळापर्यंत तुम्हांला माझ्यापासून कोणी हिरावून घेऊ शकत नाही हे मी ठासून सांगते.

प्रियतम, कोणते विचार तुम्हांला भेडसावीत आहेत? मृत्यूचे? ऐहिक भाषेत ज्याला मृत्यू म्हणतात ते खरे म्हणजे जीवनयात्रेमधील तात्पुरते विश्रांतिस्थान आहे. ह्या

महत्त्वाच्या टप्प्याची तुम्हांला काहीच कदर नाही किंवा त्याचे महत्त्व तुम्हांला माहीत नसावे असे दिसते. स्वामी ! जेथे जाऊन आपले आत्मिक मीलन होईल, जेथे पोहोचल्यावर जगाच्या, समाजाच्या मत्सरी नजरा आपल्या प्रेमात अडथळा आणू शकणार नाहीत, जेथे जाऊन आपल्याला दांपत्यसाम्राज्याचे सिंहासन प्राप्त होईल, त्या ठिकाणी सिंहासनावर विराजमान झाल्यावर आपण एकमेकांच्या आलिंगनात बद्ध होऊ, तेव्हा तो पाश इंद्राला वा ब्रह्मदेवाला सुद्धा सोडविता येणे शक्य नाही. तुम्ही ह्यालाच मृत्यू म्हणता काय ? हा अन्याय आहे ! खरोखरच अन्याय आहे !

आपला चिर-वियोग होणार असे वाटते का ? नाही प्रियतम, माझे मन तर ग्वाही देत आहे की आपले हे चिर-मीलन होणार आहे. तुमच्या निरपराधित्वाबद्दल मला शंका कशी वाटेल ? अगदीच अशक्य आहे हे. मी केवळ तुम्हांला निर्दोषी समजत नाही, तर खरा खुनी कोण आहे हेही मला निश्चित माहीत आहे. पण कोणकोणाची खात्री पटवू ? माझ्यावर कोणाचा विश्वास बसेल ? अनवरनेच दोघांचा खून करून स्वत: आत्महत्या केली आहे हे मला निश्चित माहीत आहे. जेव्हा मी तिच्याशी बोलणे संपवून परत निघून आले त्यानंतर अनवरने त्यांना परत बोलावून घेतले असले पाहिजे.

तुम्ही ज्ञानीजींना बोलावून घेतलेत हे फार चांगले केलेत, पण तुम्हांला मृत्यूच्या दाढेत सोडून मी हरिद्वारला निघून जावे हे कसे शक्य आहे ? तुम्हांला वाचविण्यासाठी मी काहीच करू शकणार नाही का ? माझ्यासारखी अबला आणखी काही करू शकणार नाही हे मला माहीत आहे. पण तुम्ही सुरू केलेले सुधारणेचे कार्य मी अर्धवट कसे सोडू ? काही नाही तर आपल्या लेखणीच्या जोरावर देशात वैचारिक क्रांती घडवीन, समाजातील सारा कचरा बेचिराख करून टाकीन.

स्वामी, तुमचे मन इतके कमकुवत असेल असे मला वाटले नव्हते. मन घट्ट करा. कोणत्याही प्रकारच्या भीतीला जवळ फिरकूसुद्धा देऊ नका. उद्यापासून तुमच्या भेटीच्या परवानगीसाठी खटपट करते. क्षमा करा, तुम्ही मला भेटण्याची बंदी केली आहे, पण एकदा तुम्हांला भेटण्याची फार इच्छा आहे हो !

प्रियतम ! अतिशय कणखर मनाने ह्या कसोटीशी सामना देण्याची तुम्ही मला ताकीद देत आहात, पण माझ्यातर्फे अगदी निश्चिंत राहून हा उपदेश आपल्याच मनाला करा. मी सुखी झालेले तुम्हांला पाहावयाचे आहे ना ? मग तुम्ही मन अगदी चांगले घट्ट करून राहा. हीच माझ्या सुखाची गुरुकिल्ली आहे.

कायमची तुमच्यामध्ये विलीन झालेली,

तुमची
सुंदरी

ज्या दिवशी बचनसिंहास अटक करण्यात आली त्या दिवसापासून सुंदरीने शिकविणे सोडून दिले, तिला आपल्या शरीराचीही शुद्ध राहिली नाही. सकाळपासून संध्याकाळपर्यंत ह्याच्याकडून त्याच्याकडे तिची धावपळ चालली होती. तिला तहानभुकेची, कपड्यालत्त्याचीही शुद्ध नव्हती. पण इतकी धावपळ ती करीत होती ती सफल होण्याची आशा दिसेना. बचनसिंहाच्या आईतर्फेही बचावाची खटपट चालली होती, पण बचनसिंहाचा काटा काढून त्याची भांडीकुंडी आणि जमीन बळकावण्याचाच त्याच्या नातेवाइकांचा प्रयत्न चालला होता.

दुसरीकडे पालासिंह सुंदरीला पळवून आपल्या घरात नेण्याच्या संधीची वाट पाहात होता. त्याच्या मार्गातील अडथळे आता बरेच कमी झाले होते.

पालासिंहाने मोठ्या हुषारीने खोट्या केसचे जाळे इतक्या शिताफीने पसरले की बचनसिंहाच्या बचावाची आशा उरली नाही.

पोलिसांनी आपली कारवाई सुरू केली आणि ३०२ कलमान्वये बचनसिंहावर खटला भरला. सेठ रलारामने आणि त्याच्या मुलाने साक्ष दिली की, बचनसिंहाने आम्हांला अनवरचा मुजरा स्थगित करण्यासाठी नाना तऱ्हेच्या धमक्या दिल्या, पण आम्ही त्याचे ऐकले नाही, तेव्हा जाता जाता तो म्हणाला, 'ठीक आहे, मुजरा स्थगित करण्यासाठी मला दुसरा मार्ग स्वीकारावा लागेल.'

मालासिंहाने लिहून दिले, 'खुनाच्या एक दिवस अगोदर बचनसिंह मला भेटला होता. तो मला म्हणत होता की, 'मला असा एखादा माणूस गाठून दे की ज्याच्यात दोन-तीन खून करण्याची हिंमत आहे.' पण जेव्हा मी त्याला असे करण्यास मनाई केली तेव्हा तो म्हणाला, 'ठीक आहे, मी स्वतःच सर्व व्यवस्था करीन.''

ह्याशिवाय पालासिंहाच्या एका साथीदाराने सांगितले की, 'त्या रात्री बचनसिंहास हातात सुरा घेऊन अनवरच्या घरासमोर घुटमळताना मी पाहिले.' कोणी म्हटले, 'आम्ही भल्या पहाटे त्याला रक्ताने भरलेले कपडे धुताना पाहिले.' कोणी म्हटले, 'खुनाच्या रात्री मी स्वतः त्याला अनवरच्या उंबरठ्यावर चढताना पाहिले. त्याच वेळी करमचंद आणि पंडितजी सुद्धा अनवरकडे मुजऱ्याच्या बाबतीत ठरवाठरव करावयास आले होते.' एका लोहाराने अनवरच्या घरातून गायब झालेला तो रक्ताने भरलेला सुरा पाहून सांगितले की, 'हा माझ्याच दुकानात तयार झाला असून बचनसिंहाने हा विकत घेतला होता.'

सर्व खटलाच बचनसिंहाच्या विरुद्ध होता. सर्वांत प्रथम बचनसिंहाच्या आईने दिलेल्या वकिलाला त्या रात्री अनवरशी झालेल्या भेटीची सर्व हकीकत सांगावी असा सुंदरीने विचार केला. पण त्याआधी बचनसिंहासमोर हा रहस्यभेद करणे अत्यावश्यक आहे असे तिला समजून आले.

दोन-तीन दिवस धावपळ केल्यानंतर अखेर सुंदरीला भेटण्याची परवानगी मिळाली.

[30]

बचनसिंह तुरुंगात ज्या भागात बंद होता तेथे संगिनी बंदुका घेतलेल्या शिपायाचा पहारा होता. ज्या शिपायाकरवी त्याने सुंदरीला पत्र पाठवून उत्तर मागवले होते त्याच्याच मदतीने आज सुंदरीच्या भेटीचा दिवसही त्याने निश्चित केला.

संध्याकाळचा पाचचा सुमार असेल. ज्यांना भेटावयास माणसे आली होती त्या कैद्यांना त्यांच्या बराकीतून काढून बाहेर एका लोखंडी बार लावलेल्या व्हरांड्यात आणण्यात आले. यात बचनसिंहही होता. बचनसिंह त्या गजांतून वाकून पाहात कोणाची तरी प्रतीक्षा करीत होता. दुरूनच सुंदरी येत असलेली त्याला दिसली. त्याचे हृदय धडधडू लागले. त्यावेळी सुंदरीची दशा पाहावत नव्हती. तिच्या शरीरात रक्ताचा थेंबसुद्धा नसावा असे वाटत होते. चेहऱ्यावर प्रेतकळा आली होती. पावले सरळ पडत नव्हती. खाली कोसळते की काय असे वाटत होते.

'सुंदरी, हे काय! तुझे धैर्य कोठे गेले! तू तर मला उपदेश करीत होतीस ना!' बचनसिंहाने बारमधून हात काढून सुंदरीचा खांदा हलवीत विचारले. पण सुंदरीला जणू शुद्धच नव्हती. इतके दिवस तिला असेच वाटत होते की आपले मन चांगले कठोर आहे. आतापर्यंत तिच्या डोळ्यांत पाण्याचे टिपूससुद्धा आले नव्हते. पण बचनसिंहाच्या समोर येताच तिच्या संयमाचा बांध फुटून डोळ्यांतून घळघळा पाणी वाहू लागले.

'सुंदरी, वेळ फार थोडा आहे ग!' बचनसिंहाने तिला धीर देत म्हटले.

सुंदरीच्या लक्षात आपली चूक आली. तिचे अश्रू थांबले, आणि डोळे पुशीत ती बचनसिंहाकडे पाहात म्हणाली, 'मी उगीच इतका वेळ वाया घालविला.'

बचनसिंह आपला घाम साफ करीत म्हणाला, 'नाही, फक्त पाच मिनिटेच गेली. अजून वीस-पंचवीस मिनिटे शिल्लक आहेत. सुंदरी, म्हणूनच मी लिहिले होते की माझी भेट घेण्यात काही अर्थ नाही.'

'पण मी काय करू?' सुंदरी जड निःश्वास सोडून म्हणाली, 'एका महत्त्वाच्या कामासाठी तुम्हांला भेटणे अत्यावश्यक होते.'

'असे कोणते काम होते?'

'मी तुम्हांला जरा फसविले. खरी गोष्ट तुमच्यापासून लपवून ठेवली.'

'म्हणजे काय?'

उत्तरादाखल सुंदरीने आतापर्यंत त्याच्यापासून लपविलेली सर्व हकीगत सांगितली. हे ऐकून बचनसिंह चकितच झाला. आतापर्यंत त्याचा समज होता की त्याला जाळ्यात अडकविण्यासाठीच पालासिंहाने हा डाव टाकला आहे, हे तीन खून पालासिंह आणि त्याच्या पार्टीनेच केले आहेत. बचनसिंहाला राहून राहून नवल वाटत होते की त्याला अडकविणे किंवा अनवरच्या दागिन्यांची चोरी करणे हाच जर पालासिंहाचा उद्देश होता तर मग त्याने करमचंद आणि पंडित राधाकृष्णांचा खून का केला? कदाचित हे दोन सद्‌गृहस्थ त्याच वेळी तेथे पोहोचले असावेत आणि म्हणून पालासिंहाने दोघांना खतम केले असावे, असा विचार करून त्याने आपले शंकानिरसन केले होते.

पण आज सुंदरीच्या तोंडून, अनवरनेच ह्या दोघांना ठार मारून आपल्या छातीत सुरा भोसकून घेतला ही खरी गोष्ट समजल्यावर बचनसिंहाचा थरकाप झाला. शिवाय सुंदरीच्या आईचा – अनवरचा – इतका भयानक शेवट! त्याची तर शुद्धच हरपण्याची वेळ आली. किती तरी वेळ त्याच्या तोंडून शब्दच फुटेना.

बचनसिंह आज मला वेश्येची मुलगी समजत असेल ह्या विचाराने सुंदरीची नजर शरमेने खाली वळली.

इकडे बचनसिंहानेही तिचे विचार ताडले व म्हणूनच तो ह्या बाबतीत काही बोलू इच्छीत नव्हता. तो म्हणाला, 'असो. झालं ते झालं. सुंदरी, सगळंच कसं विचित्र आहे. हो खरंच, ज्ञानीजी कसे अजून आले नाहीत?'

'कदाचित संध्याकाळपर्यंत येतील.'

'मग तू उद्या सकाळच्या गाडीने त्यांच्याबरोबर जाशील ना?'

'नाही, आताच मला जाता येणार नाही.'

'का?'

'मला कोर्टात साक्ष द्यावयाची आहे.'

'काय ती?'

'हेच, जे आता तुम्हांला सांगितले ते. त्याच्याच मदतीने मी तुमचे निरपराधित्व सिद्ध करीन.'

बचनसिंहास हसू आले. तो म्हणाला, 'वेडे, तुझ्या ह्या गोष्टीवर कोण विश्वास ठेवील?

हां, अनवर ह्या कृत्यांच्या बाबतीत काही पुरावा लिहून ठेवून जाती किंवा मरतेवेळी पोलिसांच्या समक्ष ह्या प्रकारची साक्ष देऊन जाती तर बचावाची काही आशा होती, पण आता काही उपयोग नाही. लोक टिंगल मात्र करतील.'

सुंदरी आवेशाने म्हणाली, 'सुंदरी वेश्येची मुलगी आहे असेच म्हणून लोक टिंगल करतील ना? एकदा नाही, हजार वेळा करू देत. मी नाही पर्वा करीत.'

'नाही सुंदरी, हे रहस्य उघडकीस यावे, हे मला सहन होणार नाही. तुझे माझ्यावर खरेच प्रेम असेल तर हे रहस्य राहू दे. दुसरे असे की न्यायालय ह्यावर विश्वास ठेवणार नाही. ह्याच्या समर्थनार्थ तुझ्याजवळ काहीच पुरावा नाही.' काही वेळ विचार करून बचनसिंह म्हणाला, 'मला आश्चर्य वाटते की अनवरने काही लिहून कसे ठेवले नाही?'

'तिने जर लिहून ठेवले असते, तर त्यात माझाही उल्लेख करावा लागला असता. सुंदरी आपली मुलगी आहे हे लोकांना कळू देण्याची तिची इच्छा नसावी. म्हणून तिने काहीही लिहून ठेवले नसावे असे मला वाटते. शिवाय तिला काय कल्पना असणार वरे की तिच्या ह्या कृत्यामुळे तुम्हांलाच...' बोलता बोलता सुंदरीचा गळा दाटून आला आणि ती पुढे काहीही बोलू शकली नाही.

दोघांमध्ये जेमतेम एवढेच संभाषण होऊ शकले. बिचाऱ्यांना अजून कितीतरी गोष्टी एकमेकांना सांगावयाच्या होत्या, पण त्याच वेळी भेटीची वेळ संपल्याची घंटा वाजली, आणि त्याबरोबर सर्व कैदी त्या गजांपासून दूर झाले. काहींना पोलिसांनी धक्के मारून दूर केले. बचनसिंहाला सांगण्यासाठी सुंदरीच्या मनात दुःखाचे भांडार होते ते तसेच राहिले. बचनसिंहापासून दूर होताना तिच्या डोळ्यांसमोर अंधेरी आली. तो कधी दृष्टीआड झाला, जाण्यापूर्वीचे त्याचे अंतिम शब्द काय होते, या सर्व गोष्टींचा तिला मुळीच पत्ता लागला नाही.

[31]

निराशा! सर्व बाजूंनी घोर निराशा! जेथपर्यंत दृष्टी आणि मनोरथ धाव घेऊ शकत होते तेथपर्यंत सुंदरीला निराशाच दिसत होती. दुसऱ्या दिवशीच शांतीजी आले. खटला अमृतसरच्या कोर्टात चालला असल्याने शांतीजी व सुंदरी यांना अमृतसरला राहूनच खटल्याची तयारी करणे भाग पडले. स्वामी गावात किंवा दिवाणपुरात राहणे सुंदरीला अनावश्यक व धोक्याचे वाटत होते.

बचनसिंहावरील खटला खालच्या कोर्टात चालला होता. याचा अंतिम निर्णय काय लागणार हे तर सर्वांनाच दिसत होते. कारण खटल्याचे स्वरूपच असे झाले होते की आरोपीच्या बचावाचे सर्व रस्ते बंद झाले होते. मुजऱ्याच्या विरोधासाठी बचनसिंहाची चाललेली धावपळ, हा तो अपराधी असल्याचा सर्वांत मोठा पुरावा होता. याशिवाय खुनाच्या रात्री त्याचे अनवरच्या दारापुढे येरझारा घालणेही सिद्ध झाले होते. हा एकच पुरावा शेकडो पुराव्यांसारखा होता. शिवाय पालासिंह आणि त्याच्या पार्टीने कौशल्याने दिलेल्या खोट्या साक्षींनी उरलीसुरली कसरही भरून निघाली.

पण ही दुर्घटना झाली कशी? त्या रात्री सुंदरी अनवरच्या घरातून बाहेर पडली त्याच वेळी अनवरने आपल्या एका साथीदाराला पाठवून करमचंद आणि पंडित राधाकृष्ण यांना बोलावून घेतले. अनवरचे निमंत्रण म्हणजे त्यांना ईश्वरी कृपाच वाटली. ते धावत पळत तिच्याकडे आले. अनवरने दोघांना मृत्यूच्या दाढेत ढकलण्यापूर्वी त्यांच्याशी खोटे प्रेमालाप केले. आधीच दारू पिऊन ते तर्र झाले होते. अनवरने त्यांना आणखी आणखी आग्रह करकरून पाजली. पिऊन पिऊन बेहोष झाल्यावर तिने आपल्या सुऱ्याने एकेक वार करून त्यांना खतम केले आणि तिसरा वार आपल्या छातीवर केला.

नेहमीप्रमाणे सकाळी अनवरची म्हातारी मोलकरीण अन्ना खोलीत आली. खोली-तील दृश्य पाहून तिने मोठ्याने किंकाळी फोडली. त्याबरोबर बरेच लोक धावत वर गेले. पाहता पाहता तेथे चिक्कार गर्दी झाली. सर्व लोक खोलीत रक्ताचा सडा पडला होता व त्यात तीन प्रेतं लडबडलेली दिसत होती.

पालासिंह आणि त्याच्या दोस्तांना ही हकीगत कळली तेव्हा त्यांच्या आनंदाला पारावार राहिला नाही. त्यांनी तातडतोब पोलिसांना बोलावून आणले. बचनसिंहाला ह्या साऱ्या खुनी नाटकाचा नायक म्हणून जाहीर करण्यात आले.

खून कधी आणि कोणी केले? ह्या गोष्टीचा खरा भेद सुंदरीशिवाय कोणालाही माहीत नव्हता. पण पंचाण्णव टक्के लोकांना बचनसिंहाचाच संशय होता. फक्त संशयच का होता? विश्वास का नाही? कारण त्यांच्या मनात शंका होती की अनवरला तर सुधारणा करण्याच्या जोशात त्याने ठार मारले—पण ज्या लोकांशी ना ओळख ना देख, ना कसले भांडण, त्यांची कत्तल त्याने का केली? पण लोकांच्या याही शंकेचे निरसन झाले. काही साक्षीदारांनी हे सिद्ध केले की ज्या वेळी पंडित राधाकृष्ण आणि करमचंद अनवरच्या घरी दुसऱ्या दिवशी होणाऱ्या मुजऱ्यासंबंधी ठरवाठरव करण्यास गेले होते त्याच वेळी बचनसिंह अनवरचा खून करून हातात सुरा घेऊन परत येत होता. आपला गुन्हा उघडकीस येऊ नये म्हणून त्याने त्या दोघांचीही वाट लावली. ह्यामुळे

बचनसिंहाचे अपराधित्व शाबीत झाले. बिचारी सदाकौर ! दुःखाने तिचा ऊर फुटायची वेळ आली होती. इकडे सुंदरीचा एक पाय कोर्टात तर दुसरा वकिलाच्या घरात होता.

बचनसिंहाच्या वकिलाने सुंदरीला बचावाच्या साक्षीदारांत समाविष्ट केले. बचनसिंहाचा खटला पुकारल्यावर सुंदरीची साक्ष घेण्यात आली. तिने आरंभापासून अखेरपर्यंत खरी खरी हकीगत सांगितली. पण तिच्या लांबलचक कहाणीचा खटल्याशी संबंध जोडला गेला नाही. अनवर कोण होती? पंडित राधाकृष्ण आणि करमचंद यांची चालचलणूक कशी होती? अनवरला वेश्याव्यवसाय का पत्करावा लागला? ह्या गोष्टींवर प्रकाश पाडण्याचा सुंदरीने आपल्याकडून आटोकाट प्रयत्न केला. पण तिच्या जवळ या गोष्टींच्या सत्यतेविषयी काय पुरावा होता? ज्या लोकांकडून ह्या गोष्टीस पाठिंबा मिळण्याची आशा होती, त्या तिघांचे मुडदे पडले होते. ह्याशिवाय तो चौथा मनुष्य (ज्याने अनवरला विधवा आश्रमात पोहोचविण्याचे आमिष दाखवून एका म्हाताऱ्या वेश्येला विकले होते तो) अनवरच्या हातून मारला गेला होता. आता एकच साक्षीदार शिल्लक उरला होता. तो म्हणजे ताराचंद. तो जिवंत आहे की मेला याचा कोणालाच पत्ता नव्हता.

बचावाच्या वकिलाने अगदी निराश होऊन सुंदरीला म्हटले, 'मुली, आज तुझा बाप येथे उपस्थित असता तर त्याच्याकडून काहीतरी मदत मिळाली असती. अजूनसुद्धा तू त्याचा तपास लावशील तर बरं होईल.'

खून कोणी केला हा प्रश्न शिल्लक राहिला होताच. ह्या बाबतीत सुंदरीच्या साक्षीला काहीच महत्त्व देण्यात आले नाही. तिच्या आईने, अनवरने, तिच्यासमक्ष त्या दोघांना ठार मारण्याच्या प्रतिज्ञेचा पुनरुच्चार केला होता हे सुंदरीने आपल्या साक्षीत स्पष्ट केले असले तरी कोर्टाचा कसा विश्वास बसणार? स्वतः सुंदरी तर खुनाच्या वेळी तेथे हजर नव्हती. कोर्टाच्या दृष्टीने सुंदरीची सारी साक्ष म्हणजे एक जुळविलेली गोष्ट किंवा शुद्ध वेडेपणा होता. सर्व काही जाणत असूनही सुंदरीच्या साक्षीने आरोपीस काही लाभ झाला नाही, सरतेशेवटी खटला सेशनच्या हाती सोपविण्यात आला.

प्रथम लोक सुंदरीला हरिजनकन्या म्हणून ओळखीत होते, आता वेश्येची मुलगी म्हणून ओळखू लागले; एवढेच ह्या साऱ्या धावपळीत सुंदरीला प्राप्त झाले.

कोर्टातील कायदा पैसेवाल्यांचा गुलाम आणि गरिबांचा मालक असतो. श्रीमंतांच्या हुकुमानुसार तो चालतो, आणि गरिबांना आपल्या हुकुमानुसार चालवतो.

खटला चालू असता सुंदरी, सदाकौर आणि ज्ञानीजी यांच्याशी बचनसिंहाच्या भेटीगाठी झाल्या. पण त्यांचे दुःखद वर्णन करून आम्ही वाचकांना अधिक दुःखी करू इच्छीत नाही.

काही तारखांनंतर सेशनकोर्टाने बचनसिंहाला फाशीचा हुकूम दिला. हतभागी सदाकौर-वर हा आघात असह्य होता. ही खबर मिळताच ती बेशुद्ध पडली.

बचनसिंहाच्या नातेवाइकांनी हायकोर्टात अपील केले.

सुंदरीलासुद्धा हा आघात असह्य झाला. पण तिच्या हृदयात धगधगणाऱ्या सूडभावनेने तिला हताश करण्याऐवजी तिच्या मनास अधिक बळकट आणि स्थिर बनविले.

[32]

अमृतसरमध्ये एका छोट्याशा गल्लीत भाड्याने घर घेऊन ज्ञानीजी व सुंदरी राहू लागली. बचनसिंहास वाचविण्याचे सारे प्रयत्न विफल झाले. फाशीविरुद्ध हायकोर्टात अपील गेले होते खरे, पण ते केवळ नावापुरतेच आहे, त्याने काहीही फायदा होणार नाही, हे सुंदरी जाणून होती.

ताराचंदाला शोधण्याची इच्छा तिच्या मनात दिवसेंदिवस तीव्र होत चालली होती. पण ही गोष्ट पाण्यावर रेघ ओढण्याइतकीच कठिण होती. तिला राहून राहून याच गोष्टीची हळहळ वाटत होती की, आपण अनवरला ताराचंदाच्या रंगरूपाविषयी का विचारले नाही ? त्याच्या स्वरूपाविषयी काहीही माहिती नसताना ती त्याला कसं शोधून काढणार ? अनवरकडून फक्त एवढेच कळले होते की त्या काळी ताराचंद सियालकोटमध्ये एका सरकारी कचेरीत नोकरी करीत होता. याच आधारावर सुंदरीने सियालकोटमधील कचेऱ्यांत चकरा मारल्या. यात तिचे कित्येक दिवस वाया गेले. पण अठरा-एकोणीस वर्षांपूर्वीच्या गोष्टींचा पत्ता कसा लागणार ? तेथूनही सुंदरीला निराश होऊनच परतावे लागले.

पण सुंदरीने धीर सोडला नाही. तिने आपली धावपळ चालूच ठेवली. त्याबरोबरच तिने पुष्कळ दिवसांपासून सोडलेले लेखनकार्य पैसे मिळविण्याच्या विचाराने परत सुरू केले. ती रात्र-दिवस कसल्या ना कसल्या तरी उद्योगात गर्क असे. तिला खाणेपिणे, कपडेलत्ते, कशाकशाची शुद्ध नव्हती. ती मोठ्या उत्कंठतेने हायकोर्टाच्या निर्णयाची वाट पाहात होती. त्यातच कित्येक महिने लोटले. ह्या दिवसांत तिच्या अनेक लघुकथा पंजाबी मासिकांतून प्रसिद्ध झाल्या. ह्या कथांच्या अनामिक लेखकाने सर्वत्र अतिशय लोकप्रियता मिळविली.

ज्ञानीजी सुंदरीची अतिशय काळजी घेत असत. तिला आध्यात्मिक उपदेश करून तिचे मन शांत ठेवण्याचा ते प्रयत्न करीत असत. पण सुंदरीच्या हृदयात सूडाग्नी धगधगत

असल्यामुळे तिच्यावर या उपदेशाचा काहीही परिणाम होत नव्हता. तिचे शरीर दिवसेंदिवस दुर्बल बनत चालले होते. पण तिचे मन अधिकाधिकच कठोर होत होते. तिच्या मनात सर्व जगाबद्दल द्वेष, तिरस्कार उफाळून येत होता. तिला आपले जीवन असह्य आणि भारभूत वाटत होते.

अचानक एके दिवशी बचनसिंहाचे पत्र आलेले पाहून तिच्या मनात आशेचा किरण उगवला. पाकिटावर बचनसिंहाच्या हस्ताक्षरात लिहिलेला पत्ता पाहून तिने धडधडत्या अंतःकरणाने पाकीट उघडले. 'सुंदरी, अखेरचा प्रणाम' हा प्रारंभ वाचताच तिला चक्कर आली; पण लगेच तिने स्वतःला सावरले व ती पत्र वाचू लागली :

'अपील नामंजूर झाले आहे. फाशीचा दिवससुद्धा निश्चित झाला आहे. आगामी मंगळवार...'

सुंदरीच्या हातातून पत्र गळून पडले, तिचे हातपाय वळू लागले; पण तिने खालचा ओठ घट्ट दाबून आपले मन घट्ट केले—ज्ञानाजींचा आध्यात्मिक उपदेश यावेळी तिच्या मदतीस धावून आला. तिने परत पत्र वाचण्यास प्रारंभ केला,

'अरेरे! सुंदरी, माझ्या मनाची या वेळी काय स्थिती झाली आहे माहीत आहे? ज्याची स्वतःचीसुद्धा तीच दशा झाली असेल त्या हतभागी प्राण्याशिवाय कोणालाही याची कल्पना करता येणार नाही. अरेरे! हे जग किती भयानक आहे! मी तुरुंगात, तेही साध्या कैद्यांच्या खोलीत नाही तर फाशीच्या कैद्यांच्या खोलीत, असूनसुद्धा मी स्वतःला स्वतंत्र समजत आहे आणि मला वाटत आहे की मी हवेत तरंगत आहे. एका-मागून एक दृश्य डोळ्यसांमोरून जात आहे. कोणते दृश्य? समजू लागल्यापासून आज-तागायतचेच प्रसंग.

'जेव्हा सुपरिंटेंडेंटने माझ्या कोठडीजवळ येऊन पहिल्याप्रथम फाशीचा हुकूम ऐकवला, त्यावेळी माझी मनःस्थिती काय झाली असेल? त्याच्या तोंडून ते चार शब्द निघताच मला ही दुनिया वेगळीच दिसू लागली. त्यावेळी खोलीच्या भिंती, गजाचे दरवाजे, फरशी, सर्व वस्तू 'फाशी फाशी' असा गिल्ला करून माझे कान किटून टाकत होत्या. बाहेर संत्री खांद्यावर बंदूक घेऊन गुणगुणत येरझारा घालीत होता तोही जणू फाशीचे गीतच गात होता. समोरच्या तुतीच्या झाडावर कावळ्यांची कावकाव चालली होती, त्यात सुद्धा फाशी हाच शब्द मला ऐकू येत होता.

'मी नखशिखांत कापत होतो. नाही, कापत नव्हतो, माझा देहही कापत नव्हता, पण माझ्या अंतर्मनात काही विशिष्ट हालचाल होत होती—मला वाटत होते माझे मन, हृदय, मेंदू, विचार, सर्वच कापत आहेत. जमीन, छत, समोरील अंगण, बाहेरची झाडे सर्वच कापत होते.

'कित्येक तास मी अशा स्थितीत होतो. नंतर हळूहळू दुसरेच दृश्य माझ्यासमोर आले. ते एका भोळ्याभाबड्या देवीचे चित्र होते. तिचा रंग मोहरीच्या फुलांसारखा पिवळा धमक झाला होता, शरीर डॉक्टरांच्या दवाखान्यातील हाडांच्या सापळ्याप्रमाणे दिसत होते. पण त्या फिक्कट चेहऱ्यावरही एक तेज विलसत होते. तो चेहरा पाहून माझा धीर खचत होता. पण आता हाच चेहरा दिसताच मला एक नवा उत्साह आला. मी हे विसरून गेलो की मला देहान्त प्रायश्चित्ताची शिक्षा मिळाली आहे. तो चेहरा माझ्या सुंदरीचा होता.

'दुसऱ्याच क्षणी ते दृश्य अदृश्य झाले आणि माझ्या डोळ्यांस फाशीचा दोर दिसू लागला. त्याच्या जवळच एक काळाकभिन्न व भयंकर मांग बसला होता. तो अतिशय मेहनत घेऊन फाशीचा दोर तेल लावून वळत होता. हे पाहून माझा पहिल्यासारखाच थरकाप झाला. माझ्या मनात नाना तऱ्हेचे विचार आले. माझे हृदय जणू घाबऱ्या घाबऱ्या त्या यमदूताला सांगत होते, 'मित्रा, जरा थांब. इतकी घाई का ? अजून माझी पुष्कळ कामं अर्धवट पडली आहेत. ती पूर्ण करू दे. मी जास्त वेळ नाही लावणार, अगदी झटपट !' पण तो घाई करीत होता. 'वा ! मला माझं काम संपविण्याची घाई आहे आणि तुला तुझं काम संपविण्याची !' तो पुन्हा घाईघाईने दोर वळू लागला.

'त्याचे उत्तर ऐकून मी निराश झालो. एखाद्या प्रवाशास गाडीमध्ये पुष्कळ सामान चढवायचं आहे पण गाडीने शिटी वाजवलेली ऐकून व गार्डाने हिरवा झेंडा दाखविलेला पाहून त्या प्रवाशाच्या मनाची स्थिती जशी होईल तशीच माझी स्थिती झाली. सुंदरी, तू एका पत्रात मृत्यूची अतिशय स्तुती केली होतीस. परिणामतः मी तसाच विचार करू लागलो. पण फाशीचा हुकूम ऐकताच तुझे सर्व उपदेश मी विसरलो आणि मृत्यू पहिल्यापेक्षाही हजारो पट अधिक भयानक स्वरूपात माझ्यासमोर उभा राहिला.

'मी तुला माझी भेट घेण्यास बंदी केली होती. मला तेव्हा वाटले होते की त्यामुळे माझे दुःख वाढेल; पण आता ती स्थिती राहिली नाही. माझ्या साऱ्या दुःखाचे औषध तूच आहेस, असे मला वाटते. बस, मरण्यापूर्वी एकदा, फक्त एकदाच, तुला भेटण्याची फार इच्छा आहे. तुझी भेट मला अतिशय फायदेशीर होईल असे वाटते. आणि मी सुखासमाधानाने डोळे मिटू शकेन.

'सुंदरी, हे सर्व कोण लिहीत आहे ? हे विचारतरंग कोठून निघत आहेत ? माझ्या मेंदूतील कोणती वस्तू त्यांना क्रमपूर्वक लेखणीच्या हवाली करीत आहे ? ही चार वार लांबीची दोरी एका झटक्यात सर्व गोष्टींचा अंत करणार ! हिच्या एका हेलकाव्याने आज तुडुंब भरलेली डोळ्यांची तळी उद्या शुष्क होणार ! आज मोठ्या वेगाने लेखणी चालविणारे हे हात आजपासून बरोबर सहा दिवसांनी काष्ठवत बनणार ! मनमंदिरात ज्या अलौकिक

देवीच्या मूर्तीची स्थापना झालेली आहे आणि रोज प्रेमपुष्पांनी मी जिची पूजा करतो, ती मूर्ती नियतीच्या कठोर हातोड्याने एका घावासरशी छिन्नविच्छिन्न होणार! अरे, किती मूर्ख आहे मी! घराला लागलेली भयंकर आग चूळभर पाण्याने विझविण्याचा प्रयत्न करावा, त्याप्रमाणे मी काय रडगाणे लावले आहे!

'सुंदरी. मी इथेच थांबतो. ह्या दुःखद कहाण्या कधीही न संपणाऱ्या आहेत. ज्याला खरोखरच तहान लागली आहे, त्याची तहान स्वप्नामध्ये कित्येक टन पाणी पिण्याने थोडीच शमणार आहे? तुझ्याबरोबर माझा इतकाच सहवास होता—नाही, नाही, तुझा माझा सहवास प्रलयकाळापर्यंत अटळ राहील.

'बघ सुंदरी, तुझ्या त्या पत्राचा बरोबर अर्थ मला त्यावेळी समजला नव्हता, पण आता पूर्णपणे समजला आहे. माझ्या मृत्यूनंतर तुला जीवनयात्रा समाप्त करावयाची आहे की काय? पण तू असे मुळीच करून कोस—असा माझा तुला अखेरचा सल्ला आहे. आणि तू तो मानावास म्हणून तर तुला एका गोष्टीची आठवण करून देतो : ' तुझ्यावर एका दुःखी जीवाचा भार आहे—माझ्या निराश्रित मातेचा. ती सध्या जीवनमरणाच्या दोलायमान अवस्थेत आहे. जोपर्यंत तू तिच्या बाबतीत निश्चिंत होत नाहीस तोपर्यंत तुला असे करण्याचा काहीही अधिकार नाही. आपण दोघे चिरकाल एकत्र राहणार आहोत ना? तर मग हा थोडासा विरह सहन करणे तुला कठिण का वाटते? मी तुझी वाट पाहात राहीन, पण जे कर्तव्य तुझ्यावर सोपवून मी जात आहे, ते पूर्ण केल्या-शिवाय तू माझ्याजवळ येऊ शकणार नाहीस.

'सोमवारी माझ्या नातेवाइकांशी माझी भेट होईल आणि मंगळवारी तुझ्याशी भेट होईल. मंगळवारी सकाळी ज्ञानीजींबरोबर येथे ये. सुंदरी, आपली भेट अगदी मोकळ्या स्वरूपात होणार आहे. सुपरिंटेंडेंटने खास कृपा करून हे कबूल केले आहे.

'सुंदरी, पत्र पूर्ण करू? किती कठिण आहे हे काम! हे पत्र संपताच माझे सारे विश्व समाप्त होणार, माझ्यासाठी या जगात काही शिल्लक उरणार नाही, असे वाटते.

'कागद संपला आहे—समासातही जागा उरली नाही. अक्षरांत अक्षर घुसवून गिचमिडीने फक्त एवढेच लिहू शकलो. जवळ उभा असलेला जमादार लौकर पत्र पूर्ण करण्यासाठी कटकट करीत आहे. कारण सुपरिंटेंडेंटच्या येण्याची वेळ झाली आहे.

'माझ्या सुंदरी, तुझी प्रेममय मूर्ती हृदयात कोरून ठेवून हे पत्र संपवितो. अखेरचे प्रेम.

तुझा

बचनसिंह

फाशीच्या हुकुमानंतर आजपर्यंत बचनसिंह रात्रंदिवस शेकडो हवाई किल्ले उठवीत होता. नदीच्या पुराप्रमाणे अनेक विचार त्याच्या मनात ये-जा करीत होते. शेवटी डोळ्यांसमोर तीच फाशी आणि तोच मृत्यू ह्या दोनच गोष्टी राहात. पण आज त्याच्या जीवनाचा अखेरचा दिवस असल्याने कोणताही विचार त्याच्या मनात खळबळ माजवीत नव्हता. जणू सर्व शक्ती उकळून थंड झाली होती आणि केवळ मरणाचे चित्र त्याच्या समोर होते. त्याला वाटत होते फाशी जाण्याच्या आधीच तो मरणयातना भोगत होता आणि एका दुसऱ्याच जगात त्याने प्रवेश केला होता. शेजारच्या बराकीच्या जवळच दोन-तीन घाणे सुरू होते. त्यांचा 'झीं झीं' आवाज ऐकून त्याला वाटत होते जणू कोणी विधवा आपल्या पतीच्या मृत्यूनंतर विलाप करीत आहे. खोलीच्या एका कोपऱ्यात एक टोळ 'टीं टीं' ओरडत होता. बचनसिंहाला वाटले, एखादी माता आपल्या मृत पुत्राचे डोके मांडीवर घेऊन रडत आहे. समोरच्या मैदानात जेव्हा दोन-तीन चिमण्या चिव-चिवत उडत गेल्या तेव्हा त्याला भास झाला की, मृत्यू त्यांचा पाठलाग करीत असून त्या भीतीने आक्रोश करीत सैरावैरा धावत आहेत.

लाहोरच्या सेंट्रल जेलच्या त्या टीचभर बराकीत बसला असतानाच त्याला आपल्या हतभागी आईची आठवण आली. ती कालच त्याला भेटावयास आली होती. नंतर सुंदरीचा विचार आला. ती आज भेटावयास येणार होती. तो बसल्या बसल्या विचार करीत होता की, आता सुंदरी गाडीतून उतरली असेल, तिकीटचेकरला तिकीट दाख-विताना तिचे अशक्त हात कापत असतील, डोळे पाण्याने भरले असतील, त्यामुळे समोरचा रस्तासुद्धा तिला नीट दिसत नसेल. आता ज्ञानीजींनी तिला धीर देऊन, तिचे सांत्वन करून तिला टांग्यात बसविले असेल, आता टांगा तुरुंगाच्या दिशेने दौडत असेल, रस्त्याच्या कडेला उभे असलेले वृक्ष मागे पळत असलेले पाहून गतकालीन सुखाचेच हे रूप समजून ती त्यांना म्हणत असेल, 'जा, माझ्या मित्रांनो, कायमचे मला सोडून जा.' आता टांगा जेलच्या दरवाजासमोर आला असेल. सर्वांत प्रथम सुंदरीची नजर त्या काळ्या फाटकावर पडेल. तिला वाटेल ते दारसुद्धा दुःखात चूर आहे. फाटकासमोर हिंडणारा लाल पगडीवाला संत्री तिला यमदूताप्रमाणे भयंकर वाटेल. कदाचित तिला हे सारे सहन होणार नाही आणि ती बेशुद्ध......

याच वेळी त्याला भारी-भक्कम बुटांचा आवाज ऐकू आला. तो उठून उभा राहिला. बाहेर एक इंग्रज सुपरिंटेंडेंट, एक डॉक्टर, दोन दरोगे आणि पुष्कळसे शिपाई उभे होते.

कोलीचा दरवाजा उघडला. कोणी न सांगताही त्याला समजून चुकले की फाशीची वेळ झाली आहे. हातकड्या पाहून त्याने आपले हात पुढे केले. एका शिपायाने त्याचे दोन्ही हात पाठीमागे करून हातकड्या घातल्या. सर्वजण त्याला पुढे करून चालू लागले.

बचनसिंह जमिनीवरून चालत होता खरा, पण त्याला वाटत होते, पायाखालची जमीन सरकली असून आपण अधांतरी चालतो आहोत. आपल्या डोक्यात मेंदू नाही आणि छातीमध्ये हृदय नाही. तरीमुद्धा त्याच्या शरीरात एक अशी गोष्ट होती, जी त्याच्या मृतवत देहात धुगधुगी निर्माण करीत होती. त्याची दृष्टी अगदी निस्तेज झाली होती. तरीमुद्धा ती कोणाला तरी धुंडाळीत होती. हातकड्यांत जखडलेले हात मधून मधून सावळी चाचपडत होते.

आता बचनसिंहास वाटत होते की तो अशा एका जागी उभा आहे, जी जागा त्याने प्रत्यक्ष पाहिलेली नव्हती, केवळ कल्पनेच्या साहाय्यानेच त्याला दिसत होती. ती जागा म्हणजे वधस्तंभ. त्याच्या नुसत्या काल्पनिक दर्शनानेच तो नखशिखान्त थरारून गेला. पण लगेच त्याची मनःस्थिती बदलली. आता त्याच्या डोळ्यांसमोर काहीसुद्धा नव्हते. होता फक्त गडद अंधकार !

किती वेळ तो तेथे उभा होता हे त्यालाही कळले नाही. त्याच वेळी त्याच्या कानांवर काही शब्द पडले : 'वेल, मिस्टर बचनसिंह, कोई बात कहना मांगता ?' कोणी उत्तर दिले त्या प्रश्नाचे ? त्यानेच की दुसऱ्या कोणी ? त्याला काहीच कळत नव्हते. थोड्या वेळाने आपणच उत्तर दिले हे त्याला कळल्यावरमुद्धा, त्याचा अर्थ त्याला कळला नाही. नंतर परत पहिला आवाज आला : 'बरं, त्यांना बोलवा.'

हे बचनसिंहाच्या कानांवर पडले. त्याने आपले मन ताब्यात ठेवण्याचा आटोकाट प्रयत्न केला. थोड्या वेळानंतर त्याला पाठीमागून कोणाची तरी किंकाळी ऐकू आली परिचित आवाज ऐकून त्याने झटकन मागे वळून पाहिले. ती सुंदरी होती, तिला आधार देत ज्ञानीजी इकडेच आणीत होते. ज्ञानीजींच्या विनंतीवरून ऑफिसराने बचनसिंहाच्या हातकड्या काढल्या. आता सुंदरी त्याच्यासमोर उभी होती. स्वतःस शुद्धीवर ठेवण्या-साठी ती जिवाचा आटापिटा करीत होती. ज्ञानीजींनी एका हातात बचनसिंहाचा हात पकडला होता. दुसऱ्या हातात सुंदरीचा हात धरला होता. दोघेजण शून्यपणे एक-मेकांकडे टक लावून पाहात होती. त्यांना एकमेकांच्या डोळ्यांत केवळ स्वतःचीच सूक्ष्म प्रतिमा दिसत होती, दुसरे काही नाही. जणू बचनसिंह सुंदरीच्या डोळ्यांत शिरून लपला होता आणि सुंदरी बचनसिंहाच्या.

त्याच वेळी सुंदरीला आपल्या मानेला कसला तरी शीतल स्पर्श झाल्यासारखे वाटले. पाहते तो ज्ञानीजींनी रुमालाची गाठ सोडून एकेक पुष्पमाला काढून त्या दोघांच्या

गळ्यांत घातल्या. आपला हात बचनसिंहाच्या हातात असल्याचे तिच्या ध्यानात आले. त्या दोघांचे हात पकडून ज्ञानीजी म्हणत होते, 'हे स्वर्ग आणि पृथ्वीच्या परमेश्वरा, ही जोडी कधीही अलग करू नकोस, स्वर्गात दोघेहि एकत्र येऊन अनंतकाळ दांपत्यजीवन व्यतीत करोत !'

त्याच वेळी त्या इंग्रज ऑफिसराने आपल्या डोक्यावरील टोपी काढली. बाकी लोक (जे मुसलमान होते) मस्तक झुकवून एक स्वरात म्हणाले, 'आमीन ! आमीन !'

यानंतर त्या दोघांच्या देहांत एकदम चैतन्य संचारले, त्यांनी एकमेकांस गाढ आलिंगन दिले. एक मिनिट, दोन मिनिटे, पाच मिनिटे, दहा मिनिटे झाली, पण त्यांची एकमेकांवरील पकड तशीच दृढ राहिली.

सुपरिटेंडेंटच्या संकेतावरून ज्ञानीजींनी म्हटले, 'काका बचनसिंह ! पुत्तर सुंदरी ! मेरे बच्चों !' पण दोघांनी एकमेकांस सोडले नाही. दोघांचेही देहभान हरपले होते. शेवटी ज्ञानीजींनी सुंदरीचा हात पकडून म्हटले, 'मेरी बच्ची !' आणि सुपरिटेंडेंटने बचनसिंहाचा हात पकडून म्हटले, 'मिस्टर बचनसिंह !'

त्यांची मिठी शिथिल पडली. बचनसिंह अजून त्याच धुंदीत उभा होता तोच एका माणसाने त्याच्या डोक्यावर एक लांबलचक काळा टोप घातला. सुंदरी कोसळणारच होती पण ज्ञानीजींनी तिला सावरले. नंतर सुपरिटेंडेंटच्या सांगण्यावरून एक खाट आणण्यात आली.

सुंदरी जेव्हा शुद्धीवर आली तेव्हा सर्वत्र काळोख पसरला होता. इंजिनाचा भप्-भप् आवाज, यात्रेकरूंची गडबड आणि फेरीवाल्यांचे 'पेढे लो, मिटाई लो' या आरोळ्या, सिगारेटच्या धुराचा वास, या सर्वांवरून तिने तर्क केला की ती रेल्वे स्टेशनवर असून प्रतीक्षालयात पडलेली आहे.

सुंदरी उठून बसली. तिने पाणी मागितले. ज्ञानीजी लोटा घेऊन पाणी आणावयास गेले. सुंदरीला आजची विसरलेली घटना पुन्हा आठवली. तिला असे वाटत होते की, आपल्या डोक्यावर कित्येक मणांचे ओझे ठेवले आहे. त्यात विचारशक्ती, स्फूर्ती काही उरले नाही. आपण कोठून कोठल्या स्थितीला येऊन पोहोचलो ! आज आपण आपले सर्वस्व गमावून जगात एकटी आणि निराश्रित झालो आहोत, या गोष्टीचीही तिला शुद्ध नव्हती. एखाद्या छताचा खालचा आधारभूत खांब निखळून पडलेला असावा त्याप्रमाणे तिची स्थिती झाली होती.

काही वेळ ती अशीच शून्य नजरेने इकडेतिकडे पाहात बसली. इतक्यात ज्ञानीजी

पाणी घेऊन आले. पाणी पिऊन तिला जरा तरतरी आली. हळूहळू बंद पडलेले मशीन सुरू व्हावे त्याप्रमाणे तिचा मेंदू काम करू लागला. सारी दुनिया तिला निराळी दिसू लागली. आपण एखाद्या भाराखाली दडपली जात आहोत असे तिला वाटले.

बचनसिंहाच्या अंतिम भेटीचे दृश्य तिच्या डोळ्यांपुढे अंधुकसे उभे राहिले. त्याला फाशी दिले हा विचार मनात येताच ती जोराने किंकाळी फोडून दोन्ही हातांनी तोंड झाकून बाकावर पालथी पडली. ज्ञानीजींनी जेव्हा सांगितले की हिच्या निरपराधी पतीला आजच फासावर चढविण्यात आले आहे तेव्हा बरेचसे प्रवासी तिच्या भोवती जमले आणि तिचे सांत्वन करण्याचा प्रयत्न करू लागले.

सुंदरीला वाटत होते मोठ्याने रडावे, पण तिला रडूच फुटत नव्हते. तिच्या शरीरात धगधगणाऱ्या अग्नीच्या ज्वालांनी तिचे अश्रू सुकून गेले असावेत. ती परत उठली आणि प्रतीक्षालयाच्या बाहेर आली. दूरवर नजर फेकून तिने आपल्या आसपासच्या यात्रेकरूंकडे लक्षपूर्वक पाहिले. प्रत्येक माणसाच्या चेहऱ्यावर तिला विश्वासघात दिसत होता, घाण वास येत होता. ईश्वराने जे काही निर्माण केले आहे ते सर्व तिचा सत्यानाश करण्यासाठीच, असे तिला वाटत होते. वर आकाशाकडे पाहिल्यावर तिला वाटत होते: हे जे काळे ढग इकडेतिकडे हिंडत आहेत, फक्त तेच तिला सहानुभूती दाखविण्यासाठी शोकवेष धारण करून येत आहेत. एखाद-दुसरी चांदणी चमकत होती. इतर चांदण्यांना तिची अवस्था बघवली नसावी म्हणून त्या चटकन ढगाआड दडल्या असाव्यात. उंच वृक्षदेखील आपली मस्तके हलवून हलवून तिला दुःखात साथ देत होते. सारा निसर्ग जणू तिच्या दुःखात सहभागी होता.

तिच्या देहात एकदम विजेचा संचार झाला. आपल्या जवळपास उभ्या असलेल्या लोकांकडे जळजळीत नजरेने पाहात ती म्हणाली, 'काय पाहता? माझं रक्त शोषून अजून पोट नाही भरलं? तुम्ही माझं काही बाकी शिल्लक ठेवलं नाही, तर आता यापेक्षा जास्त माझं काय बिघडवू शकणार आहात? माझं सर्वस्व भक्षण करून तृप्ततेने ढेकर देत आहात, अजूनसुद्धा...'

ज्ञानीजींनी तिचा हात पकडून तिला एका बाजूला बसविण्याचा प्रयत्न करीत म्हटले, 'बेटी! सावध हो! स्वतःवर ताबा ठेव!'

सर्व प्रवासी तेथून दूर झाले. ज्ञानीजी तिच्या मस्तकावरून हात फिरवीत म्हणाले, 'अशा तऱ्हेने वागून तू आपला जीव धोक्यात घालशील. व्हायचे ते होऊन गेले...'

सुंदरी ज्ञानीजींच्या बोलण्यावर हसत म्हणाली, 'बाबा, काय म्हटलंत? माझा जीव धोक्यात? नाही, मी एवढ्यात मरणार नाही. मला अजून पुष्कळ कामे उरकावयाची आहेत. ती पूर्ण व्हावयाच्या आत काही मी मरत नाही. खरंच पिताजी, त्यांचा अंत्यसंस्कार...'

'सर्व काही झाले आहे. तुला शुद्धीवर आणण्याची खूप खटपट केली पण...'

'असो. काही हरकत नाही.'

त्यानंतर दोघेजणं अमृतसरच्या गाडीत जाऊन बसली.

अमृतसरला पोहोचल्यावर जेव्हा दोघेजणं स्टेशनाबाहेर पडली तेव्हा सुंदरी ज्ञानीजींना म्हणाली, 'पिताजी, मी तुम्हांला आणखी आपल्याबरोबर बांधून ठेवू इच्छीत नाही. काही दिवस मला एकटं राहू द्या.'

'तुला एकटं सोडू?' ज्ञानीजींनी आश्चर्याने तिच्याकडे पाहात विचारले. 'आणि ते कशासाठी बेटी?'

'मी दिवाणपूरला जात आहे!'

'पण तेथे आता तुझे काय काम आहे?'

'तुम्हांला माहीत नाही, माताजींची जबाबदारी ते माझ्यावर सोपवून गेले आहेत. मी काही दिवस माताजींजवळ राहीन म्हणते.'

'चल तर मग, मी तुला पोहोचवून येतो.'

'नाही पिताजी, जाईन मी एकटी!'

तिला पुष्कळ समजाविल्यावरसुद्धा तिने ऐकले नाही तेव्हा ज्ञानीजींचा नाइलाज झाला. शेवटी सुंदरीने दिवाणपूरला जावे आणि ज्ञानीजींनी एकदोन दिवस अमृतसरला राहून हरिद्वारला परतावे असे ठरले.

[34]

स्टेशनच्या बाहेर पडल्यावर सुंदरीने आपल्या भविष्याबद्दल नाना तऱ्हेचे विचार करीत दिवाणपूरचा रस्ता पकडला. तिचे मन पूर्णपणे आपल्या विचारात गर्क होते. प्रत्येक क्षणाला तिला बचनसिंहाची आठवण येत होती. पण त्यामुळे ती आता रडत नव्हती की बेचैन होत नव्हती. लोखंड जसे जसे जास्त तापवले की दुसऱ्या वस्तूप्रमाणे विरघळण्याऐवजी अथवा जळण्याऐवजी ते अधिकाधिक कठीण व भयंकर बनते त्याप्रमाणे बचनसिंहाच्या मृत्यूमुळे सुंदरीचे मन जास्त कठोर व हिंस्र झाले होते.

एखाद्या संकटाची किंवा दुःखाची कल्पना जितकी भयंकर वाटते, तितके ते घडून गेल्यावर भयंकर वाटत नाही. थंडगार पाण्याच्या तलावात आंघोळ करण्याआधी त्यात

उतरावयाची भीती वाटते पण एकदोन बुड्या मारल्यावर कितीही वेळ त्या पाण्यात उभे राहिले तरी काही वाटत नाही. सुंदरीने जितकी कल्पना केली होती तितके दुःख आता तिला होत नव्हते. दुसरी गोष्ट अशी की तिच्या मनाला आता आघात सहन करण्याची सवय झाली होती. सदाकौरने त्या दिवशी तिला अतिशय वाईट वागणूक दिली होती पण बचनसिंहाच्या आज्ञेवरून तिला ते सर्व विसरावे लागले. दिवाणपुरात पोहोचल्यावर सर्वांत प्रथम ती सदाकौरच्या घरी गेली. तिने तिचे दार ठोठावले तेव्हा रात्रीचे आठ वाजले होते.

आतून आवाज आला : 'कोण ?'

धडधडत्या अंतःकरणाने सुंदरीने उत्तर दिले, 'माताजी, मी सुंदरी आहे.'

सदाकौर आपला पूर्वीपेक्षाही अधिक अपमान करील हे ती जाणून होती. बचनसिंह जिवंत असताना तिने आपल्याला किती फटकारले होते, मग आता तर ईश्वरच आपले रक्षण करो. पण काहीही सहन करण्याची तिने आपल्या मनाची तयारी केली होती.

दरवाजा उघडला आणि हातात दिवा घेऊन सदाकौर बाहेर आली. सदाकौरची दृष्टी इतकी क्षीण झाली होती की दिवसासुद्धा ती मोठ्या मुश्किलीने मनुष्य ओळखू शकत होती. सुंदरी तिच्या तोंडून शिव्या ऐकण्यास उत्सुक झाली होती. तिच्या तोंडून प्रथम कोणती शिवी बाहेर पडते ह्याची सुंदरी वाटच पाहात होती. पण तिने आपले दोन्ही हात पसरून म्हटले, 'ये, माझ्या हतभागी मुली, माझ्याजवळ ये'; आणि हे ऐकल्यावर सुंदरीचे डोळे एकदम विस्फारित झाले. ती एकदम तिच्या पायाशी कोसळली. सदाकौरने तिला प्रेमाने उचलून हृदयाशी धरले आणि रडतरडत ती म्हणाली, 'बेटी, आज तुझं सौभाग्य लुटलं गेलं ग ?'

सुंदरीच्या तोंडून शब्द फुटेना. ती स्फुंदून स्फुंदून रडू लागली. अनवरजानच्या भेटीनंतर आज दुसऱ्यांदा तिचे मातृप्रेम उफाळून आले, बचनसिंहाने अंतिम भेटीत सुंदरीबद्दल सदाकौरचे मन साफ केले होते, आणि तिला बचनसिंहाचेच रूप समजून जवळ करण्याची ताकीद दिली होती. सदाकौरने हळू हळू सर्व गोष्टी सुंदरीला सांगितल्या. एकमेकींचे दुःख ऐकून त्यांना वाटत होते बचनसिंह जिवंतच आहे. मध्यरात्रीपर्यंत दोघीजणी बोलत बसल्या होत्या. दोघीजणी मनातल्या मनात हाच विचार करीत होत्या की ईश्वराने ही भेट घडवून आणली नसती तर आपले काय झाले असते ! आपण जिवंत कशा राहिलो असतो !

बोलता बोलता सुंदरीला समजून चुकले की, सदाकौरचा सर्व पैसा आधीच संपलेला आहे, ह्या खटल्यात तिचे दागदागिनेही विकले गेले आहेत आणि काही जमीनसुद्धा गहाण पडली आहे. बाकीची उरलीसुरली जमीन नातेवाइकांच्या घशात जाणार. कारण

कायद्याने तेच वारस ठरतात. सदाकौर ह्यावेळी भाकरीच्या एका तुकड्यालासुद्धा महाग झाली होती. शिवाय सदाकौरकडून तिला हेही कळले की पालासिंह तिच्या दिरांना ताबडतोब जीवासिंहाची जमीन गिळंकृत करण्यासाठी भडकवीत असून त्यासंबंधी तयारीही सुरू झाली आहे.

सुंदरीच्या जखमी हृदयावर आणखी एक प्रहार झाला. पालासिंहाचा सूड घेण्यासाठी तिच्या शरीराचा कणन् कण उत्सुक झाला होता. तिला तेथे बसणे कठीण झाले. बचनसिंहाशी केलेले करारमदार, त्याच्या आईची शिरावर घेतलेली जबाबदारी सर्व काही ती विसरली. थोड्या वेळात सदाकौरचा डोळा लागला, तशी सुंदरी चोरपावलाने हळूच उठली, आणि कोनाड्यातील काड्याची पेटी घेऊन घराबाहेर पडली. यावेळी रात्रीचे बारा वाजले होते. सर्वत्र काळोख्या रात्रीने आपला काळा पडदा टाकला होता.

ज्या विहिरीजवळ पालासिंह आणि मंडळी बसत असत ती जागा सुंदरीने पाहिलेली होती. ती लगेच त्या जागी गेली. छपराच्या मागच्या बाजूला एका भोकातून आतला काही भाग दिसत होता. सुंदरी तेथे जाऊन लपून बसली. आत सरसोच्या तेलाचा एक दिवा जळत होता. त्याच्या प्रकाशात पालासिंह आणि त्याचे दोन साथीदार दारू पीत गप्पा मारीत असलेले तिला दिसले. वीरसिंह म्हणत होता, 'साप तर मेलाच आणि लाठी पण वाचली.'

पालासिंह म्हणाला, 'पण तू खरंच तिला जीवासिंहाच्या घरी शिरताना पाहिलेस की आपलं असंच नशेत बरळत आहेस?'

'देवाशपथ, मी आपल्या डोळ्याने पाहिले!'

'आता माझ्या तावडीतून कसली सुटतेय ती. उद्याच तिला ताब्यात घेऊन टाकतो. रोजचा झगडा तरी खतम होईल.'

'पण भाऊ, तिला ठेवणार कोठे?'

'बावळट कुठला, अरे थोड्या का जागा आहेत तिला ठेवण्यासाठी? उद्याच तिला पळवा.'

'पण भाऊ, तिने तर कोर्टात सांगितले होते की मी वेश्येची मुलगी आहे म्हणून.'

'ओहो, ह्या फालतू गोष्टी जाऊ दे. ह्या शंकाकुशंकांशी शिखांचा काय संबंध? तुम्ही वाहेगुरूंचे नाव घेऊन रात्रीच तिला आणण्याची तजवीज करा.'

'माझ्या मते जीवासिंहाच्या घराच्या मागची भिंत कच्ची आहे, तीच फोडून...'

'बस, बस, ठीक आहे.'

ही तयारी कसली चालली आहे हे समजण्यास सुंदरीला मुळीच वेळ लागला नाही. थोडा वेळ त्यांचे हेच बेत चालले होते. नंतर पिता पिता ते झोपी गेले. तेवढ्यात

सुंदरीने आसपासचे सुकलेले गवत एकत्र करून त्याचे तीन ढीग तयार केले होते. शेवटी तिने आपल्या हालचालीस सुरुवात केली

थोड्याच वेळात ती झोपडी जळू लागली होती. तिच्या ज्वाळांचा प्रकाश दूरवर पसरला होता आणि सारा गाव धावत पळत इकडेच येत होता.

जवळच उभी असलेली सुंदरी वेड्यासारखी मोठमोठ्याने हसत होती. तिच्या चेहऱ्यावर असे एक भयानक हसू होते की साक्षात मृत्यूसुद्धा थरथर कापला असता. सगळ्या गावात एकच हलकल्लोळ माजला. लोक पटापट जमा झाले. पण ते पोहोचण्यापूर्वीच भुशाच्या खोलीच्या वर ठेवलेले सर्व सरपण चाऱ्ही भिंतींच्या मधोमध जाऊन पडले.

'अरे, आता तर इथे होती ती बया' असे म्हणत लोकांनी आग विझविण्याचे प्रयत्न सुरू केले. काही लोक अपराध्याच्या शोधात इकडेतिकडे फिरू लागले. आपण एका मुलीला नदीच्या दिशेने धावत जाताना पाहिल्याचे काही लोकांनी सांगितले. सर्व लोक त्या दिशेने धावू लागले. किनाऱ्यावरील झुडपे चाचपडत लोक दूरवर गेले.

इतक्यात एक आवाज ऐकू आला : 'ती पाहा. नदीच्या पुलाकडे गेली.'

लोक पुलाच्या दिशेने धावू लागले. पण अंधारात कशाचाच पत्ता लागत नव्हता. थोड्या वेळानंतर पुलावरून आवाज आला, 'हो, मी खुनी आहे. या, ज्याच्यात हिंमत असेल त्याने पकडून दाखवा. दोन जिवांच्याबद्दल तीन जिवांचा जीव घेऊन जात आहे. कोणत्याही निरपराधी आत्म्याचा तळतळाट मला सहन करावा लागणार नाही. ज्यांनी माझं सौभाग्य पायदळी तुडवलं, माझ्या म्हाताऱ्या बापाचं रक्त घटाघटा पिण्यास जे कचरले नाहीत, त्याच लोकांच्या नरडीचा घोट मी घेतला आहे. दुष्टांनो, लक्षात ठेवा, एका सतीला ज्यांनी जिवंतपणी वैधव्याच्या यातना दिल्या ते तिच्या तळतळाटातून वाचू शकणार नाहीत. ज्या लोकांनी खोट्या साक्षी देऊन माझ्या पतीचा जीव घेतला आणि माझ्या म्हाताऱ्या बापाच्या खुन्यांना वाचविले त्यांना 'वाहे गुरू' चांगले शासन करीलच. सध्या खऱ्या अपराध्यांना आपल्या करणीचे फळ मिळाले आहे. या, या, मला पकडा.'

लोकांनी वर पाहिले तर पुलावर उभी असलेली सुंदरी हात पसरून आणि शिरा ताणून बोलत असलेली दिसली. तोपर्यंत पोलिसही तेथे येऊन पोहोचले. पोलिसांच्या मागोमाग गावातील दुसरे लोक पुलाकडे जाऊ लागले. सुंदरी अगदी शांत तशीच उभी राहिलेली पाहून त्यांना मोठे आश्चर्य वाटले. तिने थोडीसुद्धा हालचाल केली नाही. सारी गर्दी

पुलावर जाऊन पोहोचली. अजूनसुद्धा सुंदरी आपल्या जागेवर उभी राहून त्या लोकांचा धिक्कार करीत होती. पोलिस तिला पकडण्यासाठी पुढे सरसावताच तिनें धाडकन पाण्यात उडी टाकली. सर्वजण हात चोळीत बसले.

तिनें उडी मारताच नदीचें संथ पाणी एकदम उसळले. ज्या ठिकाणी तिने उडी मारली होती त्या ठिकाणचे पाणी एकदम फेसाळून उसळले, परत शांत झाले. पुलाखाली लोकांनी कंदिलाच्या प्रकाशात डोळे फाडून तिला शोधण्याचा प्रयत्न केला पण व्यर्थ. ती कायमची त्यांच्या दृष्टीआड झाली.

सुंदरीला उडी मारताना तर सर्वांनी पाहिले पण ती मेली का किनाऱ्याला लागली हे कोणालाच सांगता आले नाही. काही दिवसांनंतर वर्तमानपत्रात सुंदरीच्या रंगारूपाचे वर्णन देऊन पोलिसांनी तिला पकडून देण्यासाठी इनाम जाहीर केले. पोलिस आणि सारा गाव मोठ्या जोरात तिच्या शोधास लागला.

अपूर्ण प्रकरणाचा शेष भाग

वाचकांना आठवत असेलच की गुतेश्वर नावाचा एक प्रवासी शामदासाच्या खोलीत बसून त्याला एका कादंबरीचे हस्तलिखित वाचून दाखवीत होता. कादंबरी खूप मोठी होती. पण बाबू शामदासाला एकाच बैठकीत सारी कादंबरी ऐकावयाची होती. तो प्रवासी वाचत होता, शामदास ऐकत होता. यातच सारी रात्र संपली. प्रवाशाने जवळजवळ सर्व कादंबरी संपविली, एखादे प्रकरण उरले असेल, त्यावेळी प्रातःकाळची सूर्यकिरणे खोलीत शिरली होती. प्रवाशास अंतिम प्रकरणाची पाने क्रमवार लावण्यास थोडासा वेळ लागला. कारण हे प्रकरण निरनिराळ्या प्रकाराच्या आणि आकाराच्या कागदांवर लिहिले होते. काही भाग शाळेतील वह्यांच्या एका बाजूला तर काही भाग वृत्तपत्राच्या पानांच्या समासासाठी सोडलेल्या जागेवर असे निरनिराळ्या प्रकाराच्या आणि आकाराच्या कागदांवर लिहिले होते.

पानांचा क्रम लावल्यावर प्रवासी वाचू लागला. मध्येच त्याची नजर शामदासाच्या चेहऱ्यावर पडली. शामदासाच्या डोळ्यांतून श्रावणसरी पाझरत होत्या. त्याचा चेहरा प्रेतवत पांढराफटक पडला होता. त्याचे ओठ कापत होते.

'अरे,' प्रवाशाने हातात पकडलेली पाने तिवईवर ठेवीत म्हटले, 'तुम्ही तर रडत आहात! महाशय, ही इतकी जबरदस्त ट्रॅजेडी वाटते का?'

शामदासाला जणू काही ऐकूच आले नाही, त्याच्या डोळ्यांतून वाहणाऱ्या अश्रूंचा पूर मुळीच ओसरला नाही.

'बरं, हे अंतिम प्रकरण तूर्त तसंच ठेवतो. शिवाय ते अपूर्णच आहे.' असे म्हणत तो तिवईवरील ढीग गोळा करू लागला.

'नाही, नाही,' डोळे पुसून स्वतःला सावरीत शामदास म्हणाला, 'वाचा ना, मी अगदी ठीक आहे.' कागद गोळा करीत असलेल्या प्रवाशाचा हात पकडून तो म्हणाला, 'बापरे, किती दुःखद कहाणी आहे ही!' मुशाफिराने परत अंतिम प्रकरणाचे रद्दीसारखे दिसणारे कागद उचलून वाचायला सुरुवात केली.

[35]

वरील घटनेनंतर दोन वर्षांनी

लोक गुतेश्वराला केवळ नावाने ओळखीत होते. त्याला प्रत्यक्ष कोणीच पाहिले नव्हते. थोड्याच अवधीत, केवळ दोन वर्षांतच, तो अतिशय लोकप्रिय झाला होता. विशेषतः प्रकाशक आणि संपादक त्याला पाहण्यास अतिशय उत्सुक झाले होते. पण कित्येकदा प्रयत्न करूनही त्यांना त्याचा पत्ता मिळाला नव्हता. गुतेश्वर ह्या नावाने येणारे सर्व साहित्य पोस्टातून त्यांना मिळत असे. त्यांना योग्य वाटेल ते मानधन अमुक अमुक पत्त्यावर पाठविण्यासंबंधीची सूचनाही त्याला जोडूनच दिलेली असे. तेव्हा ज्याला जे योग्य वाटेल तेवढी रक्कम तो 'मुसम्मात सदाकौर, बेवा सरदार जीवासिंह, मौजा दिवाणपूर, जिल्हा अमृतसर' या पत्त्यावर पाठवीत असे. कित्येकदा लोकांनी या पत्त्यावर पत्र पाठवून गुतेश्वराचा ठावठिकाणा शोधण्याचा प्रयत्न केला पण आखल्या भागात गुतेश्वर नावाच्या व्यक्तीस ओळखणारा एकही इसम नव्हता. ज्या स्त्रीला पैसे पाठविले जात तिच्याकडूनही गुतेश्वराचा पत्ता लागेल असे काही समाधानकारक उत्तर मिळाले नाही.

गुतेश्वर अमृतसरमध्ये भगतांवाल्या दरवाजाच्या आत आठ आणे भाड्याची एक लहानशी खोली घेऊन राहात होता. कोणीही त्याला कोणाशी बोलताना पाहिले नव्हते. दिवसा तो खोलीचे दार बंद करून लिहीत असे आणि सारी रात्र शहराच्या बाहेर निर्जन प्रदेशात भटकत असे. कित्येकदा बागेतील माळ्यांनी त्याला गाताना आणि रडतानासुद्धा पाहिले होते. कित्येक लोक त्याचा 'मस्त' ह्या नावाने उल्लेख करीत, कधी कधी तो जास्त गर्दीच्या ठिकाणीही फिरत असे, तर कधी रस्त्यावरून जाणाऱ्या लोकांना तो असंबद्ध प्रश्न विचारत असे. बहुधा लोक त्याच्या बडबडीकडे दुर्लक्ष करून आपला रस्ता धरीत. काही त्याच्याजवळ थोडा वेळ उभे राहात.

त्याच्या खोलीत विशेष काहीच सामान नव्हते. एका कोपऱ्यात झोपण्यासाठी एक पोते पसरलेले होते, दुसऱ्या कोपऱ्यात तीन विटा जोडून एक चूल बनविली होती. तिच्याजवळच एक छोटासा तवा, एक मातीची वाटी, मातीची परात आणि सुकलेल्या लाकडाचे सरपण ठेवले होते. झोपण्याच्या जागेजवळच एक वीट उभी करून त्यावर मातीचा दिवा ठेवलेला होता. याच जागेवर बसून गुडघ्यावर लाकडाचा तक्ता ठेवून तो लिहीत असे.

आज सकाळीच तो आपल्या खोलीत बसून लिहीत होता. त्याच्या गुडघ्यावर एक जुनी फाटकी घोंगडी होती. रात्री रजईचे काम तो ह्या घोंगडीवरच भागवीत असावा. त्याच्या उजव्या बाजूला पुष्कळसे रद्दी कागद पडले होते, त्याच्या एका बाजूला शाळेचा अभ्यास होता आणि दुसऱ्या बाजूला त्याच्या अक्षरांमुळे पाने निळी झालेली होती.

संध्याकाळ झाली होती. सबंध दिवस सतत काम केल्यानंतर तो लेखणी खाली ठेवून, लिखित पाने गोळा करून उभा राहिला. दाराजवळ येऊन त्याने आळस दिला, हाताची बोटे मोडून तो श्रमपरिहार करू लागला. सर्व पाने मोजल्यानंतर त्याने आज लिहिलेल्या मजकुरावरून उडती नजर टाकली. त्याच्या तोंडून एकदम खालील उद्गार बाहेर पडले :

'हेच प्रकरण. बस हेच अंतिम प्रकरण. त्याचाही फक्त थोडाच भाग आता शिल्लक उरला आहे. तो आज संपवीन. त्यानंतर कायमची या दुःखद जीवनापासून सुटका करून घेईन. अरेरे! माझे दुसरे काम हजारो प्रयत्नांनंतर सुद्धा पूर्ण होऊ शकले नाही. पण झाले नाही त्याला मी तरी काय करू? ते होणेही अशक्यच होते. कारण मी अंधारातच वार करीत बसलो. माझ्या नशिबातच यश लिहिलेले नाही त्यात माझी काय चूक! बस, या अशक्य गोष्टीसाठी यापेक्षा अधिक वेळ फुकट घालवून उपयोग नाही, आधीच इतका जमीनदोस्त झालो आहे.'

नंतर कसल्याशा गहन विचारात तो गढून गेला. गाडी चालू झाल्यानंतर पैशाचे पाकीट खिशात नसल्याचे आत बसलेल्या एखाद्या प्रवाशाच्या लक्षात यावे, त्याप्रमाणे कागद संपल्याचे आता त्याच्या लक्षात आले. जेथे आधीच पुष्कळसे कागद गठ्ठा करून ठेवले होते त्याच कोपऱ्यात हेही कागद त्याने ठेवले आणि तो उशाशी हात ठेवून घोंगडी पांघरून आडवा झाला.

शहरात पैशाचे सर्वस्व असते. पैशाशिवाय श्वास घेणेसुद्धा तेथे कठिण जाते, आणि त्याच्याजवळ तर पैसा नव्हता. पंख तुटलेला पक्षी चाऱ्याच्या शोधार्थ बाहेर पडतो त्याप्रमाणे तो सकाळीच घराबाहेर पडला. दुष्काळात तेरावा महिना म्हणजे थंडीच्या दिवसातील ती सकाळची वेळ होती. बिचाऱ्याजवळ थंडीपासून रक्षण करण्यासाठी केवळ एक फाटका लांब कोट होता. तो त्याच्या मापाचाही नव्हता, त्याची काजी फाटली होती. बटने तुटली होती. थंडीपासून बचाव करण्यासाठी त्याने दोन्ही बाजूंला भोके पाडून सुताने टाके घालून गाठी मारल्या होत्या. खाली गुडघ्यापर्यंत जेमतेम पोहोचेल इतकी लांब तुमान होती. रेल्वेशेडमधील एखाद्या कामगाराप्रमाणे त्याच्या उघड्या पोटऱ्या धुळीने, मळाने रापल्या होत्या. तीच स्थिती त्याच्या चेहऱ्याची होती.

पण त्याच्या गोऱ्या रंगामुळे ते इतके वाईट दिसत नव्हते. त्याच्या पायातसुद्धा चपला नव्हत्या. पायाला भेगा पडल्या होत्या.

थंडीने काकडत काकडत तो कागद मिळविण्यासाठी अनेक ठिकाणी हिंडला, पण व्यर्थ. त्याला आपल्या फुटक्या नशिबाचा अगदी संताप आला होता. निराश मनाने धुसमुसत तो घरी परतला. घराजवळ आल्यावर एकदा त्याच्या मनात असाही विचार आला की हे अपूर्ण पुस्तक चुलीच्या हवाली करावे आणि त्याबरोबरच आपल्या ह्या दुःखी जीवनाचाही अंत करून टाकावा झालं. या कामासाठी तो इतका तयार झाला की त्याने सर्व कागद एकत्र करून चुलीत ठेवून दिले, पण त्याने पोत्याखालील काड्याची पेटी उघडून पाहिली तर ती रिकामीच होती. त्याच्या क्रोधात भरच पडली. आता तो काड्यापेटीच्या शोधार्थ परत घराबाहेर पडला.

त्याच वेळी त्याच्या विचारात परिवर्तन झाले. बराच वेळ भिंतीचा आधार घेऊन तो बाहेरच्या दारासमोर उभा राहिला. मग आत जाऊन त्याने सर्व कागद जसेच्या तसे चुलीबाहेर काढून पूर्ववत ठेवले आणि पुन्हा एकदा आपल्या नशिबाची परीक्षा पाहण्यासाठी तो घराबाहेर पडला.

चालता चालता एकदम जुगाऱ्यांच्या सावकाराची आठवण झाली. त्याने त्या सावकाराजवळ जाऊन त्याच्याकडे एक रुपया उधार मागितला. त्याला रुपया तर मिळाला; पण दोन रुपये परत करण्याच्या बोलीवर.

तो सरळ घरी आला. सर्व कागदांचा जुडगा करून बगलेत घालून तो रेल्वेस्टेशनावर गेला. त्यानंतर काही तासांनी तो लाहोरच्या बाजारात हिंडत होता. चारही बाजूंनी निराशेचे जाळे विणलेले होते. कोणीही त्याचे हस्तलिखित घेतले नाही. तो रद्दी कागदाचा ढीग पाहून आणि दुसरे म्हणजे त्याचा भयानक चेहरा पाहून एकदोन प्रकाशकांनी अगदीच मामुली किंमत सांगितली. दहा-पंधरा रुपये! जर त्याने हे प्रगट केले असते की आपणच गुनेश्वर आहोत तर लोकांनी त्याची पायधूळ घेतली असती. पण तो असे करू शकत नव्हता. पळपुट्या अपराध्याप्रमाणे तो स्वतःला भूमिगत ठेवू पाहात होता.

परत येताना त्याच्याकडे फक्त चवली शिल्लक उरली होती. ती सुद्धा खोटी. तिकीट न काढताच तो गाडीत चढून बसला. डब्याच्या वरच्या बर्थवर वृत्तपत्राची काही पाने पडली होती. जवळ बसलेल्या एका माणसाकडून पेन्सिल मागून घेऊन त्या वर्तमान-पत्राच्या समासावर अपूर्ण प्रकरणाचा बाकीचा भाग लिहिण्यास त्याने सुरुवात केली— पण अजूनही तो अपूर्णच होता....

शामदासाचे डोळे अजून पाण्याने भरलेलेच होते. त्याने लक्षपूर्वक पाहिल्यावर त्याला

कळून चुकले की गुप्तेश्वर त्यावेळी जे कागद वाचत होता ते खरेच वर्तमानपत्राचे जुने कागद असून त्यांच्या समासात पेन्सिलीने लिहिलेले होते. तिळमात्र जागाही रिकामी नव्हती. या वेळी मुसाफिराच्या हातात शेवटचे पान होते. त्या वर्तमानपत्राच्या कागदाच्या समासावरील शेवटच्या ओळी वाचल्यावर मुसाफिर थांबला आणि त्याने कागद तिवईवर ठेवला, कारण ते प्रकरण अजूनही अपूर्ण होते.

पुस्तक वाचून संपल्यावर परत एकदा गुप्तेश्वराने शामदासाकडे पाहिले. त्याचा चेहरा अगदी पांढरा फटक पडला होता. गुप्तेश्वराने सहानुभूतीच्या स्वरात म्हटले, 'मला वाटते, जागरणाने तुमची प्रकृती खराब झाली आहे. तुम्ही पडा थोडा वेळ.'

'नाही नाही, तुम्ही पुढे वाचा.' बाबू शामदासाने एक खोल निःश्वास सोडून म्हटले

'बस्स,' गुप्तेश्वराने म्हटले, 'ही कादंबरी संपली आहे. फक्त शेवटचे प्रकरण अपूर्ण राहिले आहे...ते...'

'संपले?' मनातील वेदना लपवीत शामदासाने विचारले, 'अजून किती उरले आहे?'

'अगदी थोडे.' गुप्तेश्वर त्याच्या चेहऱ्यावरील बेचैनी न्याहाळीत म्हणाला.

शामदासाने विचारले, 'गुप्तेश्वरसाहेब! माफ करा, एक विचारू का? या कादंबरीचा प्लॉट (कथानक) तुमच्या डोक्यातून निघाला की...'

गुप्तेश्वर मध्येच म्हणाला, 'नाही नाही. ही सत्यकथा आहे. मी कोणाकडून तरी ही सत्यकथा ऐकली होती. त्या कथेस मी फक्त कादंबरीचे स्वरूप दिले आहे. बहुधा अशा तऱ्हेचे खरे प्लॉट कादंबरीस लाभदायक ठरत असतात. ते कादंबरीस सजीवपणा देतात.'

बाबू शामदासाने रुमालाने कपाळावरील घाम टिपीत म्हटले, 'ही घटना तुम्ही कोणाकडून ऐकली?'

'प्रत्यक्ष सुंदरीच्या तोंडून.'

'खरंच! हे सर्व सुंदरीने सांगितले? ती तुम्हांला कोठे भेटली? केव्हा भेटली?' बोलता बोलता शामदास घामाघूम झाला.

'एका गावात भेटली.'

'आणि तुम्ही त्या घटनेस कादंबरीचे स्वरूप दिलेत?'

'होय, मला ती खूप आवडली.'

शामदासाच्या चेहऱ्यावर रागाची लकेर उमटली. पण आपला राग लपवीत तो म्हणाला, 'माफ करा, तुमच्यासारखे उच्च कोटीचे लेखक जर आपल्या सुपीक

डोक्यातून चांगले चांगले प्लॉट रचू शकतात, तर तुम्हांला या कहाणीची काय जरुरी होती ?'

'ठीक आहे, पण माझी अधिक यशाची अपेक्षा होती.'

'माफ करा, मी फार फटकळ आहे. तोंडावर खरे ते बोलून टाकतो. तुमच्या साहित्यिक गुणांनी मी तुमचा गुलाम बनलो आहे. पण तुमची ही गोष्ट मला अतिशय खटकली. एकदा पोहण्याचे कसब दाखविणारा एक जलतरणपटू पाण्यात पोहून लोकांना आपले कसब दाखवीत होता. आपल्या कौशल्याची कमाल दाखविण्यासाठी तो आपल्या शक्तीपेक्षा अधिक जोर लावून उलटसुलट पोहू लागला. परिणामतः त्याला दम लागून तो बुडून मेला, पोटात पाणी गेल्यामुळे पाण्याच्या पृष्ठभागाखालीच बुडून राहिला आणि तिकडे प्रेक्षक लोक जोरजोरात टाळ्या पिटून ओरडत होते, 'बघा, बघा. हुबेहूब मुडद्याप्रमाणे तरंगत आहे. खरंच हे प्रेतच वाटत आहे.' त्या बिचाऱ्या दुर्दैवी मुलीच्या जीवनाचा प्रत्येक क्षण असाच दुखःदायक होता! तिच्या दुःखी जीवनाचा तुम्ही असा फायदा कशाला घेतलात? म्हणतात ना,' शेळी जाते जिवानिशी आणि खाणारा म्हणतो वातड !' गुतेश्वरसाहेब, ही गोष्ट आपल्या कलेला कलंकित करीत आहे. किती कठोर आहात तुम्ही! तिचे कढत अश्रू आणि निःश्वास विकून स्वार्थ साधण्यापेक्षा त्या बिचारीला थोडीतरी मदत केली असती तर!'

खाली मान घालून गुतेश्वर म्हणाला, 'खरंच, चुकलं माझं. पण माझ्या हृदयाने मला असे करणे भाग पाडले.'

शामदास म्हणाला, 'जाऊ दे. इतकी वाईट गोष्ट नाही ही. माणूस स्खलनशील आहे, तसे नसते तर तो ईश्वर झाला नसता का? सुंदरीने मरण्याच्या थोडाच वेळ आधी तुम्हांला ही हकीकत सांगितली वाटते?'

'होय, बुडण्याच्या केवळ एकदोन दिवस आधी तिने आपले सारे रामायण मला ऐकवले.'

'तर मग ती नदीत बुडाली हे कसे कळले तुम्हांला?'

'त्या सुमारास माझा त्याच गावात मुक्काम होता.'

शामदासाला वाटत होते की जसे काही आपल्या शरीरावरील मांस कोणी तरी चिमट्याने ओरबाडून काढीत आहे. त्याच्या नसानसात एक वेदना ठणकत होती. थोडा वेळ थांबून तो म्हणाला, 'कमाल! गुतेश्वरसाहेब, तुम्ही खरोखरच कमाल केलीत. एका लेखकाच्या नात्यानेच तुम्ही आपला परिचय देऊ इच्छिता हे मला पक्के समजले आहे. पण आज उरलेली पृष्ठे लिहून टाका. एक विनंती आहे, ती टाळून तुम्ही माझे मन मोडणार नाहीत अशी आशा आहे. आजपासून तुमचा मुक्काम माझ्याच घरी ठेवा.

तुमच्या पवित्र संगतीने माझे पापी जीवनही सुधारेल. त्या दुर्दैवी मुलीबद्दल आणखी काही माहिती असल्यास सांगा.'

गुप्तेश्वर आनंदाने म्हणाला, 'ही कादंबरी मला पूर्ण करता आली असती तर किती बरे झाले असते.'

'का?'

'याचा अर्थ असा की या कादंबरीच्या अपूर्ण प्रकरणाप्रमाणे माझ्या जीवनगाथेचेही फक्त अंतिम प्रकरण बाकी आहे.'

'ऑं? काय म्हणालात? तुम्ही...तुम्ही...'

'होय. जगण्यासाठी मला आता काही स्थान नाही. वेळही नाही. मी...मी... एक...' बोलता बोलता गुप्तेश्वर परत थांबला, आणि त्यानंतर शामदासाने पुन्हा पुन्हा विचारल्यावरही तो काही बोलू शकला नाही.

थोडा वेळ थांबून गुप्तेश्वर म्हणाला, 'मी तुम्हांला आणखी एक तसदी देत आहे.'

'वा! हे तर माझे भाग्यच! सांगा काय आज्ञा आहे?'

परत थोडा वेळ थांबून गुप्तेश्वर म्हणाला, 'तुम्ही मनुष्यरूपी ईश्वर आहात. तुमच्या-बद्दल माझ्या मनात किती आदर आहे हे मला शब्दांत व्यक्त करता येत नाही. परोपकारासाठीच तुमच्यासारख्या महापुरुषांची ईश्वराने योजना केली असावी. माझे एक काम कराल का?'

त्याचे बोलणे ऐकून शामदासाची नजर धरणीला खिळली. तो म्हणाला, 'मी तुमचा आजीवन गुलाम बनून राहीन. ज्या सेवेसाठी तुम्ही मला योग्य समजता, त्यासाठी न विचारता आज्ञा करा, पण सन्मानार्थी शब्द माझ्यासाठी वापरू नका. मी एक नीच आणि पतित माणूस आहे. मी जे पाप केले आहे, ते सर्वांत मोठे पाप मी कधीच विसरणार नाही. तुम्ही ऐकलेत तर थरकाप होईल तुमचा. म्हणून म्हणतो की हे शब्द माझ्या लायकीचे नाहीत. ते तुम्हांलाच शोभून दिसतात!'

कृतज्ञतेने गुप्तेश्वराचे डोळे भरून आले. त्याने खाली मान घालून म्हटले, 'तुम्ही मला फार उच्च स्थानावर नेऊन पोहोचवीत आहात. मी या स्तुतीला एक हजारांशाने सुद्धा पात्र नाही. तुमचा हा विनय तुमचा मोठेपणा दाखवीत आहे, त्याने मी अधिकच प्रभावित झालो आहे.'

'मला तर तुम्ही साक्षात ईश्वरच वाटत आहात.'

गुप्तेश्वर म्हणाला, 'एक म्हणजे लाहोरच्या तंदूरवाल्याला[1] दिलेला रुमाल कसंही

---

1. हॉटेलवाल्याला.

करून परत मागवा. लाहोर रेल्वेस्टेशनाच्या अगदी समोरच ते दुकान आहे. दुसरे म्हणजे तुम्हांलाच जर ही कादंबरी प्रकाशित करण्याची व्यवस्था करता आली तर करा. त्यातून जी प्राप्ती होईल, ती माझ्या कादंबरीच्या अंतिम प्रकरणात ज्याचा उल्लेख केला आहे त्या पत्त्यावर पाठवा.'

बाबू शामदासाचे शरीर अगदी काष्ठवत झाले होते. त्याचे डोळे गुप्तेश्वराच्या चेहऱ्यावर खिळले होते. आपली वाट चुकली आहे हे लक्षात आल्यावर मनुष्य मागे वळून पाहतो त्याप्रमाणे भानावर येऊन गुप्तेश्वराच्या बोलण्याकडे लक्ष देत शामदास म्हणाला, 'माफ करा, माझे लक्ष भलतीकडेच गेले होते. हं, काय म्हणत होता तुम्ही ?'

गुप्तेश्वराने आपल्या मागण्या परत सांगितल्या.

शामदास आपल्या मनात पेटलेला वडवानल आतल्या आत दाबीत म्हणाला, 'जशी आज्ञा. तुमच्या दोन्ही आज्ञांचे पालन करण्यास मला अतिशय आनंद वाटेल. काय नाव वाचले होते तुम्ही ? माई सदाकौर ? ती तुमची कोणी नातेवाईक लागते वाटते ?'

'हं.'

'आणि तुमचा दौलतखाना (घर) ?'

'माझा दौलतखाना आता तुमच्या चरणापाशीच आहे. म्हणून त्याला गरीबखाना म्हणू शकत नाही.'

'हा तुमचा मोठेपणा आहे. पण तुम्ही राहणारे कोठले ?'

गुप्तेश्वराने सर्व कागद गोळा करीत हा प्रश्न टाळीत म्हटले, 'मला वाटतं तुम्ही थकला आहात. तेव्हा थोडी विश्रांती घ्या. तुम्हांला कामावरही जावयाचे असेल ना ?'

'नाही, आज रविवार आहे ना. बरं, ह्या गोष्टी परत कधीतरी करता येतील.' थोडा वेळ थांबून शामदास म्हणाला, 'अरे हो, तुमचा रुमाल! आज रविवार आहे, मीच जाऊन आणतो. तंदूरवाल्याचा पत्ता तुम्ही सांगितलाच आहे.'

गुप्तेश्वराने तो पत्ता परत सांगत म्हटले, 'बाबूजी! तुम्ही येथे किती वर्षांपासून आहात ?'

'सतरा-अठरा वर्षे झाली.'

'तर मग तुम्ही ह्या शहराशी चांगलेच परिचित असाल.'

'होय. तुमच्या कृपेने पुष्कळसे लोक मला ओळखतात.'

हे ऐकून गुप्तेश्वराच्या मनात आशा धुगधुगली. 'तर मग एका माणसाचा पत्ता लावण्यास तुम्ही मला मदत करू शकाल का ? आज दोन-अडीच वर्षे मी त्याला शोधीत आहे. पण त्याचा पत्ता लागला नाही, आणि तुम्हांला तर हे ऐकून हसूच येईल की त्याचा चेहरासुद्धा मी पाहिला नाही, की त्याच्या रंगरूपाबद्दल मला काही माहीत नाही. जर याचा चेहरा ओळखत असतो तर, काय सांगावे, आजपर्यंत त्याला शोधून काढले असते.'

शामदासाने म्हटले, 'तुम्हांला त्याच्याबद्दल जितकी म्हणून माहिती आहे तेवढी मला सांगा. मला वाटते कुठून ना कुठून तरी सुगावा लागेलच. रेल्वेच्या नोकरीत रोज नवीन नवीन लोकांशी संबंध येत असतो.. अहो, जगात असा कोणता मनुष्य आहे सांगा की जो रेल्वेकर्मचाऱ्यांच्या डोळ्यांसमोरून जात नसेल. तुम्हांला त्याच्याबद्दल काय माहिती आहे—लौकर सांगा.'

गुप्तेश्वर म्हणाला, 'मला फक्त त्याचे नाव माहीत आहे. बाकी काही नाही.'

'काय नाव आहे त्याचे ?'

'त्याचे नाव आहे ताराचंद. अरे, पण हे काय ! जागरणामुळे तुमची प्रकृती अगदीच खराब झाली वाटते. राहू देत ह्या गोष्टी. तुम्ही आज लाहोरलासुद्धा जाऊ नका. रुमालाचे परत कधीतरी पाहता येईल. तुम्ही आता आराम करा. तुमचा चेहरा अगदीच पांढराफटक पडला आहे.'

रुमालाने कपाळ पुशीत, खाकरून आवाज नीट करीत, शामदास परत म्हणाला, 'तुम्ही चिंता करू नका. कधीकधी असाच माझा जीव घाबरा होतो. आता बरे वाटेल. हं, हा ताराचंद आधी कुठे राहात होता ?'

'आधी तो सियालकोटला राहात होता.' (शामदासाच्या चेहऱ्याकडे पाहात) 'नाही महाशय ! तुमचा आवाजही कापरा झाला आहे. तुम्ही उठून खाटेवर पडा पाहू.'

शामदासाची अस्वस्थता फारच वाढली होती. रुमालाने आपल्या चेहऱ्याला वारा घालीत तो म्हणाला, 'अरे, मी त्याला चांगला ओळखतो.' त्याचा चेहरा प्रेतवत पडला होता, हात ताठरले होते, दमेकऱ्यासारखा त्याला श्वास लागत होता.

'तुम्ही त्याला ओळखता ! अगदी चांगले !' गुप्तेश्वराने खुशीत येऊन विचारले. एखाद्याला हरवलेले धन मिळावे तसा तो आनंदाने वेडा झाला. त्याला आपल्या हर्षा-वर ताबा ठेवता आला नाही. तो एकदम उठून उभा राहिला. शामदासाचा भयभीत चेहरा, अस्वस्थता, सर्व काही तो विसरून गेला. तो घाईघाईने म्हणाला, 'कृपा करून लवकर सांगा कोठे राहतो तो ! तुम्ही माझी त्याच्याशी भेट करून द्याल ?'

शामदास म्हणाला, 'एकदाच काय, हजारदा करून देईन. माझी त्याच्याशी चांगली ओळख आहे.' शामदास वेड्यासारखे डोळे विस्फारून गुप्तेश्वराकडे पाहून म्हणाला.

गुप्तेश्वर आपल्या आनंदावर ताबा ठेवण्याचा प्रयत्न करीत अधीरतेने विचारू लागला, 'कोठे राहतो तो ! काय काम करतो ?'

'लाहोरमध्ये राहतो आणि एका सरकारी कचेरीत काम करतो.'

'कृपा करून आजच माझी त्याच्याशी गाठ घालून द्याल ?'

'संध्याकाळपर्यंत त्याला आपल्याबरोबर घेऊन येईन म्हणतो.'

'बाबूजी, तुमचे कसे आभार मानू? माझ्या कातड्याचे जोडे करून तुमच्या पायांत घातले, तरी तुमचे हे उपकार फिटणार नाहीत. माझ्या जीवनातील एक कठीण समस्या तुम्ही सोडविली आहे. तुमचा थकवा आणि प्रकृतीचे अस्वास्थ्य मी समजू शकतो. तरी पण तुम्हांला आज कितीही त्रास पडला तरी हरकत नाही, आजच माझी भेट करून द्या अशी विनंती केल्याशिवाय मला राहावत नाही हो.'

यानंतर दोघेजण थोडा वेळ आराम करण्यासाठी पडले. पण रात्रभर जागरण होऊन सुद्धा त्यांना आता झोप लागली नाही. भोजनाच्या वेळी नोकराने भोजन तयार केले. दोघांनी आंबोळपांबोळ करून भोजन उरकले.

गुप्तेश्वराला कादंबरीचे शेवटचे प्रकरण पूर्ण करण्याविषयी बजावून शामदास सव्वा-बाराच्या गाडीने लाहोरला गेला.

गुप्तेश्वराचा चेहरा आज सफलतेच्या आनंदाने उजळला होता. जीवनात आज पहिल्या-प्रथमच त्याला यश मिळत होते.

आज त्याच्याजवळ भरपूर कागद होते, उत्तम प्रकारचे लेखनसाहित्य होते, बसण्यां-साठी चांगली जागा होती, कधी नव्हे इतके मन आनंदित होते, पण त्याच्याजवळ आज लिहिण्यासाठी काही शिल्लक उरले नव्हते. शिकाऱ्याला जेव्हा शिकार गवसत होती तेव्हा त्याच्याजवळ पकडण्याचे सामान अगदीच थोडे आणि बेकार होते, आणि आज शिकार करण्याचे सर्व साहित्य त्याच्या सेवेसाठी हात जोडून उपस्थित असता शिकार खेळण्यासाठी हौसच त्याच्या मनातून मावळली होती. तो अतिशय उत्सुकतेने शामदास आणि ताराचंद यांची वाट पाहात होता. त्याची नजर सतत समोरील भितीवर टांगलेल्या घड्याळाकडे खिळली होती.

शेवटी पाच वाजले. गुप्तेश्वर बाहेर दरवाजासमोर येरझाऱ्या घालू लागला. समोरच्या वळणावर एखादा टांगा या बाजूला येऊ लागला की त्याचे हृदय धडधडू लागे. त्याची चुळबूळ, अस्वस्थता अगदी शिगेला पोहोचली होती.

शेवटी एक टांगा आला एकदाचा. पण त्यातून फक्त शामदासच उतरला. गुप्तेश्वराची बेचैनी समजून शामदासाने आल्याआल्याच सांगितले, 'ते येत आहेत.'

गुप्तेश्वराच्या जिवात जीव आला. त्याने विचारले, 'कुठे आहेत?'

शामदास धापा टाकीत होता. त्याचा चेहरा भयभीत दिसत होता. देह कापत होता. त्याची स्थिती पाहून चिंतेच्या स्वरात गुप्तेश्वराने विचारले,

'काय झाले? तुम्ही असे का दिसता? अजून तुमची प्रकृती ठीक झाली नाही का?'

शामदास आपली भीती लपविण्याचा प्रयत्न करीत, उसने हसू तोंडावर आणीत म्हणाला, 'नाही, विशेष काही नाही. गाडीला वेळ होता म्हणून मी एका ट्रकमधून आलो. रस्त्यात एक अपघात झाला. तो ट्रक एका झाडावर आदळला. पुष्कळ लोक जखमी झाले. मला काही विशेष लागले नाही. पण या धक्क्याने माझे मन घाबरेघुबरे झाले आहे.' गुप्तेश्वराने घाबरून म्हटले, 'चला तर, आत येऊन आराम करा. मी नोकराला गरम गरम दूध आणावयास सांगतो आणि...'

त्याला मध्येच थांबवून शामदास म्हणाला, 'नाही, महाशय, मला काही विशेष त्रास झाला नाही. मी जरा स्टेशनावर जातो. आमचा जनरल ऑफिसर आज काही खाजगी कामासाठी येथून जाणार आहे. तेव्हा मला आणि दुसऱ्या कर्मचाऱ्यांना तेथे उपस्थित राहणे आवश्यक आहे. हा घ्या तुमचा रुमाल.'

गुप्तेश्वराला रुमाल देऊन तो टांग्यात जाऊन बसला आणि म्हणाला, 'मिस्टर ताराचंद सवासहा वाजता येतील. तुम्ही येथेच त्यांची वाट पाहात राहा. मला वाटते त्याने ४–४५ चीच गाडी पकडली असावी.' तांगा वळणावरून दृष्टीआड झाला.

सवासहा झाले, सात वाजले, तरी ताराचंदाचा पत्ता नाही. गुप्तेश्वर दाराजवळ उभा राहून येणाऱ्याजाणाऱ्याकडे लक्षपूर्वक पाहात होता.

काळोख वाढत होता. त्याच वेळी गुप्तेश्वराने पाहिले तो एक उंच मनुष्य दारासमोर उभा राहून विचारत होता, 'बाबू शामदासाचे घर हेच का?'

गुप्तेश्वराने ताडले की हाच ताराचंद. तो म्हणाला, 'या. तुम्हीच मिस्टर ताराचंद का?' 'होय' असे म्हणून तो झटकन आत शिरला. गुप्तेश्वराने बैठकीच्या खोलीत जाऊन त्याला खुर्चीवर बसण्यास सांगितले.

ताराचंदाने ओव्हरकोट घातला होता, आणि डोळे दुखत असल्यामुळे की दुसऱ्या कसल्या तरी कारणाने म्हणा, त्याने उन्हाचा काळा चष्मा घातला होता. डोक्यावर बेडौल आकाराची पगडी बांधली होती. ओव्हरकोटाची कॉलर वर चढविली होती, त्यावरून वाटत होते की तो थंडीस अतिशय घाबरत असावा.

पुष्कळ वेळ ते निमूटपणे समोरासमोर खुर्चीवर बसून राहिले.

शेवटी गुप्तेश्वराने मौनभंग करीत म्हटले, 'काय हो, तुम्हीच ताराचंद आहात ना?'

तो काही बोलला नाही, फक्त मान हलवून त्याने होकार दिला.

गुप्तेश्वराने परत म्हटले, 'आजपर्यंत मी तुमच्याच शोधार्थ भटकत होतो. दुसऱ्या शब्दात सांगावयाचे म्हणजे तुमच्याच नरडीचा घोट घेण्यासाठी मी आतापर्यंत जिवंत राहिलो होतो.' बोलता बोलता गुप्तेश्वराच्या आवाजाला धार आली व त्याचे डोळे लाल झाले.

ताराचंद तसाच शांतपणे बसला होता. त्याने गंभीरपणे म्हटले, 'मला तुमच्या बोलण्याचा अर्थ समजला नाही.'

गुप्तेश्वर आता रागाने थरथर कापत होता. त्याच्या रोमारोमात सूडभावना धगधगत होती. त्याच्या मनावरचा ताबा सुटला. तो ओरडला, 'काय म्हणालास सैताना, तुला माझ्या बोलण्याचा अर्थ नाही समजला? ठीक आहे. तो अर्थ तुला समजून सांगण्यासाठीच मी इतके दिवस तुला शोधीत होतो.'

ताराचंद परत म्हणाला, 'पण आपले बोलणे सुरू करण्याच्या आधी मला तुमचा परिचय करून द्याल का?'

'हो, का नाही?' गुप्तेश्वराने दरडावून म्हटले, 'गुरदेई नावाच्या एखाद्या स्त्रीला तू ओळखतोस का?'

'होय, पण तिचा आणि तुमचा काय संबंध?'

'तो संबंध सांगण्यासाठीच तर मी तुला शोधीत होतो. हं, ती तुझी कोण लागत होती?'

'ती माझी घरवाली होती.'

'तर मग आता कोठे आहे ती?'

ताराचंदाने काही उत्तर दिले नाही.

गुप्तेश्वराने परत विचारले, 'ती जिवंत आहे की मेली हे तरी तुला ठाऊक आहे का?'

ताराचंदाने तसेच शांतपणे उत्तर दिले, 'ती मेल्याचे मी ऐकले.'

'कोणाकडून ऐकलेस?'

ताराचंद गप्प बसला.

गुप्तेश्वर परत दरडावून म्हणाला, 'नाही, नाही, तू खोटारडा आहेस. सैतान आहेस. ती मेली की जिवंत आहे हे तुला माहीत नाही. हे तुला जाणून घेण्याची आवश्यकताच वाटली नाही. तिला तू मरणोन्मुख स्थितीत सोडून गेलास हेच तुला माहीत आहे. त्यानंतर बिचारीची काय दुर्दशा झाली याचे तुला मुळीच ज्ञान नाही.'

या वेळी ताराचंद नखशिखान्त कापत होता. त्याच्या तोंडून शब्दच फुटेना.

गुप्तेश्वरास क्रोधाने एका जागी बसणे कठिण झाले. तो आवेशाने खुर्चीवरून उठून उभा राहिला. दोन्ही मुठी आवळून वाघाप्रमाणे तो ताराचंदाच्या अंगावर धावून गेला. एका हाताने त्याचा गळा दाबून आणि दुसऱ्या हाताने त्याचा खांदा जोरजोरात घुसळीत तो म्हणाला, 'हलकट! नीच! आता का दातखिळी बसली? अशा तऱ्हेनं सोंग-ढोंग केल्यानं मी तुला जितं सोडीन असं वाटलं की काय तुला? याद राख, आता ह्या

दुनियेतील कोणतीही शक्ती माझ्यापासून तुझा बचाव करू शकणार नाही. (दातओठ खात) मी ही (वेगाने कोटाच्या खालील धारदार कट्यार काढून) तुझ्या छाताडात खुपसून आपल्या ओंजळी भरभरून तुझे रक्त पिईन तेव्हां कुठे माझ्या हृदयातील आगीचा डोंब शांत होईल. शामदासबाबूंच्या घरी तुझ्यासारख्या नीच चांडाळाला बोलावण्यात मी मोठा अन्याय केला आहे. या पवित्र जागी तुझे अपवित्र रक्त सांडल्याने मी मोठा गुन्हेगार ठरेन हे मला माहीत आहे. पण सध्या मला या गोष्टीची परवा नाही. माझी खात्री आहे की शामदासबाबूंना तुझ्या कसाब-करणीची माहिती झाल्यावर ते केवळ माझ्या या चुकीबद्दल क्षमाच करून गप्प बसणार नाहीत, तर एका नरभक्षक राक्षसाचा संहार केल्याबद्दल माझी पाठच थोपटतील.

'सांग! लौकर सांग! जाऊ दे. तुला सांगायचे नसेल तर मलासुद्धा काही विचारावयाची गरज नाही. मी फक्त एकच गोष्ट जाणतो की, तूच माझ्या आईचा खुनी आहेस. तिची अब्रू लुटणारा लुटारू आहेस. सैताना! मरण्यापूर्वी काही सांगावयाचे असेल तर सांग चटकन, पाच मिनिटांची सवलत देतो.'

ताराचंद अजूनही कापत होता, त्याची नजर जमिनीला खिळली होती. गुतेश्वराने वारंवार चिथावल्यावरसुद्धा त्याने वरील प्रश्नाचे उत्तर दिले नाही.

गुतेश्वर परत विजेप्रमाणे कडाडून म्हणाला, 'दुष्टा, ऐक, अगदी कान सताड उघडे ठेवून ऐक. ज्या माणसास एका निराश्रित अबलेचा विश्वासघात करून तिला जाळ्यात अडकवून तिची अब्रू धुळीला मिळविण्यास लाज वाटत नाही, नंतर तिला प्रसूतीच्या वेळी जो तिला आणि तिच्या अबोध बालिकेला ठोकरा खाण्यासाठी कंटकमय रस्त्यावर फेकून निघून जातो, शेवटी बिचाऱ्या अबलेला नाइलाजाने वेश्याव्यवसाय जवळ करावा लागतो, अशा दुराचारी माणसास मनुष्य म्हणवून घ्यावयाचा अधिकार नाही, त्याला जिवंत राहावयाचाही हक्क नाही.'

ताराचंद मूर्तिवत बसून राहिला. गुतेश्वराने विचारले, 'अशा चांडाळाला या पृथ्वीला भारभूत होऊन राहण्याचा काय हक्क आहे? या गोष्टीचा निर्णय मी तुझ्यावरच सोपवितो. लौकर सांग, या अपराध्याला जिवंत राहू द्यावे?'

त्याने मान हलवून 'नाही' असे उत्तर दिले.

'तर तू मरण्यास तयार आहेस?'

त्याने परत होकारार्थी मान हलविली.

'घे तर मग. हो तयार.' असे म्हणून त्याने इतक्या वेगाने कट्यार उचलली की ताराचंदाच्या ठिकाणी दुसरा कोणी असता तर त्याच्या काळजाचे पाणी पाणी झाले असते.

आता खोलीत खूप काळोख दाटला होता. आपला वार चुकणार तर नाही ना, असा विचार करून गुप्तेश्वराने झटकन दिव्याचे बटन दाबले, खोली प्रकाशाने न्हाऊन गेली. ताराचंद डोळा चुकवून पळून जाऊ नये म्हणून त्याने खोलीची कडीही लावून घेतली.

दिव्याच्या प्रकाशामध्ये त्याने ताराचंदाकडे पाहिले तर ताराचंद कापऱ्या हाताने शर्टाची आणि कोटाची बटनें काढून छाती उघडी करीत होता.

ताराचंदाची ही निर्भयता पाहून गुप्तेश्वर चकित झाला—जणू ताराचंद मरण्याची तयारी करूनच आला होता! गुप्तेश्वराला वाटले : न जाणो अशा रीतीने माझ्या मनात करुणा उत्पन्न करण्याचा प्रयत्न तर हा करीत नाही ना?

अधिक विलंब लावणे योग्य नाही असे समजून, कट्यार घेतलेला हात परत उंच करून इतक्या वेगाने तो त्याच्या अंगावर धावून आला की जणू एका घावानेंच तो त्याचे दोन तुकडे करणार होता. पण त्याचा हात अजून छातीपर्यंत पोहोचलाही नव्हता तोच त्याची नजर ताराचंदाच्या चेहऱ्याकडे वळली. आणि...

त्याने हात पुढे सरसावण्याऐवजी मागे घेतला, आणि तो स्वतः पुढे झाला. गळा दाबल्यामुळे ताराचंदाची पगडी खाली आली होती आणि चष्म्याची काडीसुद्धा पगडीत अडकून एका कानाखाली आली होती. गुप्तेश्वराने त्याच्या अंगास हात लावून पाहिला, तो घामाने न्हाऊन निघाला होता. त्याचे शरीर बर्फासारखे थंडगार पडले होते.

एक किंकाळी मारून गुप्तेश्वर मागे सरला. त्याच्या डोळ्यांसमोर काळोखी आली. दुसऱ्याच क्षणी तो परत पुढे झाला आणि त्याने ताराचंदाचा चश्मा काढून त्याचा चेहरा नीट न्याहाळून पाहिला. तो ओरडला, 'अरे, शामदासबाबू?'

गुप्तेश्वराच्या डोळ्यांसमोर सारी खोली फिरू लागली. त्याला हा जादूचा खेळच वाटू लागला. किती वेळ तसाच उभा राहून तो त्याच्याकडे टकमक पाहात होता देव जाणे! कट्यार घेतलेला हात परत एकदा त्याने वर उचलला, पण परत खाली आणला. त्याच्या हातातून कट्यार गळून पडली.

आता गुप्तेश्वर ताराचंदाच्या गळ्यात पडला होता. किती अपूर्व आणि आश्चर्यकारक होते हे मीलन!

शामदासबाबूने त्याला हृदयाशी घट्ट धरून ठेवले आणि रडत रडत तो म्हणाला, 'एका दुष्ट सैतानस्वरूप बापाच्या हतभागी मुली सुंदरी! तू अजून या कसाई बापास जिवंत ठेवले आहेस?'

त्याच वेळी शामदासाची नजर जमिनीकडे वळली. थोडे थबकून तो परत उठला आणि खाली वाकला. दुसऱ्याच क्षणी त्याच्या हातात कट्यार आली. त्याने कट्यारीचे

टोक आपल्या छातीला लावून हात मागे केला. कट्यार छातीला फाडून त्याच्या काळजात घुसणार इतक्यात गुप्तेश्वराने झटकन दोन्ही हातांची पूर्ण ताकद लावून त्याचे मनगट पकडले. कट्यारीचे टोक त्याच्या छातीला स्पर्श करण्यापूर्वी वाऱ्याने दिव्याची ज्योत थरथर कापावी त्याप्रमाणे शामदास थरारून गेला. त्याचबरोबर एक प्रेमळ स्वर त्याच्या कानी आला, 'पिताजी! पुरे, नका हे काम करू. व्हायचे ते होऊन गेले.'

शामदास म्हणाला, 'बेटी! माझ्यावर दया कर. सुंदरी, या दुष्ट बापावर दया कर, त्याला जिवंत ठेवून नव्हे तर त्याला ठार मारून त्याच्यावर कृपा कर. बेटी, आता माझे जिणे, ते सुद्धा तुझ्या नजरेसमोर जिणे, हजारो वेळा मरण्यापेक्षाही अधिक वाईट आहे. म्हणूनच मी वेषान्तर करून आलो आहे, म्हणजे तुझ्या कामात अडथळा येणार नाही.'

'चल आटप लवकर, सुंदरी. अशा स्थितीत मला जिवंत ठेवून माझ्या पापाचे गाठोडे अधिक जड करू नकोस. तुझे कर्तव्य पूर्ण कर. तुझ्या त्या दुर्दैवी मातेच्या आज्ञेचे पालन कर; नाही तर तिचा आत्मा असाच तडफडत राहील, आणि ते पाप तुझ्या माथ्यावर बसेल.'

सुंदरीने (गुप्तेश्वराने नाही—सुंदरीने) त्याला मोठ्या प्रेमाने उठविले आणि खाटेवर बसवीत त्याच्या गळ्यात हात घालून ती म्हणाली, 'बाबा! माझे कर्तव्य पूर्ण झाले. आईने ज्याला मारण्याचे काम माझ्यावर सोपविले होते तो मी मारण्याच्या आधीच मरून गेला आहे. त्याच्या वाईट सवयी आणि पाप सर्वांचा नाश झाला आहे. आता त्याचे जीवन वेगळेच आहे, एखाद्या महापुरुषाच्या जीवनाप्रमाणे त्याचे जीवन आहे.'

शामदासबाबू आता दोन्ही हातांनी तोंड लपवून स्फुंदत होता. सुंदरी त्याच्या जवळ बसली आणि प्रेमाने त्याच्या डोक्यावरून हात फिरवीत म्हणाली, 'पिताजी, तुम्ही शतायुषी व्हा. अजून मला तुमची अतिशय गरज आहे.'

शामदासाच्या तोंडून शब्द फुटत नव्हता. सुंदरी परत म्हणाली, 'पिताजी, मला जवळ घ्या. मी तुमची सुंदरी आहे.' शामदासाचा धीर सुटला, त्याने रडतरडत सुंदरीच्या कपाळाचे चुंबन घेतले. पण अजूनही त्याच्या तोंडून शब्द फुटत नव्हता.

त्यानंतर पुष्कळ वेळ दोघेजणं एकमेकांकडे पाहात राहिली, जणू त्यांचे सारे अवयव नेत्र बनले होते. सुंदरी म्हणाली, 'बाऊजी![1] तुम्ही मला आधीच ओळखले होते का?'

शामदास स्वतःला सावरीत म्हणाला, 'पुत्तर! पूर्णपणे नाही, पण थोडीशी शंका आली होती. पण जेव्हा तू रुमाल मागितलास, तेव्हा माझा संशय पक्का झाला.

---

1. बाबूजी

त्यानंतर जेव्हा तू माझा पत्ता विचारलास तेव्हा मला वाटले निश्चितच हा गुप्तेश्वर म्हणजेच सुंदरी आहे. जेव्हा मी तो रुमाल पाहिला, तेव्हा माझ्या उरल्यासुरल्या शंकेचेही निरसन झाले.'

सुंदरीला आठवले की बचनसिंहाला फाशी झाल्यानंतर रुमालाच्या एका कोपऱ्यात तिने रेशमाने भरले होते, 'दुर्दैवी सुंदरीच्या हरवलेल्या सौभाग्याची अखेरची निशाणी.'

बाबू शामदास पुढे म्हणाला, 'मुली ! खरं पाहता तुला मी स्टेशनावर पकडले ना, तेव्हाच मी तुला अंधुकसे ओळखले. तुझ्या डोळ्यांकडे दृष्टी जाताच मला तुझ्या आईची (गुरदेईची) आठवण झाली. तिचे डोळे अगदी तुझ्यासारखे होते. दुसऱ्या शब्दांत सांगावयाचे म्हणजे काल अठरा-एकोणीस वर्षांनंतर तुझ्या आईला तुझ्याच डोळ्यांत मी पाहिले. पण म्हटले चेहऱ्यासारखे चेहरे असतात. म्हणूनच ह्या गोष्टीकडे मी जास्त लक्ष दिले नाही. पण बेटी ! तुझ्या जीवनकथेत तर या रुमालाचा कोठेच उल्लेख नाही आला !'

सुंदरीने नजर खाली वळवून म्हटले, 'पिताजी, पुस्तकात तुम्ही ऐकलेच होते की जेव्हा मी रोडूच्या झोपडीत राहात होते तेव्हा एक दिवस ते आले होते. त्याच दिवशी आमची बंदरी हरवली होती. मी रडत असलेली पाहून त्यांनी खिशातून रुमाल काढून माझे डोळे पुसले. तो रुमाल माझ्याचजवळ राहिला. बस त्यांची हीच तर एक...' बोलता बोलता तिचे डोळे भरून आले, गळा दाटून आला.

शामदासाने एक निःश्वास सोडून म्हटले, 'पण बेटी, तू तर पुस्तकात लिहिले होतेस की सुंदरी नदीत बुडून मेली.'

'खरंच सुंदरी बुडाली होती पण मेली नव्हती. मी वाहात जात असता एका म्हाताऱ्या नावाड्याने मला नदीबाहेर काढून वाचविले होते. फारच चांगला होता तो. अजूनसुद्धा मला त्याची रोज आठवण येते.'

'पुत्तर, तर मग तू अमृतसरला आली होतीस ?'

'होय.'

'पण तू वेषांतर का केलेस ?'

'खूप कारणे होती. एक म्हणजे पोलिसांची भीती होती, कारण मी तीन खून केले होते; दुसरे म्हणजे त्यांची आज्ञा होती की मी त्यांच्या आईचा सांभाळ करावा, त्यासाठी लेखन करून मला पैसे मिळवायचे होते; तिसरे म्हणजे माझ्या दुसऱ्या पुस्तकांशिवाय आत्मकथा आणि समाजाच्या 'श्वेत रक्ता'ची चित्रंसुद्धा एका कादंबरीच्या रूपात तयार करण्याची माझी इच्छा होती. चौथं काम होतं तुम्हांला...' बोलता बोलता ती थांबली, तिची नजर खाली वळली.

शामदासाने तिच्या डोक्यावरून हात फिरवीत म्हटले, ‘बेटी, आता तुझी सर्व कामे पूर्ण झाली ना?’

काही वेळ गप्प बसून सुंदरी म्हणाली, ‘होय. माझी सारी कामे पूर्ण झाली. आता मी माझ्या जबाबदाऱ्यांतून मोकळी झाले आहे.’

‘आता तू कायमची माझ्या नजरेसमोर राहशील ना?’

‘होय पिताजी! जिवात जीव असेपर्यंत तुमच्याच जवळ राहीन.’

शामदासाने गहिवरून म्हटले, ‘मी आपल्या बेटीला आता जाऊन कपडे शिवून आणतो. तू आपला वेश बदल.’

‘होय, पिताजी, मी उद्या अवश्य माझा वेश बदलून आपल्या मूळ स्वरूपात दिसेन.’

‘तुला त्या स्वरूपात पाहून किती आनंद होईल बरे मला.’

‘पिताजी! तुम्हाला खरंच आनंद व्हावयास पाहिजे. एक माझ्या यशाची खुशी, आणि दुसरी माझ्या स्वरूपात प्रकट होण्याची खुशी, होय ना?’

‘वा बेटी, मी खुश होणार नाही असे कसे होईल?’

‘वाहेगुरू असेच करो.’

‘अरे पुत्तर, या प्रकरणाचा शेष भाग?’

‘तो उद्या सकाळी तुमच्या डोळ्यांसमोर येईल.’

काही वेळ थांबून सुंदरी म्हणाली, ‘पिताजी! पण तुम्ही आपली हकीगत नाही सांगितलीत ती!’

‘बेटी! माझे आयुष्य इतके पापी आणि दुराचारी होते की तुझ्यासमोर त्याचा उच्चारही करवत नाही. बरे झाले तुला मी काहीच सांगितले नाही ते. केवळ इतकेच सांगतो की तुझ्या आईला मरणोन्मुख स्थितीत सोडून, सर्व काही गोळा करून मी तेथून निघून गेलो होतो. काही दिवस भटकल्यानंतर मला रेल्वेत नोकरी मिळाली. तोसुद्धा एक योगायोगच म्हटला पाहिजे. तेव्हा रेल्वेकर्मचाऱ्यांचा हरताळ चालला होता, आणि टपाल वाहणाऱ्या गाड्यांशिवाय सर्व गाड्या बंद होत्या. शेवटी रेल्वेने काम चालू ठेवण्यासाठी नवीन लोकांची भरती करण्यास सुरुवात केली, आणि मला नोकरी मिळाली. मी आपले नाव बदलले; कारण माझे पूर्वायुष्य अतिशय भयानक होते, त्याच्यामुळे माझे वर्तमान आयुष्य सुद्धा धोक्यात येईल की काय असे वाटत होते. मागच्या गुन्ह्यांमुळे आणि दुष्कृत्यांमुळे आपल्याला कोर्टात सुद्धा उभे राहावे लागेल की काय असे मला वाटले.’

यानंतर शामदासाने बाजारात जाऊन सुंदरीसाठी कपडे आणले. दोघेजणं रात्री पुष्कळ

वेळपर्यंत गप्पा मारीत मारीत शेवटी झोपी गेली.

सकाळी जेव्हा शामदास सुंदरीच्या खोलीत गेला तेव्हा सुंदरी स्त्री-वेषात आरामात झोपलेली दिसली. त्याने सुंदरीला हाका मारल्या, नंतर हलविले, पण ती काही बोलली नाही की तिने काही हालचाल केली नाही. त्याने तिच्या तोंडावरील कपडा बाजूला केला तशी तो कपाळावर हात मारून मटकन खाली बसला. सुंदरी चिरनिद्रा घेत होती. तिच्या चेहऱ्यावर एक विलक्षण स्वर्गीय आभा होती, ओठावर सफलतेचे हसू होते. कालचा रुमाल तिच्या छातीवर पडला होता. चिरवियोगाच्या वेळी आपल्या प्राणापेक्षाही अधिक प्रिय असलेल्या प्रियतमाचा हात पकडावा त्याप्रमाणे तिने तो अगदी घट्ट धरून ठेवला होता. रुमालाच्या खाली त्याला कालच्या कट्यारीची मूठ दिसली. तिचे सर्व पाते तिच्या छातीत घुसले होते. शामदासाच्या हृदयात एक तीव्र कळ उठली व त्याने हंबरडा फोडला. इतक्यात त्याची दृष्टी तिवईवरील काही कागदांवर गेली. ते सुंदरीचे अंतिम पत्र होते.

शामदासाने वाचण्यास प्रारंभ केला :

'पूज्य पिताजी,

'मला माहीत आहे की तुम्ही अतिशय धैर्यशाली आहात. तुम्हांला आत्मिक ज्ञानसुद्धा प्राप्त आहे. मी फारच लवकर तुमच्यापासून दूर जात आहे याचे तुम्हांला खूप दुःख होईल. पण बाबा, माझी मनःस्थिती तुम्हांला समजली तर तुमच्या मनास जरूर शांती लाभेल.

'माझ्या जीवनाधाराशिवाय मी ही दोन-अडीच वर्षे कशी घालविली हे तुम्हांला माहीतच आहे. त्यांच्या आज्ञेचे पालन करण्यासाठीच केवळ मी जगले. त्यांच्या हुकुमात इतकी शक्ती होती म्हणूनच त्यांच्याशिवाय मी जिवंत राहू शकले, नाहीतर त्यांच्याशिवाय श्वास घेणेसुद्धा मला अशक्य होते.

'पण पिताजी, इतके सर्व झाल्यानंतर सुद्धा मला सारखी एक रुखरुख लागून राहिली आहे. माझ्या हातून असे पाप घडले आहे की केवळ पापच नाही तर माझ्या प्राणनाथांच्या आज्ञेचे उल्लंघनसुद्धा—याच्यासाठी वाहेगुरू मला शिक्षा करतीलच, पण ते मला माफ करतील की नाही याची मला भीती वाटते.

'ते पाप म्हणजे पालसिंह आणि त्याच्या मित्रांचे मी प्राण घेतले. पण त्या वेळी मी क्रोधाने आंधळी झाले होते. सूडाच्या भावनेने माझ्या बुद्धीवर पडदा घातला गेला होता. माझ्या पतींनी मला समजावण्याचा खूप प्रयत्न केला होता. माझी समजूतही पटली होती. पण त्यावेळी मला काय झाले होते देव जाणे, त्यांच्या कत्तलीचा बदला घेण्याचा

हाच सर्वोत्तम मार्ग आहे असे माझ्या मनाने घेतले होते. पण आज मला कळून चुकले पिताजी! तुम्हांला पाहून आज माझे डोळे खाडकन उघडले. मी तुमचा जसा बदला घेतला तीच पद्धत सर्वांत चांगली व नैसर्गिक आहे. ज्याप्रमाणे माझे साहित्य वाचून तुमचा कायाकल्प झाला, त्याप्रमाणेच जर हेच हत्यार मी त्या अपराध्यांवर, समाजावर चालविले असते, भावनेच्या ऐवजी बुद्धीने आणि सुरीच्या ऐवजी लेखणीने काम करीत पुढे गेले असते, तर केवळ त्याच लोकांचे जीवन बदलले नसते, तर आणखीही कित्येक वाट चुकलेली कोकरे योग्य मार्गावर आली असती!

'पण...! गेलेली वेळ पुन्हा हातात येणार नाही.' प्रिय पिताजी! तुम्ही ईश्वराजवळ हीच प्रार्थना करा की माझ्या बेटीला क्षमा कर.

'जोपर्यंत त्यांच्या वृद्ध आईच्या जबाबदारीतून मी मोकळी होत नाही तोपर्यंत मला त्यांच्याजवळ जाता येणार नाही, अशी मला त्यांची आज्ञा होती. बाबा, आता तुम्ही भेटलात, आता आपल्या सासूबद्दल मी निश्चिंत झाले. आजपासून ही जबाबदारी तुमच्यावर बरं का!

'याशिवाय माझ्या आईबद्दलचे जे कर्तव्य मला करावयाचे होते त्याचीही पूर्ती झाली आहे. तिचा आत्मा तुमच्या रक्ताने शांत होणार होता तो आता तुमच्या अश्रूंनी अधिक शांत होईल याची मला पूर्ण खात्री आहे.

'चौथे कर्तव्य खुद्द माझ्या बाबतीत होते; ते म्हणजे आत्मकथेस कादंबरीचे स्वरूप देऊन या कठोर आणि निर्दयी समाजाचे जिवंत चित्र जगासमोर ठेवणे. हे कामही पूर्ण झाले आहे. आता मी आपल्या जीवनातील सर्व कर्तव्ये पूर्ण करून आपल्या शरीराच्या ठिकऱ्या समाजाच्या शिरावर फोडून आपल्या प्रियतम पतीच्या चरणापाशी जात आहे.

'प्रिय पिताजी! तुम्ही स्वतःच तर रात्री म्हटले होते : 'बेटी! मी तुला तुझ्या मूळ स्वरूपात पाहून खूश होईन.' तुम्ही आपल्या वचनाचे पालन कराल अशी आशा आहे, आणि मला आपल्या या खऱ्या स्वरूपात पाहून जरूर खूश व्हाल.

'मी जिवंत राहून आपल्या पित्याच्या छत्रछायेत राहण्याचा आनंद उपभोगू शकले नाही. पण पिताजी, माझे जीवन पतीशिवाय चरखा कातण्यासारखे आहे. शिवाय भग्न हृदय आणि जोडलेला खिळा अजून किती आघात सहन करू शकेल! सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे सध्या जगातील माझे स्थान एका पळपुट्या खुन्याचे आहे. फाशी जाण्यापेक्षा कट्यार जवळ करणे मला अधिक सुखावह वाटले.

'जोपर्यंत जिवंत असेन तोपर्यंत तुमच्याजवळ राहीन असे तुमच्याजवळ मी कबूल केले होते ना! तुम्ही पाहिलंतच, मी आपला वायदा शेवटपर्यंत निभावला ना! शिवाय तुम्ही कित्येकदा कादंबरीचे अपूर्ण प्रकरण पूर्ण करण्याबद्दल बजावले होते, तुम्हांला

माहीतच आहे की माझी कादंबरी आणि माझे जीवन दोन्ही गोष्टी अभिन्न आहेत. म्हणूनच आज माझ्या कादंबरीच्या अपूर्ण प्रकरणाचा शेष भागही समाप्त झाला, त्याचबरोबर माझ्या जीवनगाथेच्या अपूर्ण प्रकरणाचा शेष भागही आज समाप्त झाला आहे.

'पूज्य पिताजी, तुमच्या कन्येचा तुम्हांला अंतिम प्रणाम! जीवनात पहिले आणि शेवटचे भेटून कायमची निघून जाणारी, मार्गांतील एक प्रवासिनी,

तुमची
सुंदरी'

ताज प्रिन्टर्स—69 नजफगढ रोड, इंडस्ट्रियल एरिया, नई दिल्ली द्वारा मुद्रित